गीतापद्यमुक्ताहार,

अथवा

श्रीमद्भगवद्गीतेचें पद्यात्मक प्राकृत भाषांतर.

137

हा ग्रंथ

कृष्णाजी नारायण आठले

फोटोग्राफर आणि पेंटर, राहणार टेंभू तालुके कऱ्हाड जिल्हा सातारा ह्यांनीं तयार केला,

तो

विष्णु केशवशेट सापळे

ह्यांनीं

लोकोपयोगार्थ

मुंबई येथें,

"निर्णयसागर" छापखान्यांत छापविला.

(सर्व हक्क मालकानें स्वाधीन. ठेविले आहेत.)

किंमत २ रुपये.

मुक्काम कोची सन १८८४ इसवी.

प्रस्तावना.

श्लोक (शार्दूलविक्रीडित).

रामाचें रचिलें चरित्र मुनिनें वाल्मीकिनें संस्कृतीं
नाहीं हानि कदापि अन्य कविंहीं तें वर्णितां प्राकृतीं ।
मुक्तांचा रचिलाचि हार वहिला जो रेशिमाच्या गुणें
तो कार्पासगुणेंकरूनि करितां काय प्रभेला उणें ? ॥

"मंत्ररामायण"—मोरोपंत.

मनुष्य कितीही ऐहिक व्यापार झटून करो; कितीही मुलांबाळांत व जायासुखसागरांत मग्न असो; कितीही संपत्तीस पूज्य मानून, तो संपादावयास दीर्घ प्रयत्न करो; कीं तिचा अभिलाष धारण करून, कृपणत्वाचें खापर मस्तकावर धरो; कीं ज्ञानाचें श्रेष्ठत्व मनांत बिंबल्यामुळें, सुयशध्वज फडकावयास व बिकट प्रसंगांतून पार पडण्यास धैर्यस्तंभाचा आश्रय करो; कसाही असला तरी, ज्याची विचारशक्ति ह्मणून जागृत आहे, व थोडा तरी सारासार विचार ह्मणून ज्यास कळतो आहे, त्याच्या मनांत जन्मांतून— निदान— एकदां तरी खालील प्रश्न उद्भवल्यावांचून राहावयाचेच नाहींत.

मी कोण ? व कोठून आलों ? मृत्यू हें काय प्रकरण आहे ? प्राणी व उद्भिजें हीं काय आहेत ? पृथ्वी, सूर्य, चंद्र, नक्षत्रें हीं काय आहेत ? प्राणी, उद्भिजें हीं नाश पावतांना आह्मी प्रत्यक्ष पाहतों, तद्वतच चंद्र, सूर्य हेही नाश पावतील कीं काय ? पावतील तर केव्हां ? सर्व पदार्थच जर नाशिवंत, तर सरते शेवटीं शून्यस्थिति होणार कीं काय ? शून्यस्थिति झाल्यास, ती किती कालपर्यंत

राहील? फळाशिवाय झाड होत नाहीं; व झाडाशिवाय फळ होत नाहीं; हें खरें, पण प्रथम कोण? झाड कीं फळ? सर्वांस उत्पन्न करणारा कोण? आणि परमेश्वरास तरी कोणी उत्पन्न केलें? कांहीं मूलतत्वांच्या संयोगव्यापारानें, कधीं कधीं अद्भुत कार्य किंवा गति उत्पन्न होते हें खरें; पण यांस नियम लावणारा कोण?

असे शतशः प्रश्न जेव्हां मनुष्याच्या मनांत एकामागून एक उद्भवतात, तेव्हां मनाची स्थिति कशी होते बरें? आतां येवढें खरें, कीं जे कोणी मूढ, म्हणजे विचारशून्य आहेत, त्यांच्या मनांत अशा प्रकारचे अंकुर क्वचित् उद्भवतात; व उद्भवलेच तरी ते विस्तार न पावतां जेथच्या तेथेंच लयास जातात. तसेंच जे लोक "[1] काम आणि क्रोध यांचे अंकित होऊन, केवळ ऐहिक भोगाच्या पूर्तीसाठीं अन्यायानें द्रव्यसंपादनार्थ सदा अतृप्त; आणि हें द्रव्य मी आज इतकें मिळविलें; उद्यां इतकें मिळवीनच; आज इतकें गांठीस आहे, उद्यां इतकें होणार. हा एक शत्रू तर आज मारला; बाकीच्यांचा समाचार उद्यां. आजकाल श्रीमंत काय तो मी; यशस्वी, भाग्यवान्, सुखी, बलाढ्यही मीच; सर्व लोकांवर माझी सत्ता आहे, माझी बरोबरी दुसरा कोण करणार, मी करीन ती पूर्वदिशा!!"

असे सदा ऐहिक सुखांत चूर होऊन गेलेले जे आहेत, त्यांच्या मनांत देखील वरील तरंग येतात, नाहीं असें नाहीं. पण ते कसे? गर्द आंधारास दुभंग करून जशी विद्युल्लता एकाएकीं "चक्क" करून तत्काल नाहींशी होते; आणि पाठीमागें तिचा मागमोसही राहत नाहीं त्यासारखे क्षणिक होत. असो.

हें दोघांविषयीं झालें. पण जो विचारी व ज्ञानी आहे, त्याची

---

१ श्रीमद्भगवद्गीता अ० १६ श्लोक १३, १४, १५ यांतील हें वर्णन आहे.

गोष्ट अगदींच निराळी !! त्या बिचाऱ्यास ह्या अशा कल्पना एका पाठीमागून एक येऊन अगदीं बेजार करून सोडतात. ज्यांचे ज्ञानतंतू विकसित झालेले नाहींत, ते लोक परमेश्वराबरोबर हुबाला देवून, व हा सर्व खेळ त्याचाच आहे असें समजून स्वस्थ बसतात. पण ज्ञानीजनाची अवस्था कठीण !!! तो नेहमी साधकबाधक प्रमाणें ताडून पाहून यांतून सार काय निघतें तें पाहण्यासाठीं रात्रंदिवस उरस्फोड करीत असतो. तो जों जों अधिक अधिक शोध करूं लागतो, तों तों त्याच्या ज्ञानतंतूंचीं टोंकें अधिकाधिकच बोथट होऊन निरुपयोगी होतात; आणि भर्तृहरीनें म्हटल्याप्रमाणें—

"[1] जईं कांहीं लागे अणुभरि कळाया मज; तसा
महा ज्ञाता तो मी म्हणुनि फुगलों मत्त-गजसा ॥
जईं विद्वत्तेजें लवलव कळे ज्ञानगठली
तईं मी मूर्खांचा मुकुटमणि ही खूण पटली"

वैराग्यशतकादर्श (स्वकृत).

अशी त्याची अवस्था होते. तेव्हांच मग मयूरपंतांसारखे महा कवि "अतर्क्य महिमा तुझा" व पुष्पदंतासारखे भगवद्भक्त—

"जिथें ब्रह्म्याचीही स्तवन करितां कुंठित मती"

महिम्नादर्श (स्वकृत).

असे निराशेचे उद्गार काढतात.

---

१ मूळ श्लोक—

यदा किंचिज्ज्ञोऽहं द्विप इव मदांधः समभवं
तदा सर्वज्ञोऽस्मीत्यभवदवलिप्तं मम मनः ॥
यदा किंचित् किंचित् गुरुजनसकाशादवगतं
तदा मूर्खोऽस्मीति ज्वर इव मदो मे व्यपगतः ॥

२ मूळ— "स्तुतिर्ब्रह्मादीनामपि तदवसन्नास्त्वयि गिरः"

कित्येकांचें ह्मणणें असें पडतें कीं, अनुभवासच सत्यत्व दिलें पाहिजे. त्यावर अभरंवसा उपयोगीं नाहीं. पण हें ह्मणणें गौण पक्षाचें आहे, असें सहज दिसून येतें. सूर्य हा दररोज प्रातःकाळीं पूर्वेकडून निघून अस्तमानीं पश्चिमेस जातो, हा अनुभव प्रत्येक मनुष्यास आहे. असें असतां विद्वान् लोक अशा ह्मणणाऱ्या मनुष्यास अज्ञ समजतात. व कोणी ह्मणेल कीं, मी आज घरांतून कोठें बाहेर गेलों नाहीं, एकेच ठिकाणीं बसलों होतों; तर तें विद्वान् लोक खोटें समजतात. आणि तूं दर एक तासास हजार मैल चालत होतास असें ह्मणतात; आणि प्रमाणांनीं सिद्ध करून दाखवितात. सूर्य व चंद्र, यांचें अंतर मोजावयास प्रत्यक्ष सांखळ्या कोणी टाकल्या आहेत? तरी पण विद्वान् लोकांच्या लेखास असत्य ह्मणण्याची कोणाची प्राज्ञा आहे?

यावरून पाहतां विद्वान् व ज्ञानी लोकांवर, व त्यांच्या लेखांवर, भरंवसाच ठेवला पाहिजे; त्यांवर असत्यपणाचा दोष लादणें ह्मणजे आपलें अज्ञान विशालरूपानें उघडें करणें होय. डोळ्यांसमोर प्रत्यक्ष वृक्ष असतांही, विद्वान् लोक जर सांगतील कीं तो वृक्ष नाहींच, तर आपणास मुकाट्यानें "हो" ह्मटलें पाहिजे.—आतां त्याची उपपत्ति विचारून घेणें हा भाग वेगळा—तसेंच, प्रत्यक्ष डोळ्यांसमोर कांहीं एक पदार्थ नसतांही, विद्वान् लोक जर ह्मणतील, कीं येथें एक झाड आहे; तरी तें आपणास चुचुंबित मान्य केलें पाहिजे. कारण केंस हा पोकळ आहे; तांब्यावरील कळंक हीं एका प्रकारचीं झाडें आहेत; स्वच्छ पाण्यांतही जीव असतात; माशीच्या पंखांवर सुंदर व अप्रतिम नाना रंगांची नकशी असते; हिरा आणि कोळसा हीं एकाच आईबापांचीं लेकरें आहेत; लांकडी पुतळे

बुद्धिबळें खेळतात; इत्यादि गोष्टी खऱ्या ठरल्या आहेत, असो.

याच न्यायानें आपणांस पूर्वीच्या एकाद्या महा तत्त्वज्ञ पुरुषाच्या वाक्याची उपपत्ति समजली नाहीं ह्मणून तुकारामासारख्या निस्पृह, सत्याभिमानी, व सर्वसंगपरित्यागी पुरुषाची सृष्टीही मिथ्या असल्या बद्दल लिहिलेलीं—

"लटिकें हांसें लटिकें रडें ।
लटिकें उडे लटिक्यापैं ॥ १ ॥
लटिकें माझें लटिकें तुझें ।
लटिकें ओझें लटिक्यापैं ॥ २ ॥
लटिकें गाये लटिकें ध्याये ।
लटिकें जाये लटिक्यापैं ॥ ३ ॥
लटिका भोगी लटिका त्यागी ।
लटिका जोगी जगमाया ॥ ४ ॥
लटिका तुका लटिक्या भावें ।
लटिकें बोले लटिक्यासवें ॥ ५ ॥"

तुकारामाची गाथा भाग २ पान १८६ अभंग २८७४.

असलीं वाक्यें असत्य कशीं ह्मणावींत ? तुह्मी व आह्मी प्रत्यक्ष दिसत असून, उभयतांही मिथ्या कसे ? असा कुतर्क घेऊन भगव-

१ विलायतेंत एक क्रीडागृह आहे. तेथें लांकडी पुतळे बुद्धिबळें खेळतात. त्या गृहावर पाटी लावलेली आहे. फी एक शिलिंग ह्मणजे आठ आणे पडते. यांतील कल्पना एवढीच आहे ह्मणतात कीं, दुसऱ्या मजल्यावर खेळणारे बसून यंत्रद्वारें पुतळ्यांस प्रेरणा करतात !!!

दुसऱ्यास खोटें ह्मणण्यापेक्षां, आपणासच त्याचीं प्रमाणें व उपपत्ति माहित नाहीं हें अज्ञान आहे असें मानणें अधिक प्रशस्त नव्हे काय? कारण गहन विचार केल्यानें अघटित सिद्धांताची ही उपपत्ति बसल्याचीं उदाहरणें अनेक आहेत.

"प्राचीनकालचे ऋषी पशूचें मांस काढून घेऊन त्यांस पुन्हा जिवंत करून सोडित असत." असें झटलें तर ज्यांची योगविद्येवर श्रद्धा आहे, व जे पूर्वीच्या ऋषींच्या आंगीं कांहीं अद्भुत व दैविक शक्ति होती असें मानतात; त्यांस कांहीं विशेष वाटणार नाहीं; पण अन्य लोकांस हें सर्व 'झूट आहे' असें वाटेल. पण चमत्कार हा कीं, सांप्रतही बकऱ्याचें मांस सुमारें आठदहा रत्तल काढून घेऊन त्यांस जिवंत सोडतां येतें. कित्येक लोकांस ही गोष्ट अगदींच खोटी वाटेल, पण खोटी नव्हे; शेकडों लोकांनीं पाहिलें व ऐकिलें असेल, कीं हल्लीं एका प्रकारचें विलायती बकरें. मिळतें, त्याच्या शेपट्याच्या झुबक्यांत महिना दोन महिन्यांत वर सांगितल्या इतकें मांस जमतें, इतकें मांस जमलें ह्मणजे त्या बकऱ्यास त्या मांसाचा भार होऊन त्रास येतो. मग लोक त्याच्या शेपटास एक चीर पाडून त्यांतून तो गोळाच्या गोळा काढून घेतात. अर्थातच खाणाराचेंही काम होतें, आणि बकऱ्यासही हलकें वाटून सुख होतें. असाच कांहीं प्रकार पूर्वी नसेल ह्मणून कशावरून? कल्पना करा कीं, वाहनावांचून हजारों खंडी ओझें, व शेकडों माणसें घेऊन एक गाडी एका दिवसांत हजारों कोस जाते, अथवा परद्वीपाची बातमी किंवा प्रत्यक्ष शब्द, एका निमेषांत येऊन पोंचतात, इत्यादि ज्या सुधारणा जाहल्या आहेत, त्या कांहीं दिवसांनीं सर्व नाहींशा होऊन पुन्हा रानटी स्थिति प्राप्त झाली; तर वरील दोन गोष्टींच्या

दंतकथेवर आणखी दहा खोट्या गोष्टी उत्पन्न होतील. पण तसें झालें ह्मणून, वरील दोन अद्भुत घडलेल्या गोष्टी खोट्याच्याच वर्गांत घालावयाच्या कीं काय? कदापि घालतां नये.

असो; तर अशा प्रकारचीं उदाहरणेंच शोधूं गेलें तर अनेक आहेत. तात्पर्य येवढेंच कीं जे जे ह्मणून महाज्ञाते होऊन गेले, त्यांची मंती अध्यात्माचा विचार करतांना कुंठित झाली. तरी जितका जितका ज्याच्यानें शोध लाववला, तितका तितका प्रत्येकानें यथामत्या लावलाच आहे. त्याचा सर्व यथास्थित विचार करून त्यांतील अद्भुत वाटणारे सिद्धांत प्रथमच खोटे असें गृहीत न धरतां, साधकबाधक प्रमाणांचा विचार करणें हेंच मनुष्यास उचित होय.

ज्ञान हें फार श्रेष्ठ आहे, याबद्दल कोणासही संशय नाहीं, व गीतेंतही सांगितलें आहेच[1]. तें ज्ञान जगन्नियंत्यानें सर्वांत श्रेष्ठ प्राणी जो मनुष्य त्यासच दिलें आहे. व त्याबरोबरच तें वृद्धिंगत करण्याची शक्तिही त्यास दिली आहे. तरी हें ध्यानांत ठेवलें पाहिजे कीं, त्यास ती सर्व अवस्थेंत सारखी नाहीं येवढेंच नव्हे, तर तिचा कांहीं अवस्थेंत तर अभावच असतो. मनुष्यास मुख्य अवस्था पाहूं गेलें तर पांच दिसतात. गर्भावस्था, बाल्यावस्था, तारूण्यावस्था, वृद्धावस्था, व मृतावस्था. गर्भावस्थेंत ज्ञानाचा सांठा मुळींच नसतो. बाल्यावस्थेंत ज्ञानाचा प्रादुर्भाव होतो खरा, पण तेंही बाल्यावस्थेतच असतें. अशा समयीं सुखद विषय ह्मटले ह्मणजे शंख, कवडा, बाहुली, गोटी, बाजा, चिमणी इत्यादि पदार्थ होत. ह्या अवस्थेंत जर एक कांचेचा मणी हरवला तर, तारूण्यावस्थेतील हिरा सांडण्याइतकें दुःख होतें. ह्या स्थितींतील संपत्ती ह्मटली ह्मणजे लाडू,

---

१ अध्याय ४ श्लोक ३८.

लाह्या, पोहे, गूळ, आणि साखर; आणि परमेश्वर झटला म्हणजे आई.

या स्थितींत कांहीं काल गेल्यावर तारूण्यावस्था प्राप्त होते. तारूण्यावस्था प्राप्त होतांच पहिले आचारविचार बदलून भर्तृहरीनें म्हटल्या प्रमाणें—

"बुझाला होता जैं मदन तिमिरें ज्ञानतरणी
दिसे तैं नेत्राला सकल तरुणीयुक्त धरणी—

वैराग्यशतकादर्श (स्वकृत).

अशी अवस्था होते. आणि—"असारे खलु संसारे सारं सारंगलोचनाः"—ह्या सर्व संसारांत कांहीं अर्थ नाहीं, फक्त एक "मृगलोचना"—हाच मनाचा सिद्धांत ठरून राहतो. आणि बाल्यावस्थेंत केलेले विचार, व ज्या पदार्थांवर विषेश आसक्ती ठेवली असते, ते पदार्थ क्षुद्रवत् भासूं लागतात. ज्या नेत्रांस पूर्वी कांचमणी, गुंजा मौल्यवान् वाटत असत; त्याच नेत्रांस ते आतां तुच्छ वाटून सुवर्ण, व हिरे मौल्यवान् वाटूं लागतात. ज्या मनास पूर्वी मातृस्तन चोखण्याची इच्छा असते, तेंच मन ह्या अवस्थेंत तरूणीचे स्तन आलिंगण्याची इच्छा करितें. तसेच जे विचार, ज्या समजुती, व जीं संभाषणें बाल्यावस्थेतील आठवत असतात, तीं सर्व मतें चुकीचीं, व अल्पविचाराचीं आहेत, असें वारंवार मनांत येऊन पश्चात्ताप होतो. व बुद्धि अंमळ विकसित झाली, तर हे केंस पिकलेले, खोकलेकरी, काठी टेंकून चालणारे पिता प्रपितामहादि म्हातारे, मतिमंद; केवळ

---

१ मूळ—

यदासीदज्ञानं स्मरतिमिरसंस्कारजनितं
तदा दृष्टं नारीमयमिदमशेषं जगदिति ॥

भोजनभाऊ असेंही कित्येकांच्या मनांत आल्यावांचून राहत नाहीं. तारुण्यावस्थेमध्यें मनुष्य नेहेमी ह्मणतो कीं, मी काय आतां बोळ्यांनीं दूध पितों आहें ? याचा अर्थ येवढाच कीं, तारुण्यावस्थेमध्यें मनुष्यास असें वाढत असतें कीं, मी जें जें बोलतों, जें जें आचरण करतों, जे जे सिद्धांत ठरवितों, व ज्या ज्या मतांचें प्रतिपादन करतों तीं तीं सर्व खरींच; त्यांत चूक ह्मणून नाहींच.

असे जे ठाम ज्ञालेले सिद्धांत त्यांची वार्धक्यांत काय दशा होते पहा ! ! ! पूर्वी जसजशी तारुण्यावस्था प्राप्त ज्ञाली तसतशा बाल्यदशेतील एकेक अर्वाच्य खोडी व पोरकट समजुती मागें मागें टाकिल्या तद्वतच त्यांतही होतें. खरेंच—

"कृतांतस्य दूती जरा कर्णमूले
समागत्य वक्तीति लोकाः शृणुध्वम् ।
परस्त्रीपरद्रव्यवांछां त्यजध्वं
भजध्वं रमानाथपादारविंदम् ।"[1]

तदनुरूप विचार बदलायचेच. जी स्त्री पूर्वी प्राणापेक्षांहि प्रिय वाटते तिचा—

"शशिनीव हिमार्तानां घर्मार्तानां यथा रवौ ॥
मनो न रमते स्त्रीणां जरापीतेंद्रिये पतौ"[2]

---

१ अर्थ— "जरा ही काळाची दूती होय. ती प्रत्येकाच्या कानांशीं लागून सांगते "अहो, ऐका" परस्त्रीपरद्रव्यांची इच्छा सोडून, परमेश्वराच्या पदकमलाचें भजन करा."

२ अर्थ— "थंडीनें कुडकुडल्यास जसें चांदणें; किंवा घामानें थबथबलेल्यास जसें ऊन, दुःसह होतें तद्वतच, ज्यांचीं इंद्रियें जरेनें गलित ज्ञालीं असतात त्यांस स्त्रीही दुःसह होते"

वाट येतो. खरेच तें, जेव्हां ऐहिक सुखांचे सर्व व्यापार बंद होतात, हजारों लोकांस आपल्या प्रभावानें दिपवून टाकणारी लेखणी पेनशन घेते; ज्या नेत्रबाह्यपटलांवर निरंतर चित्रविचित्र देखाव्यांचें प्रतिफलन असावयाचें, त्यांवर काळ्या रंगाचा अक्षयी पडदा सुटून, नेत्रद्वयाच्या नाशाबरोबर अखिल ब्रह्मांडाचा नाश असा समीकरणाचा पेटा बसतो, व हजारों मंजूळ स्वरमय जगनिर्यत्यांचा अक्षयीचा पियानोचा, कर्णरंध्रें गच्च झाल्यानें भाता फुटून गेल्यासा वाटतो; व दोन पायांचा सदा जीन आंवळलेला श्यामकर्ण जेव्हां मेटेसुटीस येतो तेव्हां सहजच—

"भोगेच्छा सर्वमेली सबळ पुरुषमीमान तोही गळाला
गेले स्वर्गास माझे सकल समवयी मित्रमेळा बुडाला ॥
काठी टेंकून हा मी हळुहळु उठतों लोचनें भिंत झालीं
आतां येईल केव्हां मरणसमय ही भीति पोटांत आली"

असे उद्गार निघूं लागतात. आणि तारुण्यावस्थेमध्यें काम, क्रोध, दंभ यांस वश होऊन केलेली आईबापांची हेळसांड, आप्तांचा तिटकारा, शहाण्यांचा अव्हेर, ज्ञात्यांचा अपमान, साधूंचा छळ इत्यादि कृत्यें पोरकटपणानें घडलीं असें वाटून, त्याबद्दल जीवास खातें आणि पश्चात्ताप होतो. पण मग उपयोग काय—

---

१ मूळ—

निवृत्ता भोगेच्छा पुरुषबहुमानोऽपि गलितः ।
समानाः स्वर्याताः सपदि सुहृदो जीवितसमाः ॥
शनैर्यष्ट्युत्थानं घनतिमिररुद्धे च नयने ।
अहो! दुष्टः कायस्तदपि मरणोपायंचकितः ॥

" [1]पेटे धाम तिथें विहीर खणितां होणार कैंचें फळ "

वैरा० दर्श (स्वकृत).

या प्रमाणें सर्व उपाय खुंटतात, आणि भर्तृहरीनें ह्मटल्या प्रमाणें—

" [2]क्षणामध्यें होतो शिशु मग पुढें कामरसिक
दरिद्रीही होतो क्षणभरि पुढें थोर धनिक ॥
जरेनें रंगोनी नटसम बरें सोंग सजुनी
भवांतीं जातो हो नर यमपुरीं दुःखभवनीं "

वैस० दर्श (स्वकृत).

कोशस्थ कीटकाप्रमाणें नानारंग पालटून शेवटीं, नाटकांतील सोंगाप्रमाणें ही स्वारी पंचमस्थितींत प्रयाण करते.

पंचमस्थिति इतर चार स्थितींहून अगदींच भिन्न आहे. मनुष्यास हिच्या इतकी भयंकर स्थिती कोणतीच वाटत नाहीं, वरील चारही स्थितींत क्षेत्रांतील क्षेत्रज्ञ ह्मणजे देहांतील आत्मा निकट सान्निध्यानें असतो. परंतु पंचमस्थितींत ह्या दोहोंचा वियोग होतो. यावरून " मृतावस्था " ह्मणजे दोन अवस्था ज्ञाल्या. क्षेत्रज्ञ रहित क्षेत्र किंवा आत्म्यावांचून देह, ही एक अवस्था; व क्षेत्ररहित क्षेत्रज्ञ ह्मणजे देहावांचून आत्मा, ही दुसरी अवस्था. यावरून हें ध्यानांत येईलच कीं, पहिली अवस्था मुळींच विचारणीय नाहीं. कारण क्षेत्र

---

१ मूळ—

" संदीप्ते भवने तु कूपखननंप्रत्युद्यमः कीदृशः "

२ मूळ—

क्षणं बालो भूत्वा क्षणमपि युवा कामरसिकः ।
क्षणं वित्तैर्हीनः क्षणमपि च सम्पूर्णविभवः ॥
जराजीर्णैरंगैर्नट इव वलीमंडिततनु-
र्नरः संसारांते विशति यमधानीयवनिकाम् ॥

हें जड तत्वांचें बनलें आहे, हें समजावयास कांहीं विशेष ज्ञानाची गरज नाहीं. व थोड्याच विचारा अंतीं हेंही कळून येईल कीं, जड तत्त्वें सर्व नाशिवंत असून, त्यांच्या रजःकणांचा समावेश त्यांच्यांतच व्हावयाचा. तेव्हां अर्थात, एकच प्रश्न शिलक राहतो, व तो फार महत्त्वाचा आहे; तो हाच कीं, देह्याच्या देहामधें व्यापणारें जें सूक्ष्म तत्त्व तें कोठें जातें? त्याचा नाश होणें शक्य आहे कीं काय? ह्याचें उत्तर गहनतर आहे. आजपर्यंत पृथ्वीवर जे कोणी साधु, संत, ज्ञानी व तत्त्वज्ञ होऊन गेले, त्या सर्वांचें पर्यवसान ह्याच प्रश्नाच्या उलगड्यावर आहे. व त्या प्रत्येकांनीं यथामत्या प्रगट केलेले विचार एकत्र केले असतां ते बहुतकरून सर्वांशीं जुळतात. ह्या सूक्ष्मतत्त्वाचा जो विचार तीच अध्यात्मविद्या होय. योगविद्या, ब्रह्मविद्या, समाधि हे सर्व हिचेच प्रकार होत. ह्याच विद्येच्या अभ्यासानें ईश्वरतत्त्व समजतें, व जन्ममरणाचा फेरा चुकतो, सदा ब्रह्मानंदांत शांतिपद प्राप्त होतें, असें साधुसंतांचें व ज्ञात्यांचें मत आहे.

मागील जन्म आपणास नव्हता, व पुढील जन्मही आपणास येणार नाहीं, अशा शंका घेतल्या तर त्या अगदीं पुळपुळीत दिसतात.

एक चमत्कार पहा!! कीं ह्या सर्व मनुष्यांनीं सांप्रत यंत्रशास्त्र कितीबरें पूर्णदशेस आणलें आहे? पण त्या सर्वांत उपयोगांत फार पडणारी अशी एकच बीजाकृति आहे, ती कोणती? तर वर्तुळ. घड्याळांत कोणती आकृती मुख्य असते? वर्तुळ. चंद्रसूर्यांची उंची काढण्यास मुख्य साधन काय? वर्तुळ. सरळ रेषेस मुख्य साधन जो काटकोन, तो तयार करण्यास प्रथम काय पाहिजे? वर्तुळ. गिरणी, टांकसाळ, पवनचक्की, पानचक्की, आगगाडी, इ० यंत्रांच्या वाफेच्या किंवा वायूच्या गतीस वृद्धिंगत करणार कोण? वर्तुळ. असो.

तर या प्रमाणें वर्तुळ, व वर्तुळगति ह्या मनुष्याच्या कामांत तर सर्वत्र दिसण्यांत येतातच; पण परमेश्वराच्या कामांत तर त्यांवाचून एकही पदार्थ नाहीं म्हटलें तरी चालेल. पृथ्वी, चंद्र, सूर्य ह्यांचीं गोलरूपें व वर्तुळगति, मार्ग, ब्रह्मांड, ब्रह्मांडें या शब्दावरूनच सिद्ध होतात. व सर्वांस राहटगाडग्याचाच नियम लागू झालेला दृष्टीस पडतो. जगाच्या इतिहासावरून पाहतां पृथ्वीवरील राष्ट्रेंही मोठ्यां प्रमाणेंच होत. एकराष्ट्र विजई होऊन कांहीं कालपर्यंत भरभराटीस लागतें न लागतें, तों दुसरेंच भरभराटीस येऊन पहिल्यास उतरती कळा लागून तें अगदीं जमीनदोस्त होतें. इतक्यांत तिसरेंच विजयी होऊन आपला पगडा बसवितें. कलाकौशल्य वाढतें वाढतें, आणि पुन्हा लयास जाऊन त्याचा मागमोसही राहत नाहीं. आणि सर्वत्र रानटी स्थिति होते. पुन्हा कांहीं कालांतरानें चढतीकला लागून पुंन्हा भरभराटी होते. नद्यांचें पाणी वाहून जाऊन समुद्रास मिळतें, समुद्राच्या पाण्याची वाफ होऊन आकाशांत जाते, तीस थंड हवा लागून तिचें फिरून पाणी होऊन पर्वतावर पडून नद्या वाहूं लागतात. हाच क्रम सर्वत्र होय.

वरील लेखावरून असा तर्क होतो कीं, ज्याअर्थीं गर्भावस्था, बाल्यावस्था, तारूण्यावस्था, वृद्धावस्था, व मृतावस्था, प्राप्त होतात; त्याअर्थीं मृतावस्थेच्या पुढें पुन्हा गर्भावस्थाच प्राप्त होण्याचा संभव आहे. कारण जमिनींतून वृक्षाचा मोड आला; त्यास पानें फुटलीं; त्याचा वृक्ष बनला; त्यास फळें आलीं; व तीं पक्वदशेस येऊन वृक्षापासून सुटून खालीं पडलीं तर पुढें काय? तर पुढें हेंच; त्याच फळाचें बीज होऊन जमिनीच्या संसर्गानें पुन्हा झाड होईल. हाच त्याचा क्रम. आपणस स्मरत नाहीं येवढ्या वरूनच मागील जन्म

नव्हता असें म्हणतां येत नाहीं. कारण गर्भावस्था आपणास स्मरत नाहीं, म्हणून ती आपणास मुळींच नव्हती म्हटलें तर लोक आपणास मूर्ख म्हणतील. असो.

तर पुनर्जन्म आहेच; साधुसंतांच्या लेखावर अभरंवसा उपयोगी नाहीं. गर्भावस्थेपेक्षां बाल्यावस्था श्रेष्ठ; बाल्यावस्थेपेक्षां तारुण्यावस्था श्रेष्ठ; तारुण्यापेक्षां वार्धक्य श्रेष्ठ; इतकें ज्याअर्थीं खरें आहे, त्याअर्थीं पुढील पंचमावस्था सर्वांत श्रेष्ठ, केवल ज्ञानाची खाण असलीच पाहिजे. व तींत म्हणजे क्षेत्रज्ञाच्या शोधांत ज्ञानवृद्धीचें प्रसरण केलें असतां त्याची परमावधी होईल यांत संशय नाहीं. तेव्हां अध्यात्म विद्येचें ज्ञान प्रत्येक मनुष्यास कळणें अगदीं अवश्य आहे; व तें त्यास होईल तितकें लौकरच संपादन केलें पाहिजे. कारण पंचमस्थिति निरंतरची आहे, तृतीय चतुर्थ अवस्थेसारखी क्षणभंगुर नव्हे. लोड, तक्ये, पान, तंबाखू, पलंग अशा ऐहिक सुखांतच गर्क होऊन पंचमस्थितीचें विस्मरण झालेल्यांस तुकारामांनीं जी सूचना केली आहे ती फारच हृदयभेदक आहे—

" धन मेळवूनि कोटी ॥ सवें नये रे लंगोटी ॥
पानें खाशील उदंडें ॥ अंतीं जाशी सुकल्या तोंडें ॥
पलंग न्याहाल्या सुपतीं ॥ शेवटीं गोवऱ्या सांगाती ॥
तुकाम्हणे राम ॥ एक विसरतां श्रम— "

तु० गा० पा० ४६२, अ० ३८३५

हें ऐकिलें म्हणजे यमाजी भास्काराची स्वारी जशीकाय दत्त करून पुढें उभी आहेशी वाटते. आणि भर्तृहरीच्या श्लोकाचा अनुभव येतो—

"वाटे सुंदर चांदणें तृणवती भू रम्य वाटे अती
विद्या रम्य सुभाषितें बहु वरी बैठेस जीं सूचती ॥
प्रेमानें रुसतें क्षणांत हसतें तें रम्य हो स्त्रीमुख
सारें रम्य खरेंच जोंवरि नसे मृत्यू उभा सन्मुख"

वै० श० दर्श० श्लो० ८८ (स्वकृत).

तेव्हां ज्याअर्थीं आपली सध्याची स्थिति अगदीं क्षणिक आहे, व पंचमस्थिति चिरस्थायी आहे; त्या अर्थीं नकली डागिन्यास न भुलतां, टिकाऊ डागिन्याकडे वळणें हा जो दूरदर्शित्वाचा धर्म त्यास अनुसरून पाहिलें ह्मणजे अध्यात्मविद्या प्रत्येक मनुष्यास फार अवश्यविचारणीय असून ती होईल तितकी लौकर संपादन कैली पाहिजे. व त्यासाठीं तशा विद्येचे ग्रंथ धुडाळणें हेंच मनुष्यांचें खरें कर्तव्य कर्म, व जन्मास आल्याचें सार्थक होय.

तर असें अपूर्व विद्याधन ज्यांत भरलें आहे, असा आपल्या पूर्वजांचा ठेवा कोणता ह्मणाल? तर "श्रीमद्भवद्गीता" हा होय. सर्व जगांत आर्यलोक श्रेष्ठ, त्यांचा सर्वांत श्रेष्ठ ग्रंथ जो महाभारत—कीं ज्याच्या येवढा ग्रंथ सर्व दुनियेंत नाहीं—हा ग्रंथ सुमारें दोन हजार वर्षांपूर्वीं व्यासनामक महा ऋषींनीं रचिला आहे. त्याचे मोठाले भाग अठरा आहेत त्यांस पर्वें ह्मणतात. त्यांतील भीष्मपर्वांत हा श्रीकृष्णार्जुनाचा अतिगहन आणि रम्य संवाद आहे. ह्या ग्रंथाचे श्लोक अवघे ७०० च आहेत. तरी यांत सर्व वेदाचें सार आहे— व

---

१ मूल—

रम्याश्चंद्रमरीचयस्तृणवंती रम्या वनान्तस्थली ।
रम्यं साधुसभासमागमसुखं काव्येषु रम्याः कथाः ॥
कौपोपाहितबाष्पबिंदुतरलं रम्यं प्रियाया मुखं ।
सर्वं रम्यमनित्यतामधिगतं चित्तेन किंचित्पुनः ॥

"गीता सुगीता कर्तव्या किमन्यैः शास्त्रविस्तरैः ।
या स्वयं पद्मनाभस्य मुखपद्माद्विनिःसृता ॥"

इत्यादि वचनावरून तिचें माहात्म्य केवढें आहे हें ध्यानांत येईलच ह्यांत पहिला प्रश्न श्लोक धृतराष्ट्राचा आहे. ९ श्लोक दुर्योधनाच्या भाषणांचें अनुकरण संजयाच्या पोटश्लोकांत आहे. ३२ श्लोक संजयाचे आहेत; ८४ श्लोक अर्जुनाचे आहेत; व बाकी राहिलेले ५७४ श्लोक प्रत्यक्ष श्रीभगवंताच्या मुखांतून निघालेले आहेत असें गीतेतच संजयानें स्पष्ट सांगितलें आहे. (अ० १८ श्लोक ७५).

"[२]स्वच्छन्दोच्छलदच्छकच्छकुहरच्छातेतरम्बुच्छटा-
मूर्च्छन्मोहमहार्षिहर्षविहितस्नानान्हिकान्हाय वः ॥
भिन्द्यादुद्यदुदारदर्दुरदरीदीर्घादरिद्रद्रुम-
द्रोहोद्रेकमहोर्मिमेदुरमदा मन्दाकिनी मन्दताम् ॥"

अशा पदलालित्यावर, किंवा—

"[३]पिबन् जंबुश्यामं मिहिरदुहितुर्वारि मधुरं ।
मृणालीभुंजानो हिमकरकलाकोमलरुचः ॥
क्षणं हृष्टस्तिष्ठन् निबिडविटपे शाखिनि सखे !
सुखेन प्रस्थानं रचयतु भवान् वृष्णिनगरे ॥"

हंसदूत. श्लोक. १४.

१ वाचावी तर गीताच वाचावी, तिजपुढें अन्य शास्त्रांचा पाड काय ? कारण ती साक्षात् विष्णूच्या मुखांतून निघाली आहे.

२ ह्या श्लोकाचा भावार्थ संस्कृतज्ञांस समजेलच. प्राकृतजनांस त्याची फारशी आवश्यकताही नाहीं, कारण हा श्लोक फक्त शब्दालंकाराचेंच उदाहरण आहे. यास्तव अर्थ दिला नाहीं.

३ टीका—

पिऊनी कालिंदीजल मधुर जंबूसम निळें ॥ मृदू भक्षूनीयां हिमकररुची तोयजमुळें
करोनो विश्रांती निबिडतरु शाखेवर जरा ॥ सुखानें तूंजाई मग खगवरा वृष्णिनगरा ॥

हंसदूतादर्श (स्वकृत).

अशा वर्णनाच्या भपक्यावरच जी मंडळी खूष होणारी आहे, तीची ह्या ग्रंथांत अगदींच निराशा होईल. व

" सा कविता सा वनिता यस्याः श्रवणेन दर्शनेन नापि कविहृदयं विटहृदयं सरलं तरलं च सत्वरं भवति "

सु० र० भा० पान. ३७.

असाच ज्यांचा समज असेल, त्यांना मात्र गीताग्रंथ वाचण्यापेक्षां काडेचिरायताचा काढा घेणें बरें वाटेल. कारण कीं, हें काव्य बहुतकरून अनुष्टुप्छंदांतच लिहिलेलें आहे. आणि 'अनुष्टुप्' छंद तर असा आहे कीं, ह्यापेक्षां नीरस छंद सर्व छंदशास्त्रांत सांपडावयाचा नाहीं. बिचारा सर्व कवींचें मायपोट. कोठें कांहीं जुळेनासें झालें तरी आपला अनुष्टुप्छंदाचा आश्रय मिळायचाच. आणि ह्याच्या आश्रयानें शीघ्रकवित्वालाही उशीर नाहीं. आतांच पाहाना ?

" रेरे मोरू उगा कां तूं खेळुनी वेळ काढिशी स्लेटपाटी लेखणी घे पाढे काढूनि दाखवी "

जुळलीच कविता. एका चरणाच्या शेवटीं " तूं " तर दुसऱ्याच्या शेवटीं " शी " बिचाऱ्या छंदाला यमकाची देखील गरज नाहीं. असो; तर ह्याच छंदानें सर्व गीता रचलेली आहे.— पाठभेदामुळें, कीं काय नकळे— त्यांतही कोठें कोठें छंदोभंग आहेत. पण ह्या सर्वांचा मोबदला अर्थ गांभीर्यांत भरून काढला आहे. विचारी मनुष्य जों जों खोल दृष्टीनें पाहील, तों तों त्यास अधिकाधिक आनंदच होईल ह्यांत तिळमात्र संशय नाहीं. गीतेंतील प्रत्येक श्लोक

१ अर्थ— " तीसच कविता ह्मणावी; कीं जी ऐकून कवीचें हृदय सुप्रसन्न होतें; व तीसच स्त्री ह्मणावी; कीं जीस पाहून कामी पुरुषाचें अंतःकरण चंचल होतें. "

तर काय ! पण प्रत्येक शब्दही ज्ञानाचें भांडार, आनंदाचें आगर, ईशतत्त्वाचा मार्ग, सौजन्याचें वळण, क्रोधाग्नीचा मेघ, कामतृणाचा अग्नि, लोभमत्तगजाचा केसरी, असा आहे अशी त्याची पूर्ण खात्री होईल. आणि असें आहे म्हणूनच सर्व कवि तिजवर अगदीं लोलुप झाले आहेत. गीतेवर ज्यानें टीका केली नाहीं असा कवि विरळा !!

ह्या ग्रंथाचे अध्याय १८ आहेत. ते म्हणजे सारख्याच श्लोकांचे आहेत असें नाहीं. विषयाच्या मानाप्रमाणें कमीजास्त आहेत. त्या प्रत्येक अध्यायांतील ठोकळ ठोकळ विषयांचें येथें निरूपण केलें असतां नूतन वाचकांस बरेंच साह्य होईल. हें निरूपण यथास्थितपणें करूं गेल्यास ग्रंथविस्तार अतिशयच होईल; यास्तव तसें न करितां आर्चे संक्षेपानें थोडक्यांतच दिग्दर्शन करून हा विषय आटपतों.

कौरवांच्या व पांडवांच्या युद्धास प्रारंभ झाला तेव्हां, समरांतील सर्व वृत्तांत, प्रज्ञाचक्षु जो धृतराष्ट्र त्यास कळावा, या हेतूनें श्रीव्यासांनीं आपला शिष्य संजय, धृतराष्ट्राजवळ ठेविला होता. त्यास धृतराष्ट्रानें विचारिला, व संजयानें निवेदन केला, असा याचा संबंध आहे.

प्रथमाध्यायाच्या पहिल्या श्लोकांतच धृतराष्ट्रानें प्रश्न केला. संजया, पुण्यभूमी जें कुरुक्षेत्र, तेथें माझे आणि पंडूचे पुत्र युद्धाची इच्छा धरून आल्यानंतर त्यांनीं काय केलें बरें? त्यावरून संजय सांगतो—पांडवांकडील दळभार आपणापुढें थाटून उभा राहिलेला दुर्योधनानें पाहून द्रोणाचार्याकडे गेला. आणि तिकडील महान् महान् योद्धयांचीं नांवें व त्यांचा पराक्रम सांगून म्हणाला, गुरुमहाराज, पाहिलेंत का हें पांडवांचें सैन्य !!! ह्यांत एक एक धेंडें कशी

आहेत पाहिलींतना ? एकापेक्षां एक !! ह्या हत्तींच्या रांगा पहा !! कशा एकसारख्या लागल्या आहेत ! अश्वरचना तरी काय !! हा पहा हिकडे रथाचा कोट !! एकून रचणाराचीतरी धन्य आहे !! आपला शिष्य, आणि द्रुपदराजाचा पुत्र, यानेंच ही रचना केली. तेव्हां हिजबरोबर आमचा टिकाव लागण्याचें काम कठिण दिसतें. मजकडेही योद्धे नाहींत असें नाहीं; फार तर काय ? पण माझ्या जिवासाठीं जीव देणारे असे असंख्य योद्धे आहेत. आणि सैन्याचें आधिपत्यही भीष्माचार्याकडे आहे, तरी देखील आपण सर्वांनीं त्यास मदत करावी हेंच उचित होय.

याप्रमाणें दुर्योधनाचें भाषण संपतें आहे तोंच, आपल्याकडून तयारी झाली असें सुचविण्याकरितां भीष्माचार्यांनीं सिंहनाद करून शंख वाजविला. हिकडे पांडवांकडील सेनापति भीमसेन, यानेंही सिंहनाद करून मोठा शंख वाजविला. असें होतांच, दोन्हीं सैन्यांत हजारों रणवाद्यें सुरू झालीं. त्या योगेंकरून दोन्ही सैन्यांतील वीरांस वीरश्री चढली, आणि बाहू फुरफुरूं लागले.

पांढरेसफेत अश्वांच्या दिव्य रथांत बसलेला अर्जुन पांडवसैन्याच्या मध्यभागीं होता. आणि त्याच्या रथाच्या धुरेवर, श्रीकृष्ण भगवान् सारथ्यकर्म करावयास बसले होते. इतक्यांत अर्जुनाच्या मनांत आलें कीं, आज कोणकोणत्या योद्धयांशीं गांठ आहे ? तें एकदां प्रत्यक्ष पहावें. ह्मणून आपला रथ दोन्हीं सैन्यांच्या मध्यभागीं नेवविला. आणि पाहूं लागला तों, गुरु, आजे, भाऊ, मामे, श्वशुर इत्यादि सर्व आपलेच आप्त आहेत. परकीय कोणीच नाहीं. असें पाहून अर्जुनाच्या पोटांत दया उत्पन्न झाली. आणि भगवंतास ह्मणाला, भगवंता, माझ्या हातून मोठाच अविचार घडला. एका राज्यलो-

माझाठीं मी आपल्या भावाबंदांस मारण्यास तयार झालों ना !! धिक् माझें जिणें !! हा दुर्योधन, आणि दुःशासन, हे सर्व आम्ही मिळून एकत्र खेळलों, एकत्र जेवलों, एकत्र विद्याभ्यास केला; असें असतांना त्यांवर शस्त्र धरायचेंना !! हाय हाय !! हा लक्ष्मण; आणि हा वृषसेन ! कालचीं लेंकरें हीं !! मांडीवर खेळावयाचीं, आणि खाऊ मागायचीं; ज्यांचा ओंठ पिळला तर दूध निघेल. त्या सर्वांचे मी खाटकासारखे गळे कापावेत ना !! तेंही असो. पण हे आमचे आजोबा !! प्रत्येकानें ज्यांस पूज्य मानून मान द्यावा अशी ज्यांची योग्यता व वय ! तसेच हे गुरुवर्य द्रोणाचार्य ! सर्व धनांपेक्षां श्रेष्ठ जें विद्याधन तें देतांना ज्यांनीं अनेक प्रकारें मजकरितां कष्ट सोसले, व ज्यांनीं अश्वत्थाम्यापेक्षांही मला अधिक म्हणविलें; त्यांस देहांत प्रायश्चित्त हीच गुरुदक्षणा देण्यास मी तयार झालों ना !! जळो माझें जिणें ! धिक्कार असो माझ्या विद्येला आणि शौर्याला !! बेहत्तर आहे, कीं, देवासारख्या गुरुश्रेष्ठांना मारून, त्यांच्या रक्तपातानें दूषित झालेलें राज्यसुख भोगावें त्यापेक्षां भीक मागावी !! आग लागो त्या राज्याला, आणि सुखाला ! त्याच्या पायीं गुरुश्रेष्ठांची हत्या करून रौरव नरकांत पडूं काय ? छेः ! असलें अघोर कर्म मी कधीं करणार नाहीं. अबब !! केवढें हो हें पाप !!

कृष्णा, मी म्हणून कांहीं आतां युद्ध करणार नाहीं. ही पहा माझी अवस्था काय झाली ! आंगास कंप सुटला, डोळ्यांस आंधारी आली, धनुष्य उचलण्याचीही शक्ति उरली नाहीं. मी तर हें धनुष्य टाकलेंच खालीं. शत्रूंनीं येऊन माझा आतां गळा कापला तरी पत्करला. इतकें बोलून धनुष्यबाण खालीं टाकून अर्जुन स्वस्थ बसला.

येथें पहिला अध्याय संपला. कोणास वाटेल कीं यांत, राजनामावळी, व थोडासा कथाभाग, इतकेंच काय तें आहे. पण तसें नव्हे. सूक्ष्म पाहिलें तर प्रत्येक श्लोकांत एकेका व्यक्तीचा स्वभाव व्यक्त होतो. विस्तारभयास्तव स्थलें दाखवितां येत नाहींत, तरी एवढें लक्षांत ठेवावें कीं, ह्या अध्यायांत धृतराष्ट्राचें कापट्य आणि संजयाचें स्पष्ट वक्तृत्व; दुर्योधनाचा कुत्सितपणा, आणि निंदकपणा; भीमाचा पराक्रम, व इतर वीरांचें शौर्य; भीष्माचार्यांची सहनशीलता, आणि द्रोणाचार्यांचें श्रेष्ठत्व; भगवंताचें भक्तवात्सल्य, व अर्जुनाची भक्ति. इत्यादि गुण मोठ्या चातुर्यानें दाखविले आहेत. आणि त्यांतूनही अर्जुनास गीतेतील मुख्य नायकाची योग्यता, त्याच्या आंगच्या गुणांनीं फारच व्यक्त होते. भीष्म, द्रोण व कर्ण, यांची शेंकडों वेळां भेंबेरी उडवून देणारा जो अर्जुन, त्याचा "वज्रादपि कठोराणि मृदूनि कुसुमादपि" अशा प्रकारचा कोमल स्वभाव पाहून वाचकांच्यां मनावर अर्जुनाच्या सौजन्याचा असा कांहीं ठसा उमटतो कीं, क्षणभर त्याची मती थक्क होते.

तेव्हां ज्यानें एका क्षणांत असल्या अर्जुनाच्या निबिड मोहतिमिराचीं पाळेंमुळें खणून काढून चोहींकडे ज्ञानसूर्याचा प्रकाश पसरून, विगलित झालेल्या अर्जुनाच्या बाह्या फुरफुरिवल्या; व अश्रूनें डबडबलेल्या नेत्रांत आवेशाची लाली आणली, व आंगांतील कंप काढून वीरश्री भरली, त्याच्या वक्तृत्वशक्तीची, त्याच्या ज्ञानाची, आणि त्याची किती बरें धन्यता वाटावी!!! असो.

दुसऱ्या अध्यायाच्या प्रारंभीं, भगवंतांनीं अर्जुनाकडे पाहिलें तों, अर्जुनाचे डोळे पाण्यानें डबडबले आहेत, सर्वांगास कंप सुटला आहे. गळा दाटून येऊन मुखश्री म्लान झाली आहे. असें पाहून भगवान्

हांसले, आणि ह्मणाले, अर्जुना, हा भलताच भ्रम तुला कोठून उत्पन्न झाला? अरे तूं कसाही झालास तरी क्षत्रियाचा छावा आहेस; समरांगणांत मारावें किंवा मरावें हाच तुझा धर्म. असें असतांना हा भागुबाईपणा तुला कोठून सुचला? आतां हें शस्त्र तूं खालीं टाकलेंस खरें, पण हे तुझे शत्रु आणि जमलेले राजे काय ह्मणतील याचा विचार केलास काय? काय हो बुळगा अर्जुन हा!! आह्मांस पाहून आपला पळत सुटला!! मी ह्मणे युद्ध करीत नाहीं; कांकणें भर ह्मणावें हातांत!! हा ह्मणे नराचा अवतार; यापेक्षां मादी बरी.

याप्रमाणें हे वीर, मनास वाटेल तशी बडबड करतील. जितकें बोलूं नये तितकें बोलतील; निंदा करतील. आणि संभावितास अपकीर्ति ह्मटली ह्मणजे मरणापेक्षां वाईट. ह्माकरितां अर्जुना ऊठ, आणि युद्ध कर. आप्तजन ह्मणे मरतील!! कसली शंका ही!! बाबा असले विजातीय तर्क तुला कोठून सुचले? आज पृथ्वीवर शेंकडों मनुष्यें आहेत; व त्या सर्वांचे आजे, पणजे मेले आहेत. ह्मणून रोजचे व्यापारधंदे सोडून, काय करावें हो! आमचे आजे मेले! आमचे पणजे मेले!! ह्मणून कोणी रडत बसलें आहेत काय? बरें, शेकडों मनुष्यें आज जिवंत असून तीं मरणार आहेत, व त्यांचीं जिवंत असलेलीं बायकामुलें ही निःसंशय मरणार आहेत, ह्मणून काय करावें हो! आह्मी व आमचीं बायकामुलें मरणार!! असें ह्मणून कोणी रडत बसले आहेत काय? बरें, रडत बसलें, ह्मणून जी गोष्ट होऊन चुकली, व जी गोष्ट निश्चयानें होणार ती त्याच्या देवास तरी टळेल काय? टळणार नाहीं. हाच अर्थ मनांत आणून सुज्ञ लोक जिवाचा किंवा मेल्याचा शोक करीत नाहींत. समजलास?

मीं म्हणे भीष्म द्रोणास मारूं कसे? आः काय शंका ही!! अनिश्चयात्मक गोष्ट गृहित घेऊन तिचा शोक करायचा, ह्याला काय म्हणावें? कोण कोणाकडून मरणार? आणि कोण कोणास मारणार? सगळा भ्रम आहे!! भीष्मद्रोणास मारणें, ही तुझ्या हातची गोष्ट आहे काय? तसें असतें तर एवढा उपद्व्याप तरी कशास पाहिजे होता? दुर्योधनासही अनायासें जय मिळाला असता? तसें असतें तर शिकारी लोकांनीं दररोज एका बाणाबरोबर पन्नास पन्नास सावजें मारलीं असतीं!! व क्रूर आणि द्वेषी लोकांनीं दररोज शेंकडों लोकांचे गळे कापले असते!! पण बाबा, तीं गोष्ट कोणाच्याच स्वाधीन नाहीं. हा तुझा अभिमान व्यर्थ आहे!! बरें, तूं भीष्म द्रोणास मारशील असें म्हटलें, तरी त्यांत विशेष तें काय? त्यांचें आयुष्यच जर संपलें असेल, तर तूं त्यांना मारले नाहींस, म्हणून ते जगतील काय?

बरें, तूं कोणास मारणार? देह हा केव्हां तरी मरणारच. तो आज काय? आणि उद्यां काय? त्यास तूंच मारावयास पाहिजेस असें नाहीं. तो नाशिवंतच. आत्मा मारशील म्हणावें तर तें अशक्य आहे. कारण तो अमर आहे. त्यास पंचमहाभूतेंही मारण्यास समर्थ नाहींत, मग तुझा काय पाड? त्यास जन्महीं नाहीं आणि मरणही नाहीं. बरें, तुला वाटत असेल कीं, आत्माच जन्मतो, आणि आत्माच मरतो, तरी जो प्राणी जन्मास आला, तो मरणार; जो मेला तो पुन्हा जन्मास येणार. जी गोष्ट कोणासच सुटत नाहीं, तीबद्दल खेद करण्यांत अर्थ काय? जन्माच्या पूर्वीं जीव कोठें असतो? हें माहीत नाहीं. मेल्यानंतर तो जातो कोठें? तेंही माहीत नाहीं. मग शेंपन्नास वर्षें लुटपुट करणारा जो जीव त्याकरितां शोक काय कामाचा?

मी, तूं, किंवा हे सर्व राजे पूर्वी नव्हतों काय ? होतों. बरें, पुढें न होऊं काय ? होऊंच. तर बाबा, हें रहाटगाडगें आहे. "पुनरपि जननं पुनरपि मरणं" असेंच चालावयाचें. ह्यास्तव युद्ध करण्यापासून तुझा कोणताही तोटा नाहीं. तूं मेलास तर स्वर्गास जाशील. शत्रूस मारलेंस तर मृत्युलोकचें राज्य भोगशील. दोहींमध्येंही तुझा फायदाच आहे. ह्यास्तव हा जो तुला अभिमान उत्पन्न झाला हाच खोटा !! तो सोडून दे. विषय, आणि इंद्रियें हींच सुखदुःख देणारीं आहेत. त्यांनाच नाश आहे, आणि त्यांनाच उत्पत्ति आहे. ह्मणून तीं सोशिलीं पाहिजेत. दुःखामध्यें, किंवा सुखामध्यें, ज्याचे मनोधर्म बदलत नाहींत, तोच थोर; आणि तोच मोक्षास जातो. आत्म्यानें हें सर्व जग व्यापलें आहे, तो अविनाशी आहे त्याचा नाश करण्यास कोणीच समर्थ नाहीं. नाश होणारा देह, आत्म्यास नाश नाहीं. तो मायेपासून अगदीं वेगळा आहे. तेव्हां तो मरेल तरी कसा ? आणि दुसऱ्यास मारील तरी कसा ? हा विचार मनांत आण. आणि सुखदुःख, जयअपजय, दोन्ही सारखींच मानून युद्ध कर, ह्मणजे पाप लागणार नाहीं.

ही एवढा वेळ तुला सांख्यबुद्धि सांगितली. आतां योगाची बुद्धि सांगतों तीही ऐक. योगाचरणांतही कांहीं अमर्यादा होत नाहीं. हा धर्म थोडा जरी आचरण केलास, तरी महा भयापासून मुक्त होशील. ह्यास्तव तूं कर्माचा अधिकारी हो. पण फलाचा अधिकारी होऊं नकोस. फलेच्छा सोड; आणि योगी होऊन कर्म कर. सिद्धींत किंवा असिद्धींत सम राहणें, ह्यासच योग ह्मणतात. फलेच्छा धरणें हें नीच आहे. हें मनांत आणून निष्काम कर्म कर. सांप्रत तुझी बुद्धि लोकव्यवहारानें भ्रांतींत पडली आहे; ती जेव्हां समाधींत स्थिरता पावेल, तेव्हां तूं योगाप्रत पोंचशील.

तेव्हां अर्जुनानें प्रश्न केला, कीं समाधींत स्थीर झालेल्या योग्याचीं लक्षणें कशीं? त्यावर भगवान् सांगतात.—जो पापसंकल्प सर्व सोडून केवल निरिच्छपणें आत्मस्वरूपींच संतुष्ट राहतो तो योगी. दुःखाचा तिरस्कार करीत नाहीं, व सुखाची इच्छा करीत नाहीं तो योगी. ज्यास क्रोध व काम नाहीं तो योगी. कोणास बरें ह्मणत नाहीं, व कोणास वाईट ह्मणत नाहीं तो योगी. कांसव जसें आपले अवयव आकर्षितें, तद्वत् जो आपलीं इंद्रियें विषयांवरून काढतो तो योगी अशी ही ब्रह्मीची स्थितिं ज्यास प्राप्त होते, तो मोह पावत नाहीं. आणि अंतकाळीं जर ही स्थिति राहिली तर तो ब्रह्मपदाप्रत पोंचतो.

येथें दुसरा अध्याय समाप्त झाला. या वरील अल्प विस्तारावरून गीतेचें साधारण स्वरूप लक्षांत येईलच; कारण प्रथमाध्यायांत कारण उपस्थित झालें आहे व दुसऱ्या अध्यायांत साधारण रीतीनें समाधानही केलें आहे आतां पुढील राहिलेले सोळा अध्याय, ह्या दुसऱ्या अध्यायाचेच पोटविभाग आहेत ह्मटलें तरी चालेल. कीर्तनांत जसें तुकारामाच्या एका अभंगाचा विस्तार असतो, तसाच या दुसऱ्या अध्यायाचाच पुढील अध्याय विस्तार होत. ह्यास्तव पुढील अध्यायांबद्दल येथें विशेष सांगण्याची आवश्यकता नाहीं. शिवाय, आमच्या लेखणीचा लगाम आंखडतां आंखडतां पुरेवाट झाली ती झाली, व शेवटीं मकाण गांठेना. यास्तव निरूपायानें दुसऱ्या भागांतच ह्यास स्थळ देणें इष्ट वाटलें. करितां. वाचकांनींही तिकडेच लक्ष पुरवावें. विचार करण्यासारख्या गोष्टी गीतेंत अनेकच आहेत त्यांचा संक्षेप तरी किती ह्मणून करावा?

असो; सरतेशेवटीं वाचकांस एवढें कळविलें पाहिजे, कीं हें भाषांतर अगदीं शब्दशः आहे असें नाहीं. तरी फार पाल्हाळही

केला नाहीं. या टीकेचा उद्देश एवढाच कीं कविता ह्मणतांना बरी वाटावी, व शब्द फार संस्कृत नसावेत. ह्मणजे तेणेंकरून ज्या प्राकृत जनास "गीता" ग्रंथ नीरस वाटतो, त्यांस वाचनाची गोडी लागेल. ही ग्रंथकर्त्याची आशा कितपत सफल होते ती पहावी !! ग्रंथास चांगले किंवा वाईट ह्मणणें हें ज्याच्या त्याच्या शीलावर आहे. लेखणीमध्यें चतुरस्रपणा असला, ह्मणजे चांगल्याचें वाईट व वाईटाचें चांगलें सहज होऊं शकतें. ह्यास्तव ग्रंथकर्त्याचें कर्तव्यकर्म एवढेंच, कीं त्यांत दाखविलेले दोष पुन्हा न होऊं देण्याची खबरदारी ठेवावयाची. असो. आह्मी "स्वजठरापिठरी"ची सेवा करून उरलेल्या कालांत हा मुक्ताहार गुंफून वाचकांच्या गळ्यांत घातला आहे. ह्यांतील मोतें नकली तर खरींच तरी सुदामजीच्या पोह्यांप्रमाणें वाचक मान्य करतील अशी आशा आहे. सरतेशेवटीं प्रार्थना ही कीं प्रथमारंभींचा श्लोक तर आपण वाचलातच, व शेवटची पद्यरूप प्रार्थनाही आपण पहालच, तरी खालील श्लोकाकडे पुनरपि लक्ष पुरवावें अशी सविनय प्रार्थना करून हा भाग आटपतों.

श्लोक.

ग्रंथीं ह्या अढळेल न्यून बरवें जें वाचतां त्वन्मना
तें मातें अति आदरें कळविणें ही प्रार्थना सज्जना
ईशा वंदुनि शेवटीं सविनयें मी एक मागें वर
कीं सेवा तुमची थडो पुनरपी ह्या हातुनी सत्वर

आपला नम्र सेवक,

कोची ता॰ ५ डिसेंबर सन १८८४. } कृष्णाजी नारायण आठले.

ग्रंथकर्ता.

ग्रंथ प्रसिद्धकर्त्याची विनंति.

प्रस्तुत ग्रंथाची हस्तलिखित प्रत पाहिल्यापासून जाहिरातीच्या पूर्वीच किसेक उदार गृहस्थांनीं सदरहू ग्रंथाच्या मागण्या केल्या; व करीत आहेत. त्याबद्दल आह्मी त्यांचे आभारी आहों. त्यांत विशेषेंकरून बडोदें, राजापूर, वेंगुर्ले, सावंतवाडी, कुमठें, कोल्हापूर, व कोची येथील लोकांचे अधिकच आभारी आहोंत. कारण कीं सदरहू गृहस्थांनीं ९० प्रतींच्या वर आश्रय दिला आहे. त्यांस एवढें सांगितलें पाहिजे कीं, ग्रंथकारांनीं समक्ष सुचविल्याप्रमाणें विस्तृत टीकाही यास जोडावयाची होती, परंतु एवढेंच पुस्तक छापण्याचें काम संपावयास सुमारें वर्ष होत आलें; आश्रयदाते पत्रें पाठवून थकले; व शिवाय पुस्तकांचीही अडीचशें पानें होऊन किंमत दोन रूपये पडावयास गेली, सबब वाचकांवरही फार बोजा न पडावा ह्मणून टीकेच्या विस्ताराचा दुसराच स्वतंत्र भाग छापण्याचा विचार केला आहे. तोही थोडक्याच दिवसांत तयार करून कळवूं.

आह्मी कोणाची आगाऊ किंमत घेतली नाहीं. व पुस्तक तयार होण्याच्या पूर्वी जाहिरात वगैरे दिली नाहीं; तरीही आश्रयदात्यांनीं आश्रय देऊन मुद्दाम आज सुमारें वर्षभर पत्रेंही पाठविलीं. यावरून ग्रंथकाराविषयीं त्यांची पूज्यबुद्धि दिसून येते. पुस्तक छापण्यास उशीर लागला त्यास आमचा नाइलाज आहे. असो; पुस्तक छापण्याचें काम संपतांच आश्रयदात्यांकडे प्रती परभारें रवाना केल्या आहेत.

आतां ग्रंथकाराच्या, व ग्रंथाच्या तर्फेनें एवढेंच सुचविलें पाहिजे कीं, जेथें हा ग्रंथ निपजला, तेथें महाराष्ट्रभाषेचा शब्दही कानावर पडण्याची मारामार पडते; मग शुद्धाशुद्ध पाहणारे कोण? शिवाय ग्रंथकर्त्याच्या पाठीमागें अनेक कामें. बरें, छापखाना तरी जवळ

असाव्याचा होता; पण तो साहाशें मैलांवर पत्र जाऊन येण्यास दहा दिवस, बारा दिवस. ह्यामुळें नजरचुकीनें एकदां अशुद्ध राहिलें कीं "वज्रलेपो भविष्यति" याप्रमाणें स्थिति ह्यास्तव "निर्णयसागर छापखान्यांतून" जरी पुष्कळप्रकारें मदत झाली तरीही कोठें कोठें अशुद्धें राहिलींच आहेत. करितां वरील गोष्टी लक्षांत आणून वाचक त्याबद्दल क्षमा करतील अशी आशा आहे.

प्रस्तुत ग्रंथास ज्यांनीं ज्यांनीं आश्रय दिला आहे, व देतील, त्यांस प्रार्थना आहे कीं, त्यांनीं सदरहू ग्रंथकाराच्या सर्व पुस्तकांस आपला उदार आश्रय द्यावा. "गीता" हा विषय कवितेचें माधुर्य दिसून येण्यासारखा नव्हे, ज्यास कवितेचें माधुर्यच पाहणें असेल त्यांनीं, सदरहू ग्रंथकर्त्याचे दुसरे पद्यात्मक ग्रंथ अवश्य पाहवेत.

प्रस्तुत ग्रंथकारांनीं रचलेले, व छापून तयार असलेले "शृंगारतिलकादर्श अथवा कालिदासकृत शृंगारतिलकाचें पद्यात्मक भाषांतर व "वैराग्यशतकादर्श" आमचेकडे मिळतील. किंमत अनुक्रमें दोन आणे व सहा आणे. "सद्वास्थिति" या नांवाच्या आर्या लौकरच छापून तयार होतील. फारच मनोरंजक आहेत.

असो. ग्रंथकाराचे ग्रंथ प्रसिद्ध करण्याचें काम आह्मी केलें. आतां त्याची चीज करणें वाचकांकडे आहे. ग्रंथकाराची पाठ थोपटल्यानें ग्रंथांतील व्यंगें नाहीशीं होऊन, देशांत समृद्धि होते, हें सुज्ञांस सांगण्याची गरज नाहीं.

कोची, ता० ६ डिसेंबर सन १८८४. } विष्णु केशवशेट सांपळे.
ग्रंथ प्रसिद्धकर्त्ता.

॥ श्रीगणेशाय नमः ॥

मंगलाचरण.

ॐ पार्थाय प्रतिबोधितां भगवता नारायणेन स्वयं
व्यासेन ग्रथितां पुराणमुनिना मध्येमहाभारतम् ॥
अद्वैतामृतवर्षिणीं भगवतीमष्टादशाध्यायिनी-
मंब त्वामनुसंदधामि भगवद्गीते भवद्वेषिणीम् ॥ १ ॥

श्लोक (शार्दूलविक्रीडित).

पार्थाला कथिलें स्वयें भगवतें नारायणें त्वत्प्रती
व्यासानें ग्रथिलें पुराणमुनिनें तूतें महाभारतीं ।
अद्वैतामृतवर्षिणी भगवती अष्टादशाध्यायिनी
माते मी नमिं त्वत्पदाब्ज भगवद्गीते भवद्वेषिणी॥ १॥

नमोऽस्तु ते व्यास विशालबुद्धे फुल्लारविंदायतपत्रनेत्र ॥
येन त्वया भारततैलपूर्णः प्रज्वालितो ज्ञानमयः प्रदीपः ॥ २ ॥

श्लोक (पृथ्वी).

प्रफुल्ल नवपंकजासम सुनेत्र ज्याचे महा
गमे भरुनि भारतीं विपुल तैल ज्यानें पहा ।
दिवा प्रखर लाविला अखिल जाण ज्ञानांगणां
असो नमन त्या महापुरुष व्यासनारायणा ॥ २ ॥

---

१ ओंविली. २ एकाच परमेश्वराविषयीं विचार सांगणारे. ३ तुझें पदकमल. ४ संसारनाशकर्ते. ५ फुललेल्या.

सर्वोपनिषदो गावो दोग्धा गोपालनंदनः ॥
पार्थो वत्सः सुधीर्भोक्ता दुग्धं गीतामृतं महत् ॥ ३ ॥

श्लोक (शार्दूलविक्रीडित).

धेनू वेद समस्त योग्य उपमे जाणों इथें शोभले
गौळी तो वसुदेवनंदन पहा ज्यानें दुधा काढिलें ।
भोक्ता अर्जुन वत्स अमृत सुधी झाला गमे अंतरीं
गीता गोड सुधेसमान दिसतें हें दूध त्याभीतरीं ॥३॥

वसुदेवसुतं देवं कंसचाणूरमर्दनम् ॥
देवकीपरमानंदं कृष्णं वंदे जगद्गुरुम् ॥ ४ ॥

झाला जो वसुदेवपुत्र जगतीं अंकीत जो सेवकां
ज्यानें शौर्यबळें क्षणांत वधिलें चाणूरकंसादिकां ।
ज्यानें तोषविली अनंदवचनें माता स्वयें देवकी
वंदीं कृष्ण जगद्गुरू सविनयें मी तो असा देव कीं ४

भीष्मद्रोणतटा जयद्रथजला गांधारनीलोपला
शल्यग्राहवती कृपेण वहनी कर्णेन वेलाकुला ॥
अश्वत्थामविकर्णघोरमकरादुर्योधनावर्तिनी
सोत्तीर्णा खलु पांडवै रणनदी कैवर्तकः केशवः ॥ ५ ॥

भीष्म द्रोण तटें, जयद्रथ जलें, गांधार पाषाणसे
शल्य ग्राहवती[1], प्रवाह कृप हा, कीं कर्ण सीमा दिसे ।
अश्वत्थाम विकर्ण मीन, भंवरे दुर्योधनादी वरी
गेले पांडव पार ही रणनदी श्रीकृष्ण अंबेकरी[2]॥५॥

---

१ उपभोगणारा, पिणारा. २ सुसर. ३ नौका चालविणारा.

पाराशर्यवचःसरोजममलं गीतार्थगंधोत्कटं
नानाख्यानककेसरं हरिकथासंबोधनाबोधितम् ।
लोके सज्जनषट्पदैरहरहः पेपीयमानं मुदा
भूयाद्भारतपंकजं कलिमलप्रध्वंसि नः श्रेयसे ॥ ६ ॥

व्यासोक्तिच सरोज[1] हें गमतसे गीतार्थ सौगंधित[2]
तंतू ईशकथा तयांत दिसती संबोधनें[3] बोधित ।
प्राशीती मधुला जन भ्रमर हे हर्षें सदा कीं पहा
आहे भारत अब्ज हें कलिमल[4]प्रध्वंसकारी महा ॥६॥

मूकं करोति वाचालं पंगुं लंघयते गिरिम् ॥
यत्कृपा तमहं वंदे परमानंदमाधवम् ॥ ७ ॥

श्लोक (द्रुतविलंबित).

करि पटू वचनीं दृढ जी मुके
अपंद[5] ही चढती गिरि कौतुकें ।
अशि अनंतकृपा नमितों तया
परमसौख्यद माधवराजया ॥ ७ ॥

यं ब्रह्मावरुणेंद्ररुद्रमरुतः स्तुन्वंति दिव्यैः स्तवै-
र्वेदैः सांगपदक्रमोपनिषदैर्गायंति यं सामगाः ॥
ध्यानावस्थिततद्गतेन मनसा पश्यंति यं योगिनो
यस्यांतं न विदुः सुरासुरगणा देवाय तस्मै नमः ॥८॥ इति ध्यानम् ॥

श्लोक (शार्दूलविक्रीडित).

धाता[6] रुद्र वरूण इंद्र मरुत ज्याला स्तवें बाहती
गाती वेद पदक्रमोपनिषदें[7] ज्या सामवेदी किती ।
योगी ही अवलोकिती निजमनीं ज्या नित्य विश्वंभरा
ज्याचा अंत नसे सुरासुरगणा त्या वंदितों ईश्वरा ॥८॥

---

१ कमल. २ सुगंधित झालेलें. ३ उत्तम शब्दांनीं. ४ कलिसंबंधी पातकनाश करणारें. ५ पांगळे. ६ ब्रह्मदेव. ७ वेद, क्रम, पदें, उपनिषदांच्या योगानें. ८ परमेश्वराला.

श्रीकृष्णपरमात्मा प्रसन्न.

गीतापद्यमुक्ताहारप्रारंभः

॥ धृतराष्ट्र उवाच ॥

धर्मक्षेत्रे कुरुक्षेत्रे समवेता युयुत्सवः ॥
मामकाः पांडवाश्चैव किमकुर्वत संजय ॥ १ ॥

धृतराष्ट्र संजयास ह्मणतो.

श्लोक (शार्दूलविक्रीडित).

धर्मानें अभियुक्त शुद्ध जगतीं ऐसें कुरुक्षेत्र जें
यामाजी बहु होउनी निजमनीं युद्धार्थ उद्युक्त जे ।
आले मत्सुत सर्व पांडव जईं इच्छूनि मोठ्या जया
तेव्हां सर्व मिळोनि काय करिते झाले सख्या संजया १

॥ संजय उवाच ॥

दृष्ट्वा तु पांडवानीकं व्यूढं दुर्योधनस्तदा ॥
आचार्यमुपसंगम्य राजा वचनमब्रवीत् ॥ २ ॥

संजय–

आली सन्मुख जैं व्यवस्थित चमू ती पांडवांची रणीं
योद्धे सर्वहि शूर वीर नयनीं दुर्योधनें पाहुनी ।
आचार्याजवळी त्वरें करुनियां जो संभ्रमें पातला
राजा शीघ्र तयाप्रती वचनही हें बोलता जाहला ॥२॥

---

१ व्यापलेलें. २ उत्सुक. ३ माझे पुत्र. ४ व्यासाचा शिष्य, त्याचें संबोधन. ५ नीट उभी राहिलेली.

पश्यैतां पांडुपुत्राणामाचार्य महतीं चमूम् ॥
व्यूढां द्रुपदपुत्रेण तव शिष्येण धीमता ॥ ३ ॥

हे आचार्य पहा पहा झडकरी ही पांडवांची चमू
मोठ्या अब्धिसमान साच गमते नेणों कसें आक्रमूं[1]।
केली ही रचना स्वयें द्रुपदजें[2] कौशल्य त्याचें कळे
आहे तो तुमचाच शिष्य गुरुजी जो श्रेष्ठ बुद्धीबळें[3] ३

अत्र शूरा महेष्वासा भीमार्जुनसमा युधि ॥
युयुधानो विराटश्च द्रुपदश्च महारथः ॥ ४ ॥

येथें वीर महापराक्रमपटू जे पार्थभीमासम
तोषावें स्वमनांत शूरपुरुषें पाहूनि युद्धक्रम[4]।
हा राजा युयुधान हा द्रुपद हा युद्धांत मोठा पटू
तैसा थोर विराट वीर नृपती शत्रूस वाटे कटू[5] ॥४॥

धृष्टकेतुश्चेकितानः काशिराजश्च वीर्यवान् ॥
पुरुजित्कुंतिभोजश्च शैब्यश्च नरपुंगवः ॥ ५ ॥

आहे हा नृप चेकितान गुरुजी हा धृष्टकेतू पहा
तैसा हा नृप काशिराज बरवा जो शौर्यशाली महा
शूरत्वें पुरुजीत साच गमतो जो सिंह ऐसा दळीं
हा तैसा नृप कुंतिभोज समजा हा शैब्य मोठा बळी ५

---

१ ओलांघून करूं. २ द्रुपदाचा पुत्र त्यानें. ३ बुद्धिबळामें. ४ युद्धाचें कौशल्य. ५ हीं सर्व राजांचीं नांवें आहेत. ६ दुःसह.

युधामन्युश्च विक्रांत उत्तमौजाश्च वीर्यवान् ॥
सौभद्रो द्रौपदेयाश्च सर्व एव महारथाः ॥ ६ ॥

हा विक्रांत महाबळी नरपती तैसा युधामन्यु हा
दावी शौर्यहि उत्तमौज समरीं कीं शत्रुतेजोमहा ।
हा सौभद्र पराक्रमी नच दिसे कीं तोड ज्याच्या गुणा
तैसे वीरहि द्रौपदेय गुरुजी कोणीच नाहीं उणा ॥६॥

अस्माकं तु विशिष्टा ये तान्निबोध द्विजोत्तम ॥
नायका मम सैन्यस्य संज्ञार्थं तान्ब्रवीमि ते ॥ ७ ॥

हे आचार्य तुह्मांस वीर कथिले हे पांडवांचे पहा
आतां वीर अह्मांकडील कथितों जे थोर योद्धे महा।
माझे हीं अगणीत वीर असती केल्यास सारे जमा
जाणायास्तव मुख्य मुख्य कथितों संज्ञार्थ विप्रोत्तमा

भवान्भीष्मश्च कर्णश्च कृपश्च समितिंजयः ॥
अश्वत्थामा विकर्णश्च सौमदत्तिस्तथैव च ॥ ८ ॥

आधीं आपण भीष्म कर्ण कृपही युद्धीं यशस्वी सदा
हे योद्धे अवघे रणीं उतरिती शौर्यें पराच्या मदा ।
अश्वत्थामं विकर्ण शूर अणखी हा सोमदत्ती पहा
हे सारे समरीं विशारद भले युद्धांत योद्धे महा॥८॥

---

१ हीं सर्व राजांचीं नांवें आहेत. २ अभिमन्यु. ३ द्रौपदीचे पुत्र. ४ ध्यानांत येण्यासाठीं. ५ शत्रूच्या. ६ द्रोणाचार्याचा पुत्र. ७ निपुण.

अन्ये च बहवः शूरा मदर्थे त्यक्तजीविताः ॥
नानाशस्त्रप्रहरणाः सर्वे युद्धविशारदाः ॥ ९ ॥

मोठे वीर अनेक साच दुसरे बाजूस राखावया
तैसे कैक मदर्थ सिद्ध असती प्राणास टाकावया ।
कोणी दीसति शस्त्र अस्त्र सगळ्या विद्यागुणीं मंडित
नाना व्यूह रचावया निपुण जे युद्धीं महापंडित ॥९॥

अपर्याप्तं तदस्माकं बलं भीष्माभिरक्षितम् ॥
पर्याप्तं त्विदमेतेषां बलं भीमाभिरक्षितम् ॥ १० ॥

भीष्मानें मम सैन्यरक्षण पहा केलें असे तत्वता
हें होईल अपूर्ण साच कथिते माझी मनोदेवता ।
भीमें रक्षित[1] सैन्य हें दिसतसे विस्तारला अब्धिसा
तें वाटे परिपूर्ण[2] कीर्तिकरसें[3] आचार्य मन्मानसा १०

अयनेषु च सर्वेषु यथाभागमवस्थिताः ॥
भीष्ममेवाभिरक्षंतु भवंतः सर्व एव हि ॥ ११ ॥

श्लोक (स्रग्धरा).

ते ते त्या त्या ठिकाणीं सशर[4] नृप उभे राहिले फार थाट
सैन्याचा सर्व झाला अघटित रचना लावुनी रम्य घाट[5]
आतां आचार्य तुम्ही सकळ मिळुनियां हेंच कर्तव्य पाहे
रक्षावा भीष्म आधीं सकल चमुपती[6] सांगणें हेंच आहे

---

१ रक्षण केलेलें. २ पुरून उरण्यासारखे. ३ यशस्वी. ४ धनुष्यबाण घेऊन. ५ रचना. ६ सेनाध्यक्ष.

तस्य संजनयन्हर्षं कुरुवृद्धः पितामहः ॥
सिंहनादं विनद्योच्चैः शंखं दध्मौ प्रतापवान् ॥ १२ ॥

श्लोक (शार्दूलविक्रीडित).

आनंदें कुरुवृद्ध भीष्म मग तो अत्युच्च[1] शब्दें करी
मोठा गर्जुनि सिंहनाद समरीं वाटे दुजा केसरी[2] ।
हातीं शंख प्रतापसिंह[3] पुरुषें घेवोनि मोठा भला
ज्याचा शब्द महाभयप्रद[4] असा मोठ्या बळें फुंकिला

ततः शंखाश्च भेर्यश्च पणवानकगोमुखाः ॥
सहसैवाभ्यहन्यंत स शब्दस्तुमुलोऽभवत् ॥ १३ ॥

वाद्यें वाजविती अनेक जन ही त्यानंतरें गोमुख[5]
कोणी घे पणवानक[6]स अथवा भेरीस[7] ही सन्मुख ।
भं भं भं कितिएक शंखहि तसे उच्चस्वरें फुंकिती
गेला नाद घुमोनि सर्व गगनीं व्यापून गेली क्षिती[8]

ततः श्वेतैर्हयैर्युक्ते[9] महति स्यंदने स्थितौ ॥
माधवः पांडवश्चैव दिव्यौ शंखौ प्रदध्मतुः ॥ १४ ॥

मोठा स्यंदन[9] भव्य दिव्य असुनी श्वेतांश्च[10] ज्या जोडिले
त्यामाजी हृषिकेश पांडव असे दोघे पहा शोभले ।
घेती शंख हतांत ते उभयतां दिव्यप्रभेसंयुत[11]
हर्षें वाजविती रणीं मग तदा जो शब्द अत्यद्भुत १४

१ अति उंच. २ सिंह. ३ सिंहासारखा आहे पराक्रम ज्याचा. ४ भयंकर. ५ गाईच्या मुखासारखें एक वाद्य आहे. ६ एक प्रकारचें वाद्य. ७ नगारा. ८ पृथ्वी. ९ रथ. १० पांढरे अश्व. ११ युक्त.

पांचजन्यं हृषीकेशो देवदत्तं धनंजयः ॥
पौंड्रं दध्मौ महाशंखं भीमकर्मा वृकोदरः ॥ १५ ॥

श्लोक (चामर).

दिव्य शंख पद्मनाभ पांचजन्य घे हतीं
नांव ज्यास देवदत्त पार्थ घेत त्याप्रती ।
पौंड्र शंखश्रेष्ठ भीम घेत आपुल्या हतीं
हे त्रिवर्ग सर्व उच्च शब्द शंख फुंकिती ॥१५॥

अनंतविजयं राजा कुंतीपुत्रो युधिष्ठिरः ॥
नकुलः सहदेवश्च सुघोषमणिपुष्पकौ ॥ १६ ॥

श्लोक (वसंततिलका).

धर्मे अनंतविजया स्वकरीं धरून
तैसें सुघोष मणिपुष्पक शंख दोन ।
हस्तामधें नकुल कीं सहदेव घेती
जे एकदांचि फुकुंनी[1] क्षिति[2] कांपवीती ॥१६॥

काश्यश्च परमेष्वासः शिखंडी च महारथः ॥
धृष्टद्युम्नो विराटश्च सात्यकिश्चापराजितः ॥ १७ ॥

श्लोक (शार्दूलविक्रीडित).

तैसा काश्य[3] महाधनुर्धर रणीं किंवा शिखंडी[4] बळी[5]
ऐसे थोर महारथी कितितरी ऐकाल नामावळी[6] ।
धृष्टद्युम्न[7] विराट[8] दक्ष[9] समरीं तैसाच हो सात्यकी[10]
सारे हे असती अजिंक्य[11] अरिलायुद्धामध्यें सत्यकीं १७

---

१ वाजवून. २ पृथ्वी. ३ एका राजाचें नांव. ४ बलाढ्य. ५ नांवें. ६ पटाईत. ७ जिंकण्यास कठीण.

द्रुपदो द्रौपदेयाश्च सर्वशः पृथिवीपते ॥
सौभद्रश्च महाबाहुः शंखान्दध्मुः पृथक् पृथक् ॥ १८ ॥

श्लोक (वसंततिलका).

तैसें पहा द्रुपद[1] कीं सुत[2] द्रौपदीचे
सौभद्र[3] थोरभुज[4] तो असती जयाचे ।
यांहीं करांत धरुनी मग वेगळाले
मोठ्या बळेंकरुनि शंखहि वाजवीले ॥१८॥

स घोषो धार्तराष्ट्राणां हृदयानि व्यदारयत् ॥
नभश्च पृथिवीं चैव तुमुलो व्यनुनादयन् ॥ १९ ॥

श्लोक (भुजंगप्रयात).

ध्वनी जेधवां दाटली त्या रवांची
उरें[5] फाटलीं तेधवां कौरवांचीं ।
कडाडे नभामाजि कांपे धरा[6] ही
दणाणे असा शब्द अत्यंत पाही ॥ १९ ॥

अथ व्यवस्थितान्दृष्ट्वा धार्तराष्ट्रान्कपिध्वजः ॥
प्रवृत्ते शस्त्रसंपाते धनुरुद्यम्य पांडवः ॥२०॥

श्लोक (शार्दूलविक्रीडित).

झाले कौरव सिद्ध सैन्यरचना लावूनि सारे रणीं
ज्याच्या वानर[7] हो रथध्वजशिरीं[8] तो पार्थ त्या पाहुनी ।
हस्तीं घेउनियां अनेक अयुधें युद्धार्थ जे पातले
त्यांतें पाहुन अर्जुनें निजकरीं गांडीव[9]ही घेतलें २०

---

१ एका राजाचें नांव. २ पुत्र. ३ अभिमन्यु. ४ महाबाहु. ५ शब्दाची. ६ हृदयें. ७ पृथ्वी. ८. मारुती. ९ रथाच्या ध्वजावर. १० अर्जुनाच्या धनुष्याचें नांव.

हृषीकेशं तदा वाक्यमिदमाह महीपते ॥

अर्जुन उवाच ॥

सेनयोरुभयोर्मध्ये रथं स्थापय मेऽच्युत ॥ २१ ॥

श्लोक (भुजंगप्रयात).

नृपा तेधवां पार्थ ही कृष्णजीला
अती आदरें बोलता काय झाला ।

अर्जुन—

सख्या अच्युता सांगतों तूजलागीं
रथालागिं ह्या ने चमूमध्यभागीं ॥ २१ ॥

यावदेतान्निरीक्षेऽहं योद्धुकामानवस्थितान् ॥
कैर्मया सह योद्धव्यमस्मिन्रणसमुद्यमे ॥ २२ ॥

रणामाजि ह्या पातले कोण कोण
धरूनी मनीं युद्धकामार्थ[2] जाण ।
कुणाशीं असे युद्ध कर्तव्य[3] आतां
मला पाहुंदे एकदां कृष्णनाथा ॥ २२ ॥

योत्स्यमानानवेक्षेऽहं य एतेऽत्र समागताः ॥
धार्तराष्ट्रस्य दुर्बुद्धेर्युद्धे प्रियचिकीर्षवः ॥ २३ ॥

मिळाले रणीं युद्धकामा धरून
तया पाहुंदे आजि डोळे भरून ।
महा दुर्मती सर्व जे धार्तराष्ट्र[4]
तयांचें रणीं इच्छिणारे अभीष्ट[5] ॥ २३ ॥

१ हे धृतराष्ट्रा. २ युद्धाची इच्छा. ३ करावयाचें. ४ कौरव. ५ कल्याण.

संजय उवाच ॥

एवमुक्तो हृषीकेशो गुडाकेशेन भारत ॥
सेनयोरुभयोर्मध्ये स्थापयित्वा रथोत्तमम् ॥ २४ ॥

संजय—

अशी जाण आज्ञा करी सव्यसाची[1]
करी मान्य तो बापुडा देव त्याची ।
चमूमाजि त्या दोनिही त्याचकाळीं
रथा स्थापि[3] जो सर्वदां विश्व पाळी[4] ॥ २४ ॥

भीष्मद्रोणप्रमुखतः सर्वेषां च महीक्षिताम् ॥
उवाच पार्थ पश्यैतान्समवेतान्कुरूनिति ॥ २५ ॥

महीपाल[5] सारे मिळाले रणांत
पुढें दीसती भीष्म कीं द्रोण ज्यांत ।
कुरू[6] सर्वही येथ एकत्र झाले
पहारे पहा अर्जुना कृष्ण बोले ॥ २५ ॥

तत्रापश्यत्स्थितान्पार्थः पितॄनथ पितामहान् ॥
आचार्यान्मातुलान्भ्रातॄन्पुत्रान्पौत्रान्सखींस्तथा ॥ २६ ॥

श्लोक (इंद्रवज्रा).

तों पार्थ पाहे मग सैन्यसिंधू[7]
आचार्य, मामा, सुत, मित्र, बंधू ।
नातू अजे कीं चुलते हि त्यांत
सारे दिसे त्या[8] अपुलेंच गोत ॥ २६ ॥

१ अर्जुन. २ भक्ताच्या आधीन असल्यामुळें. ३ उभा करी. ४ जगास पाळणारा.
५ राजे. ६ अग्रगण्य. ७ कौरव. ८ सैन्यसागर. ९ त्याला (अर्जुनाला).

श्वशुरान्सुहृदश्चैव सेनयोरुभयोरपि ॥
तान्समीक्ष्य स कौन्तेयः सर्वान्बंधूनवस्थितान् ॥२७॥

श्लोक (भुजंगप्रयात).

संखे सोयरे सासरे पार्थ पाहे
रणीं दोनिही आपुलें गोतं आहे ।
उभे राहिले बंधु सारे विचित्र
तया पाहुनी पंडुचा शूर पुत्रं ॥ २७ ॥

कृपया परयाविष्टो विषीदन्निदमब्रवीत् ॥

अर्जुन उवाच ॥

दृष्ट्वेमं स्वजनं कृष्ण युयुत्सुं समुपस्थितम् ॥ २८ ॥

जयाचें बहू चित्त व्याकूळ झालें
विषादें हरीलागिं तो काय बोले ।

अर्जुन—

रणीं जाहले सिद्ध आजी मुरारे
असें पाहुनी आपुले लोकं सारे ॥ २८ ॥

सीदन्ति मम गात्राणि मुखं च परिशुष्यति ॥
वेपथुश्च शरीरे मे रोमहर्षश्च जायते ॥ २९ ॥

श्लोक (शिखरिणी).

सख्या नेत्रीं माझ्या शिथिलपण हें फार जडलें ।
मुखांतूनी देवा जल सरुनियां शुष्कं पडलें ।
शरीरीं माझ्या हा थरथर पहा कंप सुटला ! !
तसा बा हे पाहे स्वतनुवरि रोमांच उठला ! ॥ २९ ॥

१ मित्र. २ परिवार. ३ अर्जुन. ४ शोकानें. ५ स्वजन. ६ जडत्व. ७ कोरडें. ८ हे बापा कृष्णा. ९ कांटा.

गांडीवं स्रंसते हस्तात्त्वक्चैव परिदह्यते ॥
न च शक्नोम्यवस्थातुं भ्रमतीव च मे मनः ॥ ३० ॥

गळे हस्तांतूनी विफल मम गांडीव धनु ही
त्वचा माझी देवा बहु जळतसे अग्निपरि ही ।
नसे माझ्या अंगीं समरपटु सामर्थ्य किंमपी
भ्रमे माझें आतां मन सकल बोले ध्वजकपी ॥३०॥

निमित्तानि च पश्यामि विपरीतानि केशव ॥
न च श्रेयोऽनुपश्यामि हत्वा स्वजनमाहवे ॥ ३१ ॥

श्लोक (भुजंगप्रयात).

निमित्तें मला भासती हीं विरुद्ध
नसे त्यांमध्यें एकही नीट शुद्ध ।
जना आपुल्या मारणें हा उपाय
नसे चांगला ह्यांत कल्याण काय ? ॥ ३१ ॥

न कांक्षे विजयं कृष्ण न च राज्यं सुखानि च ॥
किं नो राज्येन गोविंद किं भोगैर्जीवितेन वा ॥ ३२ ॥

श्लोक (उपजाति).

इच्छी न मी त्या विजयास चित्तीं
नको नको राज्यसुखें मला तीं ।
बा तें कशाला मज राज्य मोठें
नको नको जीवित हेंहि वाटे ॥ ३२ ॥

---

१ पडे. २ विनाकारण. ३ कातडी. ४ थोडेंदेखील. ५ ध्वजावर आहे वानर ज्याच्या तो (अर्जुन). ६ चिन्हें. ७ आयुष्य.

येषामर्थे कांक्षितं नो राज्यं भोगाः सुखानि च ॥
त इमेऽवस्थिता युद्धे प्राणांस्त्यक्त्वा धनानि च ॥ ३३॥

श्लोक (वसंततिलका).

आह्मी कशास्तव सुखें ह्मणतों मिळावीं
कीं एकदां स्वजन[1] दीनदशा पळावी ।
ते[2] जाहले स्वजन सिद्ध मरावयास
मेल्यास हे सकल काय करूं जयांस[3] ?॥ ३३॥

आचार्याः पितरः पुत्रास्तथैव च पितामहाः ॥
मातुलाः श्वशुराः पौत्राः श्यालाः संबन्धिनस्तथा ॥ ३४ ॥

आचार्य पुत्र चुलते मम वासुदेवा
आले पितामह[4] रणीं स्वमनांत ठेवा ।
मामादि हे श्वशुर[5] पौत्र[6] पहा कित्येक
संबंधयुक्त[7] जन शार्लक मित्र कैक ॥ ३४ ॥

एतान्न हन्तुमिच्छामि घ्नतोऽपि मधुसूदन ॥
अपि त्रैलोक्यराज्यस्य हेतोः किं नु महीकृते ॥ ३५ ॥

श्लोक (इंद्रवज्रा).

ह्या कारणें मी नच आज त्यांतें
मारीन; मारोत खुशाल मातें ।
त्रैलोक्य राज्यार्थहि मी न धाडें.
घालीं; क्षितीचा[10] मग काय पाड ॥ ३५ ॥

---

१ हाल. २ स्वजन. ३ युद्धीं यशस्वी होऊन. ४ आजे. ५ सासरे. ६ नातू. ७ संबंधी. ८ मेल्हणे. ९ घाला. १० पृथ्वीचा.

निहत्य धार्तराष्ट्रान्नः का प्रीतिः स्याज्जनार्दन ॥
पापमेवाश्रयेदस्मान्हत्वैतानाततायिनः ॥ ३६ ॥

श्लोक (भुजंगप्रयात).

कुरू मारुनी काय हो त्या जयाला
करावें अह्मी; कृष्ण नाथा दयाळा ।
अह्मा आततायी जरी देति ताप
तरी मारितां त्यांस, लागेल पाप ॥ ३६ ॥

तस्मान्नार्हा वयं हन्तुं धार्तराष्ट्रान्स्वबान्धवान् ॥
स्वजनं हि कथं हत्वा सुखिनः स्याम माधव ॥ ३७ ॥

अशाकारणें त्यांस आह्मी कधींही
न मारूं रणीं बांधवांलागिं पाही ।
सुखी आपुल्या मारुनीयां जनातें
कसें होउं तें यादवा सांग मातें ॥ ३७ ॥

यद्यप्येते न पश्यन्ति लोभोपहतचेतसः ॥
कुलक्षयकृतं दोषं मित्रद्रोहे च पातकम ॥ ३८ ॥

श्लोक (इंद्रवज्रा).

लोभें तेयांचें[2] बहु भ्रष्ट चित्त
त्यांच्या न आलें जरि हें मनांत ।
द्रोहें जनाच्या बहु पाप लाहे
कुलक्षयें फारच दोष आहे ॥ ३८ ॥

---

१ घरास आग लावणें, विष घालणें, शस्त्र धरणें, चोरी करणें, स्त्रीचा अपहार करणें, वतन हरणें. हीं सहा कर्में करणारास "आततायी" असें ह्मणतात. २ कौरवांचें.

कथं न ज्ञेयमस्माभिः पापादस्मान्निवर्तितुम् ॥
कुलक्षयकृतं दोषं प्रपश्यद्भिर्जनार्दन ॥ ३९ ॥

श्लोक (भुजंगप्रयात).

न जाणों कसें यांतुनी मुक्त होऊं
कसें पातकापासुनी दूर राहूं ।
कुलच्छेद[1] हा होतसे विश्वपाला[2]
महादोष हो भासतो मन्मनाला ॥ ३९ ॥

कुलक्षये प्रणश्यन्ति कुलधर्माः सनातनाः ॥
धर्मे नष्टे कुलं कृत्स्नमधर्मोऽभिभवत्युत ॥ ४० ॥

श्लोक (उपेंद्रवज्रा).

कुलक्षयानें बुडतात सारे
पैरंपरेचे[3] कुलधर्म बा रे ।
स्वधर्मनाशें कुल सर्व बा तें
अधर्ममार्गास प्रवर्त्त[4] होतें ॥ ४० ॥

अधर्माभिभवात्कृष्ण प्रदुष्यंति कुलस्त्रियः ॥
स्त्रीषु दुष्टासु वार्ष्णेय जायते वर्णसंकरः ॥ ४१ ॥

श्लोक (वसंततिलका).

कृष्णा अधर्म घडतो सुकुलांत जेव्हां
होती कुलीन युवती बहु दुष्ट तेव्हां ।
झाल्यास दुष्ट युवतीजन वृष्णिनाथा[5]
तैं वर्णसंकर[6] तिथें लिहिलाच माथां ॥ ४१ ॥

१. वंशाचें खंडन. २ (भगवंताचें संबोधन.) ३ वंशपरंपरा चालत आलेले. ४ अधर्म मार्गानें चालतें. ५ हे यादवश्रेष्ठा. (श्रीकृष्णा). ६ ज्ञातींचें मिश्रण.

संकरो नरकायैव कुलघ्नानां कुलस्य च ॥
पतंति पितरो ह्येषां लुप्तपिंडोदकक्रियाः ॥ ४२ ॥

श्लोक (भुजंगप्रयात).

अशा संकरें वंशखंडी तयांचीं
कुलें डुंबती नारकीं जाण साचीं ।
मिळेना तयां पिंड पाणी क्रियाही
अशा संकटीं लोळती सर्व पाहीं ॥ ४२ ॥

दोषैरेतैः कुलघ्नानां वर्णसंकरकारकैः ॥
उत्साद्यंते जातिधर्माः कुलधर्माश्च शाश्वताः ॥ ४३ ॥

कुलाचा पहा नाश हा एक दोष
तयाच्या मुळें वर्ण नाशे विशेष ।
सरया नासती जातिचे धर्म तेणें
तसे रक्षिले पूर्वजीं जे पुराणे ॥ ४३ ॥

उत्सन्नकुलधर्माणां मनुष्याणां जनार्दन ॥
नरके नियतं वासो भवतीत्यनुशुश्रुम ॥ ४४ ॥

श्लोक (उपजाति).

जनार्दना हे सखया मुरारे
ऐसे जयाचे कुलधर्म सारे ।
लयास जातील तया नरास
मी ऐकतों कीं नरकांत वास ॥ ४४ ॥

---

१ गटकळ्या खातात. २ नरकामध्यें. ३ ज्ञाति लयास जाते. ४ ज्ञातिनाशानें. ५ जुने. ६ रहाणें.

अहो बत महत्पापं कर्तुं व्यवसिता वयम् ॥
यद्राज्यसुखलोभेन हंतुं स्वजनमुद्यताः ॥ ४५ ॥

श्लोक (भुजंगप्रयात).

अरेरे महा पाप अत्यंत मोठें
अह्मी मांडिलें कर्म हें फार खोटें ।
पहा राज्यलोभें रणीं आजि आलों
जना आपुल्या मारण्या सिद्ध झालों ॥ ४५ ॥

यदि मामप्रतीकारमशस्त्रं शस्त्रपाणयः ॥
धार्तराष्ट्रा रणे हन्युस्तन्मे क्षेमतरं भवेत् ॥ ४६ ॥

असो आयुधें टाकितों हींच सारीं
जरी आजि हे सर्वही शस्त्रधारी ।
रणीं धार्तराष्ट्र प्रयत्नाविनाही
मला मारितां क्षेम कल्याण पाही ॥ ४६ ॥

संजय उवाच ॥

एवमुक्ताऽर्जुनः संख्ये रथोपस्थ उपाविशत् ॥
विसृज्य सशरं चापं शोकसंविग्नमानसः ॥ ४७ ॥

असें बोलुनी सोडुनी सर्व धीर
उगा बैसला स्यंदनीं पार्थ वीर ।
धनू बाण ही टाकुनी कृष्णभक्त
बहू मानसीं होउनी शोकयुक्त ॥ ४७ ॥

इति श्रीमद्भगवद्गीतासूपनिषत्सु ब्रह्मविद्यायां योगशास्त्रे श्रीकृष्णार्जुनसंवादेऽर्जुनविषादयोगो नाम प्रथमोऽध्यायः ॥ १ ॥

पहिला अध्याय समाप्त.

---

१ शस्त्रें. २ अनायासें. ३ अर्जुन. ४ दुःखी. ५ या अध्यायांत अर्जुनास विषाद प्राप्त झाला ह्मणून यास "अर्जुनविषादयोग" हें नांव दिलें आहे.

॥ अथ द्वितीयाध्यायः प्रारभ्यते ॥

॥ संजय उवाच ॥

तं तथा कृपयाविष्टमश्रुपूर्णाकुलेक्षणम ॥
विषीदंतमिदं वाक्यमुवाच मधुसूदनः ॥ १ ॥

श्लोक (भुजंगप्रयात).

कृपेनें[1] मनीं फार व्याकूळ झाला
जया लोचनीं अश्रुचा पूर[2] आला ।
दिसे स्पष्ट कीं धैर्य गेलें खचून[3]
अशा अर्जुना कृष्ण बोले हंसून ॥ १ ॥

॥ श्रीभगवानुवाच ॥

कुतस्त्वा कश्मलमिदं विषमे समुपस्थितम् ॥
अनार्यजुष्टमस्वर्ग्यमकीर्तिकरमर्जुन ॥ २ ॥

कसा जाहला मोह उत्पन्न अंगीं
अणीबाणिच्या आजच्या या प्रसंगीं ।
करी स्वर्गिच्या प्राप्तिचा नाश भारी
तसा मोह हा कीर्तिचा नाशकारी ॥ २ ॥

क्लैब्यं मा स्म गमः पार्थ नैतत्त्वय्युपपद्यते ॥
क्षुद्रं हृदयदौर्बल्यं त्यक्त्वोत्तिष्ठ परंतप ॥ ३ ॥

श्लोक (इंद्रवज्रा).

षंढत्वें[4] हें थोरपणासिं झांकी
शोभे न बापा तुज सर्व.टाकीं ।
हे वीरश्रेष्ठा अतुलप्रतापा[5]
राहें उभा सन्मुख सिद्ध[6] बापा ॥ ३ ॥

---

१ करुणेनें. २ लोट. ३ नाश होऊन. ४ दुर्बलत्व. ५ तुझ्या सारखा सामर्थ्यवान दुसरा कोणी नाहीं. ६ तयार.

॥ अर्जुन उवाच ॥

कथं भीष्ममहं संख्ये द्रोणं च मधुसूदन ॥
इषुभिः प्रतियोत्स्यामि पूजार्हावरिसूदन ॥ ४ ॥

श्लोक (भुजंगप्रयात).

वहू पूज्य ते भीष्म आणीक द्रोण
कसे त्यांवरी सोडुं हे तीव्र बाण ।
अशा संकटीं मी पडें देवराया
अहा व्यापिते काय ही चित्त मायां ! ॥ ४ ॥

गुरूनहत्वा हि महानुभवान् श्रेयो भोक्तुं भैक्ष्यमपीह लोके ॥
हत्वार्थकामांस्तु गुरूनिहैव भुंजीय भोगान्रुधिरप्रदिग्धान् ॥ ५ ॥

श्लोक (उपेंद्रवज्रा).

मारून युद्धीं गुरु रक्त पाडूं
संपत्तिनें त्या मग सौख्य जोडूं ।
याहून श्रेयस्कर फार भिक्षा
वाटे जगीं उत्तम तीच दीक्षा ॥ ५ ॥

न चैतद्विद्मः कतरन्नो गरीयो यद्वा जयेम यदि वा नो जयेयुः ॥
यानेव हत्वा न जिजीविषामस्तेऽवस्थिताः प्रमुखे धार्तराष्ट्राः ॥ ६ ॥

श्लोक (इंद्रवज्रा).

दोघांमधें श्रेष्ठपणा कुणास
नेणों अहांला जय कीं परास ।
सन्मूख हे जे धृतराष्ट्रपुत्र
त्यांच्या हतानें मरणें पवित्र ॥ ६ ॥

---

१ मोह. २ कल्याणकारक. ३ स्थिति. ४ उत्तम.

कार्पण्यदोषोपहतस्वभावः पृच्छामि त्वां धर्मसंमूढचेताः ॥
यच्छ्रेयः स्यान्निश्चितं ब्रूहि तन्मे शिष्यस्तेऽहं शाधि मां त्वां प्रपन्नम् ॥७॥

श्लोक (भुजंगप्रयात).

अशा संकटीं मी तुला हें विचारीं
कथीं निश्चयें युक्ति कल्याणकारी ।
तुझा शिष्य मी जाहलों देवनाथा
पदीं ठेवितों हात जोडोनि माथा ॥ ७ ॥

नहि प्रपश्यामि ममापनुद्याद् यच्छोकमुच्छोषणमिंद्रियाणाम् ॥
अवाप्य भूमावसपत्नमृद्धं राज्यं सुराणामपि चाधिपत्यम् ॥ ८ ॥

श्लोक (इंद्रवज्रा).

आलें जरी कंटकहीन[1] राज्य
किंवा सुरांचें जरि सामराज्य[2] ।
ग्लानी[3] अणी जो सकलेंद्रियां ही
तो शोक जाण्यास उपाय नाहीं ॥ ८ ॥

॥ संजय उवाच ॥

एवमुक्त्वा हृषीकेशं गुडाकेशः परंतप ॥
न योत्स्य इति गोविंदमुक्त्वा तूष्णीं बभूव ह ॥ ९ ॥

संजय–

तों पार्थ देवा मग काय बोले
कृष्णा मला हें धनुही न तोले ।
मी युद्ध आतां न करींच ऐसें
बोलोनि तो वीर उगाच बैसे ॥ ९ ॥

१ निःशत्रु. २ सार्वभौमत्व. ३ विकलपणा.

तमुवाच हृषीकेशः प्रहसन्निव भारत ॥
सेनयोरुभयोर्मध्ये विषीदंतमिदं वचः ॥ १० ॥

पार्थाकडे पाहुनि त्याच कालीं
दोन्ही दळें सर्व तटस्थ[1] झालीं ।
सैन्यांत जेव्हां बहु खिन्न झाला
श्रीकृष्ण बोले हंसुनी तयाला ॥ १० ॥

॥ श्रीभगवानुवाच ॥

अशोच्यानन्वशोचस्त्वं प्रज्ञावादांश्च भाषसे ॥
गतासूनगतासूंश्च नानुशोचंति पंडिताः ॥ ११ ॥

भगवान्—

करूं नये तो करितोसि शोक
गोष्टींमधें दाविशि फार झोंक[2] ।
मेले जिते कीं बहु आज लोक
ज्ञाते तयांचा करिती न शोक ॥ ११ ॥

न त्वेवाहं जातु नासं न त्वं नेमे जनाधिपाः ॥
न चैव न भविष्यामः सर्वे वयमतःपरम् ॥ १२ ॥

मी तूं चमू[3] हे जन सर्व राय[4]
पूर्वीं कधीं हे नव्हतोंचि काय ! ।
होणार बाधा पुढती न हे कां !
ह्या कोण रोधील[5] अखंड चाकां[6] !! ॥ १२ ॥

१ स्वस्थ राहिलीं. २ प्रौढी. ३ सैन्य. ४ राजे. ५ बंद करील. ६ निरंतर. ७ चक्राला.

देहिनोऽस्मिन्यथा देहे कौमारं यौवनं जरा ॥
तथा देहांतरप्राप्तिर्धीरस्तत्र न मुह्यति ॥ १३ ॥

श्लोक (भुजंगप्रयात).

जसें प्राणिया बाल्य[1] येतें स्वदेहीं
क्रमानेंच तारुण्य[2] वार्धक्य[3] पाहीं ।
तसा देह हा जाउनी अन्य येतो
खरा धैर्यशाली न ह्या मोहिजेतो[6] ॥ १३ ॥

मात्रास्पर्शास्तु कौंतेय शीतोष्णसुखदुःखदाः ॥
आगमापायिनो नित्यास्तांस्तितिक्षस्व भारत ॥ १४ ॥

श्लोक (इंद्रवज्रा).

हीं इंद्रियें विषय हे सुख दुःख देती
संहार[4] कीं जननें[5] ह्यासच नित्य होती ।
ह्याकारणेंच विजया स्वमनांत पाहें
तीं सोसणें सकलही तुज भाग आहे ॥ १४ ॥

यं हि न व्यथयंत्येते पुरुषं पुरुषर्षभ ॥
समदुःखसुखं धीरं सोऽमृतत्वाय कल्पते ॥ १५ ॥

श्लोक (भुजंगप्रयात).

असो सौख्य कीं दुःख मोठें जिवाला
धरी तुल्य दोन्ही जुमानी नें त्यांला ।
न बाधे व्यथा ज्या असा एक जो तो
खरा ज्ञानसंपन्न मोक्षास जातो ॥ १५ ॥

---

१ बाळपणा. २ जरा. ३ नाश. ४ उत्पत्ति. ५ समान. ६ भीत नाहीं.

नासतो विद्यते भावो नाभावो विद्यते सतः ॥
उभयोरपि दृष्टोऽतस्त्वनयोस्तत्त्वदर्शिभिः ॥ १६ ॥

नसे जें मुळीं तें कसें हो मिळेल ?
दिसे स्पष्ट जें तें कसें लोपिजेल ।
कळे भेद हा ज्ञानियांलागिं[1] वेगीं[2]
सख्या अर्जुना जाण हें अंतरंगीं[3] ॥ १६ ॥

अविनाशि तु तद्विद्धि येन सर्वमिदं ततम् ॥
विनाशमव्ययस्यास्य न कश्चित्कर्तुमर्हति ॥ १७ ॥

श्लोक (इंद्रवज्रा).

जो व्यापितो या सकला जगातें
तूं जाण आत्मा स्वमनें तयातें ।
तो अक्षयी[4] यास्तव त्यास जाण
नाशूं शकेना कुणि हें[5] प्रमाणें[6] ॥ १७ ॥

अंतवंत इमे देहा नित्यस्योक्ताः शरीरिणः ॥
अनाशिनोऽप्रमेयस्य तस्माद्युद्ध्यस्व भारत ॥ १८ ॥

आहेत हे देहच नाशिवंत
आत्मा अनादी[7] समजे अनंत[8] ।
ह्याकारणें तूं तरि ऊठ वेगीं
पार्था करीं युद्ध अशा प्रसंगीं ॥ १८ ॥

---

१ ज्ञान्याला. २ सत्वर. ३ मनामध्यें. ४ क्षय होणारा नाहीं. ५ खचीत. ६ पुरातन. ७ अंत नाहीं.

य एनं वेत्ति हंतारं यश्चैनं मन्यते हतम् ॥
उभौ तौ न विजानीतो नायं हंति न हन्यते ॥ १९ ॥

आत्मा मरे हें ह्मणती कितेक
हा मारतो बोलति कैक लोक ।
दोघेहि ते अज्ञ असेच जाणा
आत्मा न मारी न मरेहि कोणा ॥ १९ ॥

न जायते म्रियते वा कदाचिन्नायं भूत्वा भविता वा न भूयः ।
अजो नित्यः शाश्वतोऽयं पुराणो न हन्यते हन्यमाने शरीरे ॥ २० ॥

जन्मे न आत्मा न मरे कधीं ही
देहासवें नासेत[2] होतें[3] नाहीं ।
आहे अनादी[4] अज[5] नित्य[6] खासें[7]
देहासवें मृत्यु न जन्म त्यास ॥ २० ॥

वेदाविनाशिनं नित्यं य एनमजमव्ययम् ॥
कथं स पुरुषः पार्थ कं घातयति हंति कम् ॥ २१ ॥

श्लोक (शालिनी).

आत्मा मायेपासुनी भिन्न आहे
ऐसें चित्तीं तूं सदा साच पाहें ।
अन्याला हा सांग मारील कैसा
किंवा तोही मृत्यु पावेल कैसा ॥ २१ ॥

---

१ देहाबरोबर. २ नाश पावत. ३ जन्मत नाहीं. ४ पुरातन. ५ जन्म नाहीं. ६ चिरकाल. ७ सत्य.

वासांसि जीर्णानि यथा विहाय नवानि गृह्णाति नरोऽपराणि ॥
तथा शरीराणि विहाय जीर्णान्यन्यानि संयाति नवानि देही ॥ २२ ॥

श्लोक (भुजंगप्रयात).

जशीं टाकुनी जीर्ण-वस्त्रांसि राया
नवीं नित्य घेतों अह्मीं पांघराया ।
शरीरें तशीं जीर्ण आत्मा त्यजूनी
नवीं नित्य घे ह्याच न्यायेंकरूनी ॥ २२ ॥

नैनं छिंदंति शस्त्राणि नैनं दहति पावकः ॥
न चैनं क्लेदयंत्यापो न शोषयति मारुतः ॥ २३ ॥

न शस्त्रें तया तोडिती तीक्ष्ण जीं जीं
न जाळी तया अग्निही तीव्र-तेजीं[२] ।
न पाणी करी आर्द्र[३] शीतस्वभावी[४]
न वायू कधीं शोषि[५] शुष्क[६]-प्रभावी ॥ २३ ॥

अच्छेद्योऽयमदाह्योऽयमक्लेद्योऽशोष्य एव च ॥
नित्यः सर्वगतः स्थाणुरचलोऽयं सनातनः ॥ २४ ॥

श्लोक (इंद्रवज्रा).

तोडावया कीं भिजवावयास
जाळावया कीं सुकवावयास ।
अशक्य तो व्यापुनि सर्व राहे
आत्मा अनादी चलहीन[७] आहे ॥ २४ ॥

---

१ जुनीं. २ प्रखरतेजांनीं. ३ ओलें. ४ शीत आहे स्वभाव ज्याचा. ५ शुष्ककरी.
६ शुष्क करण्याचाच आहे बाणा ज्याचा. ७ अचल.

अव्यक्तोऽयमचिंत्योऽयमविकार्योऽयमुच्यते ॥
तस्मादेवं विदित्वैनं नानुशोचितुमर्हसि ॥ २५ ॥

श्लोक (भुजंगप्रयात).

स्वयें सत्य अव्यक्त कीं निर्विकार
नये चिंतण्या कीं नसे त्या अकार ।
स्वतां तो मरेना कधींही क्षणोनी
त्वरें मुक्त हो शोक सारा त्यजोनी ॥२५॥

अथ चैनं नित्यजातं नित्यं वा मन्यसे मृतम् ॥
तथापि त्वं महाबाहो नैनं शोचितुमर्हसि ॥ २६ ॥

बरें जन्म वा मृत्यु येतो तयाला
असें वाटलें बा जरी त्वन्मनाला ।
तरी शोक हा योग्य नाहींच तूतें
असें वाटतें अर्जुना मन्मतीतें ॥ २६ ॥

जातस्य हि ध्रुवो मृत्युर्ध्रुवं जन्म मृतस्य च ॥
तस्मादपरिहार्येऽर्थे न त्वं शोचितुमर्हसि ॥ २७ ॥

श्लोक (इंद्रवज्रा).

जो जन्मला तो मरणार खास
मेला तरी निश्चित जन्म त्यास ।
जी गोष्ट कोणा परिहार्य[1] नाहीं
त्याकारणें शोकहि योग्य नाहीं ॥ २७ ॥

---

१ निवारण करण्यास योग्य.

अव्यक्तादीनि भूतानि व्यक्तमध्यानि भारत ॥
अव्यक्तनिधनान्येव तत्र का परिदेवना ॥ २८ ॥

जन्माअधीं जीव कुठें असे तो ?
मेल्यावरी कोणिकडेस जातो ? ।
मध्यंतरीं मात्र दिसे जना या
त्याचा तुला शोक कशास वायां ! ! ॥ २८ ॥

आश्चर्यवत्पश्यति कश्चिदेनमाश्चर्यवद्वदति तथैव चान्यः ॥
आश्चर्यवच्चैनमन्यः शृणोति श्रुत्वाप्येनं वेद न चैव कश्चित् ॥ २९ ॥

आत्मा कुणी अद्भुत मानितात
आश्चर्यकारी कुणि बोलतात ।
ऐकून कोणी बहु थोर जाणे
त्याचें खरें रूप कुणीच नेणे ॥ २९ ॥

देही नित्यमवध्योऽयं देहे सर्वस्य भारत ॥
तस्मात्सर्वाणि भूतानि न त्वं शोचितुमर्हसि ॥ ३० ॥

पूर्वी तुला म्यां कथिलेंहि हेंच
आत्मा कधीही न मरेच साच ।
त्या नाश नाहीं ध्रुवे तो समर्थ
मारीन त्याला म्हणणेंहि व्यर्थ ॥ ३० ॥

---

१ व्यर्थ. २ नित्य.

स्वधर्ममपि चावेक्ष्य न विकंपितुमर्हसि ॥
धर्म्याद्धि युद्धाच्छ्रेयोऽन्यत्क्षत्रियस्य न विद्यते ॥ ३१ ॥

धर्माकडेही तव लक्ष जाऊ
युद्धास विन्मूख[1] नकोच होऊं ।
कीं युद्ध हा क्षत्रिय-धर्म पाहीं
त्याहून श्रेयस्कर[2] अन्य नाहीं ॥ ३१ ॥

यदृच्छया चोपपन्नं स्वर्गद्वारमपावृतम् ॥
सुखिनः क्षत्रियाः पार्थ लभंते युद्धमीदृशम् ॥ ३२ ॥

श्लोक (भुजंगप्रयात).

जरी युद्ध हें प्राप्त होई नराला
खुलें होतसे स्वर्गिचें द्वार त्याला ।
बरें पातलें आयतें पुण्य[3]-पर्व
असें मानिती क्षात्रधर्मीक[4] सर्व ॥ ३२ ॥

अथ चेत्त्वमिमं धर्म्यं संग्रामं न करिष्यसि ॥
ततः स्वधर्मं कीर्तिं च हित्वा पापमवाप्स्यसि ॥ ३३ ॥

करावें असा युद्ध हा क्षात्रधर्म
तया टाकुनी आचरीशी अकर्म[5] ।
स्वधर्मासिं कीर्तीसिं विन्मूख होसी
वृथा दादुनी पाप हें आचरीसी ॥ ३३ ॥

---

१ पराङ्मुख. २ कल्याणकारक. ३ पुण्यवेळ. ४ क्षत्रियधर्मी. ५ वाईट कर्म.

अकीर्तिं चापि भूतानि कथयिष्यंति तेऽव्ययाम् ॥
संभावितस्य चाकीर्तिर्मरणादतिरिच्यते ॥ ३४ ॥

श्लोक (इंद्रवज्रा).

लोकीं तुझी ही अपकीर्ति खाण
होवोनि राहील सदैव जाण ।
संभाविताशीं अपकीर्ति पाहे
मृत्यूहुनी फार कठीण आहे ॥ ३४ ॥

भयाद्रणादुपरतं मंस्यंते त्वां महारथाः ॥
येषां च त्वं बहुमतो भूत्वा यास्यसि लाघवम् ॥ ३५ ॥

योद्धे महा जे तुज मानं देते
गेला पळोनी ह्मणतील तूतें ।
आहेस तूं शूर रणांत दक्षं
येणें तुला येइल गौणं पक्ष ॥ ३५ ॥

अवाच्यवादांश्च बहून्वदिष्यंति तवाहिताः ॥
निंदंतस्तव सामर्थ्यं ततो दुःखतरं नु किम् ॥ ३६ ॥

बोलूं नये तें अरि बोलतील
नानाप्रकारें तुज निंदितील ।
सामर्थ्य निंदीतिल याच पाईं
याहून तें दुःख अधीक काईं ॥ ३६ ॥

---

१ मान देणारे. २ पयाईत. ३ कमीपणा. ४ काय ?

हतो वा प्राप्स्यसि स्वर्गं जित्वा वा भोक्ष्यसे महीम् ॥
तस्मादुत्तिष्ठ कौंतेय युद्धाय कृतनिश्चयः ॥ ३७ ॥

श्लोक (भुजंगप्रयात).

निमालास युद्धीं तरी वास[2] नाकीं[3]
परा जिंकिल्या राज्य घे याच लोकीं ।
तुला लाभ दोन्हीमधें सत्य आहे
म्हणोनी उभा शीघ्र युद्धासिं राहें ॥ ३७ ॥

सुखदुःखे समे कृत्वा लाभालाभौ जयाजयौ ॥
ततो युद्धाय युज्यस्व नैवं पापमवाप्स्यसि ॥ ३८ ॥

श्लोक (इंद्रवज्रा).

तूं तुल्य[4] मानीं सुख दुःख दोन्ही
तैशी मनीं ठेवुनि लाभ हानी ।
दोन्ही धरोनीच समानयोगें
तूं युद्ध केल्या नच पाप लागे ॥ ३८ ॥

एषा तेऽभिहिता सांख्ये बुद्धिर्योगे त्विमां शृणु ॥
बुद्ध्या युक्तो यया पार्थ कर्मबंधं प्रहास्यसि ॥ ३९ ॥

श्लोक (शार्दूलविक्रीडित).

सांख्यांचा[5] कथिला विचार तुजला म्यां येथपर्यंत हा
तेणें सत्वर कर्मबंध सुटुनी तूं मुक्त होशी पहा ।
योगाचा[6] कथितों विचार तुजला आतां पुढें अर्जुना
ऐकायास्तव तूं मम प्रिय सख्या निश्चित ठेवी मना ॥

१ मृत्यु पावलास. २ रहाणें. ३ स्वर्गलोकीं. ४ समान. ५ ज्ञानाचा. ६ फलेच्छा सोडण्याचा.-(निष्काम कर्माचा)

नेहाभिक्रमनाशोऽस्ति प्रत्यवायो न विद्यते ॥
स्वल्पमप्यस्य धर्मस्य त्रायते महतो भयात् ॥ ४० ॥

श्लोक (इंद्रवज्रा).

तैसेंच योगाचरणांत कांहीं
पार्था क्रमोल्लंघन होत नाहीं ।
हा धर्म थोडा जरि आचरीशी
मोठ्या भयापासुन मुक्त होशी ॥ ४० ॥

व्यवसायात्मिका बुद्धिरेकेह कुरुनंदन ॥
बहुशाखा ह्यनंताश्च बुद्धयोऽव्यवसायिनाम् ॥ ४१ ॥

येथें असे निश्चित बुद्धि एक
अज्ञांस बुद्धी असती अनेक ।
ठेवूं नको चंचल सर्व हेतू
निश्चित बुद्धी धरि एक बा तूं ॥ ४१ ॥

यामिमां पुष्पितां वाचं प्रवदंत्यविपश्चितः ॥
वेदवादरताः पार्थ नान्यदस्तीति वादिनः ॥ ४२ ॥

श्लोक (मंदाक्रांता).

वेदामध्यें बहु कथियलीं वेदकर्मे अनेक
तीं तीं केल्या मिळतिल सुखें संपदा भोग नाक ।
ऐसें पार्था धरुनि हृदयीं वेदवाक्यांभिमानी[2]
त्यांच्यापेक्षां जगतिवरती थोर कांहीं न मानीं ॥४२॥

१ अमर्यादा. २ वेदाचाच अभिमान बाळगणारे.

कामात्मानः स्वर्गपरा जन्मकर्मफलप्रदाम् ॥
क्रियाविशेषबहुलां भोगैश्वर्यगतिं प्रति ॥ ४३ ॥

श्लोक (इंद्रवज्रा).

जे भोग इच्छा धरुनी मनांत
कर्मं प्रयत्नें करिती जगांत ।
लोभें अशीं जे करतात हातें
संपत्ति ऐश्वर्य मिळे तयांतें ॥ ४३ ॥

भोगैश्वर्यप्रसक्तानां तयापहृतचेतसाम् ॥
व्यवसायात्मिका बुद्धिः समाधौ न विधीयते ॥ ४४ ॥

जे भोग इच्छा धरिती प्रमाण
ते सर्व कर्मीं[1] फलसक्त[2] जाण ।
त्यांची मती त्यांसच आकळेना[3]
ब्रह्माकडे[4] जाण कधीं वळेना ॥ ४४ ॥

त्रैगुण्यविषया वेदा निस्त्रैगुण्यो भवार्जुन ॥
निर्द्वंद्वो नित्यसत्वस्थो निर्योगक्षेम आत्मवान् ॥ ४५ ॥

वेदोक्त कर्मं, जन सक्त[5] त्यांच्या
कामास येती बहुकर्मठांच्या[6] ।
सोडूनि द्वंद्वें[7] नर सौख्य भोगी
निष्कामं[8] तूं सत्वर होय योगी ॥ ४५ ॥

---

१ फलावर आसक्ती ठेवणारे. २ आवरेना. ३ निराकार परमेश्वराकडे. ४ निमग्न होणारे. ५ कर्म करणारे. ६ जोड्या. ७ निरिच्छ.

यावानर्थ उदपाने सर्वतः संप्लुतोदके ॥
तावान्सर्वेषु वेदेषु ब्राह्मणस्य विजानतः ॥ ४६ ॥

ज्याच्या नदी वाहतसे समीप
त्याला नको निश्चित जाण कूप
तैसें कळालें परमात्ममर्म[1]
त्याला नसे कारण वेदकर्म ॥ ४६ ॥

कर्मण्येवाधिकारस्ते मा फलेषु कदाचन ॥
मा कर्मफलहेतुर्भूर्मा ते संगोऽस्त्वकर्मणि ॥ ४७ ॥

श्लोक (उपजाति).

कर्माधिकारी जगतांत हो तूं
न हो फलासक्त धरून हेतू ।
कर्मे करूनीच जगीं रहावें
परी फलासक्त कधीं न व्हावें ॥ ४७ ॥

योगस्थः कुरु कर्माणि संगं त्यक्त्वा धनंजय ॥
सिद्ध्यसिद्ध्योः समो भूत्वा समत्वं योग उच्यते ॥ ४८ ॥

श्लोक (इंद्रवज्रा).

सोडी फलेच्छा करि कर्म नित्य
तेणेंच तूं होशिल बंधमुक्त ।
सिद्धीअसिद्धींत[2] समान वाग
ह्यालाच बा रे ह्मणतात योग ॥ ४८ ॥

---

१ विहीर. २ परमेश्वराचें मर्म. ३ फलप्राप्ति होवो अथवा न होवो.

दूरेण ह्यवरं कर्म बुद्धियोगाद्धनंजय ॥
बुद्धौ शरणमन्विच्छ कृपणाः फलहेतवः ॥ ४९ ॥

ह्या ज्ञानयोगास महत्त्व फार
हा कर्मयोगाहुन फार थोर ।
चित्तीं फलेच्छा धरणें हि नीच
जाणूनि कर्मं करि तूं तशींच ॥ ४९ ॥

बुद्धियुक्तो जहातीह उभे सुकृतदुष्कृते ॥
तस्माद्योगाय सुज्यस्व योगः कर्मसु कौशलम् ॥ ५० ॥

ज्ञानी ह्मणूनी जगतांत जो तो
कर्मं जगीं ह्याच लयास[1] नेतो ।
ह्याकारणें तूं नर होय योगी
कौशल्यें[2] तेणें उपजेल अंगीं ॥ ५० ॥

कर्मजं बुद्धियुक्ता हि फलं त्यक्त्वा मनीषिणः ॥
जन्मबंधविनिर्मुक्ताः पदं गच्छंत्यनामयम् ॥ ५१ ॥

आहेत जे कां नर शास्त्रवेत्ते[3]
निष्काम कर्मं करिती सदा ते ।
तेणें भवाला उतरून नित्य
जातात ते ब्रह्मपदास सत्य ॥ ५१ ॥

---

१ नाहींशीं करतो. २ कुशळपणा. ३ शास्त्र जाणणारे.

यदा ते मोहकलिलं बुद्धिर्व्यतितरिष्यति ॥
तदा गंतासि निर्वेदं श्रोतव्यस्य श्रुतस्य च ॥ ५२ ॥

बुद्धी तुझी ही बहुलिंत[1] झाली
अज्ञानअब्धींत[2] बुडून गेली ।
त्याच्यांतुनी पार निघेल जेव्हां
वैराग्य तूतें उपजेल तेव्हां ॥ ५२ ॥

श्रुतिविप्रतिपन्ना ते यदा स्थास्यति निश्चला ॥
समाधावचला बुद्धिस्तदा योगमवाप्स्यसि ॥ ५३ ॥

बुद्धीस मोह व्यवहार घाली
तेणेंच ती भ्रांतिमधें बुडाली ।
शांती समाधींत[3] घडेल तीसीं
तेव्हांच तूं योगपदासिं जासी ॥ ५३ ॥

॥ अर्जुन उवाच ॥

स्थितप्रज्ञस्य का भाषा समाधिस्थस्य केशव ॥
स्थितधीः किं प्रभाषेत किमासीत व्रजेत किम् ॥ ५४ ॥

अर्जुन—

श्लोक (भुजंगप्रयात).

समाधींत योगी कसा काय राहे ?
कसा तो असे बोलणें काय आहे ?।
जगीं वागतो कोणत्या तो रितीनें
सख्या सांग ऐकूं तरी त्वन्मुखानें ॥ ५४ ॥

---

१ मळली. २ अज्ञानसागरांत. ३ निर्गुणसमाधीमध्यें.

॥ श्रीभगवानुवाच ॥

प्रजहाति यदा कामान्सर्वान्पार्थ मनोगतान् ॥
आत्मन्येवात्मना तुष्टः स्थितप्रज्ञस्तदोच्यते ॥ ५५ ॥

भगवान्—

श्लोक (इंद्रवज्रा).

जो पापसंकल्प समस्त सोडी
आत्मस्वरूपीं[1] बहु ज्यास गोडी ।
तेथें सदा जो बहु सौख्य भोगी[2]
पार्था तयाला ह्मणतात योगी ॥ ५५ ॥

दुःखेष्वनुद्विग्नमनाः सुखेषु विगतस्पृहः ॥
वीतरागभयक्रोधः स्थितधीर्मुनिरुच्यते ॥ ५६ ॥

दुःखामुळें होत नसे उदास
इच्छा सुखाची तिळ ही न ज्यास ।
जो क्रोधकामाविरहीत[3] जाण
योगी असा तोच मनांत आण ॥ ५६ ॥

यः सर्वत्रानभिस्नेहस्तत्तत्प्राप्य शुभाशुभम् ॥
नाभिनंदति न द्वेष्टि तस्य प्रज्ञा प्रतिष्ठिता ॥ ५७ ॥

कोठेंच सक्ती तिळमात्र नाहीं
दुःखस्थितीला न विटेचि[4] माहीं ।
शुभाशुभा वाईट जो ह्मणे न
योगी असा तोच सदैव मान ॥ ५७ ॥

१ बेत. २ समाधीमध्यें. ३ भोगतो. ४ निराळा. ५ कंटाळत नाहीं.

यदा संहरते चायं कूर्मोऽगानीव सर्वशः ॥
इंद्रियाणींद्रियार्थेभ्यस्तस्य प्रज्ञा प्रतिष्ठिता ॥ ५८ ॥

सर्वेंद्रियें निग्रहितेकरूनी[1]
काढीतसे जो विषयांवरूनी ।
आकर्षितें[2] कांसव जेवि नित्य
योगी तयाला ह्मणतात सत्य ॥ ५८ ॥

विषया विनिवर्तंते निराहारस्य देहिनः ॥
रसवर्जं रसोऽप्यस्य परं दृष्ट्वा निवर्तते ॥ ५९ ॥

हटें व्रतें जे जन पाळतात
ते भोगिती भोग[3] न या जगांत ।
ही भोगइच्छा न सुटे तयास
राहे न ती ब्रह्म कळे जयास ॥ ५९ ॥

यततो ह्यपि कौंतेय पुरुषस्य विपश्चितः ॥
इंद्रियाणि प्रमाथीनि हरंति प्रसभं मनः ॥ ६० ॥

श्लोक (उपेंद्रवज्रा).

प्रयत्नें देंमूं[4] लागतो इंद्रियांसें[5]
तईं ज्ञानिया फार होती अयास ।
पहा अर्जुना इंद्रियें ह्या जगांत
बळानें मना निश्चयें ओढितात ॥ ६० ॥

---

१ निग्रहानें. २ ओढून घेतें. ३ सुखें. ४ आवरूं लागतो. ५ इंद्रियांना.

तानि सर्वाणि संयम्य युक्त आसीत मत्परः ॥
वशे हि यस्येंद्रियाणि तस्य प्रज्ञा प्रतिष्ठिता ॥ ६१ ॥

श्लोक (इंद्रवज्रा).

ऐशांसही जो अवरून घेतो
आत्मस्वरूपीं च सदा रहातो ।
स्वाधीन ज्याच्या सकलेंद्रियें हीं
योगी खरा तोच मनांत पाहीं ॥ ६१ ॥

ध्यायतो विषयान्पुंसः संगस्तेषूपजायते ॥
संगात्संजायते कामः कामात्क्रोधोऽभिजायते ॥ ६२ ॥

चिंती मनीं जो विषयांस नित्य
त्या भोगइच्छा उपजेल सत्य ।
इच्छेमुळें काम उठे मनांत
तो तृप्त नोहे तरि क्रोध येत ॥ ६२ ॥

क्रोधाद्भवति संमोहः संमोहात्स्मृतिविभ्रमः ॥
स्मृतिभ्रंशाद्बुद्धिनाशो बुद्धिनाशात्प्रणश्यति ॥ ६३ ॥

क्रोधामुळें मोह मनांत येतो
तेणें स्मृतीला मग भ्रंश[1] होतो ।
स्मृतिभ्रमें बुद्धि लयास जाते
मूढत्व[2] तेणें मग प्राप्त होतें ॥ ६३ ॥

१ चंचलता. २ मूर्खपणा.

रागद्वेषवियुक्तैस्तु विषयानिंद्रियैश्चरन् ॥
आत्मवश्यैर्विधेयात्मा प्रसादमधिगच्छति ॥ ६४ ॥

हीं इंद्रियें वश्य[1] जया नराला
जो राग[2] कीं द्वेषहि मुक्त झाला ।
ब्रह्मांत जो लीन[3] धरूनि नाद[4]
तो सर्वभावें[5] मिळवी प्रसाद ॥ ६४ ॥

प्रसादे सर्वदुःखानां हानिरस्योपजायते ॥
प्रसन्नचेतसो ह्याशु बुद्धिः पर्यवतिष्ठते ॥ ॥ ६५ ॥

दुःखें प्रसादें विलयास जातीं
प्रसन्न होतें मन ये प्रशांती ।
कीं तोच शांती चिरकाळ भोगी
प्रसन्न ज्याचें मन तोचि योगी ॥ ६५ ॥

नास्ति बुद्धिरयुक्तस्य न चायुक्तस्य भावना ॥
न चाभावयतः शांतिरशांतस्य कुतः सुखम् ॥ ६६ ॥

अज्ञांस बुद्धी विजया नसेच
अर्थात एकाग्र नसे तसाच ।
एकाग्रते वीण मिळे न शांति
शांतीविणें कोठुन सौख्यप्राप्ती ? ॥ ६६ ॥

---

१ स्वाधीन. २ प्रीति. ३ तल्लीन. ४ छंद. ५ प्रकारानें.

इंद्रियाणां हि चरतां यन्मनोऽनुविधीयते ॥
तदस्य हरति प्रज्ञां वायुर्नावमिवांभसि ॥ ६७ ॥

कर्मेंद्रियें आचरितात जेव्हां
जो आवरीना जन चित्त तेव्हां ।
बुद्धी तयाची भडके जगांत
वारा जसा नांव जलांत नेत ॥ ६७ ॥

तस्माद्यस्य महाबाहो निगृहीतानि सर्वशः ॥
इंद्रियाणींद्रियार्थेभ्यस्तस्य प्रज्ञा प्रतिष्ठिता ॥ ६८ ॥

ह्या कारणें आण असें मनांत
बुद्धीबळें जो मन आवरीत ।
ह्या इंद्रियांपासुन जाण वेगीं
तो जाण निःसंशय सत्य योगी ॥ ६८ ॥

या निशा सर्वभूतानां तस्यां जागर्ति संयमी ॥
यस्यां जाग्रति भूतानि सा निशा पश्यतो मुनेः ॥ ६९ ॥

श्लोक (चामर).

सर्व जीव जेधवां निजून राहती सदा
आत्मसंयमी पहा सदैव जागतो तदा ।
जेधवां समग्र लोक जागती जगावरी
आत्मसंयमी खुशाल झोंप घेत अंतरीं ॥ ६९ ॥

१ आत्मसंयमन करणारा. * भावार्थ हा कीं, लोक ज्याविषयीं निद्रिस्त असतात, त्याविषयीं तो जागृत असतो, व लोक ज्याविषयीं जागृत असतात त्याची आत्मसंयम्यास गरज नसते; ह्मणजे तो निद्रिस्ताप्रमाणें असतो.

आपूर्यमाणमचलप्रतिष्ठं समुद्रमापः प्रविशंति यद्वत् ॥
तद्वत्कामा यं प्रविशंति सर्वे स शांतिमाप्नोति न कामकामी ॥७०॥

श्लोक (इंद्रवज्रा).

इच्छा मनीं उद्भवतात कोटी
घेतो नद्या सागर जेवि पोटीं ।
तेवी जयामाजि जिरून जाती
प्रत्यक्ष तो निर्मल योगमूर्ती ॥ ७० ॥

विहाय कामान्यः सर्वान्पुमांश्चरति निःस्पृहः ॥
निर्ममो निरहंकारः स शांतिमधिगच्छति ॥ ७१ ॥

निरिच्छ होऊन जगांत सत्य
टाकी फलेच्छा करि कर्म नित्य ।
वागे जगीं जो अभिमानहीन
होईल तो ब्रह्मपदींच लीन ॥ ७१ ॥

एषा ब्राह्मी स्थितिः पार्थ नैनां प्राप्य विमुह्यति ॥
स्थित्वास्यामंतकालेऽपि ब्रह्म निर्वाणमृच्छति ॥ ७२ ॥

ब्राह्मी स्थिती ही मिळते जयाला
तो मोह पावेल पुन्हा कशाला ? ।
राहे स्थिती ही जरि अंतकाळीं
ब्रह्मास तो योग्यच भाग्यशाली ॥ ७२ ॥

इति श्रीमद्भगवद्गीतासूपनिषत्सु ब्रह्मविद्यायां योगशास्त्रे श्रीकृष्णार्जुनसंवादे सांख्ययोगो नाम द्वितीयोऽध्यायः ॥ २ ॥

दुसरा अध्याय समाप्त.

ह्या अ० सांख्याचा विचार आहे म्हणून यास "सांख्ययोग" असें नांव आहे.

॥ अथ तृतीयाध्यायः प्रारभ्यते ॥

॥ अर्जुन उवाच ॥

ज्यायसी चेत्कर्मणस्ते मता बुद्धिर्जनार्दन ॥
तत्किं कर्मणि घोरे मां नियोजयसि केशव ॥ १ ॥

अर्जुन—

श्लोक (इंद्रवज्रा).

कर्माहुनी ज्ञान अगाध फार
ऐसा तुवां सांगितला विचार ।
या घोर कर्मी तरि सांग आतां
कां योजितोसी मज लोकताता ॥ १ ॥

व्यामिश्रेणेव वाक्येन बुद्धिं मोहयसीव मे ॥
तदेकं वद निश्चित्य येन श्रेयोऽहमाप्नुयाम् ॥ २ ॥

संदिग्ध[2] वाक्यें वदसी दयाळा
बुद्धीस तेणें भ्रममात्र झाला ।
निश्चिंत बुद्धी तरि बा मुरारी[3]
सांगें मला एकच सौख्यकारी ॥ २ ॥

---

१ मोठें. २ संशयित. ३ श्रीकृष्ण.

॥ श्रीभगवानुवाच ॥

लोकेऽस्मिन्द्विविधा निष्ठा पुरा प्रोक्ता मयानघ ॥
ज्ञानयोगेन सांख्यानां कर्मयोगेन योगिनाम् ॥ ३ ॥

भगवान्—

आधींच दोन्ही कथिले सुमार्ग
ज्ञान्यास तो योग्यच ज्ञानमार्ग ।
निष्कामकर्मी पथ अन्य जाण
तो योग्य योग्यास मनांत आण ॥ ३ ॥

न कर्मणामनारंभान्नैष्कर्म्यं पुरुषोऽश्नुते ॥
न च संन्यसनादेव सिद्धिं समधिगच्छति ॥ ४ ॥

कर्मास आरंभ जरी न केला
मोक्षास तो योग्य तरी न झाला ।
जो स्वस्वकर्मांसि उगाच टाकी
कल्याण पावे नच सत्य तो कीं ॥ ४ ॥

नहि कश्चित्क्षणमपि जातु तिष्ठत्यकर्मकृत् ॥
कार्यते ह्यवशः कर्म सर्वः प्रकृतिजैर्गुणैः ॥ ५ ॥

केल्याविना कर्म कुणी न राही
विश्रांति कोणा क्षण एक नाहीं ।
ज्यांच्या जसें येत असे मनांत
तैसे स्वभावा सम वर्ततात[२] ॥ ५ ॥

---

१ निरिच्छ. २ वागतात.

कर्मेंद्रियाणि संयम्य य आस्ते मनसा स्मरन् ॥
इंद्रियार्थान्विमूढात्मा मिथ्याचारः स उच्यते ॥ ६ ॥

बाहेर ढोंगें विषयांस वारी
चित्तांत चाले जपमाळ सारी ।
तो मूर्ख ढोंगी मुकला[1] विवेक[2]
दांभीक[3] त्याला ह्मणतात लोक ॥ ६ ॥

यस्त्विंद्रियाणि मनसा नियम्यारभतेऽर्जुन ॥
कर्मेंद्रियैः कर्मयोगमसक्तः स विशिष्यते ॥ ७ ॥

श्लोक (उपजाति).

करूनियां निग्रह[4] सर्व चित्त
कर्मेंद्रियांनीं[5] करवीत कृत्य ।
धरी न आशा मनिं तत्फळाची[6]
तो श्रेष्ठ जाणे नर सव्यसाची ॥ ७ ॥

नियतं कुरु कर्म त्वं कर्म ज्यायो ह्यकर्मणः ॥
शरीरयात्राऽपि च ते न प्रसिद्ध्येदकर्मणः ॥ ८ ॥

श्लोक (इंद्रवज्रा).

आवश्य कर्मं अचरी यथेष्ट
कीं कर्म त्यागाहुनि[7] कर्म श्रेष्ठ ।
केल्याविना स्वल्पहि कर्म कांहीं
हा देह संरक्षण होत नाहीं ॥ ८ ॥

---

१ सुटला. २ विचार. ३ ढोंगी. ४ आवरून. ५ इंद्रियांकडून. ६ त्याच्या फलाची. ७ कर्म सोडून देण्यापेक्षां.

यज्ञार्थात्कर्मणोऽन्यत्र लोकोऽयं कर्मबंधनः ॥
तदर्थं कर्म कौंतेय मुक्तसंगः समाचर ॥ ९ ॥

श्लोक (भुजंगप्रयात).

तसा आणखी एक आहे उपाय
तया आचराया नसे प्रत्यवाय ।
फलेच्छा अर्धी पूर्ण यज्ञार्थ सोडी
करी कर्म जें शीघ्र मोक्षास जोडी ॥ ९ ॥

सहयज्ञाः प्रजाः सृष्ट्वा पुरोवाच प्रजापतिः ॥
अनेन प्रसविष्यध्वमेष वोऽस्त्विष्टकामधुक् ॥ १० ॥

श्लोक (वसंततिलका).

लोकांबरोबरच हे सुरयज्ञ पार्था
निर्मून काय वदला तइं सृष्टिकर्त्ता ।
वृद्धी करा सुजनहो किति गूण वानू
म्यां ही तुह्मांस दिधली जणुं कामधेनू ॥ १० ॥

देवान्भावयतानेन ते देवा भावयंतु वः ॥
परस्परं भावयंतः श्रेयः परमवाप्स्यथ ॥ ११ ॥

श्लोक (इंद्रवज्रा).

देवांस यज्ञेंकरूनी भजावें
प्रसन्न होती तरि ते स्वभावें ।
परस्परें ह्यांतच सौख्य होय
कल्याणकारी उघडा उपाय ॥ ११ ॥

---

१ हरकत. २ परमेश्वराप्रीत्यर्थ. ३ देवाप्रीत्यर्थ यज्ञ. ४ ब्रह्मदेव. ५ वाढवा. ६ हे कामधेनूप्रमाणें इच्छित फलें देणारे आहेत. ७ यज्ञाच्या मुखानें.

इष्टान्भोगान्हि वो देवा दास्यंते यज्ञभाविताः ॥
तैर्दत्तानप्रदायैभ्यो यो भुंक्ते स्तेन एव सः ॥ १२ ॥

देवांस यज्ञें जन अर्पिताती
त्यां देव इच्छाफल-भोग देती ।
खांतो न देतां उपकारि[1] देवां
कृतघ्न[2] तो चोर खरा ह्मणावा ॥ १२ ॥

यज्ञशिष्टाशिनः संतो मुच्यंते सर्वकिल्बिषैः ॥
भुंजते ते त्वघं पापा ये पचंत्यात्मकारणात् ॥ १३ ॥

श्लोक (वसंततिलका).

जे यज्ञशेषें[3] अवघें जन नित्य खाती
ते पापमुक्त नर मोक्षपदासि जाती ।
जो स्वोदरार्थ[4] शिजवून नवान्न खातो
तो पाप खाउनि बळें नरकासि जातो॥ १३॥

अन्नाद्भवंति भूतानि पर्जन्यादन्नसंभवः ॥
यज्ञाद्भवति पर्जन्यो यज्ञः कर्मसमुद्भवः ॥ १४ ॥

श्लोक (शालिनी).

प्राणी अन्नापासुनी जन्मताती
पर्जन्यानें अन्ननिष्पत्ति होती ।
यज्ञानें तो सर्व पर्जन्य येई
तैसा कर्मापासुनी यज्ञ होई[5] ॥ १४ ॥

---

१ सुखें. २ उपकार करणाऱ्या. ३ केलेले उपकार न. जाणणारा. ४ यज्ञाचें अवशिष्ट. ५ आपल्याच पोटासाठीं.

कर्म ब्रह्मोद्भवं विद्धि ब्रह्माक्षरसमुद्भवम् ॥
तस्मात्सर्वगतं ब्रह्म नित्यं यज्ञे प्रतिष्ठितम् ॥ १५ ॥

श्लोक (इंद्रवज्रा).

वेदाकडोनी निघतात कर्मे
कीं अक्षरांपासुन वेदमर्मे ।
ह्याकारणें व्याप्त करी जगातें
यज्ञांत तें ब्रह्म सदा रहातें ॥ १५ ॥

एवं प्रवर्तितं चक्रं नानुवर्तयतीह यः ॥
अघायुरिंद्रियारामो मोघं पार्थ स जीवति ॥ १६ ॥

जें चालतें चक्र परंपरा हें
जो चालवीना जन पाप लाहे ।
तो पाप आयुष्य उगाच वाहे
जो इंद्रियां आधिन नित्य राहे ॥ १६ ॥

यस्त्वात्मरतिरेव स्यादात्मतृप्तश्च मानवः ॥
आत्मन्येव च संतुष्टस्तस्य कार्यं न विद्यते ॥ १७ ॥

आत्मत्व ज्याला कळण्यांत आलें
कीं रंगुनी चित्त तयांत गेलें ।
आत्मत्वयोगें बहु तुष्ट झाला
कांहीं नसे कारण कर्म त्याला ॥ १७ ॥

---

१ व्यास नाश नाहीं तें. २ पुरातन. ३ पाप जोडतो. ४ आपण कोण हें. ५ कर्मानें तो बद्ध होत नाहीं.

नैव तस्य कृतेनार्थो नाकृतेनेह कश्चन ॥
न चास्य सर्वभूतेषु कश्चिदर्थव्यपाश्रयः ॥ १८ ॥

कर्मीं तयाला फळ हें नसेच
ज़ाणें अकर्मास फळें तसेंच ।
जो सर्वभूतीं फलसक्ति सोडी
तो मुक्त होऊन कृतार्थ जोडी ॥ १८ ॥

तस्मादसक्तः सततं कार्यं कर्म समाचर ॥
असक्तो ह्याचरन्कर्म परमाप्नोति पूरुषः ॥ १९ ॥

कर्तव्य कर्मं ह्मणुनी करावीं
निष्काम कर्मं जनिं आचरावीं ।
आसक्त कर्मीं जन जो न होय
तो निश्चयें ब्रह्मपदासि जाय ॥ १९ ॥

कर्मणैव हि संसिद्धिमास्थिता जनकादयः ॥
लोकसंग्रहमेवापि संपश्यन्कर्तुमर्हसि ॥ २० ॥

कर्मं करूनी जनकादि राजे
बा पावले सिद्धिस याचि तेजें[1] ॥
लोकार्थ[2] कर्मं करितात श्रेष्ठ
ह्याकारणें तूं करिं कर्म इष्ट ॥ २० ॥

---

१ निष्कर्माच्या तेजानें. २ लोकांसाठीं.

यद्यदाचरति श्रेष्ठस्तत्तदेवेतरो जनः ॥
स यत्प्रमाणं कुरुते लोकस्तदनुवर्त्तते ॥ २१ ॥

लोकीं जसे चालति मोठमोठे
जातात कीं अन्यहि त्याच वाटे ।
कीं शास्त्रें जें ते ठरवून देती
त्या त्या परी सर्वच वागताती ॥ २१ ॥

न मे पार्थास्ति कर्तव्यं त्रिषु लोकेषु किंचन ॥
नानवाप्तमवाप्तव्यं वर्त्त एव च कर्मणि ॥ २२ ॥

मातें त्रिलोकांत उणें न कांहीं
कर्तव्य पार्था तिळमात्र नाहीं ।
इच्छीत नाहीं जरि स्वल्प बा मी
लोकानुसारें[1] तरि वागतों मी ॥ २२ ॥

यदि ह्यहं न वर्त्तेयं जातु कर्मण्यतंद्रितः ॥
मम वर्त्मानुवर्तते मनुष्याः पार्थ सर्वशः ॥ २३ ॥

श्लोक (भुजंगप्रयात).

निरालस्यपंथें जरी मीच नित्य
प्रवर्तेन कर्मीं जगामाजि सत्य ।
तरी सर्व हें लोक माझ्याच मार्गें
पहा शीघ्र येतील तैशाच मार्गें ॥ २३ ॥

---

१ नियम. २ लोकांप्रमाणें.

उत्सीदेयुरिमे लोका न कुर्यां कर्म चेदहम् ॥
संकरस्य च कर्त्ता स्यामुपहन्यामिमाः प्रजाः ॥ २४ ॥

जरी कर्म मीं नाचरीलें यथेष्ट
तरी लोक हे सर्व होतील भ्रष्ट ।
करूं अन्यधर्मैं जरी तेंच कृत्य
तरी ह्या प्रजा भ्रष्ट होतील सत्य ॥ २४ ॥

सक्ताः कर्मण्यविद्वांसो यथा कुर्वंति भारत ॥
कुर्याद्विद्वांस्तथासक्तश्चिकीर्षुर्लोकसंग्रहम् ॥ २५ ॥

श्लोक (शिखरिणी).

अडाणी जे प्राणी सकलभुवनीं कर्म करिती
फलाशेच्या पाशा मनिं धरुनि नाशास मिळती ।
ह्मणोनीयां ज्ञानी फलेंविफल मानी सम मनीं
करी कर्मैं धर्मैं शुभअशुभ वेंमैं समजुनी ॥ २५ ॥

न बुद्धिभेदं जनयेदज्ञानां कर्मसंगिनाम् ॥
जोषयेत्सर्वकर्माणि विद्वान्युक्तः समाचरन् ॥ २६ ॥

श्लोक (इंद्रवज्रा).

पाडूं नये भ्रांतिमधें कुणाला
अज्ञान वा कर्मठ लोक त्याला ।
बुद्ध्याच त्यांच्याकडुनी करावें
आवश्य उत्तेजन त्यांस द्यावें ॥ २६ ॥

---

१ लोक. २ सिद्धि किंवा असिद्धि. ३ मर्मैं.

प्रकृतेः क्रियमाणानि गुणैः कर्माणि सर्वशः ॥
अहंकारविमूढात्मा कर्त्ताहमिति मन्यते ॥ २७ ॥

मायागुणांनीं घडतात कर्में[1]
सुज्ञांस बा हीं कळतात मर्में ।
गर्विष्ठ कर्ता ह्मणतो स्वता मी
तो मूर्ख आहेच प्रसिद्ध नामीं ॥ २७ ॥

तत्ववित्तु महाबाहो गुणकर्मविभागयोः ॥
गुणा गुणेषु वर्तंत इति मत्वा न सज्जते ॥ २८ ॥

मायागुणें मूर्ख भुलूनि जातो
पार्था फलासक्त ह्मणोनि होतो ।
ज्ञान्यास बापा कधिं हें न साहे[2]
निष्कामकर्मीं ह्मणुनीच राहे ॥ २८ ॥

प्रकृतेर्गुणसंमूढाः सज्जंते गुणकर्मसु ॥
तानकृत्स्नविदो मंदान्कृत्स्नविन्न विचालयेत् ॥ २९ ॥

मायागुणानें विषयांत सक्त
करूं नये त्यां सुजनें विभक्त[3] ।
मूर्खांस ऐशा खवळूं न द्यावें
वाटेस त्यांच्या सुजनें न जावें ॥ २९ ॥

---

१ मोहामुळें. २ मान्य होत नाहीं. ३ निराळा.

मयि सर्वाणि कर्माणि संन्यस्याध्यात्मचेतसा ।।
निराशीर्निर्ममो भूत्वा युद्धस्व विगतज्वरः ॥ ३० ॥

तूं शांतचित्तें मज सर्व कर्मे ॥
अर्पी निरिच्छेवरच्याच धर्मे ।
सोडोनि आतां भय शोक दोनी
युद्धास हो सिद्ध नरा उठोनी ॥ ३० ॥

ये मे मतमिदं नित्यमनुतिष्ठंति मानवाः ।।
श्रद्धावंतोऽनसूयंतो मुच्यंते तेऽपि कर्मभिः ॥ ३१ ॥

माझें असें हें मत नित्य जाण
जे लोक चित्तीं धरिती प्रमाण ।
जे एकनिष्ठें[1] जन आचरीती
कर्मांतुनी ते नर मुक्त होती ॥ ३१ ॥

ये त्वेतदभ्यसूयंतो नानुतिष्ठंति मे मतम् ॥
सर्वज्ञानविमूढांस्तान्विद्धि नष्टानचेतसः ॥ ३२ ॥

आरोपुनी दोष मतावरी या
स्वीकार याचा करिती न वांया ।
त्याला क्षणावें बहुशून्यबुद्धी
जाणेल तोही मिळवील सिद्धी ॥ ३२ ॥

---

१ एकनिष्ठेनें.

सदृशं चेष्टते स्वस्याः प्रकृतेर्ज्ञानवानपि ॥
प्रकृतिं यांति भूतानि निग्रहः किं करिष्यति ॥ ३३ ॥

श्लोक (शालिनी).

ज्ञानी ही तो पूर्वसंस्कारयोगें
माये ऐसा अर्जुना जाण वागे ।
प्राणी मायाधीन[1] सर्वांस ठावें
कैसें तेथें निग्रहें[2] बा करावें !! ॥ ३३ ॥

इंद्रियस्येंद्रियस्यार्थे रागद्वेषौ व्यवस्थितौ ॥
तयोर्न वशमागच्छेत्तौ ह्यस्य परिपंथिनौ ॥ ३४ ॥

श्लोक (स्रग्धरा).

प्रीती[3] गोडावरीही धरिति बहु गमे थोरवी त्यांत मोटी
जें जें वाईट आहे झडकरि करिती इंद्रियें द्वेष पोटीं
हा राग[4] द्वेष दोन्ही प्रखरतर[5] रिपू झोंबती फार ठावे[6]
ह्यासाठीं सुज्ञलोकीं कधिं न वशतया धैर्य टाकूनि व्हावें

श्रेयान्स्वधर्मो विगुणः परधर्मात्स्वनुष्ठितात् ॥
स्वधर्मे निधनं श्रेयः परधर्मो भयावहः ॥ ३५ ॥

कैसाही धर्म झाला तरि मनिं समजे आपुला तोच मोठा । अन्यांचा योग्य[7] आहे ह्मणुनि अचरितां फार होईल तोटा ॥ गेला स्वप्राण वेळीं जरि तरि बरवा आपुल्या धर्म काजीं[8] । बाबा धर्मी पराच्या भय बहु असतें सत्य हें शूर गाजी ॥ ३५ ॥

---

१ मायेच्या स्वाधीन. २ निग्रहानें. ३ प्रीति. ४ कडक. ५ माहित आहेत. ६ चांगला. ७ कामामध्यें. ८ दुसऱ्याच्या.

॥ अर्जुन उवाच ॥

अथ केन प्रयुक्तोऽयं पापं चरति पूरुषः ॥
अनिच्छन्नपि वार्ष्णेय बलादिव नियोजितः ॥ ३६ ॥

श्लोक (इंद्रवज्रा).

प्रेरीतसे कोण जिवास बापा
हा जो बळानें करवीत पापा ।
चित्तांत इच्छा अगदीं नसून
हा कोण हट्टें करवी झटून ॥ ३६ ॥

॥ श्रीभगवानुवाच ॥

काम एष क्रोध एष रजोगुणसमुद्भवः ॥
महाशनो महापाप्मा विद्ध्येनमिह वैरिणम् ॥ ३७ ॥

भगवान्—

हा काम हा क्रोधही फार दुष्ट
रजोगुणें[2] उद्भवला बलिष्ठ ।
खादाड मोठा बहु पापकारी
शत्रू महा हा जननाशकारी ॥ ३७ ॥

धूमेनाव्रियते वह्निर्यथाऽऽदर्शो मलेन च ॥
यथोल्बेनाऽऽवृतो गर्भस्तथा तेनेदमावृतम् ॥ ३८ ॥

श्लोक (भुजंगप्रयात).

धुरानें जसा अग्नि वेष्टून जातो
मळानें जसा आरसा व्याप्त होतो ।
जसें झांकितें नाळ[3] गर्भास नित्य
तसा काम हा झांकि सर्वांस सत्य ॥३८॥

१ इच्छा. २ रजापासून उत्पन्न झाला आहे. ३ गर्भाभोंवतीं असणारें वेष्टण.

आवृतं ज्ञानमेतेन ज्ञानिनो नित्यवैरिणा ॥
कामरूपेण कौंतेय दुष्पूरेणानलेन च ॥ ३९ ॥

श्लोक (इंद्रवज्रा).

बा व्यापिलें ज्ञान समग्र यानें
ज्ञानीजनांचा अरि जो गुणानें ।
नानाप्रकारें अणितोच शीर्ण
कामाग्नि[2] हा जाण महा कठीण ॥ ३९ ॥

इंद्रियाणि मनो बुद्धिरस्याधिष्ठानमुच्यते ॥
एतैर्विमोहयत्येष ज्ञानमावृत्य देहिनम् ॥ ४० ॥

देहांत बुद्धी मन इंद्रियें हीं
संपादुनी[3] काम तयांत राही ।
त्यांच्या कडोनी भुलवूनि प्राणी
हा ज्ञान वेष्टून[4] भ्रमांत आणी ॥ ४० ॥

तस्मात्त्वमिंद्रियाण्यादौ नियम्य भरतर्षभ ॥
पाप्मानं प्रजहि ह्येनं ज्ञानविज्ञाननाशनम् ॥ ४१ ॥

श्लोक (भुजंगप्रयात).

अशाकारणें इंद्रियें जिंक आधीं[5]
तईं अर्जुना नाशती ह्या उपाधी[6] ।
महाज्ञाननाशासि जो सर्वमूळ
अधीं त्यास काढी खणूनी समूळ[7] ॥ ४१ ॥

---

१ त्रास. २ हा इच्छारूप अग्नि. ३ त्यांत मिळून. ४ ज्ञानास आटोक्यांत धरून. ५ प्रथम. ६ संकटें. ७ मूळापासून.

इंद्रियाणि पराण्याहुरिंद्रियेभ्यः परं मनः ॥
मनसस्तु परा बुद्धिर्यो बुद्धेः परतस्तु सः ॥ ४२ ॥

श्लोक (इंद्रवज्रा).

हीं इंद्रियें बा विषयांत श्रेष्ठ
त्याहूनि आहे मन हें वरिष्ठ ।
बुद्धी मनाहून बहूत थोर
आत्मा तिच्याहून अगाध फार ॥ ४२ ॥

एवं बुद्धेः परं बुद्ध्वा संस्तभ्यात्मानमात्मना ॥
जहि शत्रुं महाबाहो कामरूपं दुरासदम् ॥ ४३ ॥

आत्मा असा थोर मनांत आण
त्याच्या स्वरूपास मनांत जाण ।
कामारि हा दुष्ट त्वरीत जिंकी
आहे तुला हें नर सांगणें कीं ॥ ४३ ॥

इति श्रीमद्भगवद्गीतासूपनिषत्सु ब्रह्मविद्यायां योगशास्त्रे श्रीकृष्णार्जुनसंवादे कर्मयोगो नाम तृतीयोऽध्यायः ॥ ३ ॥

तिसरा अध्याय समाप्त.

या अध्यायांत कर्मांचा विचार असल्यामुळें यास "कर्मयोग" असें नांव आहे.

---

१ हा इच्छारूप शत्रु.

॥ अथ चतुर्थोऽध्यायः प्रारभ्यते ॥

॥ श्रीभगवानुवाच ॥

इमं विवस्वते योगं प्रोक्तवानहमव्ययम् ॥
विवस्वान्मनवे प्राह मनुरिक्ष्वाकवेऽब्रवीत ॥ १ ॥

भगवान् अर्जुनास ह्मणतात.

श्लोक (इंद्रवज्रा).

जो बोलिलों योग अनादि त्याला
सूर्यास मी पूर्वीच सांगिजेला ।
त्यानें मनूलां कथिला क्रमानें
इक्ष्वाकुला[1] सांगितला मनूनें ॥ १ ॥

एवं परंपराप्राप्तमिमं राजर्षयो विदुः ॥
स कालेनेह महता योगो नष्टः परंतप ॥ २ ॥

परंपरेनें कथण्यांत आला
राजर्षिनीं[2] पूर्वीच जाणिजेला ।
ऋषीजनांला बहु मान्य झाला
कालेंकरूनी विलयासं[3] गेला ॥ २ ॥

स एवायं मया तेऽद्य योगः प्रोक्तः पुरातनः ॥
भक्तोऽसि मे सखा चेति रहस्यं ह्येतदुत्तमम् ॥ ३ ॥

आतां तुला म्यां कथिलाहि तोच
आला जसां चालत बा तसाच ।
सांगीतलें तूं प्रियभक्तराज
ह्याकारणें तूज रहस्यं[4] आज ॥ ३ ॥

---

१ विशेष नाम. २ विशेष नाम एका राजाचें. ३ अस्तास गेला. ४ गुह्य.

॥ अर्जुन उवाच ॥

अपरं भवतो जन्म परं जन्म विवस्वतः ॥
कथमेतद्विजानीयां त्वमादौ प्रोक्तवानिति ॥ ४ ॥

अर्जुन–

आलीकडे जन्म तुझें दिसे हें
भानू अनादी उघडेंच आहे ।
सांगीतला योग कसा तयाला
हें स्पष्ट सांगें तरि बा दयाळा ॥ ४ ॥

॥ श्रीभगवानुवाच ॥

बहूनि मे व्यतीतानि जन्मानि तव चार्जुन ॥
तान्यहं वेद सर्वाणि न त्वं वेत्थ परंतप ॥ ५ ॥

भगवान्–

म्यां घेतले जन्म अनंत बापा
झाले तुझेही बहु शत्रुतापा[2] ।
हें ईशतत्त्वें[3] समजे मला तें
जीवत्त्वयोगें[4] नकळे तुला तें ॥ ५ ॥

अजोऽपि सन्नव्ययात्मा भूतानामीश्वरोऽपि सन् ॥
प्रकृतिं स्वामधिष्ठाय संभवाम्यात्ममायया ॥ ६ ॥

मातें कधीं नाश न जन्म साचा
स्वामी असें मीच चराचराचा[5] ॥
माझीच माया गुतवूनि[6] घेतों
माझाच मी घेउन जन्म येतों ॥ ६ ॥

---

१ अर्जुना. ४ शत्रूस ताप देणाऱ्या. ३ मी परमेश्वर असल्यानें. ४ तूं मनुष्य असल्यानें. ५ स्थावरजंगमाचा. ६ वेष्टून.

यदा यदा हि धर्मस्य ग्लानिर्भवति भारत ॥
अभ्युत्थानमधर्मस्य तदाऽऽत्मानं सृजाम्यहम् ॥ ७ ॥

अस्तासि जातो जगतांत धर्म
वृद्धीस येतो सगळा अधर्म ।
सृष्टीमध्यें गोंधळ सर्व होतो
मी त्याच वेळीं अवतार घेतों ॥ ७ ॥

परित्राणाय साधूनां विनाशाय च दुष्कृताम् ॥
धर्मसंस्थापनार्थाय संभवामि युगे युगे ॥ ८ ॥

तारावया सज्जन साधुवृंद[२]
मारावया दुर्जन गर्वधुंद[३] ।
स्थापावया धर्म पुन्हां जगांत
मी जन्म घेतोंच युगायुगांत ॥ ८ ॥

जन्म कर्म च मे दिव्यमेवं यो वेत्ति तत्त्वतः ॥
त्यक्त्वा देहं पुनर्जन्म नैति मामेति सोऽर्जुन ॥ ९ ॥

मज्जन्मलीला[४] बहु दिव्य[५] पाही
मृत्यू अणी जन्म न जाणिल्या ही[६] ।
जाणील जो टाकुनि देह रूपा
पावेल तो सत्वर मत्स्वरूपा ॥ ९ ॥

---

१ सगुणरूप. २ साधूंचे समुदाय. ३ गर्वानें अंध झालेले. ४ चरित्र. ५ विलक्षण. ६ ती समजल्यावर जन्म मृत्यु नाहीं.

वीतरागभयक्रोधा मन्मया मामुपाश्रिताः ।।
बहवो ज्ञानतपसा पूता मद्भावमागताः ।। १० ।।

हा काम टाकूनच क्रोध भीती
माझाच जे आश्रय आदरीती ।
माझ्या प्रसादें मिळवून ज्ञान
ते मत्स्वरूपीं मिळतात जाण ॥ १० ॥

ये यथा मां प्रपद्यंते तांस्तथैव भजाम्यहम् ।।
मम वर्त्मानुवर्तंते मनुष्याः पार्थ सर्वशः ।। ११ ।।

जे ज्याप्रमाणें भजतात मातें
मी त्याप्रमाणें भजतों तयांतें ।
हें अर्जुना तूं जगतांत पाहें
माझ्याच मार्गें जन वागताहे ॥ ११ ॥

कांक्षंतः कर्मणां सिद्धिं यजंत इह देवताः ।।
क्षिप्रं हि मानुषे लोके सिद्धिर्भवति कर्मजा ।। १२ ।।

सिद्धीच चित्तीं धरूनी सदैव
जे पूजिती सादर अन्य देव ।
ह्या मृत्युलोकीं तरि कर्मयोगें
त्या सर्व सिद्धी फळतात वेगें ॥ १२ ॥

चातुर्वर्ण्यं मया सृष्टं गुणकर्मविभागशः ॥
तस्य कर्त्तारमपि मां विद्ध्यकर्त्तारमव्ययम् ॥ १३ ॥

श्लोक (स्रग्धरा).

केले निर्माण पार्था सकल जगभरीं वर्ण हे चार मीच
कर्माच्या दृग्विभागें गुणअवगुण हे पाहुनी उंच नीच
त्यांचा कर्त्ता खरा मी जरि तरिच पहा सत्य कर्त्ताहि नाहीं ।
मी कोणा लिप्त नाहीं ह्मणुनि मज नरा नाशही सत्य नाहीं ॥ १३ ॥

न मां कर्माणि लिंपंति न मे कर्मफले स्पृहा ॥
इति मां योऽभिजानाति कर्मभिर्न स बद्ध्यते ॥ १४ ॥

श्लोक (इंद्रवज्रा).

कर्में न पार्था मज लिप्त कर्तीं
इच्छी कधीं मी नच कर्मप्राप्ती ।
हें तत्त्व जो कां स्वमनांत पाहे
तो कर्मबंधांतुन मुक्त आहे ॥ १४ ॥

एवं ज्ञात्वा कृतं कर्म पूर्वैरपि मुमुक्षुभिः ॥
कुरु कर्मैव तस्मात्त्वं पूर्वैः पूर्वतरं कृतम् ॥ १५ ॥

श्लोक (शालिनी).

जाणोनी हीं तत्त्व आणीक मर्में
मोक्षार्थ्यांनीं आचरीलीं स्वकर्में ।
ह्यासाठीं तूं बा करीं कर्म हेंच
केलें जें त्वत्पूर्वजांनीं[२] तसेंच ॥ १५ ॥

१ ज्ञाती. २ तुझ्या वडिलांनीं.

किं कर्म किमकर्मेति कवयोऽप्यत्र मोहिताः ॥
तत्ते कर्म प्रवक्ष्यामि यज्ज्ञात्वा मोक्ष्यसेऽशुभात् ॥ १६ ॥

श्लोक (इंद्रवज्रा).

ज्ञान्यासही होइल मोह जाण
कीं कर्म हें कोण अकर्म कोण ।
त्यांतील आतां कथितोंच हेतूं
तैं मुक्त होशी अशुभांतुनी तूं ॥ १६ ॥

कर्मणो ह्यपि बोद्धव्यं बोद्धव्यं च विकर्मणः ॥
अकर्मणश्च बोद्धव्यं गहना कर्मणो गतिः ॥ १७ ॥

घेई नरा तें समजूनि कर्म
तैसेंच आहे कसलें विकर्म ।
घे जाणुनी सर्व खरीं अकर्मे
ज्यांचीं पहा फार कठीण मर्में ॥ १७ ॥

कर्मण्यकर्म यः पश्येदकर्मणि च कर्म यः ॥
स बुद्धिमान्मनुष्येषु स युक्तः कृत्स्नकर्मकृत् ॥ १८ ॥

सत्कर्म मानी करुनी न केलें
दुष्कर्म मानी न करून केलें ।
तो थोर बुद्धी जगतांत श्रेष्ठ
कर्तव्यकर्ता जन तो वरिष्ठ ॥ १८ ॥

---

१ उद्देश.

यस्य सर्वे समारंभाः कामसंकल्पवर्जिताः ॥
ज्ञानाग्निदग्धकर्माणं तमाहुः पंडितं बुधाः ॥ १९ ॥

जो कामसंकल्प त्यजूनि सत्य
आरंभ कर्मास करीत नित्य ।
ज्ञानाग्निनें जाळुनि सर्व कर्म
ज्ञाता खरा तो उघडेंच वर्म ॥ १९ ॥

त्यक्त्वा कर्मफलासंगं नित्यतृप्तो निराश्रयः ॥
कर्मण्यभिप्रवृत्तोऽपि नैव किंचित्करोति सः ॥ २० ॥

सोडी फलेच्छा करि कर्म नित्य
निराश्रयें नित्य मनांत तृप्त ।
कर्मैं करी सर्व जगीं प्रबुद्ध
मायेकडूनी मग तो न बद्ध ॥ २० ॥

निराशीर्यतचित्तात्मा त्यक्तसर्वपरिग्रहः ॥
शारीरं केवलं कर्म कुर्वन्नाप्नोति किल्बिषम् ॥ २१ ॥

स्वाधीन ठेवून तनू मनास
परिग्रहाची[1] धरि तो न आस ।
शारीरमात्रें[2] करि कर्म नित्य
अर्थात तो होइल बंधमुक्त ॥ २१ ॥

---

१ दान मिळण्याची. २ देहमात्रेंकरून.

यदृच्छालाभसंतुष्टो द्वंद्वातीतो विमत्सरः ॥
समः सिद्धावसिद्धौ च कृत्वापि न निबद्ध्यते ॥ २२ ॥

जो लाभ हानी समतोल मानी
हेवा मनीं मत्सर ही न आणी ।
कीं कार्य होवो अथवा न हो कीं
ज्या एक तो बद्ध न होय लोकीं ॥ २२ ॥

गतसंगस्य मुक्तस्य ज्ञानावस्थितचेतसः ॥
यज्ञायाचरतः कर्म समग्रं प्रविलीयते ॥ २३ ॥

जो मुक्त संगें[1] अथवा विरक्त
आत्मस्वरूपीं धरि नित्य चित्त ।
यज्ञार्थ कृत्यें[2] करि नित्य हातें
तत्कर्म सारेंच लयास[3] जातें ॥ २३ ॥

ब्रह्मार्पणं ब्रह्म हविर्ब्रह्माग्नौ ब्रह्मणा हुतम् ॥
ब्रह्मैव तेन गंतव्यं ब्रह्मकर्मसमाधिना ॥ २४ ॥

हा अग्नि कर्ता हवि[3] हेंच ब्रह्म
कीं होम[4]द्रव्यें सगळेंच ब्रह्म ।
हें कर्महीं ब्रह्म असेंच मानी
जाईल तो ब्रह्मपदास ज्ञानी ॥ २४ ॥

---

१ जो आसक्त नाहीं. २ करून न केल्याप्रमाणें होतें. ३ तूप. ४ होमाचें साहित्य.

दैवमेवापरे यज्ञं योगिनः पर्युपासते ॥
ब्रह्माग्नावपरे यज्ञं यज्ञेनैवोपजुह्वति ॥ २५ ॥

कीं दैवयज्ञास धरूनि श्रेष्ठ
उपासितीं[2] तो किति एकनिष्ठ ।
हें ब्रह्म अग्नी धरुनी मनांत
तयांत ज्ञानी मन होमितात[3] ॥ २५ ॥

श्रोत्रादीनींद्रियाण्यन्ये संयमाग्निषु जुह्वति ॥
शब्दादीन्विषयानन्य इंद्रियाग्निषु जुह्वति ॥ २६ ॥

कोणी रहाती वहु संयमानें[4]
श्रोत्रेंद्रियें जाळिति[5] निग्रहानें ।
शब्दादिकांना किती जाळतात
ह्या इंद्रियीं यापरि वागतात ॥ २६ ॥

सर्वाणींद्रियकर्माणि प्राणकर्माणि चापरे ॥
आत्मसंयमयोगाग्नौ जुह्वति ज्ञानदीपिते ॥ २७ ॥

श्लोक (वसंततिलका).

कोणी समाधि धरूनी करितात शोध
हीं इंद्रियें निजबळें करिती निरोध ।
ते चित्स्वरूप[6] सहजें अणितात ध्यानीं
हा आत्मनिग्रह असा करितात ज्ञानी ॥ २७ ॥

---

१ दैव हाच यज्ञ मानणारे ह्मणजे दैवावरच भरंवसा ठेवणारे. २ उपासना करतात. ३ जाळतात. ४ निग्रहानें. ५ कान जाळतात–ह्मणजे ऐकत नाहींत. ६ परब्रह्मस्वरूप.

द्रव्ययज्ञास्तपोयज्ञा योगयज्ञास्तथाऽपरे ॥
स्वाध्यायज्ञानयज्ञाश्च यतयः संशितव्रताः ॥ २८ ॥

श्लोक (इंद्रवज्रा).

कोणी करीती जन द्रव्ययज्ञ
तैसा कुणी तापसनाम यज्ञ[1] ।
स्वाध्यायी[2] वा थोरहि योगयज्ञ[3]
हे यत्नशाली[4] करितात यज्ञ ॥ २८ ॥

अपाने जुह्वति प्राणं प्राणेऽपानं तथाऽपरे ॥
प्राणापानगती रुद्ध्वा प्राणायामपरायणाः ॥ २९ ॥

श्लोक (शालिनी).

प्राणांतें या जाळिताती अपानीं[5]
अपानातें जाळिती आत्मप्राणीं ।
कोणी कोणी दोनिही रोधिताती[6]
प्राणायामीं श्रेष्ठ त्यां बोलताती ॥ २९ ॥

अपरे नियताहाराः प्राणान्प्राणेषु जुह्वति ॥
सर्वेऽप्येते यज्ञविदो यज्ञक्षपितकल्मषाः ॥ ३० ॥

श्लोक (इंद्रवज्रा).

कोणी अहारांत कमी करीती
प्राणांत हा प्राणहि जाळिताती ।
हे यज्ञवेत्ते हटयोगि[7] होती
यज्ञेंकरोनी परि मुक्त होती ॥ ३० ॥

---

१ तप. २ वेदपठण. ३ योग. ४ उद्योगी लोक. ५ अपान या नांवाचा एक वायू आहे त्यांत. ६ आटोपून धरतात. ७ शरीरास त्रास देऊन योगयत्न करणारे.

यज्ञशिष्टामृतभुजो यांति ब्रह्म सनातनम् ॥
नायं लोकोऽस्त्ययज्ञस्य कुतोऽन्यः कुरुसत्तम ॥ ३१ ॥

जे यज्ञशेषामृत हें पितात
ते ब्रह्मलोकाप्रत पावतात ।
अयज्ञ ते हा मुकतात लोक
कैंचा तयांना मग स्वर्गलोक ॥ ३१ ॥

एवं बहुविधा यज्ञा वितता ब्रह्मणो मुखे ॥
कर्मजान्विद्धि तान्सर्वानेवं ज्ञात्वा विमोक्ष्यसे ॥ ३२ ॥

हे यज्ञ ऐसे बहु विस्तरानें
सांगीतले पूर्वीच बा विधीनें ।
विस्तारिलें कर्महि तेंच यज्ञ
जाणेल तो मुक्त[१] खराच सुज्ञ[२] ॥ ३२ ॥

श्रेयान्द्रव्यमयाद्यज्ञाज्ज्ञानयज्ञः परंतप ॥
सर्वं कर्माखिलं पार्थ ज्ञाने परिसमाप्यते ॥ ३३ ॥

सांगीतला जो तुज द्रव्ययज्ञ[३]
त्याहून हा श्रेष्ठच ज्ञानयज्ञ[४] ।
ज्ञानामध्यें हींच अपूर्व[५] मर्मे
कीं संपती त्यांत समग्र कर्मे ॥ ३३ ॥

---

१ तोच मोक्षास जाईल. २ तोच शहाणा. ३ कोणी द्रव्यदान करणें हाच यज्ञ समजतात. ४ कोणी ज्ञान हाच यज्ञ समजतात. ५ विलक्षण.

तद्विद्धि प्रणिपातेन परिप्रश्नेन सेवया ॥
उपदेक्ष्यंति ते ज्ञानं ज्ञानिनस्तत्त्वदर्शिनः ॥ ३४ ॥

जैं प्रश्न संतांस करूनि भावें
पादारविंदीं[2] बहु लीन[3] व्हावें ।
तेव्हांच तूतें उपदेशितील
ज्ञानीच बोधामृत पाजितील ॥ ३४ ॥

यज्ज्ञात्वा न पुनर्मोहमेवं यास्यसि पांडव ॥
येन भूतान्यशेषेण द्रक्ष्यस्यात्मन्यथो मयि ॥ ३५ ॥

ऐसें तुला ज्ञान मिळेल जेव्हां
जाईल हा मोह समग्र तेव्हां ।
तूं भूतमात्रीं[4] मन ठेविशील
आत्मस्वरूपा तरि पाहशील ॥ ३५ ॥

अपि चेदसि पापेभ्यः सर्वेभ्यः पापकृत्तमः ॥
सर्वं ज्ञानप्लवेनैव वृजिनं संतरिष्यसि ॥ ३६ ॥

पार्था जरी तूं असशील पापी
पाप्यांत मोठा अससी तथापी ।
ही ज्ञाननौका उतरील पार
पार्था तुझा पापसमुद्र थोर ॥ ३६ ॥

---

१ भक्तीनें. २ पदकमलाचे ठाईं. ३ नम्र. ४ प्राणीमात्रावर.

यथैधांसि समिद्धोऽग्निर्भस्मसात्कुरुतेऽर्जुन ॥
ज्ञानाग्निः सर्वकर्माणि भस्मसात्कुरुते तथा ॥ ३७ ॥

श्लोक (उपेंद्रवज्रा).

जईं अग्नि चेतून जातो अपार
तईं भस्म होतो जसा काष्ठभार ।
तसा ज्ञानअग्नी करी भस्म कर्मे
पुरीं ठाउकीं सज्जना हींच मर्मे ॥ ३७ ॥

नहि ज्ञानेन सदृशं पवित्रमिह विद्यते ॥
तत्स्वयं योगसंसिद्धः कालेनात्मनि विंदति ॥ ३८ ॥

श्लोक (इंद्रवज्रा).

ज्ञानापरी शुद्ध नसेच कांहीं
धुंडून साऱ्या जगतांत पाहीं ।
तें ज्ञान ज्ञानी बहु योगयत्नें
कालें करोनी मिळवी प्रयत्नें ॥ ३८ ॥

श्रद्धावाँल्लभते ज्ञानं तत्परः संयतेंद्रियः ।
ज्ञानं लब्ध्वा परां शांतिमचिरेणाधिगच्छति ॥ ३९ ॥

जो भक्तिभावें दृढ एकचित्त
जो इंद्रियें जिंकुन होय मुक्त ।
तो ज्ञान पावे विसरून भ्रांती
कीं पावतो सत्य सदैव शांति ॥ ३९ ॥

अज्ञश्चाश्रद्दधानश्च संशयात्मा विनश्यति ॥
नायं लोकोऽस्ति न परो न सुखं संशयात्मनः ॥ ४० ॥

जे संशयी वा नर भक्तिहीन
कीं अज्ञ तेही बुडती फसून ।
जो संशयी त्या नच सौख्य कांहीं
हा लोक नाहीं परलोक नाहीं ॥ ४० ॥

योगसंन्यस्तकर्माणं ज्ञानसंछिन्नसंशयम् ॥
आत्मवंतं न कर्माणि निबध्नन्ति धनंजय ॥ ४१ ॥

संन्यास मोठा बहु कर्मयोगीं
ज्ञानें पहा संशय सर्व त्यागी ।
आत्मज्ञ तो योग असाच साधी
कीं कर्म त्याला न कधींच बांधी ॥ ४१ ॥

तस्मादज्ञानसंभूतं हृत्स्थं ज्ञानासिनात्मनः ॥
छित्त्वैनं संशयं योगमातिष्ठोत्तिष्ठ भारत ॥ ४२ ॥

याकारणें संशय जो निघाला
तूं ज्ञानरूपखड्गें[2] उडवीं तयाला ।
आतां उठें रे करि कर्म आजी
आहेस तूं शूर रणांत गाजी ॥ ४२ ॥

इति श्रीमद्भगवद्गीतासूपनिषत्सु ब्रह्मविद्यायां योगशास्त्रे श्रीकृष्णार्जुनसंवादे ज्ञानयोगो नाम चतुर्थोऽध्यायः ॥ ४ ॥

चौथा अध्याय समाप्त.

ह्या अध्यायांत ज्ञानाचा विचार आहे म्हणून यास "ज्ञानयोग" असें नांव आहे.

१ सुख. २ ज्ञानरूप तरवारीनें.

॥ अथ पंचमोऽध्यायः प्रारभ्यते ॥

॥ अर्जुन उवाच ॥

संन्यासं कर्मणां कृष्ण पुनर्योगं च शंससि ॥
यच्छ्रेय एतयोरेकं तन्मे ब्रूहि सुनिश्चितम् ॥ १ ॥

अर्जुन—

श्लोक (इंद्रवज्रा).

बा कर्मसंन्यास वदूनि सांगं
त्वां वर्णिला मागुन कर्मयोग ।
दोहींत श्रेयस्कर कोण बापा
सांगून माझ्या करि दूर तापा ॥ १ ॥

॥ श्रीभगवानुवाच ॥

संन्यासः कर्मयोगश्च निःश्रेयसकरावुभौ ॥
तयोस्तु कर्मसंन्यासात्कर्मयोगो विशिष्यते ॥ २ ॥

भगवान्—

संन्यासही कर्महि साध्यकारी
आहेत दोन्ही बहु सौख्यकारी ॥
विचारतोसी जरि कोण श्रेष्ठ ·
दोहींमधें कर्म असे वरिष्ठ ॥ २ ॥

---

१ संपूर्ण.

ज्ञेयः स नित्यसंन्यासी यो न द्वेष्टि न कांक्षति ॥
निर्द्वंद्वो हि महाबाहो सुखं बंधात्प्रमुच्यते ॥ ३ ॥

श्लोक (शालिनी).

संन्यासी तो वासनेला वरीना[1]
द्वेषातेंही मानसीं जो धरीना ।
झाला द्वंद्वांपासुनी[2] जो विरक्त
होतो बंधापासुनी तोच मुक्त ॥ ३ ॥

सांख्ययोगौ पृथग्बालाः प्रवदंति न पंडिताः ॥
एकमप्यास्थितः सम्यगुभयोर्विंदते फलम् ॥ ४ ॥

श्लोक (इंद्रवज्रा).

हा सांख्य हा योग दिसून येत
हा भेद मूर्खी नच पंडितांत ।
कांकीं तयांचें फल एक आहे
ऐसें मनीं पंडित तोचि पाहे ॥ ४ ॥

यत्सांख्यैः प्राप्यते स्थानं तद्योगैरपि गम्यते ॥
एकं सांख्यं च योगं च यः पश्यति स पश्यति ॥ ५ ॥

श्लोक (शालिनी).

कीं सांख्यांना स्थान जें प्राप्त होतें
योग्यांचेंही प्रस्थ तेथेंच जातें ।
सांख्य योगा पाहतो ऐक्यभावें
पार्था त्याला युक्तनेत्री[3] म्हणावें ॥ ५ ॥

---

१ स्वीकारीना. २ सुख, दुःख; मान, अपमान; शीत, उष्ण; इ० जोड्या. ३ डोळस.

संन्यासस्तु महाबाहो दुःखमाप्तुमयोगतः ॥.
योगयुक्तो मुनिर्ब्रह्म न चिरेणाधिगच्छति ॥ ६ ॥

श्लोक (इंद्रवज्रा).

संन्यास हा दुर्लभ फार आहे
कर्माविणें निश्चित प्राप्त नोहे ।
कर्मानुषंगें[1] जन जो रहातो
तो सत्वरी मोक्षपदासि जातो ॥ ६ ॥

योगयुक्तो विशुद्धात्मा विजितात्मा जितेंद्रियः ॥
सर्वभूतात्मभूतात्मा कुर्वन्नपि न लिप्यते ॥ ७ ॥

कर्मे करूनी बहु शुद्धचित्त
आत्मा तयाचा बहु तुष्ट नित्य ।
जो इंद्रियें जिंकुन मुक्त संग
त्याला नसे बंधन हा प्रसंग ॥ ७ ॥

नैव किंचित्करोमीति युक्तो मन्येत तत्त्ववित् ॥
पश्यन्शृण्वन्स्पृशन्जिघ्रन्नश्नन्गच्छन्स्वपन्श्वसन् ॥ ८ ॥

भेटून ऐकून बघून सत्य
जेऊन जाऊन निजून नित्य ।
कीं वास घेऊनच मोक्षकामीं
जो श्वास सोडून ह्मणे न मी मी ॥ ८ ॥

---

१ कर्मानुरोधानें.

प्रलपन्विसृजन्गृण्हन्नुन्मिषन्निमिषन्नपि ॥
इंद्रियाणींद्रियार्थेषु वर्तंत इति धारयन् ॥ ९ ॥

श्लोक (शालिनी).

देणें घेणें बोलणें दूर जाणें
कीं नेत्राची पापणी हालवीणें ।
आहे सारें इंद्रियांचेंच काम
ऐसें मानी सुज्ञ तो ज्ञानधाम ॥ ९ ॥

ब्रह्मण्याधाय कर्माणि संगं त्यक्त्वा करोति यः ॥
लिप्यते न स पापेन पद्मपत्रमिवांभसा ॥ १० ॥

श्लोक (इंद्रवज्रा).

अर्पून ब्रह्मीं करि कर्म सांग
कर्मीं करी सोडुनि सर्व संग ।
निष्पाप आहे नर तो सुपात्र
पाण्यांत राहे जणु पद्मपत्र ॥ १० ॥

कायेन मनसा बुद्ध्या केवलैरिंद्रियैरपि ॥
योगिनः कर्म कुर्वंति संगं त्यक्त्वाऽऽत्मशुद्धये ॥ ११ ॥

श्लोक (शालिनी).

देहानें वा बुद्धिनें वा मनानें
कर्मीं सारी मात्र या इंद्रियानें ।
टाकोनीयां संगें सौख्यास पावे
हेतू हा कीं चित्त हें शुद्ध व्हावें ॥ ११ ॥

१ ज्ञानी. २ फार योग्य. ३ कमलाचें पान. ४ आसक्ति.

युक्तः कर्मफलं त्यक्त्वा शांतिमाप्नोति नैष्ठिकीम् ॥
अयुक्तः कामकारेण फले सक्तो निबद्ध्यते ॥ १२ ॥

श्लोक (इंद्रवज्रा).

टाकूनियां कर्मफलास योगी
आत्मस्थितीनें चिरशांति भोगी ।
होवोनि राहे फलसक्त जो तो
अज्ञान कर्मास्तव बद्ध होतो ॥ १२ ॥

सर्वकर्माणि मनसा संन्यस्यास्ते सुखं वशी ॥
नवद्वारे पुरे देही नैव कुर्वन्न कारयन् ॥ १३ ॥

टाकूनि कर्मं रहतो मनानें
घेवोनि संन्यासच कौतुकानें ।
राहे नवद्वारपुरींत[1] देही
हस्तें करीना करवी न कांहीं ॥ १३ ॥

न कर्तृत्वं न कर्माणि लोकस्य सृजति प्रभुः ॥
न कर्मफलसंयोगं स्वभावस्तु प्रवर्तते ॥ १४ ॥

श्लोक (शालिनी).

लोकाचें जें योग्य कर्तव्य कांहीं
त्यातें पार्था ईश निर्मीत नाहीं ।
केलें त्यानें हें फलाचें न भोग.
आहे स्वाभावीक हा शुद्धयोग ॥ १४ ॥

---

१ नऊ आहेत दरवाजे ज्याला अशा देहनगरांत.

नादत्ते कस्यचित्पापं न चैव सुकृतं विभुः ॥
अज्ञानेनावृतं ज्ञानं तेन मुह्यंति जंतवः ॥ १५ ॥

कोणाच्याही पातका ईश नेघे
झोंबाडीना[1] पुण्यही फार वेगें ।
अज्ञानानें वेष्टिलें ज्ञान बारे
त्यांच्या योगें मोहती लोक सारे ॥ १५ ॥

ज्ञानेन तु तदज्ञानं येषां नाशितमात्मनः ॥
तेषामादित्यवज्ज्ञानं प्रकाशयति तत्परम् ॥ १६ ॥

आत्मज्ञानें तत्त्व बिंबून[2] येतें
अज्ञानाचें बीज निर्मूळ होतें ।
भानू जैसा पूर्ण दैदीप्यमान
तैसें दावी आत्मरूपास ज्ञान ॥ १६ ॥

तद्बुद्धयस्तदात्मानस्तन्निष्ठास्तत्परायणाः ॥
गच्छंत्यपुनरावृत्तिं ज्ञाननिर्धूतकल्मषाः ॥ १७ ॥

ज्ञानामध्यें सर्व निष्ठा मती ही[3]
आत्मा गेला त्यांत रंगून पाहीं ।
ऐसे जे ते पावती मोक्ष बापा
ज्ञानाग्नीनें जाळुनी सर्व पापा ॥ १७ ॥

---

१ हिसकावून घेत नाहीं. २ कळून येतें. ३ ज्ञानामध्येंच निष्ठा, ज्ञानामध्येंच मती.

विद्याविनयसंपन्ने ब्राह्मणे गवि हस्तिनि ॥
शुनि चैव श्वपाके च पंडिताः समदर्शिनः ॥ १८ ॥

विद्वानातें सद्गुणी माणसातें
विप्रातें वा धेनुतें कुंजरातें ।
श्वानातें कीं शुद्ध चांडाल[2] जाती[3]
ज्ञाते सर्वी सारखे पाहताती ॥ १८ ॥

इहैव तैर्जितः सर्गो येषां साम्ये स्थितं मनः ॥
निर्दोषं हि समं ब्रह्म तस्माद्ब्रह्मणि ते स्थिताः ॥ १९ ॥

श्लोक (इंद्रवज्रा).

सर्वांत ज्याचें सम चित्त थारी[4]
स्वर्गस्थ तो कीं जरि देहधारी ।
तें ब्रह्म निर्दोष समान आहे
ह्मणूनि ब्रह्मीं जन तोच राहे ॥ १९ ॥

न प्रहृष्येत्प्रियं प्राप्य नोद्विजेत्प्राप्य चाप्रियम् ॥
स्थिरबुद्धिरसंमूढो ब्रह्मविद्ब्रह्मणि स्थितः ॥ २० ॥

श्लोक (मंदाक्रांता).

हर्षेना जो प्रिय विषयही प्राप्त झाले तथापी
कष्टी नोहे हृदयकमळीं अप्रियें जो कदापी ।
ज्ञानी मोठा कुमतिजन तो बा नव्हे सत्य पाहे
ब्रह्मामध्यें सतत जन तो अर्जुना जाण राहे ॥ २० ॥

---

१ हत्तीला. २ अतिशूद्र. ३ जात. ४ रहातें.

बाह्यस्पर्शेष्वसक्तात्मा विंदत्यात्मनि यत्सुखम् ॥
स ब्रह्मयोगयुक्तात्मा सुखमक्षय्यमश्नुते ॥ २१ ॥

श्लोक (इंद्रवज्रा).

जो बाह्य सौख्यास नसे च सक्त
आत्मस्वरूपींच सदैव तृप्त ।
तो ब्रह्मयोगी समजे महात्मा
सौख्यांत राहे चिर[1] कीं तदात्मा ॥ २१ ॥

ये हि संस्पर्शजा भोगा दुःखयोनय एव ते ॥
आद्यंतवंतः कौंतेय न तेषु रमते बुधः ॥ २२ ॥

श्लोक (मालिनी).

सकल विषयसौख्यें भासती जीं जनास
घडि घडि बहु देती दुःख तीं मानसास ।
सतत दिसत आहे त्यांजला आदि अंत
म्हणुनि विबुध पार्था रम्य होती न त्यांत ॥ २२ ॥

शक्नोतीहैवः यः सोढुं प्राक् शरीरविमोक्षणात् ॥
कामक्रोधोद्भवं वेगं स युक्तः स सुखी नरः ॥ २३ ॥

श्लोक (शालिनी).

कामक्रोधाच्या महावेग[2]राशी
पार्था जो कां मृत्यु[3]आधींच सोशी ।
योगी ऐसा तोच बापा गणावा
सर्वोभावें[4] सौख्यकारी म्हणावा ॥ २३ ॥

१ निरंतर. २ कामक्रोधाच्या मोठ्या जोरानें येणाऱ्या लहरी. ३ जन्मांतच (जिवंतपणीं). ४ सर्वोपरि.

योंऽतःसुखोंऽतरारामस्तथांतर्ज्योतिरेव यः ॥
स योगी ब्रह्म निर्वाणं ब्रह्मभूतोऽधिगच्छंति ॥ २४ ॥

श्लोक (वसंततिलका).

जो आंत[1] फारच सुखी रमतोहि आंत
ज्याच्या प्रकाश पडला बहु अंतरांत ।
तो जाण सत्य जगतीवर ब्रह्मयोगी
निर्वाण[2] ब्रह्मपद तोच यथेच्छ[3] भोगी ॥ २४ ॥

लभंते ब्रह्म निर्वाणमृषयः क्षीणकल्मषाः ॥
छिन्नद्वैधा यतात्मानः सर्वभूतहिते रताः ॥ २५ ॥

श्लोक (इंद्रवज्रा).

जे स्थीरबुद्धी परकार्यसक्त[4]
इंद्रांस टाकूनि महाविरक्त ।
ते लोक निष्पाप जगांत होती
ते निश्चयें ब्रह्मपदासि जाती ॥ २५ ॥

कामक्रोधवियुक्तानां यतीनां यतचेतसाम् ॥
अभितो ब्रह्म निर्वाणं वर्तते विदितात्मनाम् ॥ २६ ॥

क्रोधास कामास वियुक्त[5] झाले
यत्नें जयांनीं वश चित्त केलें ।
तद्देह वांचो अथवा मरो कीं
ते मुक्त झाले नर याच लोकीं[6] ॥ २६ ॥

---

१ आत्मस्वरूपांत. २ अंतींचें. ३ निरंतर. ४ परोपकार करणारे. ५ विन्मुख. ६ या मृत्युलोकांतच ते मुक्त झाले.

स्पर्शान्कृत्वा बहिर्बाह्यांश्चक्षुश्चैवांतरे भ्रुवोः ॥
प्राणापानौ समौ कृत्वा नासाभ्यंतरचारिणौ ॥ २७ ॥

श्लोक (मालिनी).

सकलविषय जे हे बाह्य बाहेर ठेवी
नजर भृकुंटिमाजी मध्यभागांत लावी ।
सम करुनिच प्राणापान हे वायु दोन
दृढतर धरिती जे नासिकीं[2] आवरून ॥ २७ ॥

यतेंद्रियमनोबुद्धिर्मुनिर्मोक्षपरायणः ॥
विगतेच्छाभयक्रोधो यः सदा मुक्त एव सः २८ ॥

श्लोक (शालिनी).

जिंकी चित्ता बुद्धिला इंद्रियांला
आत्मा मोक्षीं फार रंगून गेला ।
इच्छा भीति क्रोध सांडी प्रमाण
त्याला मुक्ती नित्य आहेच जाण ॥ २८ ॥

भोक्तारं यज्ञतपसां सर्वलोकमहेश्वरम् ॥
सुहृदं सर्वभूतानां ज्ञात्वा मां शांतिमृच्छति ॥ २९ ॥

भोक्ता आहें मीच यज्ञा तपाचा
ब्रह्मांडाचा ईशही मीच साचा ।
कीं सर्वांचा मी सखा ज्यास ठावें
मोठी शांती अर्जुना तोच[3] पावे ॥ २९ ॥

इति श्रीमद्भगवद्गीतासूपनिषत्सु ब्रह्मविद्यायां योगशास्त्रे श्रीकृष्णार्जुनसंवादे कर्मसंन्यासयोगो नाम पंचमोऽध्यायः ॥ ५ ॥

पांचवा अध्याय समाप्त.

या अध्यायांत कर्मसंन्यास असल्यामुळें यास "कर्मसंन्यासयोग" हें नांव आहे.

१ भोंवयांमध्यें. २ नाकांत. ३ असें जाणणारा.

॥ अथ षष्ठोऽध्यायः प्रारभ्यते ॥

॥ श्रीभगवानुवाच ॥

अनाश्रितः कर्मफलं कार्यं कर्म करोति यः ।।
स संन्यासी च योगी च न निरग्निर्न चाक्रियः ।। १ ।।

भगवान्–

श्लोक (शालिनी).

जोकां आशा टाकुनीयां फलाची
कर्मे सारीं आचरी सव्यसाची ।
संन्यासी तो तोच योगी खचीत
अग्नी[2] कर्मे जो त्यजी तो न होत ॥ १ ॥

यं संन्यासमिति प्राहुर्योगं तं विद्धि पांडव ॥
न ह्यसंन्यस्तसंकल्पो योगी भवति कश्चन ॥ २ ॥

श्लोक (वसंततिलका)

संन्यास ज्यास ह्मणती जगतांत लोक
तो कर्मयोगच असे तरि जाण एक ।
संकल्पत्याग न करी नच आस दा[3]पी
योगी नव्हेचि जन तो समजे कदापी ॥ २ ॥

---

१ अर्जुना. २ लग्न झाल्यावरोवर अग्नि सिद्ध होतो, व स्त्री मरण पावल्यानंतर तो राहत नाहीं असी चाल आहे, ह्मणून अग्नी सोडला तरी तो संन्यासी होत नाहीं, ह्मणजे गृहस्थाश्रम सोडला अथवा कर्मे टाकलीं ह्मणजे संन्यासी होत नाहीं असा अर्थ. ३ आशात्याग.

आरुरुक्षोर्मुनेर्योगं कर्म कारणमुच्यते ॥
योगारूढस्य तस्यैव शमः कारणमुच्यते ॥ ३ ॥

श्लोक (शालिनी).

संपादाया योग वा कर्म मूळ
हीनें कर्मे प्राप्त नाहीं समूळ ।
योगी झाला जाउनी सर्व भ्रांती
त्याला पार्था प्राप्त होईल शांती ॥ ३ ॥

यदा हि नेंद्रियार्थेषु न कर्मस्वनुषज्जते ॥
सर्वसंकल्पसंन्यासी योगारूढस्तदोच्यते ॥ ४ ॥

श्लोक (इंद्रवज्रा).

जेव्हां गुतेना विषयांत चित्त
कर्मासि टाकीत विटून नित्य ।
कीं भोग संकल्प समस्त टाकी
योगी तयाला ह्मणतात लोकीं ॥ ४ ॥

उद्धरेदात्मनाऽऽत्मानं नात्मानमवसादयेत् ॥
आत्मैव ह्यात्मनो बंधुरात्मैव रिपुरात्मनः ॥ ५ ॥

स्वचित्त हें जाणुनि उद्धरावें
संसारडोहांत बुडूं न द्यावें ।
बंधूहि आहे निज चित्त जाण
वा तेंच शत्रूहि मनांत आण ॥ ५ ॥

बंधुरात्माऽऽत्मनस्तस्य येनात्मैवात्मना जितः ॥
अनात्मनस्तु शत्रुत्वे वर्तेतात्मैव शत्रुवत् ॥ ६ ॥

जिंकी मनाला तरि आत्मबंधू
त्याच्याहुनी होइल सौख्यसिंधू ।
त्यानें नराला जिकल्यास आधीं
शत्रूहुनी देइल फार बाधी ॥ ६ ॥

जितात्मनः प्रशांतस्य परमात्मा समाहितः ॥
शीतोष्णसुखदुःखेषु तथा मानापमानयोः ॥ ७ ॥

जो शांत आहे जितचित्त आहे
तो स्थीर होवोनि सुखांत राहे ।
मानापमानीं सुख दुःख दोनी
कीं शीतउष्णास समान मानीं ॥ ७ ॥

ज्ञानविज्ञानतृप्तात्मा कूटस्थो विजितेंद्रियः ॥
युक्त इत्युच्यते योगी समलोष्टाश्मकांचनः ॥ ८ ॥

ज्ञानें करूनी बहु स्थीर चित्त
आत्मानुभावें मन नित्य तृप्त ।
योगी खरा तोच समान भेंडा.
मानी मनीं हेम तसाच धोंडा ॥ ८ ॥

---

१ सुखदायक. २ मनानें. ३ बाधा. ४ मातीचें ढेंकूळ.

सुहृन्मित्रार्युदासीनमध्यस्थद्वेष्यबंधुषु ॥
साधुष्वपि च पापेषु समबुद्धिर्विशिष्यते ॥ ९ ॥

हो मित्र शत्रू अथवा उदासं
मध्यस्थ बंधू सुहृदांत त्यास ।
साधू असो कीं बहु थोर पापी
बुद्धी जयाची समही[2] तथापी ॥ ९ ॥

योगी युंजीत सततमात्मानं रहसि स्थितः ॥
एकाकी यतचित्तात्मा निराशीरपरिग्रहः ॥ १० ॥

करूनियां स्थीर तनू मनाला
सोडोनियां कर्म करी फलाला ।
एकांतशा निर्मल एक जागीं
योजी[3] मनाला मग कर्मयोगी ॥ १० ॥

शुचौ देशे प्रतिष्ठाप्य स्थिरमासनमात्मनः ॥
नात्युच्छ्रितं नातिनीचं चैलाजिनकुशोत्तरम् ॥ ११ ॥

घाली महाशुद्ध पवित्र जागीं
बा आपुलें आसन थोर योगी ।
जें उंच किंवा बहु नीच नाहीं
जें दर्भचर्मावर[4] वस्त्र पाहीं ॥ ११ ॥

---

१ उदासीन. २ सारखी. ३ प्रवेश करवितो. ४ कातड्यावर.

तत्रैकाग्रं मनः कृत्वा यतचित्तेंद्रियक्रियः ॥
उपविश्यासने युंज्याद्योगमात्मविशुद्धये ॥ १२ ॥

वा इंद्रियांला दमुनी बसावें
एकाग्रचित्तें बहु स्थीर व्हावें ।
तैं आसनीं बैसुनि स्थीर बुद्धी
योजी मनाला मग योगसिद्धी ॥ १२ ॥

समं कायशिरोग्रीवं धारयन्नचलं स्थिरः ॥
संप्रेक्ष्य नासिकाग्रं स्वं दिशश्चानवलोकयन् ॥ १३ ॥

श्लोक (शिखरिणी).

शिरा ग्रीवा काया[३] सम करुनियां नीट सरळ
मनीं ध्यावें भावें अनुसरुनि ध्यानास अचळ ।
बसावें स्थीरत्वें दृढ नजर नासाग्र[४] धरुनी
न पाहाव्या सुद्धां मग दशादिशा दृष्टिकडुनी ॥ १३ ॥

प्रशांतात्मा विगतभीर्ब्रह्मचारिव्रते स्थितः ॥
मनः संयम्य मच्चित्तो युक्त आसीत मत्परः ॥ १४ ॥

श्लोक (इंद्रवज्रा).

जो ब्रह्मचर्य व्रत शांत[५] पाळी
भीती मनींची अगदींच टाळी[६] ।
मद्रूप[७] ध्यातो दमुनी मनास
पावेल तो निश्चित मत्पदास[८] ॥ १४ ॥

---

१ मस्तकाला. २ मान. ३ देहाला. ४ नाकाच्या शेंड्यावर. ५ मन चंचल न करतां. ६ नाहींशी करी. ७ माझें स्वरूप. ८ माझ्या पदाप्रत.

युंजन्नेवं सदाऽऽत्मानं योगी नियतमानसः ॥
शांतिं निर्वाणपरमां मत्संस्थामधिगच्छति ॥ १५ ॥

श्लोक (शालिनी).

आटोपूनी आपुलें सर्व चित्त
माझ्या ठाईं योजितो तैंच नित्य ।
योगी होतो तोच मोक्षास भोग्य[1]
स्वीकाराया शांतिला तोच योग्य ॥ १५ ॥

नात्यश्नस्तु योगोऽस्ति न चैकांतमनश्नतः ॥
न चातिस्वप्नशीलस्य जाग्रतो नैव चार्जुन ॥ १६ ॥

श्लोक (उपेंद्रवज्रा).

बहू भक्षितां योग तो आकळेना[2]
मुळीं भक्षही टाकुनी तो मिळेना ।
बहू नीजतां प्राप्त नाहींच तो[3] कीं
अती जाग्रणेंही मिळेना विलोकीं ॥ १६ ॥

युक्ताहारविहारस्य युक्तचेष्टस्य कर्मसु ॥
युक्तस्वप्नावबोधस्य योगो भवति दुःखहा ॥ १७ ॥

श्लोक (शालिनी).

अन्नें तींही बेत पाहून खावीं
बेतानें ती योग्यशी झोंप घ्यावी ।
दुःखें सारीं पाववी जो लयाला
साधे ऐसा वागतो योग त्याला ॥ १७ ॥

१ भोगण्यास योग्य. २ प्राप्त होत नाहीं. ३ योग.

यदा विनियतं चित्तमात्मन्येवावतिष्ठते ॥
निःस्पृहः सर्वकामेभ्यो युक्त इत्युच्यते तदा ॥ १८ ॥

श्लोक (इंद्रवज्रा).

आत्मस्वरूपांत सदा रमून
बा स्थीर व्हावें मन हें दमून ।
साऱ्या स्पृहा टाकुनि शून्य व्हावें
तैं सिद्ध ऐसें मग नाम पावे ॥ १८ ॥

यथा दीपो निवातस्थो नेंगते सोपमा स्मृता ॥
योगिनो यतचित्तस्य युंजतो योगमात्मनः ॥ १९ ॥

योगी सदा जो अवरी मनाला
तादात्म्य[1] जो कां स्वरुपांत झाला ।
शोभे तयाला उपमाहि हीच
निर्वात[2] जागीं जणुं दीप साच ॥ १९ ॥

यत्रोपरमते चित्तं निरुद्धं योगसेवया ॥
यत्र चैवात्मनाऽऽत्मानं पश्यन्नात्मनि तुष्यति ॥ २० ॥

ज्याच्या समाधान मनास आहे
आत्माच तो केवल पाहताहे ।
सर्वेंद्रियें त्यांतच लीन झालीं
ज्याची तिथें तन्मय[3] वृत्ति झाली ॥ २० ॥

---

१ तत्स्वरूप. २ जेथें वारा नाहीं. ३ तदाकार.

सुखमात्यंतिकं यत्तद्बुद्धिग्राह्यमतींद्रियम् ॥
वेत्ति यत्र न चैवायं स्थितश्चलति तत्त्वतः ॥ २१ ॥

जें इंद्रियांना न मिळे कधींही
बुद्धीसही प्राप्त कधींच नाहीं ।
ऐसें मिळे सौख्य अपार जेव्हां
वृत्ती तयाची न ढळेच तेव्हां ॥ २१ ॥

यं लब्ध्वा चापरं लाभं मन्यते नाधिकं ततः ॥
यस्मिंस्थितो न दुःखेन गुरुणापि विचाल्यते ॥ २२ ॥

सौख्याहुनी त्या अपुल्या अपार
मानी न कांहीं जरि लाभ थोर ।
दुःखें जरी उद्भवलीं तथापि
तो स्थीर योगी न ढळे कदापि ॥ २२ ॥

तं विद्याद्दुःखसंयोगवियोगं योगसंज्ञितम् ॥
स निश्चयेन योक्तव्यो योगो निर्विण्णचेतसा ॥ २३ ॥

श्लोक (शालिनी).

सुज्ञानें ही योग हा आचरावा
मोठ्या यत्नें पूर्ण सिद्धीस न्यावा ।
पार्था आहे योग हा सौख्यपात्रं
जेथें नाहीं दुःख तें लेशमात्रं ॥ २३ ॥

---

१ सुखदायक. २ थोडेंही.

संकल्पप्रभवान्कामांस्त्यक्त्वा सर्वानशेषतः ॥
मनसैवेंद्रियग्रामं विनियम्य समंततः ॥ २४ ॥

श्लोक (इंद्रवज्रा).

संकल्पमात्रें उठतात इच्छा
त्या सर्व सोडोनि धरी निरिच्छा ।
सर्वांस शिक्षा करूनी मनानें
इंद्रीयग्रामांत[1] वसे सुखानें ॥ २४ ॥

शनैः शनैरुपरमेद्बुद्ध्या धृतिगृहीतया ॥
आत्मसंस्थं मनः कृत्वा न किंचिदपि चिंतयेत् ॥ २५ ॥

बुद्धीस पार्था बहु धैर्य द्यावें
हळू हळू स्थीर बळेंच व्हावें ।
स्थीरत्व ब्रह्मीं अणुनी मनांत
चिंतूं नये अन्य कधींच त्यांत ॥ २५ ॥

यतो यतो निश्चरति मनश्चंचलमस्थिरम् ॥
ततस्ततो नियम्यैतदात्मन्येव वशं नयेत् ॥ २६ ॥

श्लोक (वसंततिलका).

अस्थीर हें बहुत चंचल चित्त फार
धांवे पहा चहुंकडे न करी विचार ।
नाचे उगीच इकडे तिकडेच धांवे
सुज्ञें तयास अवरून बळेंच घ्यावें ॥ २६ ॥

---

१ इंद्रिय हेंच गांव त्याच्यामध्यें.

प्रशांतमनसं ह्येनं योगिनं सुखमुत्तमम् ॥
उपैति शांतरजसं ब्रह्मभूतमकल्मषम् ॥ २७ ॥

ज्यांचें पहा हृदय हें असतें प्रशांत[1]
अत्यंत सौख्यकर ते पद भोगतात ।
बा जो रजादि[2] गुण टाकुनि मुक्त झाला
तो ब्रह्म सत्य उपमा दुसरी न त्याला ॥ २७ ॥

युंजन्नेवं सदाऽऽत्मानं योगी विगतकल्मषः ॥
सुखेन ब्रह्मसंस्पर्शमत्यंतं सुखमश्नुते ॥ २८ ॥

श्लोक (इंद्रवज्रा).

योजोनि निष्पाप मनास योगी
आत्मस्वरूपीं बहु सौख्य भोगी ।
ब्रह्मांत योगी चिरकाळ राहे
अत्यंत तो शांत सुखास लाहे ॥ २८ ॥

सर्वभूतस्थमात्मानं सर्वभूतानि चात्मनि ॥
ईक्षते योगयुक्तात्मा सर्वत्र समदर्शनः ॥ २९ ॥

श्लोक (शालिनी).

आत्म्यामाजी सर्व भूतें पहातो
भूतांमाजी तोच आत्मा रहातो ।
योगी पाहे हेंच आत्म्यांत नित्य
तो ब्रह्माशीं साम्य[3] झालाच सत्य ॥ २९ ॥

---

१ शांत. २ सत्व, रज, तम हे तीन गुण. ३ तदाकार.

यो मां पश्यति सर्वत्र सर्वं च मयि पश्यति ॥
तस्याहं न प्रणश्यामि स च मे न प्रणश्यति ॥ ३० ॥

सर्वांमध्यें मीच व्यापूनि राहें
माझ्यामध्यें सर्व जाणून आहे ।
माझा आहे तो तयाचाहि मी कीं
मी त्याला कीं सोडिना तो मला कीं॥ ३० ॥

सर्वभूतस्थितं यो मां भजत्येकत्वमास्थितः ॥
सर्वथा वर्तमानोऽपि स योगी मयि वर्तते ॥ ३१ ॥

सर्वांभूतीं मीच हें ज्यास ठावें
ऐशा मातें जो भजे ऐक्यभावें ।
संसारीं तो साच आहे तथापी
माझ्या मध्यें जाण तो धूतपापी[1] ॥ ३१ ॥

आत्मौपम्येन सर्वत्र समं पश्यति योऽर्जुन ॥
सुखं वा यदि वा दुःखं स योगी परमो मतः ॥ ३२ ॥

श्लोक (इंद्रवज्रा).

जैसी स्वदेहा सुख दुःख हानी
सर्वत्र प्राण्यास तसेंच मानी ।
तो थोर तो युक्त[2] हि तो सुजाण[3]
पार्था मला संमत फार जाण ॥ ३२ ॥

---

१ निष्पापी. २ शहाणा. ३ बुद्धिमान.

॥ अर्जुन उवाच ॥

योऽयं योगस्त्वया प्रोक्तः साम्येन मधुसूदन ॥
एतस्याहं न पश्यामि चंचलत्वात्स्थितिं स्थिराम् ॥ ३३ ॥

अर्जुन–

तों पार्थ बोले मग वासुदेवा
हा योग जन्मांत नसेच ठावा ।
कसें करावें मननिग्रहाला
आहे महासंकट हें जिवाला ॥ ३३ ॥

चंचलं हि मनः कृष्ण प्रमाथि बलवद्दृढम् ॥
तस्याहं निग्रहं मन्ये वायोरिव सुदुष्करम् ॥ ३४ ॥

ह्याच्या पहा चंचल फार खोडी
जें इंद्रियांला स्वबळेंच ओढी ।
त्याचा मला निग्रह पूर्ण होणें
वायूस बांधून धरून येणें ॥ ३४ ॥

॥ श्रीभगवानुवाच ॥

असंशयं महाबाहो मनो दुर्निग्रहं चलम् ॥
अभ्यासेन तु कौंतेय वैराग्येण च गृह्यते ॥ ३५ ॥

भगवान्–

बापा खरी ही म्हणतोस गोष्ट
आहेच हें चंचल फार दुष्ट ।
अभ्यास वैराग्य करील नित्य
जिंकील पार्था मन तोच सत्य ॥ ३५ ॥

१ वैराग्याचा अभ्यास करील.

असंयतात्मना योगो दुष्प्राप इति मे मतिः ॥
वश्यात्मना तु यतता शक्योऽवाप्तुमुपायतः ॥ ३६ ॥

स्वचित्त हें स्थीर नसे जयाचें
योगास तो जाण कधीं न पोंचे ।
प्रयत्नशीलें करितां प्रयत्न
सिद्धीस पावे तरि योगयत्न ॥ ३६ ॥

॥ अर्जुन उवाच ॥

अयतिः श्रद्धयोपेतो योगाच्चलितमानसः ॥
अप्राप्य योगसंसिद्धिं कां गतिं कृष्ण गच्छति ॥ ३७ ॥

अर्जुन—

श्लोक (शालिनी).

श्रद्धा[1] नाहीं पूर्ण ह्या अंतरंगीं
तेणें नोहे स्थीर हें चित्त योगीं ।
नाहीं झाला हा जरी योग पूर्ण
सांगें त्याला बा गती कोण तूर्ण[2] ॥ ३७ ॥

कच्चिन्नोभयविभ्रष्टश्छिन्नाभ्रमिव नश्यति ॥
अप्रतिष्ठो महाबाहो विमूढो ब्रह्मणः पथि ॥ ३८ ॥

श्लोक (इंद्रवज्रा).

तो काय देवा उभयांत[3] भ्रष्ट
पावेल कां ब्रह्मपथांत कष्ट[4] ।
आकाशपंथें जणु मेघराय[5]
तैसाच हाही वितळेल[6] काय ? ॥ ३८ ॥

१ निष्ठा. २ सत्वर. ३ संसारांत व योगांत. ४ च्युत. ५ मेघ. ६ नाश पावेल.

एतन्मे संशयं कृष्ण छेत्तुमर्हस्यशेषतः ॥
त्वदन्यः संशयस्यास्य छेत्ता नह्युपपद्यते ॥ ३९ ॥

हा सर्व मत्संशय छेद आतां
बा तूं खरा संशय सर्व हर्ता ।
माझा पहा संशय दूर सारी
ऐसा तुझ्यावांचुन कोण भारी ॥ ३९ ॥

॥ श्रीभगवानुवाच ॥

पार्थ नैवेह नामुत्र विनाशस्तस्य विद्यते ॥
नहि कल्याणकृत्कश्चिद्दुर्गतिं तात गच्छति ॥ ४० ॥

भगवान्—

त्याचा[1] घडे नाश न मृत्युलोकीं
तैसा घडे नाश न स्वर्गलोकीं ।
कल्याण होतेंच तया नरास
नाहीं तया दुर्गति[3] जाण खास ॥ ४० ॥

प्राप्य पुण्यकृताँल्लोकानुषित्वा शाश्वतीः समाः ॥
शुचीनां श्रीमतां गेहे योगभ्रष्टोऽभिजायते ॥ ४१ ॥

श्लोक (शालिनी).

बा तो रहे सौख्य भोगून नाकीं
वर्षोवर्षें स्वर्गलोकीं विलोकी ।
कांहीं वर्षानंतरें जन्म घेती
श्रीमंतांच्या तेच पोटास येती ॥ ४१ ॥

---

१ मोठा. २ योग अपूर्ण राहणाराचा. ३ वाईट गति.

अथवा योगिनामेव कुले भवति धीमताम् ॥
एतद्धि दुर्लभतरं लोके जन्म यदीदृशम् ॥ ४२ ॥

श्लोक (इंद्रवज्रा).

योगी मुनी जे बहु थोर लीन
श्रीमंत मोठे अथवा कुलीन ।
वंशीं तयांच्या नर जन्म घेतो
आहे पहा दुर्लभ फार जो तो ॥ ४२ ॥

तत्र तं बुद्धिसंयोगं लभते पौर्वदेहिकम् ॥
यतते च ततो भूयः संसिद्धौ कुरुनंदन ॥ ४३ ॥

संस्कार होतो फिरुनी तयाला
जो पूर्वजन्मीं अपुराच झाला ।
मोक्षार्थ साधी सुकृतें करून
अर्थात जातो भवं[2] उद्धरून[3] ॥ ४३ ॥

पूर्वाभ्यासेन तेनैव ह्रियते ह्यवशोऽपि सः ॥
जिज्ञासुरपि योगस्य शब्दब्रह्मातिवर्तते ॥ ४४ ॥

साधावया योग महा कठीण
अभ्यास नाहीं तरि व्यर्थ शीणं[4] ।
पूर्वार्जितें त्यास बळेंच ओढी ·
इच्छा पहा ब्रह्म करूनि सोडी ॥ ४४ ॥

१ संसार. २ तरुन. ३ कष्ट. ४ पूर्वजन्मींच्या कर्मांप्रमाणें.

प्रयत्नाद्यतमानस्तु योगी संशुद्धकिल्बिषः ॥
अनेकजन्मसंसिद्धस्ततो याति परां गतिम् ॥ ४५ ॥

श्लोक (भुजंगप्रयात).

प्रयत्नें जरी योग हा साध्य केला
तरी पूर्ण हो पापसंकल्प गेला ।
पुढें गेलिया जन्म काहीं विलोकीं
वसे मुक्त होऊनी तो दिव्य लोकीं ॥ ४५ ॥

तपस्विभ्योऽधिको योगी ज्ञानिभ्योऽपि मतोऽधिकः ॥
कर्मिभ्यश्चाधिको योगी तस्माद्योगी भवार्जुन ॥ ४६ ॥

श्लोक (शालिनी).

ज्ञान्यापेक्षां तापसी त्याजपेक्षां
कर्म्यापेक्षां थोर सर्वांहिपेक्षां ।
योगी मोठा सौख्य तो फार भोगी
ह्यासाठीं तूं अर्जुना होय योगी ॥ ४६ ॥

योगिनामपि सर्वेषां मद्गतेनांतरात्मना ॥
श्रद्धावान्भजते यो मां स मे युक्ततमो मतः ॥ ४७ ॥

श्लोक (इंद्रवज्रा).

योग्यांत साऱ्या जन तोच श्रेष्ठ
पार्था भजे जो मज एकनिष्ठ ।
बा तोच योगी मज पूज्य भारी
कर्मे करी भक्ति धरूनि सारी ॥ ४७ ॥

इति श्रीमद्भगवद्गीतासूपनिषत्सु ब्रह्मविद्यायां योगशास्त्रे श्रीकृष्णार्जुनसंवादे अभ्यासयोगो नाम षष्ठोऽध्यायः ॥ ६ ॥

सहावा अध्याय समाप्त.

ह्यास "अभ्यासयोग" असें नांव आहे.

१ मान्य.

॥ अथ [illegible]ऽध्यायः प्रारभ्यते ॥

॥ श्रीभगवानुवाच ॥

मय्यासक्तमनाः पार्थ योगं युंजन्मदाश्रयः ॥
असंशयं समग्रं मां यथा ज्ञास्यसि तच्छृणु ॥ १ ॥

श्लोक (इंद्रवज्रा).

आत्मा तुझा मत्स्वरुपीं रमावा
पार्था तुझ्या हातुनि योग व्हावा ।
जेथें तुझे संशय सर्व जाती
मी सांगतों एक तशीच रीती ॥ १ ॥

ज्ञानं तेऽहं सविज्ञानमिदं वक्ष्याम्यशेषतः ॥
यज्ज्ञात्वा नेह भूयोऽन्यज्ज्ञातव्यमवशिष्यते ॥ २ ॥

श्लोक (वसंततिलका).

ज्ञानासहीत तुजला कथितों क्रमानें
विज्ञानही सकल सांगिन कौतुकानें ।
तें ऐकिल्यावरि मिळे तुज ज्ञान मोठें
कीं संशयास मग थार नुरेचि कोठें ॥ २ ॥

मनुष्याणां सहस्रेषु कश्चिद्यतति सिद्धये ॥
यततामपि सिद्धानां कश्चिन्मां वेत्ति तत्त्वतः ॥ ३ ॥

श्लोक (मालिनी).

बहु कठिण दिसे कीं मानवांच्या हजारीं[2]
नरवर[3] अढळेना सिद्ध यत्नांत जारी[4] ।
विरलतर तशाही माजि तत्त्वज्ञ[5] एक
उघड विदित केलें तत्त्व हें नीट ऐक ॥ ३ ॥

१जागा. २हजार मनुष्यांत. ३पुरुषश्रेष्ठ. ४मनापासून यत्न करणारा. ५तत्त्व जाणणारा.

भूमिरापोऽनलो वायुः खं मनो बुद्धिरेव च ॥
अहंकार इतीयं मे भिन्ना प्रकृतिरष्टधा ॥ ४ ॥

हुतवह[1] जल भूमी वायु आकाश पांच
तदुपरि मन बुद्धी कीं अहंकार साच ।
प्रकृति[2] मम अशी ही पावली भेद आठ
जगभर पसरे ही जाण पार्था अफाट[3] ॥ ४ ॥

अपरेयमितस्त्वन्यां प्रकृतिं विद्धि मे पराम् ॥
जीवभूतां महाबाहो ययेदं धार्यते जगत् ॥ ५ ॥

श्लोक (इंद्रवज्रा).

ही अर्जुना प्रकृति एक पाहे
बा मूळमाया दुसरीच आहे ।
जीच्यांत प्राणी जन जन्मतात
उत्पत्ति[4] किंवा लय[5] ही तियेंत ॥ ५ ॥

एतद्योनीनि भूतानि सर्वाणीत्युपधारय ॥
अहं कृत्स्नस्य जगतः प्रभवः प्रलयस्तथा ॥ ६ ॥

श्लोक (शालिनी).

भूतें हीच्या पासुनी सर्व होती
आहे पार्था हीच बा मूळशक्ती ।
उत्पत्तीला वा स्थितीला तरी ही
नाशाला ही मीच आधार पाहीं ॥ ६ ॥

---

१ अग्नि. २ माया. ३ विस्तृत. ४ जन्म. ५ नाश.

मत्तः परतरं नान्यत्किंचिदस्ति धनंजय ॥
मयि सर्वमिदं प्रोतं सूत्रे मणिगणा इव ॥ ७ ॥

श्लोक (इंद्रवज्रा).

माझ्याहुनी भिन्न नसेच कांहीं
सर्वत्र ही व्यापुन मीच राहीं ।
माझ्याच ठाईं जणु ओविलेंसे
हें विश्व सूत्रांत मणीच जैसे ॥ ७ ॥

रसोऽहमप्सु कौंतेय प्रभाऽस्मि शशिसूर्ययोः ॥
प्रणवः सर्ववेदेषु शब्दः खे पौरुषं नृषु ॥ ८ ॥

पाण्यामधें बा रस अर्जुना मी
चंद्रांत सूर्यांत असें प्रभा मी ।
ओंकार वेदीं गगनांत मीच
कीं शब्द पौरूष नरांत मीच ॥ ८ ॥

पुण्यो गंधः पृथिव्यां च तेजश्चास्मि विभावसौ ॥
जीवनं सर्वभूतेषु तपश्चास्मि तपस्विषु ॥ ९ ॥

पृथ्वीमधें मी नर पुण्यगंध
आग्नीमधें तेजहि मी सबंध ।
ह्या जीवमात्रीं नर मीच प्राण
कीं तापसींही तप मीच जाण ॥ ९ ॥

---

१ वेदामध्यें ओंकार मीच. २ गगनांत शब्द मीच. ३ तपस्व्यांमध्यें तप मीच.

बीजं मां सर्वभूतानां विद्धि पार्थ सनातनम् ॥
बुद्धिर्बुद्धिमतामस्मि तेजस्तेजस्विनामहम् ॥ १० ॥

श्लोक (शालिनी).

ह्या भूतांचें बीज ही मीच सत्य
जाणे पार्था मी अनादीहि नित्य ।
बुद्धी ही मी बुद्धिमंतांत राहें
तेजस्व्यांचें तेज ही मीच आहें ॥ १० ॥

बलं बलवतामस्मि कामरागविवर्जितम् ॥
धर्माविरुद्धो भूतेषु कामोऽस्मि भरतर्षभ ॥ ११ ॥

श्लोक (भुजंगप्रयात).

बलिष्ठांमधें शक्ति ही जाण मीच
जगीं काम रागाविणें तेंहि मीच ।
सदा बुद्धि ज्याची स्वधर्माविरुद्ध
पहा तीहि बुद्धी स्वयें मीच शुद्ध ॥ ११ ॥

ये चैव सात्त्विका भावा राजसास्तामसाश्च ये ॥
मत्त एवेति तान्विद्धि न त्वहं तेषु ते मयि ॥ १२ ॥

श्लोक (इंद्रवज्रा).

सात्त्वीक आदी नर तीन गूण
माझ्याच पासून जगांत जाण ।
माझेच ते भाव पहा समस्त
नाहीं परी मी विजया तयांत ॥ १२ ॥

---

१ इच्छेवांचून आणि प्रीतीवांचून जगांत आहे तें मीच.

त्रिभिर्गुणमयैर्भावैरेभिः सर्वमिदं जगत् ॥
मोहितं नाभिजानाति मामेभ्यः परमव्ययम् ॥ १३ ॥

हे भाव या तीनगुणेंकरून
उत्पन्न झालें जगतांत जाण ।
मोहून गेलें जग सर्व त्यानें
त्यांहून मीं भिन्न कुणी न जाणे ॥ १३ ॥

दैवी ह्येषा गुणमयी मम माया दुरत्यया ॥
मामेव ये प्रपद्यंते मायामेतां तरंति ते ॥ १४ ॥

श्लोक (शालिनी).

त्रैगुण्यानें पूर्ण मायाहि जाण
मोठी आहे पार जाण्या कठीण ।
जे जे कोणी मत्पदीं लीन होती
ते ते पार्था हींतुनी पार जाती ॥ १४ ॥

न मां दुष्कृतिनो मूढाः प्रपद्यंते नराधमाः ॥
मायया पहृतज्ञाना आसुरं भावमाश्रिताः ॥ १५ ॥

श्लोक (इंद्रवज्रा).

जे जे न मातें भजती कदापी
ते दुष्ट वा दुर्जन थोर पापी ।
मायेमुळें तन्मन भ्रष्ट झालें
ते दैत्यभावास मिळून गेले ॥ १५ ॥

---

१ तीन गुणांहून. २ दैत्यस्वभावास.

चतुर्विधा भजंते मां जनाः सुकृतिनोऽर्जुन ॥
आर्तो जिज्ञासुरर्थार्थी ज्ञानी च भरतर्षभ ॥ १६ ॥

श्लोक (इंद्रवज्रा).

आहेत जे कां बहु पुण्यवंत
मातें मनानें भजती महंत ।
अर्थार्थि[२] जिज्ञासु[३], तसाच, फार
दुःखार्त[४], ज्ञानी, नर भेद चार ॥ १६ ॥

तेषां ज्ञानी नित्ययुक्त एकभक्तिर्विशिष्यते ।
प्रियो हि ज्ञानिनोऽत्यर्थमहं स च मम प्रियः ॥ १७ ॥

जो भक्तिनें पूजित एकनिष्ठ
सर्वांत ज्ञानी मज तोच श्रेष्ठ ।
आहे मला तो बहु जीव प्राण
तोही मला मानि तसेंच जाण ॥ १७ ॥

उदाराः सर्व एवैते ज्ञानी त्वात्मैव मे मतम् ।
आस्थितः स हि युक्तात्मा मामेवानुत्तमां गतिम् ॥ १८ ॥

हे सर्व आहेत उदार सारे
ज्ञानीच आत्मा मज खास बारे ।
ह्याकारणें तो मम आश्रयानें
माझ्यांत पार्था वसतो सुखानें ॥ १८ ॥

१ सज्जन. २ द्रव्येच्छू. ३ ज्ञानेच्छू. ४ दुःखानें गांजलेला.

बहूनां जन्मनामंते ज्ञानवान्मां प्रपद्यते ॥
वासुदेवः सर्वमिति स महात्मा सुदुर्लभः ॥ १९ ॥

घेवोनि येतो बहुवार जन्म
तेव्हांच ज्ञानी भजतो अनन्य ।
सर्वांत पाहे मग वासुदेव
ज्ञानी असा दुर्लभ तो सदैव ॥ १९ ॥

कामैस्तैस्तैर्हृतज्ञानाः प्रपद्यंतेऽन्यदेवताः ॥
तं तं नियममास्थाय प्रकृत्या नियताः स्वया ॥ २० ॥

श्लोक (शालिनी).

ज्या ज्या कामीं ज्ञान लागून गेलें
त्या त्या कामीं देवही अन्य झाले ।
जैसे जैसे प्रकृती वश्य होती
त्या त्या नेमें देवता पूजिताती ॥ २० ॥

यो यो यां यां तनुं भक्तः श्रद्धयार्चितुमिच्छति ॥
तस्य तस्याचलां श्रद्धां तामेव विदधाम्यहम् ॥ २१ ॥

श्लोक (इंद्रवज्रा).

ज्या देवतेला ह्मणतो भजावें
कीं भक्तिनें त्यास सदा पुजावें ।
त्या दैवतीं मी शिरुनींच नित्य
देतों तया इच्छित सर्व सत्य ॥ २१ ॥

स तया श्रद्धया युक्तस्तस्याराधनमीहते ॥
लभते च ततः कामान्मयैव विहितान्हितान् ॥ २२ ॥

भक्ती करूनी नर जे सदैव
आराधिती सादर अन्य देव ।
तत्काम सारे घडतात पूर्ण
श्रद्धा[1] तयांची दृढ मीच जाण ॥ २२ ॥

अंतवत्तु फलं तेषां तद्भवत्यल्पमेधसाम् ॥
देवान्देवयजो यांति मद्भक्ता यांति मामपि ॥ २३ ॥

ते अल्पबुद्धी जन नापसंत
त्यांचीं फलें सर्वच नाशिवंत ।
ते स्वस्वदेवाप्रत पोंचतात
मद्भक्त ते मत्प्रत पावतात ॥ २३ ॥

अव्यक्तं व्यक्तिमापन्नं मन्यंते मामबुद्धयः ॥
परं भावमजानंतो ममाव्ययमनुत्तमम् ॥ २४ ॥

अव्यक्त मातें ह्मणती कित्येक
कीं व्यक्त कोणी ह्मणतात लोक ।
मी नित्य कीं निर्मळ सौख्यपर्व
बा नेणती कोणिच मूढ सर्व ॥ २४ ॥

---

१ त्यांच्या इच्छा. २ निश्च.

नाहं प्रकाशः सर्वस्य योगमायासमावृतः ॥
मूढोऽयं नाभिजानाति लोको मामजमव्ययम् ॥ २५ ॥

श्लोक (भुजंगप्रयात).

असे झांकलों योगमायेकडून
प्रकाशे न सर्वां जनातें म्हणून ।
पहा मी अनादी असूनी अनंत
मला जाणिना मूढ दुर्बुद्धिमंत ॥ २५ ॥

वेदाहं समतीतानि वर्तमानानि चार्जुन ॥
भविष्याणि च भूतानि मां तु वेद न कश्चन ॥ २६ ॥

श्लोक (शालिनी).

पूर्वी जीं जीं सर्व गेलीं लयास
हल्लीं जीं जीं वर्तती जाण त्यांस ।
होणारीं कीं यापुढें सर्व भूतें
तीं जाणें मी मात्र कोणी न मातें ॥ २६ ॥

इच्छाद्वेषसमुत्थेन द्वंद्वमोहेन भारत ॥
सर्वभूतानि संमोहं सर्गे यांति परंतप ॥ २७ ॥

इच्छाद्वेषापासुनी द्वंद्व झाले
त्यांच्या योगें विश्व[2] मोहून गेलें ।
सृष्टीलाही घालिती मोहपाश
त्याच्या योगें पावती सर्व नाश ॥ २७ ॥

१ जीव. २ जग.

येषां त्वंतगतं पापं जनानां पुण्यकर्मणाम् ॥
ते द्वंद्वमोहनिर्मुक्ता भजंते मां दृढव्रताः ॥ २८ ॥

पापें गेलीं ज्यांचिया अंतरींचीं
पुण्यें कर्में आचरोनीच साचीं ।
पार्था ते ते द्वंद्वमोहा त्यजीती
भक्ती भावें तेच मातें यजीती ॥ २८ ॥

जरामरणमोक्षाय मामाश्रित्य यतंति ये ॥
ते ब्रह्म तद्विदुःकृत्स्नमध्यात्मं कर्म चाखिलम् ॥ २९ ॥

श्लोक (भुजंगप्रयात).

जरा मृत्यु हीं नाश व्हावीं म्हणून
करी यत्न आधार माझा धरून ।
पहा जाणती ब्रह्म तें हें प्रमाण
दुजें कर्म अध्यात्महीं सर्व जाण ॥ २९ ॥

साधिभूताधिदैवं मां साधियज्ञं च ये विदुः ॥
प्रयाणकालेऽपि च मां ते विदुर्युक्तचेतसः ॥ ३० ॥

श्लोक (चामर).

आधिभूत आधिदैव आधियज्ञ मीच तो
ज्ञानवान सत्य तोच अंतरांत जाण तो ।
अंतकालिं जो अशा मला मनांत आठवी
मी तयास ब्रह्मरूप मंदिरांत सांठवीं ॥ ३० ॥

इति श्रीमद्भगवद्गीतासूपनिषत्सु ब्रह्मविद्यायां योगशास्त्रे श्रीकृष्णार्जुनसंवादे ज्ञानविज्ञानयोगो नाम सप्तमोऽध्यायः ॥ ७ ॥

सातवा अध्याय समाप्त.

व्यास " ज्ञानविज्ञान योग " असें नांव आहे.

॥ अथ अष्टमोऽध्यायः प्रारभ्यते ॥

॥ अर्जुन उवाच ॥

किं तद्ब्रह्म किमध्यात्मं किं कर्म पुरुषोत्तम ॥
अधिभूतं च किं प्रोक्तमधिदैवं किमुच्यते ॥ १ ॥

श्लोक (इंद्रवज्रा).

अध्यात्म तें काय अणीक ब्रह्म
देवा मला सांग तसेंच कर्म ।
कोणा ह्मणावें अधिभूत जाण
कीं तें दयाळा अधिदैव कोण ॥ १ ॥

अधियज्ञः कथं कोऽत्र देहेऽस्मिन्मधुसूदन ॥
प्रयाणकाले च कथं ज्ञेयोऽसि नियतात्मभिः ॥ २ ॥

देहामधें या अधियज्ञ कोण
आहे कसा सांग समग्र खूण ।
केलें बळानें वश चित्त ज्यांनीं
कैसें स्मरावें तुज सांग त्यांनीं ॥ २ ॥

॥ श्रीभगवानुवाच ॥

अक्षरं ब्रह्म परमं स्वभावोऽध्यात्ममुच्यते ॥
भूतभावोद्भवकरो विसर्गः कर्मसंज्ञितः ॥ ३ ॥

भगवान्–

जें ब्रह्म तें अक्षर शुद्ध जाण
सद्भाव अध्यात्म मनांत आण ।
उत्पत्ति नाशा करि भूतभाव
त्याला पहा कर्म असेंच नांव ॥ ३ ॥

अधिभूतं क्षरो भावः पुरुषश्चाधिदैवतम् ॥
अधियज्ञोऽहमेवात्र देहे देहभृतां वर ॥ ४ ॥

जाणे मनीं अक्षर आधिभूत
आत्मा जिवाचा अधिदैव त्यांत ।
देहांत व्यापून अनंत मीच
सर्वांत जो तो अधियज्ञ मीच ॥ ४ ॥

अंतकाले च मामेव स्मरन्मुक्त्वा कलेवरम् ॥
यः प्रयाति स मद्भावं याति नास्त्यत्र संशयः ॥ ५ ॥

श्लोक (शालिनी).

ऐशा मातें अंतकाळीं स्मरोनी
पावे मातें तोच देह त्यजोनी ।
तो पावेगा मत्प्रती हेंच सत्य
पार्था नाहीं लेश संदेह त्यांत ॥ ५ ॥

यं यं वापि स्मरन्भावं त्यजत्यंते कलेवरम् ॥
तं तमेवैति कौंतेय सदा तद्भावभावितः ॥ ६ ॥

जेव्हां जेव्हां देह टाकूनि जावें
तेव्हां तेव्हां अंतरीं जें स्मरावें ।
त्या त्या भावें त्यास पावे भरून
ज्याच्या त्याच्या एकनिष्ठेंकरून ॥ ६ ॥

तस्मात्सर्वेषु कालेषु मामनुस्मर युद्ध्य च ॥
मय्यर्पितमनोबुद्धिर्मामेवैष्यस्यसंशयम् ॥ ७ ॥

श्लोक (उपेंद्रवज्रा).

तरी तूं स्मरें नित्य मातें मनांत
परी दाखवी शत्रुला दोन हात ।
जरी चित्त बुद्धी मला अर्पिशील
तरी मत्स्वरूपीं सरुया पावशील ॥ ७ ॥

अभ्यासयोगयुक्तेन चेतसा नान्यगामिना ॥
परमं पुरुषं दिव्यं याति पार्थानुचिंतयन् ॥ ८ ॥

श्लोक (इंद्रवज्रा).

अभ्यासयोगें करुनींच पाहीं
अन्यत्र कोठें मन जात नाहीं ।
सुस्थीर झाल्यावरि बा मनांत
ते पावती कीं पुरुषोत्तमांत ॥ ८ ॥

कविं पुराणमनुशासितारमणोरणीयांसमनुस्मरेद्यः ॥
सर्वस्य धातारमचिंत्यरूपमादित्यवर्णं तमसः परस्तात् ॥ ९ ॥

जो कां अनादी कवि सर्व शास्ता[1]
सूक्ष्माहुनी सूक्ष्म असूनि धाता[2] ।
सूर्यापरी प्रकाशोनि धरी जगाशीं
जो वेगळा स्पष्ट दिसे तमाशीं ॥ ९ ॥

१ सर्वांस शासन करणारा. २ सृष्टि निर्माणकर्ता.

प्रयाणकाले मनसाचलेन भक्त्या युक्तो योगबलेन चैव ॥
भ्रुवोर्मध्ये प्राणमावेश्य सम्यक् स तं परं पुरुषमुपैति दिव्यम् ॥ १० ॥

श्लोक (वसंततिलका).

प्राणप्रयाणसमयीं मन आवरूनी
भक्तीबळें प्रबळ योगबळें करोनी ।
गोळा करी भृकुटि माजि समग्र प्राण
पावेल दिव्य पुरुषीं तरि तोचि जाण ॥ १० ॥

यदक्षरं वेदविदो वदंति विशंति यद्यतयो वीतरागाः ॥
यदिच्छंतो ब्रह्मचर्यं चरंति तत्ते पदं संग्रहेण प्रवक्ष्ये ॥ ११ ॥

श्लोक (इंद्रवज्रा).

वेदज्ञ[1] ज्या अक्षर बोलतात
ज्ञानी विरागी[2] रिघती[3] जयांत ।
जें ब्रह्मचाऱ्यांस मिळेल अंतीं
मी त्या पदाची कथितों सुरीती ॥ ११ ॥

सर्वद्वाराणि संयम्य मनो हृदि निरुद्ध्य च ॥
मूर्ध्न्याधायात्मनः प्राणमास्थितो योगधारणाम् ॥ १२ ॥

कोंडूनि द्वारें सगळींच नित्य
बांधून टाकी हृदयांत चित्त ।
कीं मस्तकीं कोंडुन आत्मप्राण
बा योग योगी करितात जाण ॥ १२ ॥

---

१ वेदवेत्ते. २ निरिच्छ. ३ प्रवेश करतात.

ॐमित्येकाक्षरं ब्रह्म व्याहरन्मामनुस्मरन् ॥
यः प्रयाति त्यजन्देहं स याति परमां गतिम् ॥ १३ ॥

श्लोक (वसंततिलका).

ओं हेंच ब्रह्म हृदयांत भजे स्मरे वा
कीं अंतकाळसमयीं करि हीच सेवा ।
जाईल उत्तम पदा जन तो सुखांत
नाहींच संशय असें समजें मनांत ॥ १३ ॥

अनन्यचेताः सततं यो मां स्मरति नित्यशः ॥
तस्याहं सुलभः पार्थ नित्ययुक्तस्य योगिनः ॥ १४ ॥

श्लोक (इंद्रवज्रा).

माझ्याच ठाईं धरुनी स्वचित्त
मातें पहा जे भजतात नित्य ।
आहें तया मी मिळण्यास सोपा
योगी महायुक्त अशास बापा ॥ १४ ॥

मामुपेत्य पुनर्जन्म दुःखालयमशाश्वतम् ॥
नाप्नुवंति महात्मानः संसिद्धिं परमां गताः ॥ १५ ॥

जे थोर योगी अथवा महंत
जे पावले मत्प्रत साधु संत ।
जो दुःखनाशें बहु लिप्त झाला
तो जन्म नाहीं फिरुनी तयाला ॥ १५ ॥

---

१ ज्ञाते. २ दुःखानें आणि नाशानें बद्ध झालेला जन्म फिरून नाहीं.

आब्रह्मभुवनाल्लोकाः पुनरावर्तिनोऽर्जुन ॥
मामुपेत्य तु कौंतेय पुनर्जन्म न विद्यते ॥ १६ ॥

श्लोक (मालिनी).

फिरुनि फिरुनि सांग्यां जन्म आहेत लोकीं
नर चरक[1] टळेना ब्रह्मलोकीं[2] विलोकीं ।
परि मज नर जो कां पावला पूर्वपुण्यें
क्षितिवरि नच येई जन्म घेऊन जाणें ॥ १६ ॥

सहस्रयुगपर्यंतमहर्यद्ब्रह्मणो विदुः ॥
रात्रिं युगसहस्रां तां तेऽहोरात्रविदो जनाः ॥ १७ ॥

श्लोक (इंद्रवज्रा).

होतीं युगें एक सहस्र जेव्हां
होतो विधी[3]चा दिन एक तेव्हां ।
कीं रात्र तैशीच महा अपूर्व
ज्ञानीजनाला कळतेंच सर्व ॥ १७ ॥

अव्यक्ताद्व्यक्तयः सर्वाः प्रभवंत्यहरागमे ॥
रात्र्यागमे प्रलीयंते तत्रैवाव्यक्तसंज्ञके ॥ १८ ॥

श्लोक (शालिनी).

जैं ब्रह्म्याचे दीन आरंभ होती
तैं मायेच्या पासुनी व्यक्ति[4] होती[5] ।
जेव्हां त्याची रात्र आरंभ होती
अव्यक्तीं[6] ह्या व्यक्ति लोपून जाती ॥ १८ ॥

१ चक्र. २ ब्रह्मलोकांत सुद्धां हें टळत नाहीं. ३ ब्रह्मदेवाचा. ४ भूतें. ५ ब्रह्मांत. ६ नाहींशा होतात.

भूतग्रामः स एवायं भूत्वा भूत्वा प्रलीयते ॥
रात्र्यागमेऽवशः पार्थ प्रभवत्यहरागमे ॥ १९ ॥

भूतांचा हा ग्राम निर्माण होतो
होतो होतो होउनी लुप्त होतो ।
होतो जेव्हां तो दिनारंभ होई
राच्यारंभीं सर्व नाशास जाई ॥ १९ ॥

परस्तस्मात्तु भावोऽन्यो व्यक्तोऽव्यक्तात्सनातनः ॥
यः स सर्वेषु भूतेषु नश्यत्सु न विनश्यति ॥ २० ॥

श्लोक (इंद्रवज्रा).

तो भाव ही एक अणीक आहे
जो सर्व भूतांत भरूनि राहे ।
तो भिन्न भूतां प्रकृतीहुनी ही
नाशे न भूतांपरि तो कदाही ॥ २० ॥

अव्यक्तोऽक्षर इत्युक्तस्तमाहुः परमां गतिम् ॥
यं प्राप्य न निवर्तंते तद्धाम परमं मम ॥ २१ ॥

अव्यक्त कीं अक्षर जें प्रमाण
माझी गती उत्तम तीच जाण ।
गेले तिथें ते परते न येती
तें धाम माझें बहु सौख्य शांती ॥ २१ ॥

पुरुषः स परः पार्थ भक्त्या लभ्यस्त्वनन्यया ॥
यस्यांतस्थानि भूतानि येन सर्वमिदं ततम् ॥ २२ ॥

अनन्यभावें भजतां तयाला
पावेल तो ह्या पुरुषोत्तमाला ।
ज्याच्या स्वरूपीं असतात भूतें
बा व्यापिलें सर्व जगास जें तें ॥ २२ ॥

यत्र काले त्वनावृत्तिमावृत्तिं चैव योगिनः ॥
प्रयाता यांति तं कालं वक्ष्यामि भरतर्षभ ॥ २३ ॥

श्लोक (शालिनी).

ज्याज्या काळीं योगिया जन्म नोहे[२]
कीं ज्या काळीं तो पुन्हा प्राप्त आहे ।
पार्था ते ते काल ही एक एक
तूतें आतां सांगतों नीट ऐक ॥ २३ ॥

अग्निर्ज्योतिरहः शुक्लः षण्मासा उत्तरायणम् ॥
तत्र प्रयाता गच्छंति ब्रह्म ब्रह्मविदो जनाः ॥ २४ ॥

श्लोक (शार्दूलविक्रीडित).

अग्नी दैवत हें असूनि दिवसा कीं शुक्ल पक्षांतरीं
षण्मासांतर उत्तरायण तसें आहे जया भीतरी ।
ऐशा ह्या दिवसांत देह आपुला ठेवील योगी जरी
पार्था ब्रह्मपदास तो अढळही निश्चित जातो तरी २४

१ एकनिष्ठेनें. २ फिरून येत नाहीं.

धूमो रात्रिस्तथा कृष्णः षण्मासा दक्षिणायनम् ॥.
तत्र चांद्रमसं ज्योतिर्योगी प्राप्य निवर्तते ॥ २५ ॥

श्लोक (चामर).

धूम आकुर्तीत रात्र कृष्णपक्ष ह्या दिनीं
चांद्र मास ज्योति षष्ठ मास दक्षणायनीं ।
ह्या दिनांत साच मृत्यु योगियास ये जरी
तो फिरोनि ह्या जगांत जन्म घे पुन्हां तरी २५

शुक्लकृष्णे गती ह्येते जगतः शाश्वते मते ॥
एकया यात्यनावृत्तिमन्ययावर्तते पुनः ॥ २६ ॥

शुक्ल कृष्ण ह्या गती जगास मान्य नित्यही
एक एक मागुत्या फिरूनि येति प्रत्यहीं ।
एकिनें नरास जन्म येतसे पुनःपुन्हा
दूसरीमुळें जना फिरूनि जन्म येइना ॥ २६ ॥

नैते सृती पार्थ जानन् योगी मुह्यति कश्चन ॥
तस्मात्सर्वेषु कालेषु योगयुक्तो भवार्जुन ॥ २७ ॥

श्लोक (इंद्रवज्रा).

जाणोनि हे मार्ग मनांत दोनी
बा आत्मयोगी नच मोह मानी ।
या कारणें हो नर योगयुक्त
तेणेंच होशील सदैव मुक्त ॥ २७ ॥

वेदेषु यज्ञेषु तपःसु चैव दानेषु यत्पुण्यफलं प्रदिष्टम् ॥
अत्येति तत्सर्वमिदं विदित्वा योगी परं स्थानमुपैति चाद्यम् ॥ २८ ॥

जें वेदयज्ञांत घडेल पुण्य
दानाहुनी फारचि अयगंण्य ।
सर्वांहुनी उत्तम थोर योगी
सुस्थीर अत्यंत पदास भोगी ॥ २८ ॥

इति श्रीमद्भगवद्गीतासूपनिषत्सु ब्रह्मविद्यायां योगशास्त्रे श्रीकृष्णार्जुनसंवादे अक्षरब्रह्मयोगो नाम अष्टमोऽध्यायः ॥ ८ ॥

आठवा अध्याय समाप्त.

ह्यास " अक्षरब्रह्मयोग " असें नांव आहे.

॥ अथ नवमोऽध्यायः प्रारभ्यते ॥

॥ श्रीभगवानुवाच ॥

इदं तु ते गुह्यतमं प्रवक्ष्याम्यनसूयवे ॥
ज्ञानं विज्ञानसहितं यज्ज्ञात्वा मोक्ष्यसेऽशुभात् ॥ १ ॥

भगवान्–

श्लोक (इंद्रवज्रा).

हे अर्जुना तूं परदोषमूक[3]
गुह्यांतलें गुह्य रहस्यें[4] ऐक ।
हें ज्ञान विज्ञानसहीत जाणें
मी सांगतों मोक्ष मिळेल तेणें ॥ १ ॥

---

१ श्रेष्ठ. २ अत्यंत स्थीर. ३ दुसऱ्याचे दोष काढण्याविषयीं मुका आहेस. ४ महत्त्वाची गोष्ट.

राजविद्या राजगुह्यं पवित्रमिदमुत्तमम् ॥
प्रत्यक्षावगमं धर्म्यं सुसुखं कर्तुमव्ययम् ॥ २ ॥

ही राजविद्या बहुगुह्य गोष्ट
ये प्रत्ययाला सकला यथेष्ट ।
पार्था असे धर्म्य पवित्र सत्य
ही सौख्यदाती[1] असुनीहि नित्य ॥ २ ॥

अश्रद्दधानाः पुरुषा धर्मस्यास्य परंतप ॥
अप्राप्य मां निवर्तंते मृत्युसंसारवर्त्मनि ॥ ३ ॥

श्लोक (भुजंगप्रयात).

अविश्वास धर्मावरी ह्या कितेक
जरी ठेविती अर्जुना अज्ञ लोक ।
तयाला पहा प्राप्ति माझी नसून
पडे जन्ममृत्यूमधें तो फसून ॥ ३ ॥

मया ततमिदं सर्वं जगदव्यक्तमूर्तिना ॥
मत्स्थानि सर्वभूतानि न चाहं तेष्ववस्थितः ॥ ४ ॥

श्लोक (इंद्रवज्रा).

बा ज्ञान तें काय अधीक आहे ?
अदृश्य[2] मी व्यापुन सर्व राहें ।
माझ्यामधें राहति सर्व भूतें
भूतांमधें पाहुं नकोस मातें ॥ ४ ॥

१ सौख्य देणारी. २ दिसत नाहीं.

न च मत्स्थानि भूतानि पश्य मे योगमैश्वरम् ॥
भूतभृन्न च भूतस्थो ममात्मा भूतभावनः ॥ ५ ॥

श्लोक (शालिनी).

माझ्या मध्यें सर्व नाहींत भूतें
ऐश्वर्याचा[1] योग हा जाण त्यातें ।
पार्था आत्मा सर्वभूतांत राहे
नाहीं ऐसा तो परी सत्य आहे ॥ ५ ॥

यथाऽऽकाशस्थितो नित्यं वायुः सर्वत्रगो महान् ॥
तथा सर्वाणि भूतानि मत्स्थानीत्युपधारय ॥ ६ ॥

श्लोक (इंद्रवज्रा).

वायू जसा हा गगनांत पाहे
सर्वत्र व्यापूनि सदैव राहे ।
तेवींच भूतें सगळीं पहा तीं
माझ्याच ठाईं विजया रहाती ॥ ६ ॥

सर्वभूतानि कौंतेय प्रकृतिं यांति मामिकाम् ॥
कल्पक्षये पुनस्तानि कल्पादौ विसृजाम्यहम् ॥ ७ ॥

श्लोक (मालिनी).

सकल प्रलयकालीं नाशती सर्व भूतें
मम प्रकृतिमध्यें हें सांगतों जाण तूतें ।
पुनरपि नर त्यांना संभवाच्याच वेळीं
जगतिवर क्रमानें मीच जन्मास घालीं ॥ ७ ॥

१ हेंच माझें ऐश्वर्य.

प्रकृतिं स्वामवष्टभ्य विसृजामि पुनः पुनः ॥
भूतग्राममिमं कृत्स्नमवशं प्रकृतेर्वशात् ॥ ८ ॥

श्लोक (शालिनी).

मायेच्या मी आश्रयाला धरून
हें मी निर्मी सर्व पार्था फिरून ।
भूतांचा हा ग्राम[3] तूं सत्य पाहे
मायेच्या हा नित्य आधीन आहे ॥ ८ ॥

न च मां तानि कर्माणि निबध्नंति धनंजय ॥
उदासीनवदासीनमसक्तं तेषु कर्मसु ॥ ९ ॥

श्लोक (भुजंगप्रयात).

ह्मणोनी मला बांधिती तीं न कर्में
अगा अर्जुना हींच त्यांतील मर्में ।
उदासीन मी नित्य राहें ह्मणून
प्रसक्ती फलाची कधीं मी धरीं न ॥ ९ ॥

मयाध्यक्षेण प्रकृतिः सूयते सचराचरम् ॥
हेतुनानेन कौंतेय जगद्विपरिवर्तते ॥ १० ॥

श्लोक (इंद्रवज्रा).

बा जन्म जो सर्वचराचरांचा
अध्यक्ष मी मात्र असें तयांचा ।
हें सर्व माया प्रसवून[3] झालें
ह्याकारणें हें जग सर्व चाले ॥ १० ॥

१ विश्व. २ समुदाय. ३ मायेपासून झालें.

अवजानंति मां मूढा मानुषीं तनुमाश्रितम् ॥
परं भावमजानंतो मम भूतमहेश्वरम् ॥ ११ ॥

नेणोनि मातें नर अप्रबुद्ध
मी मानिती एक मनुष्य शुद्ध ।
माझा करीती अपमान खास
सर्वेश[2] मी हें नकळे तयांस ॥ ११ ॥

मोघाशा मोघकर्माणो मोघज्ञाना विचेतसः ॥
राक्षसीमासुरीं चैव प्रकृतिं मोहिनीं श्रिताः ॥ १२ ॥

श्लोक (शालिनी).

आशा कर्मे सर्व ही जाण साचीं
किंवा ज्ञानें व्यर्थ जो मूढ[3] त्याचीं ।
झाला ऐसा लुब्धे[4] तो प्रकृतीला
मूढा किंवा आसुरी राक्षसीला ॥ १२ ॥

महात्मानस्तु मां पार्थ दैवीं प्रकृतिमाश्रिताः ॥
भजंत्यनन्यमनसो ज्ञात्वा भूतादिमव्ययम् ॥ १३ ॥

श्लोक (इंद्रवज्रा).

भूतांस मी जाणुनि आदि अंत
घेवोनि दैवी प्रकृतीस संत ।
बा ते जगीं या मज ऐक्यभावें
पार्था महात्मे भजती स्वभावें ॥ १३ ॥

---

१ अज्ञ. २ सर्वाचा स्वामी. ३ मूर्ख. ४ लंपट.

सततं कीर्तयंतो मां यतंतश्च दृढव्रताः ।।
नमस्यंतश्च मां भक्त्या नित्ययुक्ता उपासते ।। १४ ।।

जे लोक आहेत दृढव्रताचे
मत्कीर्तनीं ते रत नित्य वाचे ।
जे युक्त जे नित्य उपासितात
ते भक्तिभावें मज वंदितात ।। १४ ।।

ज्ञानयज्ञेन चाप्यन्ये यजंतो मामुपासते ।।
एकत्वेन पृथक्त्वेन बहुधा विश्वतोमुखम् ।। १५ ।।

श्लोक (शार्दूलविक्रीडित).

कोणी एक उपासिती जन मला बा ज्ञानयज्ञें पहा
तैसे जाण कित्येक लोक दुसरे मातें गणोनी महा ।
एकत्वें भजती किती जन मला तैसें पृथक्त्वें किती
पार्था ह्या जगतीवरी जन मला नानामुखें योजिती ।।

अहं क्रतुरहं यज्ञः स्वधाहमहमौषधम् ।।
मंत्रोऽहमहमेवाज्यमहमग्निरहं हुतम् ।। १६ ।।

श्लोक (इंद्रवज्रा).

कोणी क्रतू मानिति यज्ञ मीच
स्वाहा स्वधा औषध मंत्र मीच ।
कीं जाणती अग्निहि मीच कोणी
कीं होमद्रव्यें कुणि मीच मानी ।। १६ ।।

१ दृढ निश्चयाचे. २ अनेक तऱ्हेनें.

पिताहमस्य जगतो माता धाता पितामहः ॥
वेद्यं पवित्रमोंकार ऋक् साम यजुरेव च ॥ १७ ॥

माता पिता मी सकळां जनांचा
धाता अजा मीच तयांस साचा ।
ओंकार मी वेद्य पवित्र मीच
ऋग्वेद किंवा यजु साम मीच ॥ १७ ॥

गतिर्भर्ता प्रभुः साक्षी निवासः शरणं सुहृत् ॥
प्रभवः प्रलयः स्थानं निधानं बीजमव्ययम् ॥ १८ ॥

श्लोक (शार्दूलविक्रीडित).

भूतांची गति निश्चयें करुनि मी कीं मीच त्यां पालक
साक्षी ईश सखा प्रभू सकल मी आहें जगच्चालक[2] ।
आहें मी शरणागतास वश ही सर्वांस वासस्थल[3]
सृष्टीचा लय मी स्थिती जनन मी कीं नित्य मी निर्मळ

तपाम्यहमहं वर्षं निगृह्णाम्युत्सृजामि च ॥
अमृतं चैव मृत्युश्च सदसच्चाहमर्जुन ॥ १९ ॥

पार्था ह्या जगतांत मीच तपतों कीं मीच वृष्टी करीं
मी आवर्षण पाडितों कधिं कधीं पर्जन्य वृद्धी करीं
आहें मोक्षहि मी जगीं मरण मी ही खूण ठेवीं मनीं
जें जें सुंदर चांगलें सकल मी वाईट ही मी जनीं १९

---

१ जाणण्यास योग्य. २ जगाचा चालविणारा. ३ राहण्याचें स्थान.

त्रैविद्या मां सोमपाः पूतपापा यज्ञैरिष्ट्वा स्वर्गतिं प्रार्थयंते ॥
ते पुण्यमासाद्य सुरेंद्रलोकमश्नंति दिव्यान्दिवि देवभोगान् ॥ २० ॥

श्लोक (स्रग्धरा).

वेत्ते जे तीन वेदीं सतत करिति जे सोमपानास नित्य
पापें ज्यांनीं धुवोनी सकल जगभरी सारिलें सर्व कृत्य ।
यज्ञार्थातें करोनी झडकरि जन ते पावती स्वर्गलोकीं
तेथें[2]स्या पुण्यलोकीं[3]सुखकर विषया भोगिती ते विलोकी

ते तं भुक्त्वा स्वर्गलोकं विशालं क्षीणे पुण्ये मर्त्यलोकं विशंति ॥
एवं त्रयीधर्ममनुप्रपन्ना गतागतं कामकामा लभंते ॥ २१ ॥

श्लोक (वसंततिलका).

भोगूनि भोग मग ते नर दिव्यलोकीं
संपून पुण्य पडती मग मृत्युलोकीं ।
फेऱ्यांत नित्य असती जन यापरी ते
आसक्त जे जन सदा असती फलातें ॥ २१ ॥

अनन्याश्चिंतयंतो मां ये जनाः पर्युपासते ॥
तेषां नित्याभियुक्तानां योगक्षेमं वहाम्यहम् ॥ २२ ॥

श्लोक (उपजाति).

उपासिती जे मज एकनिष्ठ
भक्तांत माझ्या जन तेच श्रेष्ठ ।
तो नित्य योगी नर योग साचा
निर्विघ्न मी चालवितों तयाचा ॥ २२ ॥

---

१ यज्ञांत एका वनस्पतीचा रस पितात तो. २ सुख करणारे. ३ स्वर्गलोकीं.

येऽप्यन्यदेवता भक्ता यजंते श्रद्धयान्विताः ।।
तेऽपि मामेव कौंतेय यजंत्यविधिपूर्वकम् ।। २३ ।।

श्लोक (इंद्रवज्रा).

जे अन्य देवां भजतात लोकीं
मातेंच तेही भजती विलोकीं ।
भक्ती मनीं सुदृढ ही करून
होतें परी तें अविधीकरून ॥ २३ ॥

अहं हि सर्वयज्ञानां भोक्ता च प्रभुरेव च ।।
न तु मामभिजानंति तत्त्वेनातश्च्यवंति ते ।। २४ ।।

श्लोक (शालिनी).

यज्ञांचाही सर्वथा मीच भोक्ता
सर्वांचा ही मी प्रभू सर्व शास्ता ।
तत्त्वाला ह्या लोक कोणीच नेणें
ते ते सारे अर्जुना अज्ञ जाणें ॥ २४ ॥

यांति देवव्रता देवान पितॄन्यांति पितृव्रताः ।।
भूतानि यांति भूतेज्या यांति मद्याजिनोऽपि माम् ।। २५ ।।

देवांचे जे भक्त ते देवलोकीं
पित्रांचे ते पोंचती पितृलोकीं ।
भूतांचे ते भूतलोकास जाती
मातें माझे भक्त ते पावताती ॥ २५ ॥

---

१ दृढ निश्चयानें. २ कुमार्गानें.

पत्रं पुष्पं फलं तोयं यो मे भक्त्या प्रयच्छति ॥
तदहं भक्त्युपहृतमश्नामि प्रयतात्मनः ॥ २६ ॥

श्लोक (वसंततिलका).

जें भक्तिनेंच मज देतिल भक्त कोणी
हो पत्र पुष्प अथवा फल शुद्ध पाणी ।
निष्काम तें ह्मणुनियां मज प्रेम दाटे
खातों पितों सकल तें प्रिय फार वाटे ॥ २६ ॥

यत्करोषि यदश्नासि यज्जुहोषि ददासि यत् ॥
यत्तपस्यसि कौंतेय तत्कुरुष्व मदर्पणम् ॥ २७ ॥

ह्याकारणें सकल हें करितोस जें तूं
खातोस यज्ञ करितोस धरूनि हेतू ।
किंवा अघोर तप आचरण्यास जाशी
अर्पीं मला सकल तें मग मुक्त होशी ॥ २७ ॥

शुभाशुभफलैरेवं मोक्ष्यसे कर्मबंधनैः ॥
संन्यासयोगयुक्तात्मा विमुक्तो मामुपैष्यसि ॥ २८ ॥

ऐसें मनांत धरूनी जरि वागशील
कर्मे शुभाशुभ न तीं तुज बांधितील ।
संन्यासयोग तुज़ला मग साध्य[1] झाला
तेणेंच तूं सहज पावशि मत्पदाला ॥ २८ ॥

१ प्राप्त झाला.

समोऽहं सर्वभूतेषु न मे द्वेष्योऽस्ति न प्रियः ॥
ये भजंति तु मां भक्त्या मयि ते तेषु चाप्यहम् ॥ २९ ॥

सर्वांत मी सम मला प्रिय ही न कांहीं
कीं द्वेष ही मम मनीं लवलेश[1] नाहीं ।
भक्ती अनन्य धरुनी भजतात मातें
त्यांच्यांत मी मजमधें वसतात बा ते ॥ २९ ॥

अपि चेत्सुदुराचारो भजते मामनन्यभाक् ॥
साधुरेव स मंतव्यः सम्यग्व्यवसितो हि सः ॥ ३० ॥

पार्था पहा जरि दुराचरणीं असून
मातें भजेल दृढ भक्ति मनीं धरून ।
साधूच जाण विजया तरि तो वरिष्ठ
त्याचा खरा सतत निश्चय एकनिष्ठ ॥ ३० ॥

क्षिप्रं भवति धर्मात्मा शश्वच्छांतिं निगच्छति ॥
कौंतेय प्रतिजानीहि न मे भक्तः प्रणश्यति ॥ ३१ ॥

तो धर्मशील जन होउनि शीघ्र योगी
राहूनियां मम पदीं चिरशांति भोगी ।
ध्यानांत ठेव विजया विसरूं न द्यावें
मद्भक्त तो जन कधीं नच नाश पावे ॥ ३१ ॥

१ तिळमात्र नाहीं.

मां हि पार्थ व्यपाश्रित्य येऽपि स्युः पापयोनयः ॥
स्त्रियो वैश्यास्तथा शूद्रास्तेऽपि यांति परां गतिम् ॥ ३२ ॥

मद्भक्त ते उपजले जरि नीचवंशीं
कीं शूद्र होय युवती जन वैश्यअंशीं ।
कोणी असोत मम भक्त महा समर्थ
होतील ते मम रूपें सगळे कृतार्थ ॥ ३२ ॥

किं पुनर्ब्राह्मणाः पुण्या भक्ता राजर्षयस्तथा ॥
अनित्यमसुखं लोकमिमं प्राप्य भजस्व माम् ॥ ३३ ॥

जे पुण्यवंत द्विजराज ऋषीहि भक्त
ते सांग सत्य मग होतिल कां न मुक्त ।
हा मृत्युलोक बहु नाशक दुःखदाता
ह्याकारणें मज भजें तुज मीच त्राता ॥ ३३ ॥

मन्मना भव मद्भक्तो मद्याजी मां नमस्कुरु ॥
मामेवैष्यसि युक्त्वैवमात्मानं मत्परायणः ॥ ३४ ॥

माझ्यांत योज मन तूं मम भक्त होईं
वंदूनियां शरणही मजलाच येईं ।
माझ्यामधें जरि तुझें मन ठेविशील
निश्चित तूं मम पदाप्रति पावशील ॥ ३४ ॥

इति श्रीमद्भगवद्गीतासूपनिषत्सु ब्रह्मविद्यायां योगशास्त्रे श्रीकृष्णार्जुनसंवादे राजविद्याराजगुह्ययोगो नाम नवमोऽध्यायः ॥ ९ ॥

नववा अध्याय समाप्त.

ह्यास "राजविद्याराजगुह्य" असें नांव आहे.

---

१ हलक्या कुलांत. २ वाण्याच्या जातींत. ३ मोठे. ४ पुण्यवान्. ५ ब्रह्मवर्य. ६ तारणारा.

॥ अथ दशमोऽध्यायः प्रारभ्यते ॥

॥ श्रीभगवानुवाच ॥

भूय एव महाबाहो शृणु मे परमं वचः ॥
यत्तेऽहं प्रीयमाणाय वक्ष्यामि हितकाम्यया ॥ १ ॥

भगवान्—

श्लोक (वसंततिलका).

हें अर्जुना बहुत उत्तम एक तूतें
मी सांगतों तरि पुन्हां परिसें तयातें ।
आनंदलाभ तुज होईल फार तेणें
हें निश्चयेंकरुन मी स्वमनांत जाणें ॥ १ ॥

न मे विदुः सुरगणाः प्रभवं न महर्षयः ॥
अहमादिर्हि देवानां महर्षीणां च सर्वशः ॥ २ ॥

माझें पहा जनन[1] कीं सगळा प्रभाव[2]
ऐश्वर्य थोर मम जे नर सर्वभाव ।
मोठ्या ऋषींस न कळे मम अंत साचा
कीं मी पुरातन असें जनिता[3] तयांचा ॥ २ ॥

यो मामजमनादिं च वेत्ति लोकमहेश्वरम् ॥
असंमूढः स मर्त्येषु सर्वपापैः प्रमुच्यते ॥ ३ ॥

आहें अनादि चिर मी मज जन्म नाहीं
जो सुज्ञ तो निजमनांत असेंच पाही ।
स्वामी असें सकल मीच चराचराचा
जाणेल तो धनि नसे मग पातकाचा ॥ ३ ॥

---

१ जन्म. २ सामर्थ्य. ३ जन्मदाता.

बुद्धिर्ज्ञानमसंमोहः क्षमा सत्यं दमः शमः ॥
सुखं दुःखं भवो भावो भयं चाभयमेव च ॥ ४ ॥

श्लोक (शिखरिणी).

क्षमा बुद्धी शांती भय अभय कीं ज्ञान परम
सुखें आणी दुःखें बहुकठिण[2] जो इंद्रियदम[1] ।
दिसे जें जें लोकीं जनन अथवा मृत्यु बरवा
नरा मोहप्राप्ती गहनतर[5] जो नाश अथवा ॥ ४ ॥

अहिंसा समता तुष्टिस्तपो दानं यशोऽयशः ॥
भवंति भावा भूतानां मत्त एव पृथग्विधाः ॥ ५ ॥

श्लोक (वसंततिलका).

तुष्टी[3] तसेंच तप कीं समता अहिंसा[4]
कीं दान मान अपकीर्ति बरी प्रशंसा ।
हे सर्व भाव मजपासुनि प्राप्त होती
ही गुह्य गोष्ट तुज सांगितली सख्या ती ॥ ५ ॥

महर्षयः सप्त पूर्वे चत्वारो मनवस्तथा ॥
मद्भावा मानसा जाता येषां लोक इमाः प्रजाः ॥ ६ ॥

श्लोक (इंद्रवज्रा).

चौघे मनू सप्त ऋषी अपूर्व[5]
झाले तयापासुन लोक सर्व ।
ते सर्व झाले मजपासुनी रे
माझेच हे यास्तव लोक सारे ॥ ६ ॥

---

१ इंद्रियनिग्रह. २ अति कठिण. ३ संतोष. ४ हिंसा न करणें. ५ महान्.

एतां विभूतिं योगं च मम यो वेत्ति तत्त्वतः ॥
सोऽविकंपेन योगेन युज्यते नात्र संशयः ॥ ७ ॥

जाणेल माझ्या सगळ्या विभूती
होवोनि योगी सम सर्वभूतीं ।
पावेल तो सत्वर योगसिद्धी
त्याची सदा निश्चित होय बुद्धी ॥ ७ ॥

अहं सर्वस्य प्रभवो मत्तः सर्वं प्रवर्तते ॥
इति मत्वा भजंते मां बुधा भावसमन्विताः ॥ ८ ॥

श्लोक (मंदाक्रांता).

सर्वांचा मी अखिलजनिता जाणुनी नित्य चालें
माझ्या योगें सकल जग हें सत्य निर्माण झालें ।
ऐसें चित्तीं धरुनि जन जे मत्प्रती भक्तिभावें
पूजोनीयां भजति सखया त्यांस मी नित्य पावें ॥८॥

मच्चित्ता मद्गतप्राणा बोधयंतः परस्परम् ॥
कथयंतश्च मां नित्यं तुष्यंति च रमंति च ॥ ९ ॥

श्लोक (वसंततिलका).

अर्पूनियां मम पदीं निजजीव चित्त
जे एकमेक करिती उपदेश नित्य ।
माझे अनेकविध भक्त गुणानुवाद
गाती यथेष्ट मिळण्यास्तव मत्प्रसाद ॥ ९ ॥

---

१ अंश.

तेषां सततयुक्तानां भजतां प्रीतिपूर्वकम् ॥
ददामि बुद्धियोगं तं येन मामुपयांति ते ॥ १० ॥

श्लोक (इंद्रवज्रा).

ऐशापरी जे धरतात प्रीती
माझ्यावरी सर्व अशाच रीती ।
जेणें मला सत्वर पावती ते
देतों अशी बुद्धिच मी तयांतें ॥ १० ॥

तेषामेवानुकंपार्थमहमज्ञानजं तमः ॥
नाशयाम्यात्मभावस्थो ज्ञानदीपेन भास्वता ॥ ११ ॥

श्लोक (भुजंगप्रयात).

तयांच्या मनीं लाविती ज्ञानदीप[1]
कृपेनें तमा नाशितो मत्प्रताप[2] ।
लया धाडितो सर्व अज्ञानभ्रांती
तया देतसे सर्वदा सौख्य शांती ॥ ११ ॥

॥ अर्जुन उवाच ॥

परं ब्रह्म परं धाम पवित्रं परमं भवान् ॥
पुरुषं शाश्वतं दिव्यमादिदेवमजं विभुम् ॥ १२ ॥

अर्जुन–

श्लोक (वसंततिलका).

अत्यंत पावनहि तूं अजआदिदेव
भव्य प्रताप जगतांत तुझा सदैव ।
स्वामी हि तूं परम ब्रह्म निधान हेतू
आत्मा चिरायु बहु दिव्य खराखुरा तूं ॥१२॥

---

१ ज्ञानाचा दिवा. २ माझें सामर्थ्य.

आहुस्त्वामृषयः सर्वे देवर्षिर्नारदस्तथा ॥
असितो देवलो व्यासः स्वयं चैव ब्रवीषि मे ॥ १३ ॥

ऐसें तुवां स्ववदनें कथिलेंच आदी
कीं व्यासही असित देवल नारदादी ।
देवर्षिही वदति नित्य असेंच सारे
आहे तुझें चरित अद्भुत हें मुरारे ॥ १३ ॥

सर्वमेतदृतं मन्ये यन्मां वदसि केशव ॥
नहि ते भगवन्व्यक्तिं विदुर्देवा न दानवाः ॥ १४ ॥

श्लोक (इंद्रवज्रा).

हें सत्य आहे जरि लोकताता
नेणें कुणी त्वत्स्वरुपासि आतां ।
देवांस दैत्यांस नसेच ठावें
त्याला कसें हो मनुजें पहावें ॥ १४ ॥

स्वयमेवात्मनात्मानं वेत्थ त्वं पुरुषोत्तम ॥
भूतभावन भूतेश देवदेव जगत्पते ॥ १५ ॥

देवाधिदेवा जगपालकारे
भूताधिपा सौख्यकरा मुरारे ।
जाणावया दुर्लभ तूं जनांस
तूं जाणशी आपण आपणास ॥ १५ ॥

---

१ मानवानें. २ सर्व प्राणिमात्रांचा स्वामी.

वक्तुमर्हस्यशेषेण दिव्या ह्यात्मविभूतयः ॥
याभिर्विभूतिभिर्लोकानिमांस्त्वं व्याप्य तिष्ठसि ॥ १६ ॥

ह्याकारणें सर्व तुझ्या विभूती
ज्या व्यापुनी सर्व जगीं रहाती ।
सांगें मला आज कृपा करूनी
हे कृष्णनाथा मज आदरूनी ॥ १६ ॥

कथं विद्यामहं योगिंस्त्वां सदा परिचिंतयन् ॥
केषु केषु च भावेषु चिंत्योऽसि भगवन्मया ॥ १७ ॥

श्लोक (भुजंगप्रयात).

असे तूज योगेश्वरा सर्व ठावें
परी सांग कैसें तुला ओळखावें ।
तुला चिंतनीं सांग कैसें अणावें
स्वरूपीं तुझ्या कोणत्या लीन व्हावें ॥ १७ ॥

विस्तरेणात्मनो योगं विभूतिं च जनार्दन ॥
भूयः कथय तृप्तिर्हि शृण्वतो नास्ति मेऽमृतम् ॥ १८ ॥

मला बोधिलें त्वां बहू गोड कृष्णा
परी अंतरीं वाढली फार तृष्णा ।
विभूती तुझ्या आणखी योग सांगें
मला विस्तरें यादवा तूंच सांग ॥ १८ ॥

---

१ प्रेमानें. २ शरण जावें. ३ उपदेश केला. ४ समग्र.

॥ श्रीभगवानुवाच ॥

हंत ते कथयिष्यामि दिव्या ह्यात्मविभूतयः ॥
प्राधान्यतः कुरुश्रेष्ठ नास्त्यंतो विस्तरस्य मे ॥ १९ ॥

भगवान्–

बहू चांगला प्रश्न आनंदपर्व
विभूती अतां सांगतों तूज सर्व ।
विभूतींस माझ्या जरी अंत नाहीं
तरी त्यांतुनी मुख्य सांगेन कांहीं ॥ १९ ॥

अहमात्मा गुडाकेश सर्वभूताशयस्थितः ॥
अहमादिश्च मध्यं च भूतानामंत एव च ॥ २० ॥

श्लोक (शालिनी).

भूतांचा मी मध्य कीं आदि अंत
सर्वांनाही व्यापुनी मी अनंत ।
आत्मा आहे जो हृदीं सर्व भूतीं
मोठी पार्था तीच माझी विभूती ॥ २० ॥

आदित्यानामहं विष्णुर्ज्योतिषां रविरंशुमान् ॥
मरीचिर्मरुतामस्मि नक्षत्राणामहं शशी ॥ २१ ॥

श्लोक (इंद्रवज्रा).

विष्णू पहा मी अदितीसुतांत
भानू असें मी नर तेजसांत[2] ।
वायूंत मी जाण असें मरीची
मी चंद्र ताऱ्यांतहि सव्यसाची ॥ २१ ॥

१ आनंददायक. २ तेजस्वी पदार्थांत.

वेदानां सामवेदोऽस्मि देवानामस्मि वासवः ॥
इंद्रियाणां मनश्चास्मि भूतानामस्मि चेतना ॥ २२ ॥

वेदांत मी साम असेंच जाण
देवांत मी इंद्र धरीं प्रमाण ।
कीं इंद्रियांही मन मीच आहें
मी चेतना[1] सर्व जिवांत राहें ॥ २२ ॥

रुद्राणां शंकरश्चास्मि वित्तेशो यक्षरक्षसाम् ॥
वसूनां पावकश्चास्मि मेरुः शिखरिणामहम् ॥ २३ ॥

रुद्रांत मी शंकर अर्जुना हे
यक्षांमधें मीच कुबेर आहें ।
अग्नी असें मी सकलां वसूंत
मेरू गणावा मज पर्वतांत ॥ २३ ॥

पुरोधसां च मुख्यं मां विद्धि पार्थ बृहस्पतिम् ॥
सेनानीनामहं स्कंदः सरसामस्मि सागरः ॥ २४ ॥

श्लोक (भुजंगप्रयात).

असें स्कंद मी जाण सेनापतींत
पुरोहीत जे मोठमोठे तयांत ।
गुरूराज[2] मी स्वर्गिचा इंद्र त्याचा
सरांमाजि मी अब्धि हें जाण साचा ॥२४॥

---

१ प्राण. २ बृहस्पति.

महर्षीणां भृगुरहं गिरामस्म्येकमक्षरम् ॥
यज्ञानां जपयज्ञोऽस्मि स्थावराणां हिमालयः ॥ २५ ॥

श्लोक (वसंततिलका).

मोठ्या ऋषींत विजया भृगु मीच आहें
वाणींमधें प्रणव अक्षर मीच पाहें ।
यज्ञामधें सकलही जपयज्ञ मीच
कीं स्थावरामधिं हिमालय मीच उंच ॥ २५ ॥

अश्वत्थः सर्ववृक्षाणां देवर्षीणां च नारदः ॥
गंधर्वाणां चित्ररथः सिद्धानां कपिलो मुनिः ॥ २६ ॥

बा मीच तो सकल पिंपळ पादपांत
देवर्षि जे सकल नारद मीच त्यांत ।
गंधर्व चित्ररथ मी स्वजनीं तयांच्या
सिद्धांमधें कपिल मी मुनिराज साचा ॥ २६ ॥

उच्चैःश्रवसमश्वानां विद्धि माममृतोद्भवम् ॥
ऐरावतं गजेंद्राणां नराणां च नराधिपम् ॥ २७ ॥

श्लोक (इंद्रवज्रा).

उच्चैःश्रवा अश्वगणांत तो मी
क्षीराब्धिपासून[1] प्रसिद्ध नामी ।
हत्तींत ऐरावत मीच थोर
कीं मानवीं मी नृप शूर वीर ॥ २७ ॥

---

१ क्षीरसमुद्रापासून.

आयुधानामहं वज्रं धेनूनामस्मि कामधुक् ॥
प्रजनश्चास्मि कंदर्पः सर्पाणामस्मि वासुकिः ॥ २८ ॥

मी आयुधीं वज्र कितीक वानूं
धेनूंत मी सुंदर कामधेनू ।
हेतूमधें काम प्रसिद्ध तो मी
सर्पांमधें वासुकि मीच नामीं ॥ २८ ॥

अनंतश्चास्मि नागानां वरुणो यादसामहम् ॥
पितॄणामर्यमा चास्मि यमः संयमतामहम् ॥ २९ ॥

श्लोक (वसंततिलका).

नागांमध्यें सतत मीच असें अनंत
मी अर्जुना जलचरांत वरूण नित्य ।
मी अर्यमाच पितरांत बहूत चोजें[1]
मी नियहांत परिपूर्ण यमाधिराज ॥ २९ ॥

प्रह्लादश्चास्मि दैत्यानां कालः कलयतामहम् ॥
मृगाणां च मृगेंद्रोऽहं वैनतेयश्च पक्षिणाम् ॥ ३० ॥

प्रल्हाद मी सकळ दैत्यगणांत नामी
आकर्षित्यांत नर काळ खराखुरा मी ।
मी श्वापदांत समजें नर सिंह मानें
पक्ष्यांमधें गरुड मी विजया क्रमानें ॥ ३० ॥

१ इच्छा. २ आश्चर्य.

पवनः पवतामस्मि रामः शस्त्रभृतामहम् ॥
झषाणां मकरश्चास्मि स्रोतसामस्मि जाह्नवी ॥ ३१ ॥

श्लोक (एथ्वी).

नभीं उडति जीव जे सकल त्यांत मी मारुत
धनुर्धर[1] तयांत रे विजय राम मी निश्चित ।
जलीं सकल मत्स्य जे मकर त्यांत हे सद्रथी[2] ।
पवित्र सरितांमध्यें[3] विमल[4] मीच भागीरथी ॥ ३१ ॥

सर्गाणामादिरंतश्च मध्यं चैवाहमर्जुन ॥
अध्यात्मविद्या विद्यानां वादः प्रवदतामहम् ॥ ३२ ॥

श्लोक (इंद्रवज्रा).

सृष्टीस मीं आदि तसाच अंत
कीं मध्य ही मी विजया तयांत ।
विद्येंत अध्यात्म गणीं मला रे
वेदांत मी तत्त्व खरेंच सारें ॥ ३२ ॥

अक्षराणामकारोऽस्मि द्वंद्वः सामासिकस्य च ॥
अहमेवाक्षयः कालो धाताऽहं विश्वतोमुखः ॥ ३३ ॥

कीं अक्षरांमाजि अकार मीच
वा मी समासीं बहु द्वंद्व उंच ।
कीं अक्षयीं कालहि मीच आहें
सर्वांस आधार धरून राहें ॥ ३३ ॥

---

१ योद्धे. २ हे अर्जुना. ३ नद्या. ४ पवित्र.

मृत्युः सर्वहरश्चाहमुद्भवश्च भविष्यताम् ॥
कीर्तिः श्रीर्वाक्च नारीणां स्मृतिर्मेधा धृतिः क्षमा ॥ ३४ ॥

नाशांत मी मृत्यु असें खचीत
मी जन्म आहें नर जन्मत्यांत ।
कीर्ती धृती श्री स्मृति आणि वाचा
प्रज्ञा क्षमा मी युवतींत साचा ॥ ३५ ॥

बृहत्साम तथा साम्नां गायत्री छंदसामहम् ॥
मासानां मार्गशीर्षोऽहमृतूनां कुसुमाकरः ॥ ३५ ॥

श्लोक (शार्दूलविक्रीडित).

आम्नायांत वरिष्ठ साम ह्मणती तेथें बृहत्साम मी
गायत्री विजया मनांत समजें छंदांमधें सर्व मी ।
तैसा मी वर मार्गशीर्ष महिना मासांत साऱ्या जनीं
आहें सर्व ऋतूंत जाण मधु मी हें तत्त्व आणी मनीं ३५

द्यूतं छलयतामस्मि तेजस्तेजस्विनामहम् ॥
जयोऽस्मि व्यवसायोऽस्मि सत्त्वं सत्त्ववतामहम् ॥ ३६ ॥

श्लोक (इंद्रवज्रा).

वा द्यूत आहें कपटांत मीच
कीं तेजवंतीं तरि तेज मीच ।
यत्नामधें मी जय हेंच तत्त्व
सत्वस्थ जे त्यांतहि मीच सत्व ॥ ३६ ॥

१ वसंतऋतु.

वृष्णीनां वासुदेवोऽस्मि पांडवानां धनंजयः॥
मुनीनामप्यहं व्यासः कवीनामुशना कविः ॥ ३७ ॥

श्रीकृष्ण मी सर्वच यादवांत
कीं मीच तो अर्जुन पांडवांत ।
ऋषींमध्यें व्यासहि मी वरिष्ठ
कीं मीच तो शुक्र कवींत श्रेष्ठ ॥ ३७ ॥

दंडो दमयतामस्मि नीतिरस्मि जिगीषताम् ॥
मौनं चैवास्मि गुह्यानां ज्ञानं ज्ञानवतामहम् ॥ ३८ ॥

बा दंडकर्त्यांतहि मीच दंड
वीरांमधें नीतिहि मी उदंड ।
गुह्यांमधें मीच सदैव मौन
ज्ञान्यांमधें मीच अखंड ज्ञान ॥ ३८ ॥

यच्चापि सर्वभूतानां बीजं तदहमर्जुन ॥
न तदस्ति विना यत्स्यान्मया भूतं चराचरम् ॥ ३९ ॥

मी ह्या जगाचें चिरबीज नित्य
हें अर्जुना जाण मनांत सत्य ।
माझ्याविणें या जगतांत पाहीं
कोणी कधीं एकहि होत नाहीं ॥ ३९ ॥

नांतोऽस्ति मम दिव्यानां विभूतीनां परंतप ॥
एष तूद्देशतः प्रोक्तो विभूतेर्विस्तरो मया ॥ ४० ॥

माझ्या विभूती भरल्या अनंत
नाहीं तयांना तिळमात्र अंत ।
संक्षेप त्यांचा ह्मणुनी करूनी
सांगीतल्या बा तुज आदरूनी ॥ ४० ॥

यद्यद्विभूतिमत्सत्वं श्रीमदूर्जितमेव वा ॥
तत्तदेवावगच्छ त्वं मम तेजोंऽशसंभवम् ॥ ४१ ॥

श्रीमंत किंवा बहु भाग्यवंत
किंवा जगीं जे जन साधुसंत ।
माझ्याच अंशेंकरुनी प्रमाण
निर्माण झाले स्वमनांत आण ॥ ४१ ॥

अथवा बहुनैतेन किं ज्ञातेन तवार्जुन ॥
विष्टभ्याहमिदं कृत्स्नमेकांशेन स्थितो जगत् ॥ ४२ ॥

सांगों किती ज्ञान असें अपार
ध्यानांत घे एकच मुख्य सार ।
म्यां एक अंशें करुनी जगास
हें निर्मिलें जाण सदैव खास ॥ ४२ ॥

इति श्रीमद्भगवद्गीतासूपनिषत्सु ब्रह्मविद्यायां योगशास्त्रे श्रीकृष्णार्जुनसंवादे विभूतियोगो नाम दशमोऽध्यायः ॥ १० ॥

दहावा अध्याय समाप्त.

ह्यास "विभूतियोग" असें नांव आहे.

॥ अथ एकादशोऽध्यायः प्रारभ्यते ॥

॥ अर्जुन उवाच ॥

मदनुग्रहाय परमं गुह्यमध्यात्मसंज्ञितम् ॥
यत्त्वयोक्तं वचस्तेन मोहोऽयं विगतो मम ॥ १ ॥

श्लोक (इंद्रवज्रा).

कृष्णा मला तूंच कृपा करून
अध्यात्म हें सांगितलें ह्मणून ।
माझ्या मनाला बहु हर्ष झाला
तेणें पहा मोह समग्र गेला ॥ १ ॥

भवाप्ययौ हि भूतानां श्रुतौ विस्तरशो मया ॥
त्वत्तः कमलपत्राक्ष माहात्म्यमपि चाव्ययम् ॥ २ ॥

श्लोक (शालिनी).

भूतांचे जे जन्म वा मृत्यु सारे
आजी ऐकें त्वन्मुखें यादवा रे ।
आहे तूझें थोर माहात्म्य मोठें
ऐकोनियां फार आश्चर्य वाटे ॥ २ ॥

एवमेतद्यथात्थ त्वमात्मानं परमेश्वर ॥
द्रष्टुमिच्छामि ते रूपमैश्वरं पुरुषोत्तम ॥ ३ ॥

श्लोक (वसंततिलका).

ऐश्वर्य अद्भुत तुझें बहु थोर कानें
म्यां ऐकिलें सकल आज तुझ्या मुखानें ।
आतां मनांत मज एक असें अपेक्षा
दे विश्वरूप तव दर्शन अंबुजाक्षा ॥ ३ ॥

१ आत्म्याचा विचार. २ हे श्रीकृष्णा. ३ सत्ता. ४ इच्छा. ५ कमलनेत्रा.

मन्यसे यदि तच्छक्यं मया द्रष्टुमिति प्रभो ॥
योगेश्वर ततो मे त्वं दर्शयात्मानमव्ययम् ॥ ४ ॥

श्लोक (भुजंगप्रयात).

पहाया जरी योग्य तें[1] मी असेन
तुला दाखवाया जरी कष्टवे[2] न ।
तरी दाखवी तें मला दिव्य रूप
मनीं लागला हेतु[3] त्याचा अमूप[4] ॥ ४ ॥

॥ श्रीभगवानुवाच ॥

पश्य मे पार्थ रूपाणि शतशोऽथ सहस्रशः ॥
नानाविधानि दिव्यानि नानावर्णाकृतीनि च ॥ ५ ॥

भगवान्—

श्लोक (इंद्रवज्रा).

नानाकृती[5]चीं कितिएक रूपें
नानाप्रकारें असतीं अमूपें ।
वर्णांत नानाविध भेद फार
आहेत पार्था स्वरूपें अपार ॥ ५ ॥

पश्यादित्यान्वसून्रुद्रानश्विनौ मरुतस्तथा ॥
बहून्यदृष्टपूर्वाणि पश्याश्चर्याणि भारत ॥ ६ ॥

श्लोक (शालिनी).

रुद्रांनीं कीं अश्विनी मारुतांनीं
किंवा पार्था श्रेष्ठ जे त्या वसूंनीं ।
नाहीं बापा देखिलें रूप बा हें
मोठें हें कीं थोर आश्चर्य पाहें ॥ ६ ॥

१ हें रूपाचें दर्शक सर्वनाम. २ तुला फार श्रम नसतील तर. ३ हेतु. ४ फार. ५ अनेक तऱ्हेचीं.

इहैकस्थं जगत्कृत्स्नं पश्याद्य सचराचरम् ॥
मम देहे गुडाकेश यच्चान्यद्द्रष्टुमिच्छसि ॥ ७ ॥

श्लोक (इंद्रवज्रा).

आतां पहा तूं जग हेंच सारें
माझ्या स्वरूपांत खुशाल बारे ।
वाटेल जें जें तुज तेंच पाहे
पार्था पहा सर्वच यांत आहे ॥ ७ ॥

न तु मां शक्यसे द्रष्टुमनेनैव स्वचक्षुषा ॥
दिव्यं ददामि ते चक्षुः पश्य मे योगमैश्वरम् ॥ ८ ॥

ऐश्वर्य मोठें नर[1] तें कठीण[2]
त्वल्लोचना[3] होइल फार शीर्ण ।
ही घे पहाया ममरूप भव्य
देतों तुला दृष्टि बहूत दिव्य[5] ॥ ८ ॥

॥ संजय उवाच ॥

एवमुक्त्वा ततो राजन् महायोगेश्वरो हरिः ॥
दर्शयामास पार्थाय परमं रूपमैश्वरम् ॥ ९ ॥

संजय–

श्रीकृष्ण योगेश्वर[6] हें समग्र
बोलोनि दावी मग रूप उग्र[7] ।
पार्थास तैं प्रेम बहूत दाटे
आले शरीरावर सर्व कांटे ॥ ९ ॥

---

१ हे अर्जुना. २ दुःसह. ३ तुझ्या डोळ्यांना. ४ कष्ट. ५ तेज सहन करण्याजोगी. ६ श्रेष्ठ योगी. ७ भयंकर.

अनेकवक्त्रनयनमनेकाद्भुतदर्शनम् ॥
अनेकदिव्याभरणं दिव्यानेकोद्यतायुधम् ॥ १० ॥

श्लोक (विबुधप्रिया).

काय हो तरि वर्णुं मी किति उग्र अद्भुत रूप तें
कोटिलोचन कोटिही कर आननें किति भूपते ।
भव्य मौक्तिकमाळही शिरपेंच तो मुकुटावरी
दाँगिने किति हे असे बहु शस्त्र अस्त्रहि घे करीं १०

दिव्यमाल्यांबरधरं दिव्यगंधानुलेपनम् ॥
सर्वाश्चर्यमयं देवमनंतं विश्वतोमुखम् ॥ ११ ॥

मालिका बहु दिव्य मौक्तिक पीत अंबर भर्जरी
भाळिं लालहि गंध केशरि वास मायें न अंबरीं ।
फांकली बहु कांति पाहुन सूर्यतेजहि लोपलें
भव्य तें किति रूप हो गगनांत सर्वहि व्यापिलें ११

दिवि सूर्यसहस्रस्य भवेद्युगपदुत्थिता ॥
यदि भाः सदृशी सा स्याद्भासस्तस्य महात्मनः ॥ १२ ॥

एकदां जरि निर्मिले शतकोटि सूर्यहि अंतरीं
नेत्र हा दर्शे सोडुनी जरि तापले बहुतापरी ।
काय ते करितील हो मम विश्वरूपहि त्यापुढें
कां न होतिल सर्व ते रवि दीन हीनहि बापुडे॥१२॥

---

१ एक कोट (संख्या). २ मोत्यांची. ३ एका प्रकारचा अलंकार. ४ अलंकार. ५ हातामध्यें. ६ पिवळें. ७ वस्त्र. ८ जरीचें. ९ कपाळीं. १० नराहे. ११ आकाशांत. १२ झांकलें. १३ आकाशांत. १४ बारा नेत्र उघडून (हल्लीं जगांत सूर्याच्या एका नेत्राचा मात्र प्रकाश आहे. असे बारा नेत्र उघडले म्हणजे पूर्ण तेज होतें. १५ प्रखरतर.

तत्रैकस्थं जगत्कृत्स्नं प्रविभक्तमनेकधा ॥
अपश्यद्देवदेवस्य शरीरे पांडवस्तदा ॥ १३ ॥

एक ठाइंच कोटिशा बहु देखिलीं जगतें अशीं
भिन्न भिन्नहि विश्वतोमुख[1] ओंविलीं जणुं माळशी।
शेंकडों शरिरांत त्या अशिं एक होउन राहिलीं
भव्य दिव्यहि तेजसंयुत[2] अर्जुनें मग पाहिलीं १३

ततः स विस्मयाविष्टो हृष्टरोमा धनंजयः ॥
प्रणम्य शिरसा देवं कृतांजलिरभाषत ॥ १४ ॥

पाहुनी मग रूप अद्भुत अर्जुना भय वाटलें
रोम अंकित अंग होउनि प्रेम अंतरिं दाटलें।
कंठ दाटुनि बाष्प[3] आणुनि लोचनाप्रति तेधवां
हात जोडुनि नम्र होउनि बोलिला मग माधवा १४

॥ अर्जुन उवाच ॥

पश्यामि देवांस्तव देव देहे सर्वांस्तथा भूतविशेषसंघान् ॥
ब्रह्माणमीशं कमलासनस्थमृषींश्च सर्वानुरगांश्च दिव्यान् ॥ १५ ॥

श्लोक (इंद्रवज्रा).

अर्जुन–

रूपीं तुझ्या ह्या सुर देखताहे
हे जीव सारे जनसंघ[4] आहे।
पद्मासनीं हा विधि वेद[5]अंग
महर्षि हे दिव्य किती भुजंग ॥ १५ ॥

---

१ विश्व हेंच आहे मुख ज्याचें. २ तेजःपुंज. ३ अश्रु. ४ समुदाय. ५ वेद हेंच आहे आंग ज्याचें.

अनेकबाहूदरवक्त्रनेत्रं पश्यामि त्वां सर्वतोऽनंतरूपम् ॥
नांतं न मध्यं न पुनस्तवादिं पश्यामि विश्वेश्वर विश्वरूपम् ॥ १६ ॥

बाहू मुखें लोचन कैक[1] पोटें
त्वद्रूप[2] सर्वत्र[3] अनंत मोठें ।
आदी तुला मध्य न अंत पाहे
विश्वेश्वरा विश्वशरीर बा[4] हें ॥ १६ ॥

किरीटिनं गदिनं चक्रिणं च तेजोराशिं सर्वतो दीप्तिमंतम् ॥
पश्यामि त्वां दुर्निरीक्ष्यं समंताद् दीप्तानलार्कद्युतिमप्रमेयम् ॥ १७ ॥

हस्तीं गदा पद्महि जो किरीटी[5]
तूं तेजराशी बहु दीप्ति मोठी ।
सर्वत्र देखे तव उग्र रूप
दावाग्नि[6] सूर्यद्युतिसें प्रदीप ॥ १७ ॥

त्वमक्षरं परमं वेदितव्यं त्वमस्य विश्वस्य परं निधानम् ॥
त्वमव्ययः शाश्वतधर्मगोप्ता सनातनस्त्वं पुरुषो मतो मे ॥ १८ ॥

तूं ज्ञेय तूं अक्षय तूं कृपाळ
तूं आदि तूं शाश्वत धर्मपाळ ।
सांगीतलें त्वां अथवा जनांनीं
आतां कधीं तें न असत्य मानी ॥ १८ ॥

---

१ कितीएक. २ तुझें स्वरूप. ३ जिकडे तिकडे. ४ हे बापा. ५ मुगुट घातला आहे ज्यानें असा. ६ वणवा.

अनादिमध्यांतमनंतवीर्यमनंतबाहुं शशिसूर्यनेत्रम् ॥
पश्यामि त्वां दीप्तहुताशवक्त्रं स्वतेजसा विश्वमिदं तपंतम् ॥ १९ ॥

त्वद्वीर्य किंवा भुज हे अनंत
आदी न त्या मध्य न त्यास अंत ।
भानू शशी नेत्र मुखांत ज्वाला
दैदीप्य कांती जन तप्त झाला ॥ १९ ॥

द्यावापृथिव्योरिदमंतरं हि व्याप्तं त्वयैकेन दिशश्च सर्वाः ॥
दृष्ट्वाऽद्भुतं रूपमुग्रं तवेदं लोकत्रयं प्रव्यथितं महात्मन् ॥ २० ॥

देवा तुझ्या ह्या स्वरुपेंकरून
पृथ्वी दिशा हीं सगळीं भरून ।
आकाश व्यापून समग्र गेलें
विक्राळरूपें जन सर्व भ्याले ॥ २० ॥

अमी हि त्वां सुरसंघा विशंति केचिद्भीताः प्रांजलयो गृणंति ॥
स्वस्तीत्युक्त्वा महर्षिसिद्धसंघाः स्तुवंति त्वां स्तुतिभिः पुष्कलाभिः ॥२१॥

देवाधिदेवा तुज नम्र[2] देव
कोणी स्तुतीही करिती सदैव ।
स्वस्त्ययन[3]स्तु मंत्रें ऋषि सर्व गाती
ऐश्वर्य मोठें जन हें पहाती ॥ २१ ॥

---

१ हे जगदीशा. २ शरण आले आहेत. ३ स्वस्ति-अस्तु. कल्याण असो.

रुद्रादित्या वसवो ये च साध्या विश्वेऽश्विनौ मरुतश्चोष्मपाश्च ॥
गंधर्वयक्षासुरसिद्धसंघा वीक्षंते त्वां विस्मिताश्चैव सर्वे ॥ २२ ॥

आदित्य कीं रुद्र वसू ऋषीहीं
वा यक्ष कीं राक्षसमारुतां ही ।
हा विश्व कीं अश्विनिचे कुमार
सर्वांस आश्चर्य गमे अपार ॥ २२ ॥

रूपं महत्ते बहुवक्त्रनेत्रं महाबाहो बहुबाहूरुपादम् ॥
बहूदरं बहुदंष्ट्राकरालं दृष्ट्वा लोकाः प्रव्यथितास्तथाऽहम् ॥ २३ ॥

डोळे हजारों वदनें हजारों
जानूं[1] हजारों उदरें[2] हजारों ।
विक्राळ[3] दाढा द्दिजें[4] जीभ हाले
मीही तसा सर्वहि लोक भ्याले ॥ २३ ॥

नभःस्पृशं दीप्तमनेकवर्णं व्यात्ताननं दीप्तविशालनेत्रम् ॥
दृष्ट्वा हि त्वां प्रव्यथितांतरात्मा धृतिं न विंदामि शमं च विष्णो ॥ २४ ॥

दैदीप्य[5] तेजें भरलें अभाळ[6]
हें तोंड मोठें उघडें विशाळ ।
अग्नीप्रमाणें नयनांत लाली
देखोनियां गळणं[7] फार झाली ॥ २४ ॥

---

१ गुडघे. २ पोटें. ३ भयंकर. ४ दांत. (दोनदां आहे जन्म ह्यांस). ५ तेजः-पुंज. ६ आकाश. ७ धैर्य खचलें.

दंष्ट्राकरालानि च ते मुखानि दृष्ट्वैव कालानलसंनिभानि ॥
दिशो न जाने न लभे च शर्म प्रसीद देवेश जगन्निवास ॥ २५ ॥

श्लोक (भुजंगप्रयात).

मुखांचा तुझ्या पाहुनी हा गराडा
जयामाजि अक्राळ विक्राळ दाढा ।
मुखीं शेंकडो तप्त दैदीप्य ज्वाळा
सुचेना पहा तूं कृपेनें दयाळा ॥ २५ ॥

अमी च त्वां धृतराष्ट्रस्य पुत्राः सर्वे सहैवावनिपालसंघैः ॥
भीष्मो द्रोणः सूतपुत्रस्तथासौ सहास्मदीयैरपि योधमुख्यैः ॥ २६ ॥

श्लोक (इंद्रवज्रा).

हे सर्व बापा धृतराष्ट्रपुत्र
त्यांचे सहायी क्षितिपाळ मित्र ।
हा कर्ण हे भीष्म गुरू वडील
तैसेच राजे अमुच्याकडील ॥ २६ ॥

वक्त्राणि ते त्वरमाणा विशंति दंष्ट्राकरालानि भयानकानि ॥
केचिद्विलग्ना दशनांतरेषु संदृश्यंते चूर्णितैरुत्तमांगैः ॥ २७ ॥

श्लोक (स्रग्धरा).

हे सारे धांव घेती तव वदनिं पहा आपटीती ललाटें
कोणी दाढेंत देवा अडकुनि बसले कष्टती फार वाटे ।
कोणाचीं मस्तकेंही फुटुनिफुटुनियां छिन्नविच्छिन्न काया ।
कोणाचे कान गेले कर पद तुटले चाविले देवराया ॥ २७ ॥

---

१ विस्तार. २ मदतनीस. ३ पृथ्वीपती (राजे). ४ कपाळें. ५ कुचंबतात. ६ देह. ७ श्लोकाचा भावार्थ सरल अर्थात पहावा म्हणजे नीट समजेल.

यथा नदीनां बहवोऽम्बुवेगाः समुद्रमेवाभिमुखा द्रवंति ॥
तथा तवामी नरलोकवीरा विशंति वक्त्राण्यभिविज्वलंति ॥ २८ ॥

श्लोक (इंद्रवज्रा).

जैशा नद्या धांवति सागरांत
एकापुढें एक त्वरा करीत ।
ज्वाला मुखीं त्वद्दहनें तयांत
हे सर्व तैसे नृप धांवतात ॥ २८ ॥

यथा प्रदीप्तं ज्वलनं पतंगा विशंति नाशाय समृद्धवेगाः ॥
तथैव नाशाय विशंति लोकास्तवापि वक्त्राणि समृद्धवेगाः ॥ २९ ॥

किंवा मरायास पतंग जातो
अग्नीमधें लौकर धांव घेतो ।
तैसे मुखामाजि बळेंच आजी[1]
हे सर्व राजे पळती पहा जी ॥ २९ ॥

लेलिह्यसे ग्रसमानः समंताल्लोकान्समग्रान्वदनैर्ज्वलद्भिः ॥
तेजोभिरापूर्य जगत्समग्रं भासस्तवोग्राः प्रतपंति विष्णो ॥ ३० ॥

भक्षून सर्वांस झटापटीनें
जैं चाटितोसी जिभळ्या जिभेनें ।
ज्वाळा हजारों बहु तीक्ष्ण येती
बा त्वत्प्रभावें[2] जन तप्त[3] होती ॥ ३० ॥

१ आज. २ तुझ्या तेजानें. ३ तापले आहेत.

आख्याहि मे को भवानुग्ररूपो नमोऽस्तु ते देववर प्रसीद ॥
विज्ञातुमिच्छामि भवंतमाद्यं न हि प्रजानामि तव प्रवृत्तिम् ॥ ३१ ॥

तूं कोण ऐसा बहु उग्ररूपी
नेणोनि भीती गमते स्वरूपीं ।
प्रसन्न होईं त्यज उग्ररूप
दावीं दयाळा पहिलें स्वरूप ॥ ३१ ॥

॥ श्रीभगवानुवाच ॥

कालोऽस्मि लोकक्षयकृत्प्रवृद्धो लोकान्समाहर्त्तुमिह प्रवृत्तः ॥
ऋतेऽपि त्वां न भविष्यंति सर्वे येऽवस्थिताः प्रत्यनीकेषु योधाः ॥ ३२ ॥

भगवान्–

प्रत्यक्ष मी जो ह्मणतात काळ
आतां कुठें जातिल भूमिपाळ ।
तूं मारिनाशी जरि यांस साचा
मी नाश आतांच करीन ह्यांचा ॥ ३२ ॥

तस्मात्त्वमुत्तिष्ठ यशो लभस्व जित्वा शत्रून्भुंक्ष्व राज्यं समृद्धम् ॥
मयैवैते निहताः पूर्वमेव निमित्तमात्रं भव सव्यसाचिन् ॥ ३३ ॥

ह्याकारणें वा यशें[2] घेच ऊठ
जिंकून तूं राज्य करीं यथेष्टं[3] ।
मीं मारिलें पूर्वीच कौरवांना
निमित्त हो तूं तरि युद्धमाना ॥ ३३ ॥

---

१ न समजून. २ कीर्ति. ३ खुशाल.

द्रोणं च भीष्मं च जयद्रथं च कर्णं तथान्यानपि योधवीरान् ॥
मया हतांस्त्वं जहि मा व्यथिष्ठा युद्ध्यस्व जेताऽसि रणे सपत्नान् ॥ ३४ ॥

श्लोक (वसंततिलका).

भीष्मादि कर्णहि जयद्रथ वीर आले
पूर्वीच म्यां सकल मारुनि ठार केले ।
घेणें उरे तुजकडे जयमात्र आतां
पार्था उठें धनु करीं धरिं नीट भातां ॥ ३४ ॥

॥ संजय उवाच ॥

एतच्छ्रुत्वा वचनं केशवस्य कृतांजलिर्वेपमानः किरीटी ॥
नमस्कृत्वा भूय एवाह कृष्णं सगद्गदं भीतभीतः प्रणम्य ॥ ३५ ॥

संजय– श्लोक (इंद्रवज्रा).

ऐकूनियां ही भगवंतवाणी
ये अर्जुनाच्या नयनांत पाणी ।
केला नमस्कार बहूत डोले
होवोनियां सद्गद[2] काय बोले ॥ ३५ ॥

॥ अर्जुन उवाच ॥

स्थाने हृषीकेश तव प्रकीर्त्या जगत्प्रहृष्यत्यनुरज्यते च ॥
रक्षांसि भीतानि दिशो द्रवंति सर्वे नमस्यंति च सिद्धसंघाः ॥ ३६ ॥

श्लोक (वसंततिलका).

नारायणा तव कृपें जन हर्षयुक्त
झाले तसेच बहु ते अनुराग[3]युक्त ।
दैत्येंद्र[4]ही दशदिशा पळती भयानें
सारे महर्षि भजती तुज वंदनानें ॥ ३६ ॥

१ बाण ठेवण्याची पिशवी. २ गहिंवरून (कंठ दाटून). ३ प्रीति. ४ मोठमोठे राक्षस.

कस्माच्च ते न नमेरन्महात्मन् गरीयसे ब्रह्मणोऽप्यादिकर्त्रे ॥
अनंत देवेश जगन्निवास त्वमक्षरं सदसत्तत्परं यत् ॥ ३७ ॥

आहेस निश्चित पहा विधि तूं विधीचा
अव्यक्त[1] अक्षर[2] अनंतहि तूंच साचा ।
विश्वंभरा सदय तूं बहु थोर दीनाँ[3]
ऐशा तुला कवण वंदन हो करीना ॥ ३७ ॥

त्वमादिदेवः पुरुषः पुराणस्त्वमस्य विश्वस्य परं निधानम् ॥
वेत्ताऽसि वेद्यं च परं च धाम त्वया ततं विश्वमनंतरूप ॥ ३८ ॥

तूं आदिदेव जन तूंच अनादि तूंच
साऱ्या जगास बहु श्रेष्ठ निधान तूंच ।
बा ज्ञानही परम तूं हरि तूं अनंत
सर्वज्ञ, व्यापक, नसे तुज आदि अंत ॥३८॥

वायुर्यमोऽग्निर्वरुणः शशांकः प्रजापतिस्त्वं प्रपितामहश्च ॥
नमो नमस्तेऽस्तु सहस्रकृत्वः पुनश्च भूयोऽपि नमो नमस्ते ॥३९ ॥

श्लोक (इंद्रवज्रा).

तूं अग्नि वायू यम चंद्र तूंच
किंवा विधीचा जनिताहि तूंच ।
मी वंदितों तूज अनेक वेळा
पुनःपुन्हां वंदितसें दयाळा ॥ ३९ ॥

---

१ ब्रह्मदेवाचा ब्रह्मदेव तूं. २ गुप्त. ३ चिरंजीव. ४ अनाथांस.

नमः पुरस्तादथ पृष्ठतस्ते नमोऽस्तु ते सर्वत एव सर्व ॥
अनंतवीर्यामितविक्रमस्त्वं सर्वं समाप्नोषि ततोऽसि सर्वः ॥ ४० ॥

वंदीत आले तुज कैक लोक
तूं संकटीं उद्धरिले अनेक ।
देवाधिदेवा अतुल[1]प्रतापा
सर्वत्र वंदीं तुज मायबापा ॥ ४० ॥

सखेति मत्वा प्रसभं यदुक्तं हे कृष्ण हे यादव हे सखेति ॥
अजानता महिमानं तवेदं मया प्रमादात्प्रणयेन वापि ॥ ४१ ॥

श्लोक (शिखरिणी).

तुला देवाधीशा अजबरि सखा[3] मी समजलों
अरे जारे कांरे बहु सलगिचे[4] शब्द बदलों ।
अमर्यादा केली मजकडुन ही चूक घडली
क्षमा व्हावी त्याची म्हणुनि नमितों पादयुगुलीं[5] ॥ ४१ ॥

यच्चावहासार्थमसत्कृतोऽसि विहारशय्यासनभोजनेषु ॥
एकोऽथ वाप्यच्युत तत्समक्षं तत्क्षामये त्वामहमप्रमेयम् ॥ ४२ ॥

किती जातां येतां मिळुनि बसतां एक शयनीं[6]
विनोदामध्यें कीं अशनीं[7] करितां दूर गमनी ।
अवज्ञा मी केली तव बहु गमे खंतच मनीं
क्षमा व्हावी त्याची पदर पसरी दास नमुनी ॥ ४२ ॥

१ निरुपम आहे प्रताप ज्या तुझा. २ नमस्कार असो. ३ मित्र. ४ निकट संबंधाचे (बरोबरीचे). ५ पदद्वयांस. ६ एक ठिकाणीं निजलों असतांना. ७ भोजन करतेवेळीं.

पितासि लोकस्य चराचरस्य त्वमस्य पूज्यश्च गुरुर्गरीयान् ।
न त्वत्समोऽस्त्यभ्यधिकः कुतोऽन्यो लोकत्रयेऽप्यप्रतिमप्रभावः ॥ ४३ ॥

श्लोक (वसंततिलका).

बा तूं पिता सकलभूतचराचराचा
तूं पूज्य तूं परम तूं गुरुवर्य साचा ।
देवा प्रभाव तुमचा अघटीत जाणें
बा कोण हो त्रिभुवनांत तुह्मांप्रमाणें ॥ ४३ ॥

तस्मात्प्रणम्य प्रणिधाय कायं प्रसादये त्वामहमीशमीड्यम् ॥
पितेव पुत्रस्य सखेव सख्युः प्रियः प्रियायार्हसि देव सोढुम् ॥ ४४ ॥

जैशी क्षमा करितसे जनितां मुलास
मित्रास मित्र अथवा प्रियही प्रियास ।
तैशी क्षमा मज करून प्रसन्न व्हावें
साष्टांग वंदन तुह्मां करिं नम्रभावें ॥ ४४ ॥

अदृष्टपूर्वं हृषितोऽस्मि दृष्ट्वा भयेन च प्रव्यथितं मनो मे ॥
तदेव मे दर्शय देव रूपं प्रसीद देवेश जगन्निवास । ४५ ॥

आनंदलों बघुनि आज अपूर्व रूप
पोटीं परंतु भयही उपजे अमूप ।
नारायणा मजसिं आज प्रसन्न व्हावें
तें सौम्य रूप पहिलें मज दाखवावें ॥ ४५ ॥

---

१ चालणारे आणि न चालणारे. २ बाप. ३ अद्भुत. ४ शांत.

किरीटिनं गदिनं चक्रहस्तमिच्छामि त्वां द्रष्टुमहं तथैव ॥
तेनैव रूपेण चतुर्भुजेन सहस्रबाहो भव विश्वमूर्ते ॥ ४६ ॥

श्लोक (इंद्रवज्रा).

आतां पुरे हें तव विश्वरूप
जेणें मला भी उपजे अमूप ।
हस्तीं गदा चक्र किरीट माथां
तें रूप पाहों मन इच्छि आतां ॥ ४६ ॥

॥ श्रीभगवानुवाच ॥

मया प्रसन्नेन तवार्जुनेदं रूपं परं दर्शितमात्मयोगात् ॥
तेजोमयं विश्वमनंतमाद्यं यन्मे त्वदन्येन न दृष्टपूर्वम् ॥ ४७ ॥

भगवान—

प्रसन्न होवोनि तुला क्षणोनी
म्यां दाविलें रूप कृपा करूनी ।
जें[1] आजपर्यंत कुणींच नाहीं
बा पाहिलें तें विजया जनांहीं[2] ॥ ४७ ॥

न वेदयज्ञाध्ययनैर्न दानैर्न च क्रियाभिर्न तपोभिरुग्रैः ॥
एवंरूपः शक्य अहं नृलोके द्रष्टुं त्वदन्येन कुरुप्रवीर ॥ ४८ ॥

श्लोक (शिखरिणी).

कितीही योगाचें मनन[3] अथवा वेदपठण
तपश्चर्या केली प्रखरतरही फार कठिण ।
बहू सत्रें दानें करुनि झिजवीली तनु जरी
मिळेना पार्था हें तुजविण कुणा दर्शन तरी ॥४८॥

१ हें स्वरूपाचें संबंधीसर्वनाम. २ जनांनीं. ३ निजध्यास.

मा ते व्यथा मा च विमूढभावो दृष्ट्वा रूपं घोरमीदृङ् ममेदम् ॥
व्यपेतभीः प्रीतमनाः पुनस्त्वं तदेव मे रूपमिदं प्रपश्य ॥ ४९ ॥

श्लोक (वसंततिलका).

अत्युग्ररूप बघुनी घाबरलीस भीती
ती सोडुनी सकल निर्भय हो स्वचित्तीं ।
पाहें स्वरूप पहिलें बहु सौम्य गोड
संतोष मान सखया भय सर्व सोड ॥ ४९ ॥

॥ संजय उवाच ॥

इत्यर्जुनं वासुदेवस्तथोक्त्वा स्वकं रूपं दर्शयामास भूयः ॥
आश्वासयामास च भीतमेनं भूत्वा पुनः सौम्यवपुर्महात्मा ॥ ५० ॥

संजय–

बोलोनियां मग अशी भगवान वाणी
तत्काल रूप पहिलें धरि चक्रपाणी ।
बा सौम्य रूप धरुनी मग अर्जुनाचें
प्रत्यक्ष[1] सांत्वन करी भगवान वाचे ॥ ५० ॥

॥ अर्जुन उवाच ॥

दृष्ट्वेदं मानुषं रूपं तव सौम्यं जनार्दन ॥
इदानीमस्मि संवृत्तः सचेताः प्रकृतिं गतः ॥ ५१ ॥

अर्जुन– श्लोक (इंद्रवज्रा).

पाहोनियां मानव[3]देह याला
जीवामधें जीव बराच आला ।
हा वेळ बापा नव्हतीच[4] शुद्धी
आरंभ झाला भरण्यास बुद्धी ॥ ५१ ॥

१ साक्षात्. २ वाणीनें. ३ मनुष्याचा. ४ स्मृती नाहींशी झाली होती, ती आतां येण्यास आरंभ झाला. (पुरती आली नाहीं असा भाव).

॥ श्रीभगवानुवाच ॥

सुदुर्दर्शमिदं रूपं दृष्टवानसि यन्मम ॥
देवा अप्यस्य रूपस्य नित्यं दर्शनकांक्षिणः ॥ ५२ ॥

भगवान्–

जें रूप त्वां देखियलें नरा हें
सर्वांस तें दुर्लभ फार आहे ।
हें देवही दर्शन इच्छितातीं
कोणी न त्यांतें तरि पावतातीं ॥ ५२ ॥

नाहं वेदैर्न तपसा न दानेन न चेज्यया ॥
शक्य एवंविधो द्रष्टुं दृष्टवानसि मां यथा ॥ ५३ ॥

तूं पाहिलें थोर स्वरूप जाण
तें सर्व लोकांस महा कठीण ।
दानें[2] तपें[3] कीं नर पूजनानें
तें प्राप्त नोहेच पहा कशानें ॥ ५३ ॥

भक्त्या त्वनन्यया शक्य अहमेवंविधोऽर्जुन ॥
ज्ञातुं द्रष्टुं च तत्त्वेन प्रवेष्टुं च परंतप ॥ ५४ ॥

आहे जरी हें नर सर्व खास
जो एकनिष्ठें भजतो तयास ।
जाणावया कीं मिळण्यास बापा
देखावया मी बहु त्यास सोपा ॥ ५४ ॥

---

१ ख्या स्वरूपाप्रत. २ दानानें. ३ तपानें.

मत्कर्मकृन्मत्परमो मद्भक्तः संगवर्जितः ॥
निर्वैरः सर्वभूतेषु यः स मामेति पांडव ॥ ५५ ॥

श्लोक (वसंततिलका).

इच्छा मनांत न धरी जन जो फलाची
सिद्धी असिद्धि घडली तरि एक साची ।
निर्वैर जो सकलभूतगणांत राहे
निःशंक तोच विजया मज पावताहे ॥ ५५ ॥

इति श्रीमद्भगवद्गीतासूपनिषत्सु ब्रह्मविद्यायां योगशास्त्रे श्रीकृष्णार्जुनसंवादे विश्वरूपदर्शनयोगो नाम एकादशोऽध्यायः ॥ ११ ॥

अकरावा अध्याय समाप्त.

ह्यांत विश्वरूपदर्शन दिलें आहे म्हणून यास " विश्वरूपदर्शन " हें नांव आहे.

॥ अथ द्वादशोऽध्यायः प्रारभ्यते ॥

॥ अर्जुन उवाच ॥

एवं सततयुक्ता ये भक्तास्त्वां पर्युपासते ॥
ये चाप्यक्षरमव्यक्तं तेषां के योगवित्तमाः ॥ १ ॥

अर्जुन—

श्लोक (इंद्रवज्रा).

निर्गूण कोणी तुजला म्हणून
कोणी भजे वा सगुणा धरून ।
वा कोण सांगा उभयांत दक्ष[2]
दोहींमधें उत्तम कोण पक्ष ॥ १ ॥

---

१ प्राप्यांत. २ उत्तम.

॥ श्रीभगवानुवाच ॥

मय्यावेश्य मनो ये मां नित्ययुक्ता उपासते ॥
श्रद्धया परयोपेतास्ते मे युक्ततमा मताः ॥ २ ॥

भगवान्—

माझ्याच ठाईं धरुनी मनातें
जे भक्तिभावें भजतात मातें ।
जे एकनिष्ठा धरिती अनन्य
आहेत पार्था मज तेच मान्य[१] ॥ २ ॥

ये त्वक्षरमनिर्देश्यमव्यक्तं पर्युपासते ॥
सर्वत्रगमचिंत्यं च कूटस्थमचलं ध्रुवम् ॥ ३ ॥

अव्यक्त मी अक्षर मी अचिंत्य[३]
अदृश्यहीं[४] मी चलहीन[५] सत्य ।
व्यापूनि मी सर्व चराचरातें
राहें मनीं जाणुनि हेंच मातें ॥ ३ ॥

संनियम्येंद्रियग्रामं सर्वत्र समबुद्धयः ॥
ते प्राप्नुवंति मामेव सर्वभूतहिते रताः ॥ ४ ॥

जे इंद्रियांतें अवरून ध्याती[६]
सर्वत्र बुद्धी समं[७] ठेविताती ।
जे सर्वदां भूताहितांत[८] दंग[९]
माझा तयां नित्य घडे प्रसंग ॥ ४ ॥

---

१ दुसरा नाहीं. २ प्रिय. ३ चिंतावयास कठीण. ४ दिसण्यास कठीण. ५ अचल (स्थीर). ६ हें लोकांचें संबंधी सर्वनाम. ७ सारखी. ८ प्राणिमात्रांच्या कल्याणाविषयीं. ९ तत्पर.

क्लेशोऽधिकतरस्तेषामव्यक्तासक्तचेतसाम् ॥
अव्यक्ता हि गतिर्दुःखं देहवद्भिरवाप्यते ॥ ५ ॥

जे निर्गुणीं चित्त धरूं पहाती
त्यांच्या जिवा कष्ट बहूत होती ।
बा निर्गुणानें श्रमतोच जीवं
मद्वाक्य हें नित्य मनांत ठेव ॥ ५ ॥

ये तु सर्वाणि कर्माणि मयि संन्यस्य मत्पराः ॥
अनन्येनैव योगेन मां ध्यायंत उपासते ॥ ६ ॥

माझ्याच ठाईं दृढ भक्ति ठेव
कर्मैं समर्पीं मजला सदैव ।
अद्वैतयोगें मग पूर्ण ध्यातो
जो एकनिष्ठें मजला स्मरे तो ॥ ६ ॥

तेषामहं समुद्धर्त्ता मृत्युसंसारसागरात् ॥
भवामि न चिरात्पार्थ मय्यावेशितचेतसाम् ॥ ७ ॥

हा मृत्युसंसार तयांस नाहीं
मी होतसें तारक त्यांस पाहीं ।
तत्काळ कैवार धरूनि त्याचा
मी उद्धरीतों भवं जाण साचा ॥ ७ ॥

---

१ प्राणी. २ अर्पण कर. ३ दुजा भाव टाकून. ४ संसार.

मय्येव मन आधत्स्व मयि बुद्धिं निवेशय ॥
निवसिष्यसि मय्येव अत ऊर्ध्वं न संशयः ॥ ८ ॥

ह्याकारणें तूं मन बुद्धि योजीं
माझ्या स्वरूपांत बळेंच आजी ।
ऐसें जरी तूं धरिशील शीलं[1]
अर्थात पार्था मज पावशील ॥ ८ ॥

अथ चित्तं समाधातुं न शक्नोषि मयि स्थिरम् ॥
अभ्यासयोगेन ततो मामिच्छाप्तुं[2] धनंजय ॥ ९ ॥

श्लोक (शालिनी).

माझ्या ठाईं स्थीर होई न चित्त
योगाभ्यासीं तूं करीं यत्न नित्य ।
त्याच्या योगें पूर्ण होईल काम[2]
होई अंतीं[3] प्राप्तही मोक्षधाम ॥ ९ ॥

अभ्यासेऽप्यसमर्थोऽसि मत्कर्मपरमो भव ॥
मदर्थमपि कर्माणि कुर्वन्सिद्धिमवाप्स्यसि ॥ १० ॥

श्लोक (इंद्रवज्रा).

हेंही जरी होत नसेल तूतें
अर्पीं स्वकर्मे नर सर्व मातें ।
सत्कर्ममार्गीं धरिशील बुद्धी
तेणेंच पार्था मिळतील सिद्धी ॥ १० ॥

---

१ स्वभाव. २ इच्छा (मनोरथ). ३ शेवटीं.

अथैतदप्यशक्तोऽसि कर्तुं मद्योगमाश्रितः ॥
सर्वकर्मफलत्यागं ततः कुरु यतात्मवान् ॥ ११ ॥

'हेंही जरी होत नसेल तूतें
राहून माझ्या तरि आश्रयातें ।
सोडीं फलेच्छा दमुनी मनाची
इच्छा पहा कर्मफलें सुखाचीं ॥ ११ ॥

श्रेयो हि ज्ञानमभ्यासाज्ज्ञानाद्ध्यानं विशिष्यते ॥
ध्यानात्कर्मफलत्यागस्त्यागाच्छांतिरनंतरम् ॥ १२ ॥

श्लोक (शार्दूलविक्रीडित).

अभ्यासाहुनि फार श्रेष्ठ विजया बा ज्ञान श्रेयस्कर
ज्ञानाहून विशेष ध्यान जगतीं आहेच अग्रेसर ।
ध्यानाहून निकाम कर्म करणें कल्याणकारी महा
त्याच्याहूनि पलीकडे विकसते सन्मोक्षशांती पहा १२

अद्वेष्टा सर्वभूतानां मैत्रः करुण एव च ॥
निर्ममो निरहंकारः समदुःखसुखः क्षमी ॥ १३ ॥

श्लोक (शिखरिणी).

दया सर्वांभूतीं सतत कधिंही द्वेष न करी
जया मी कीं माझें तिळभरि नसे गर्व न धरी ।
धरी दुःखें किंवा सकलहि सुखें जो सम मनीं
क्षमा शांती चित्तीं धरुनि वसतो जो नर जनीं ॥ १३

१ मागील श्लोकांत सांगितलेलें.

संतुष्टः सततं योगी यतात्मा दृढनिश्चयः ॥
मय्यर्पितमनोबुद्धिर्यो मे भक्तः स मे प्रियः ॥ १४ ॥

श्लोक (उपजाती).

मनोजयें[1] योगबळें करूनी
तृप्ती मनामाजि सदैव मानी ।
अर्पूनि बुद्धी मज सर्व त्यक्त
आहे खरा मत्प्रिय तोच भक्त ॥ १४ ॥

यस्मान्नोद्विजते लोको लोकान्नोद्विजते च यः ॥
हर्षामर्षभयोद्वेगैर्मुक्तो यः स च मे प्रियः ॥ १५ ॥

श्लोक (इंद्रवज्रा).

ज्याला पहा लोक कधीं न भीती
लोकांविशीं निर्भय जो स्वचित्तीं ।
जो क्रोधचिंतासुखदुःखमुक्त
आहे खरा मत्प्रिय तोच भक्त ॥ १५ ॥

अनपेक्षः शुचिर्दक्ष उदासीनो गतव्यथः ॥
सर्वारंभपरित्यागी यो मद्भक्तः स मे प्रियः १६ ॥

आरंभ सोडोनि वसे जगांत
जो प्रत्यहीं निर्मळ शुद्धचित्त ।
जो दक्ष कीं[2] निस्पृह हर्षयुक्त[3]
आहे खरा मत्प्रिय तोच भक्त ॥ १६ ॥

---

१ मन जिंकण्यानें. २ निरिच्छ. ३ आनंदी.

यो न हृष्यति न द्वेष्टि न शोचति न काङ्क्षति ॥
शुभाशुभपरित्यागी भक्तिमान्यः स मे प्रियः ॥ १७ ॥

आनंद कीं हर्ष नसें जयास
इच्छा नसे शोक नसें मनास ।
शुभाशुभाषासुनि जो विरक्त
आहे खरा मत्प्रिय तोच भक्त ॥ १७ ॥

समः शत्रौ च मित्रे च तथा मानापमानयोः ॥
शीतोष्णसुखदुःखेषु समः संगविवर्जितः ॥ १८ ॥

हो शत्रु कीं मित्र समान भावो[2]
सन्मान किंवा अपमान होवो ।
शीतोष्ण मानीं सुखदुःख उक्त
आहे खरा मत्प्रिय तोच भक्त ॥ १८ ॥

तुल्यनिंदास्तुतिर्मौनी संतुष्टो येनकेनचित् ॥
अनिकेतः स्थिरमतिर्भक्तिमान्मे प्रियो नरः ॥ १९ ॥

निंदोत वानोत सदा अनंद
आत्मस्वरूपीं[3] धरि नित्य छंद ।
राहे सदा जो विजया असक्त[4]
आहे खरा मत्प्रिय तोच भक्त ॥ १९ ॥

१ शुभ-अशुभ- चांगले आणि वाईट. २ भक्ति. ३ आत्म्याच्याच स्वरूपामध्यें. ४ सक्त नाहीं असा.

ये तु धर्म्यामृतमिदं यथोक्तं पर्युपासते ॥
श्रद्दधाना मत्परमा भक्तास्तेऽतीव मे प्रियाः ॥ २० ॥

धर्मावरी या धरुनी सुश्रद्धा
अर्पूनि मातें मनबुद्धि सुद्धां ।
अनन्य मानी नर तोच युक्त
आहे खरा मत्प्रिय तोच भक्त ॥ २० ॥

इति श्रीमद्भगवद्गीतासूपनिषत्सु ब्रह्मविद्यायां योगशास्त्रे श्रीकृष्णार्जुनसंवादे भक्तियोगो नाम द्वादशोऽध्यायः ॥ १२ ॥

बारावा अध्याय समाप्त.

यांत भक्ति निरूपण केली आहे म्हणून यास "भक्तियोग" असें नांव आहे.

॥ अथ त्रयोदशोऽध्यायः प्रारभ्यते ॥

॥ श्रीभगवानुवाच ॥

इदं शरीरं कौंतेय क्षेत्रमित्यभिधीयते ॥
एतद्यो वेत्ति तं प्राहुः क्षेत्रज्ञ इति तद्विदः ॥ १ ॥

भगवान्—

श्लोक (इंद्रवज्रा).

पार्था दिसे हें नरदेह[1] पात्र
ह्या तत्त्वं[2]वेत्ते ह्मणतात क्षेत्र ।
जो जाणतो क्षेत्र तयास पाहे
क्षेत्रज्ञ[3] हें नांव प्रसिद्ध आहे ॥ १ ॥

---

१ नरदेह हेंच कोणीएक पात्र. २ ज्ञाते. ३ क्षेत्र जाणणारा.

क्षेत्रज्ञं चापि मां विद्धि सर्वक्षेत्रेषु भारत ॥
क्षेत्रक्षेत्रज्ञयोर्ज्ञानं यत्तज्ज्ञानं मतं मम ॥ २ ॥

क्षेत्रांत साऱ्या भरुनी रहातो
क्षेत्रज्ञ जो मी विजया असें तो ।
जें ज्ञान दोहींविषयीं अनन्य
आहे पहा तें मज फार मान्य ॥ २ ॥

तत्क्षेत्रं यच्च यादृक् च यद्विकारि यतश्च यत् ॥
स च यो यत्प्रभावश्च तत्समासेन मे शृणु ॥ ३ ॥

बा क्षेत्र ऐसें ह्मणती कशाला ?
क्षेत्रज्ञ हें नांव असे कुणाला ।
संक्षेप त्याचा करुनीच बारे
मी सांगतों आज तुला सख्यारे ॥ ३ ॥

ऋषिभिर्बहुधा गीतं छंदोभिर्विविधैः पृथक् ॥
ब्रह्मसूत्रपदैश्चैव हेतुमद्भिर्विनिश्चितैः ॥ ४ ॥

पूर्वी ऋषींनीं पहिल्या अनादी
निश्चित[2] केले किति एक छंदीं[3] ।
वेदांत ह्याचा कथिला विचार
त्याचें तुला सांगतसेंच सारं[4] ॥ ४ ॥

---

१ मूळच्या. २ विचार करून नियम केले आहेत. ३ वेदामध्यें. ४ सारांश.

महाभूतान्यहंकारो बुद्धिरव्यक्तमेव च ॥
इंद्रियाणि दशैकं च पंच चेंद्रियगोचराः ॥ ५ ॥

हीं पांच भूतें विजया अफाट[1]
अव्यक्त[2], बुद्धी, अभिमान, आठ ।
दशेंद्रियें, कीं, मन, हें प्रधान
शब्दादि हीं पांच धरूनि जाण ॥ ५ ॥

इच्छा द्वेषः सुखं दुःखं संघातश्चेतना धृतिः ॥
एतत्क्षेत्रं समासेन सविकारमुदाहृतम् ॥ ६ ॥

कीं द्वेष इच्छा सुख दुःख पाहीं
तैशी धृती[3] आणिक चेतनाही ।
बा सर्व हे क्षेत्रविकार जाण
तल्लक्षणें[4] हींच धरीं प्रमाण ॥ ६ ॥

अमानित्वमदंभित्वमहिंसा क्षांतिरार्जवम् ॥
आचार्योपासनं शौचं स्थैर्यमात्मविनिग्रहः ॥ ७ ॥

शांती अमानित्व[5] शुची[6] अहिंसा
किंवा अदांभित्व[7] गुरुप्रशंसा ।
तैसा मनोनिग्रह[8] जो कठीण
कीं शौर्य आणी सरलत्व जाण ॥ ७ ॥

---

१ विस्तारलेलीं. २ व्यक्त नव्हे ती. (माया). ३ धैर्य. ४ चलनवलन. ५ त्याचीं लक्षणें. ६ निरभिमानीपणा. ७ शुचिर्भूतपणा. ८ निगर्वीपणा. ९ मनाला आवरण्याची शक्ति.

इंद्रियार्थेषु वैराग्यमनहंकार एव च ॥
जन्ममृत्युजराव्याधिदुःखदोषानुदर्शनम् ॥ ८ ॥

वैराग्य सांग्या विषयांत पाहे
किंवा अहंकार त्यजूनि राहे ।
जो जन्ममृत्यू दुखणें जराही
हीं दुःखदोषाईं समस्त पाहीं ॥ ८ ॥

असक्तिरनभिष्वंगः पुत्रदारगृहादिषु ॥
नित्यं च समचित्तत्वमिष्टानिष्टोपपत्तिषु ॥ ९ ॥

कोणी न माझी गृहपुत्रदारा
जो मानितो व्यर्थचि हा पसारा ।
कांहीं जगीं इष्ट अनिष्ट होवो
ज्याचा पहा नित्य समान भावो ॥ ९ ॥

मयि चानन्ययोगेन भक्तिरव्यभिचारिणी ॥
विविक्तदेशसेवित्वमरतिर्जनसंसदि ॥ १० ॥

माझ्याच ठाईं धरि एक सक्ती
अनन्यभावें बहुपूज्य भक्ती ।
एकांतवासीं रममाण होणें
किंवा समाजांत अलक्ष देणें ॥ १० ॥

---

१ उदासीन.

अध्यात्मज्ञाननित्यत्वं तत्त्वज्ञानार्थदर्शनम् ॥
एतज्ज्ञानमिति प्रोक्तमज्ञानं यदतोऽन्यथा ॥ ११ ॥

अध्यात्म जो कां चिरकाळ[1] जाणे
सत्तत्व सारें समजून घेणें ।
जें ज्ञान तें हेंच मनांत आण
अर्थांत अज्ञान विरुद्ध[2] जाण ॥ ११ ॥

ज्ञेयं यत्तत्प्रवक्ष्यामि यज्ज्ञात्वामृतमश्नुते ॥
अनादिमत्परं ब्रह्म न सत्तन्नासदुच्यते ॥ १२ ॥

अनादि जें ब्रह्म परंनिधान
असूनही जें नसल्यासमान ।
कथीन जें योग्य कळावयास
ज्याच्या मुळें मुक्ति मिळेल खास ॥ १२ ॥

सर्वतः पाणिपादं तत्सर्वतोऽक्षिशिरोमुखम् ॥
सर्वतः श्रुतिमल्लोके सर्वमावृत्य तिष्ठति ॥ १३ ॥

श्लोक (वसंततिलका).

त्या हात पाय जिकडेतिकडेहि साच
सर्वत्र नेत्र भरले वदनें तशींच ।
सर्वत्र कर्ण भरले न दिसेच अंत
व्यापूनि जें जगभरी भरलें अनंत ॥ १३ ॥

१ निरंतर. २ उलट.

सर्वेंद्रियगुणाभासं सर्वेंद्रियविवर्जितम् ॥
असक्तं सर्वभृच्चैव निर्गुणं गुणभोक्तृ च ॥ १४ ॥

सर्वेंद्रियांत गमतो सकलांस भास
आहे परी सकल-इंद्रियहीन खास ।
कोठेंच सक्त नसुनी सगळ्यांत राहे
तें सत्व निर्गुण परी गुण भोगताहे ॥ १४ ॥

बहिरंतश्च भूतानामचरं चरमेव च ॥
सूक्ष्मत्वात्तदविज्ञेयं दूरस्थं चांतिके च तत् ॥ १५ ॥

व्यापूनियां अचर कीं चर सर्व भूतें
बाहेर आंत सकलीं भरुनी रहातें ।
तें सूक्ष्म फार ह्मणुनी कळल्या कठीण
जें दूर ही जवळही दिसतेंच जाण ॥ १५ ॥

अविभक्तं च भूतेषु विभक्तमिव च स्थितम् ॥
भूतभर्तृ च तज्ज्ञेयं ग्रसिष्णु प्रभविष्णु च ॥ १६ ॥

श्लोक (उपजाति).

असूनि भूतीं अविभक्त[2] पाहे
विभक्त[3] ऐशापरि नित्य आहे ।
होती तयापासुनि सर्व भूतें
सर्वांस तें पालननाशकर्तें ॥ १६ ॥

---

१ ह्यास इंद्रियें नाहींत. २ एकत्र. ३ वेगळें.

ज्योतिषामपि तज्ज्योतिस्तमसः परमुच्यते ॥
ज्ञानं ज्ञेयं ज्ञानगम्यं हृदि सर्वस्य धिष्ठितम् ॥ १७ ॥

तेजामधें उत्तम हेंच तेज
तमामधें हेंच तमाधिराज ।
साऱ्या जनाच्या हृदयांत वागे
जाणावयाचें परि ज्ञानयोगें ॥ १७ ॥

इति क्षेत्रं तथा ज्ञानं ज्ञेयं चोक्तं समासतः ॥
मद्भक्त एतद्विज्ञाय मद्भावायोपपद्यते ॥ १८ ॥

श्लोक (इंद्रवज्रा).

क्षेत्रज्ञ कीं क्षेत्रहि नाम ज्याचें
सांगीतलें ज्ञान तुला तयाचें ।
जाणूनि हें ज्ञान मनांत बा तें
मद्भक्त पावे चिरं[2] मत्पदातें ॥ १८ ॥

प्रकृतिं पुरुषं चैव विद्ध्यनादी उभावपि ॥
विकारांश्च गुणांश्चैव विद्धि प्रकृतिसंभवान् ॥ १९ ॥

श्लोक (वसंततिलका).

आतां असेंच दुसरेंहि मनांत आण
हीं प्रकृती[3] पुरुष दोन अनादि[4] जाण ।
जे जे पहा गुण[5]विकार मनांत येती
ते जाण कीं प्रकृतिपासुनि सर्व होती ॥ १९ ॥

---

१ मोठें अज्ञान. २ निरंतर. ३ माया. ४ प्राचीन. ५ सत्व, रज, तम हा तीन गुणाचे विकार.

कार्यकारणकर्तृत्वे हेतुः प्रकृतिरुच्यते ॥
पुरुषः सुखदुःखानां भोक्तृत्वे हेतुरुच्यते ॥ २० ॥

श्लोक (इंद्रवज्रा).

कर्तृत्व कीं कारण कार्य पाहे
सर्वांस हेतू[1] प्रकृतीच आहे ।
जे भोग पार्था सुख दुःख हर्ष
त्यांला असे कारण हा पुरूष[2] ॥ २० ॥

पुरुषः प्रकृतिस्थो हि भुंक्ते प्रकृतिजान्गुणान् ॥
कारणं गुणसंगोऽस्य सदसद्योनिजन्मसु ॥ २१ ॥

श्लोक (वसंततिलका).

राहोनियां पुरुष प्रकृति अंतरंगीं
पार्था तिच्या सकल तीन[3] गुणांस भोगी ।
जी प्राप्त होत असते बहु नीच योनी[4]
हेतू तयास गुणसंगति हेंच मानी ॥ २१ ॥

उपद्रष्टानुमंता च भर्ता भोक्ता महेश्वरः ॥
परमात्मेति चाप्युक्तो देहेऽस्मिन्पुरुषः परः ॥ २२ ॥

श्लोक (शिखरिणी).

पहा देहामध्यें पुरुष वसतो जो क्षणुनियां
जगीं देती पार्था बहु विविध नामें जन तया ।
उपद्रष्टा[5], भोक्ता, परम अनुमंता[6], जगपती,
जया भर्ता[7], किंवा सकल परमात्माच वदती ॥ २२ ॥

---

१ कारण. २ आत्मा. ३ सत्त्व, रज, तम. ४ नीच ज्ञातींत जन्म. ५ दूर राहून पाहणारा. ६ अनुमान करणारा. ७ पोषण करणारा.

य एवं वेत्ति पुरुषं प्रकृतिं च गुणैः सह ॥
सर्वथा वर्तमानोऽपि न स भूयोऽभिजायते ॥ २३ ॥

श्लोक (इंद्रवज्रा).

जो कोण पार्था पुरुषाप्रती या
कीं जाणतो ही गुणयुक्त माया ।
त्यानें जरी हा धरिला प्रपंच
त्याला पुन्हा जन्म नसेच साच ॥ २३ ॥

ध्यानेनात्मनि पश्यंति केचिदात्मानमात्मना ॥
अन्ये सांख्येन योगेन कर्मयोगेन चापरे ॥ २४ ॥

आत्मा कुणी हा बघती मनानें
कीं त्यास कोणी बघतात ध्यानें ।
कीं ज्ञानयोगें नर सांख्य यास
नानाप्रकारें बघतात त्यास ॥ २४ ॥

अन्ये त्वेवमजानंतः श्रुत्वान्येभ्य उपासते ॥
तेऽपि चातितरंत्येव मृत्युं श्रुतिपरायणाः ॥ २५ ॥

श्लोक (वसंततिलका).

अज्ञान लोक असतात किती जगांत
ते ऐकुनीच परशब्द उपासितात ।
त्यांना प्रपंच सगळा तरण्यास पाहे
त्यांची तशी श्रवणभक्तिच मुख्य आहे ॥ २५ ॥

यावत्संजायते किंचित्सत्वं स्थावरजंगमम् ॥
क्षेत्रक्षेत्रज्ञसंयोगात्तद्विद्धि भरतर्षभ ॥ २६ ॥

श्लोक (इंद्रवज्रा).

पार्था तसें हें वमनांत आणीं
जो जो दिसे सर्व जगांत प्राणी ।
उत्पन्न जो कीं जगतांत होतो
क्षेत्रज्ञ कीं क्षेत्र मिळून होतो ॥ २६ ॥

समं सर्वेषु भूतेषु तिष्ठंतं परमेश्वरम् ॥
विनश्यत्स्वविनश्यंतं यः पश्यति स पश्यति ॥ २७ ॥

सर्वांत आत्मा सम जो सुरेश
सर्वांस होतो परि त्या न नाश ।
हें तत्त्व जो कां स्वमनांत पाहे
पार्था जगीं डोळस[1] तोच आहे ॥ २७ ॥

समं पश्यन् हि सर्वत्र समवस्थितमीश्वरम् ॥
न हिनस्त्यात्मनाऽऽत्मानं ततो याति परां गतिम् ॥ २८ ॥

सर्वत्र जो ईश समान आहे
त्याला असें जो स्वमनांत पाहे ।
तो आपुला नाश करी न सत्य
पावेल तो उत्तमलोक[2] नित्य ॥ २८ ॥

---

१ नेत्रयुक्त. २ स्वर्ग.

प्रकृत्यैव च कर्माणि क्रियमाणानि सर्वशः ॥
यः पश्यति तथात्मानमकर्तारं स पश्यति ॥ २९ ॥

हीं सर्व कर्मं प्रकृती करीती
ऐसेंच जो पाहतसे स्वचित्तीं ।
आत्मा अकर्त्ता परि सत्य आहे
ऐसें जगीं तोच मनांत पाहे ॥ २९ ॥

यदा भूतपृथग्भावमेकस्थमनुपश्यति ॥
तत एव च विस्तारं ब्रह्म संपद्यते तदा ॥ ३० ॥

श्लोक (भुजंगप्रयात).

जरी सर्व भूतें अशीं वेगळालीं
परब्रह्म जें त्याजपासून झालीं ।
परब्रह्म हें सर्व व्यापूनि राहे
असें पाहणारा तयां पावताहे ॥ ३० ॥

अनादित्वान्निर्गुणत्वात्परमात्मायमव्ययः ॥
शरीरस्थोऽपि कौंतेय न करोति न लिप्यते ॥ ३१ ॥

श्लोक (इंद्रवज्रा).

आत्मा अनादी गुणहीन साच
ह्याकारणें अव्ययही तसाच ।
राहे प्रपंचीं न करीच कांहीं
कीं तो कधीं लिप्तहि होत नाहीं ॥ ३१ ॥

१ कर्त्ता नव्हे. २ त्या परब्रह्माला. ३ गुणरहित. ४ नित्य. ५ बद्ध.

यथा सर्वगतं सौक्ष्म्यादाकाशं नोपलिप्यते ॥
सर्वत्रावस्थितो देहे तथात्मा नोपलिप्यते ॥ ३२ ॥

सर्वत्र आकाश भरून पाही
सूक्ष्मत्वयोगें परि लिप्त नाहीं ।
आत्मा तसा हा सकलास व्यापी
तो निश्चयें लिप्त नसे तथापि ॥ ३२ ॥

यथा प्रकाशयत्येकः कृत्स्नं लोकमिमं रविः ॥
क्षेत्रं क्षेत्री तथा कृत्स्नं प्रकाशयति भारत ॥ ३३ ॥

कीं एक भानू असुनी नभांत
प्रकाश पाडी सगळ्या जगांत ।
क्षेत्रज्ञ तैसा जरि एक आहे
क्षेत्रीं प्रकाशून समस्त राहे ॥ ३३ ॥

क्षेत्रक्षेत्रज्ञयोरेवमंतरं ज्ञानचक्षुषा ॥
भूतप्रकृतिमोक्षं च ये विदुर्यांति ते परम् ॥ ३४ ॥

क्षेत्रज्ञ कीं क्षेत्र मधील भाव
जो ज्ञाननेत्रें[1] बघतो सदैव ।
हीं प्रकृतीपासुनि भिन्न भूतें
जाणेल तो जाइल सद्गतीतें ॥ ३४ ॥

इति श्रीमद्भगवद्गीतासूपनिषत्सु ब्रह्मविद्यायां योगशास्त्रे श्रीकृष्णार्जुनसंवादे क्षेत्रक्षेत्रज्ञविभागयोगो नाम त्रयोदशोऽध्यायः ॥ १३ ॥

तेरावा अध्याय समाप्त.

ह्यांत क्षेत्र (देह) क्षेत्रज्ञ (आत्मा) यांचा विचार सांगितला असल्यामुळें यास " क्षेत्रक्षेत्रज्ञविभागयोग " असें नांव आहे.

---

१ ज्ञान हेंच नेत्र ज्यानें.

॥ अथ चतुर्दशोऽध्यायः प्रारभ्यते ॥

॥ श्रीभगवानुवाच ॥

परं भूयः प्रवक्ष्यामि ज्ञानानां ज्ञानमुत्तमम् ॥
यज्ज्ञात्वा मुनयः सर्वे परां सिद्धिमितो गताः ॥ १ ॥

श्लोक (इंद्रवज्रा).

ज्ञानामधें उत्तम फार एक
तें ज्ञान सांगेन फिरोनि ऐक ।
जें ऐकुनी कैक मुनींद्र सिद्ध
होवोनि पार्था जहले प्रसिद्धें[1] ॥ १ ॥

इदं ज्ञानमुपाश्रित्य मम साधर्म्यमागताः ॥
सर्गेऽपि नोपजायंते प्रलये न व्यथंति च ॥ २ ॥

माझाच ज्ञानाश्रय आदरीला
साधर्म्यतेनें मज लीन झाला ।
त्याला नसे जन्म कधींच बापा
कीं मृत्युही त्यास न शत्रुतापा[2] ॥ २ ॥

मम योनिर्महद्ब्रह्म तस्मिन् गर्भं दधाम्यहम् ॥
संभवः सर्वभूतानां ततो भवति भारत ॥ ३ ॥

श्लोक (शालिनी).

पार्था माझ्यापासुनी एक शक्ती
मायानामें जाण उत्पन्न होती ।
ज्यावेळीं मी बीज पेरीं तिच्यांत
तेव्हां भूतें सर्व होती जगांत[3] ॥ ३ ॥

---

१ कित्येक. २ कैक मुनींद्रसिद्ध होऊन प्रसिद्ध झाले (असा अन्वय.) ३ हे शत्रूस ताप देणाऱ्या (हें अर्जुनाचें संबोधन). ४ प्राणी.

सर्वयोनिषु कौंतेय मूर्त्तयः संभवंति याः ॥
तासां ब्रह्म महद्योनिरहं बीजप्रदः पिता ॥ ४ ॥

होती योनीपासुनी सर्व मूर्ती
त्यांना आहे मूळमाया पहा ती ।
तेथें बीजा पेरणारा असें मी
झालों तेव्हां बाप अर्थात नामीं ॥ ४ ॥

सत्वं रजस्तम इति गुणाः प्रकृतिसंभवाः ॥
निबध्नंति महाबाहो देहे देहिनमव्ययम् ॥ ५ ॥

श्लोक (वसंततिलका).

हें सर्व सत्व रज कीं तम तीन गूण
झाले पहा प्रकृतिपासुनि सर्व जाण ।
आत्मा ह्मणोनि वसतो शरिरांत जो हा
हे त्यास बद्ध करिती विजया अहाहा ॥ ५ ॥

तत्र सत्वं निर्मलत्वात्प्रकाशकमनामयम् ॥
सुखसंगेन बध्नाति ज्ञानसंगेन चानघ ॥ ६ ॥

बा त्यांत सत्वगुण निर्मळ फार आहे
निर्दोष ह्यास्तव प्रकाशित तोच आहे ।
ह्याकारणेंच विजया गुण तो अशेष[1]
देह्यासं[2] ज्ञानसुख देत असे विशेष ॥ ६ ॥

१ तेजस्वी. २ संपूर्ण. ३ देह ब्यास आहे ह्यास.

रजो रागात्मकं विद्धि तृष्णासंगसमुद्भवम् ॥
तन्निबध्नाति कौंतेय कर्मसंगेन देहिनम् ॥ ७ ॥

श्लोक (इंद्रवज्रा).

तैसा रजोगूण पहा नरा हे
हा सत्य इच्छात्मक जाण आहे ।
ह्याला पहा एक असे उपाधी
तो कर्मसंगें पुरुषास बांधी ॥ ७ ॥

तमस्त्वज्ञानजं विद्धि मोहनं सर्वदेहिनाम् ॥
प्रमादालस्यनिद्राभिस्तन्निबध्नाति भारत ॥ ८ ॥

श्लोक (शालिनी).

तैसा पार्था हा तमोगूण जाण
अज्ञानानें वेष्टिला हें प्रमाण ।
देह्याला तो बांधितो आवरून
निद्रालस्यें कीं प्रमादेंकरून ॥ ८ ॥

सत्वं सुखे संजयति रजः कर्मणि भारत ॥
ज्ञानमावृत्य तु तमः प्रमादे संजयत्युत ॥ ९ ॥

श्लोक (इंद्रवज्रा).

सत्वामुळें सौख्य मिळे अपार
तैसें रजापासुन कर्मसार ।
ज्ञानास वेष्टी तम अर्जुना हे
अज्ञानवृद्धी करितें सदा हें ॥ ९ ॥

१ धर्म. २ बद्ध करतो. ३ देह ज्यास आहे त्याला. ४ अपराधानें.

रजस्तमश्चाभिभूय सत्वं भवंति भारत ॥
रजः सत्वं तमश्चैव तमः सत्वं रजस्तथा ॥ १० ॥

श्लोक (वसंततिलका).

टाकोनियां रज कधीं तम गूण मागें
वाढें पुढें सरुनि सत्व कधीं निजांगें ।
नाशून सत्व तम कीं रज फार वाढे
लोपून सत्व रज वा तम होय गाढे ॥ १० ॥

सर्वद्वारेषु देहेऽस्मिन्प्रकाश उपजायते ॥
ज्ञानं यदा तदा विद्याद्विवृद्धं सत्वमित्युत ॥ ११ ॥

श्लोक (शालिनी).

देहाचीं या इंद्रियें हींच द्वारें
त्यांच्या मध्यें जैं प्रकाशेल सारें ।
पार्था मोठें ज्ञान तेव्हां प्रमाण
कीं हें तेथें वाढलें सत्व जाण ॥ ११ ॥

लोभः प्रवृत्तिरारंभः कर्मणामशमः स्पृहा ॥
रजस्येतानि जायंते विवृद्धे भरतर्षभ ॥ १२ ॥

श्लोक (इंद्रवज्रा).

आरंभ कर्मीं जरि लोभ जोडे
लोपूनि शांती बहु आस वाढे ।
वृद्धी रजाची तरि सव्यसाची
झाली म्हणावी परिपूर्ण साची ॥ १२ ॥

१ वाढतें.

अप्रकाशोऽप्रवृत्तिश्च प्रमादो मोह एव च ॥
तमस्येतानि जायंते विवृद्धे कुरुनंदन ॥ १३ ॥

अज्ञान चित्तीं उपजून मोहें
किंवा प्रमादें अनुषंग राहे ।
तेव्हां क्षणावें तम वाढलें हें
पार्था बरी खूण मनांत पाहे ॥ १३ ॥

यदा सत्वे प्रवृद्धे तु प्रलयं याति देहभृत् ॥
तदोत्तमविदां लोकानमलान्प्रतिपद्यते ॥ १४ ॥

जो सत्ववृद्धींत शरीरें[1] टाकी
तो पावतो सत्वर दिव्यलोकीं[2] ।
ज्ञाते सदाही रहतात जेथें
हा पावतो सत्वर जाण तेथें ॥ १४ ॥

रजसि प्रलयं गत्वा कर्मसंगिषु जायते ॥
तथा प्रलीनस्तमसि मूढयोनिषु जायते ॥ १५ ॥

तैसें रजोवृद्धि असून पाही
जो देह ठेवील जगांत देही ।
तो जन्म घे कर्मठ त्यांत साचा
कीं मूढ योनींत तमोगुणाचा ॥ १५ ॥

---

१ सहवास. २ मृत्यु पावेल. ३ स्वर्गलोकीं.

कर्मणः सुकृतस्याहुः सात्विकं निर्मलं फलम् ॥
रजसस्तु फलं दुःखमज्ञानं तमसः फलम् ॥ १६ ॥

श्लोक (वसंततिलका).

सात्वीक कर्म करितां फल त्याप्रमाणें
सात्वीक निर्मल तसें सुखयुक्त जाणे ।
दुःखास देइ फल तेंच रजोगुणाचें
अज्ञानवृद्धि करिते फल तें तमाचें ॥ १६ ॥

सत्वात्संजायते ज्ञानं रजसो लोभ एव च ॥
प्रमादमोहौ तमसो भवतो ज्ञानमेव च ॥ १७ ॥

श्लोक (इंद्रवज्रा).

सत्वामुळें ज्ञान मिळे अपार
तैसा रजापासुन लोभ फार ।
पार्था तमापासुन मोह येतो
उन्माद अज्ञान नरास देतो ॥ १७ ॥

ऊर्ध्वं गच्छंति सत्वस्था मध्ये तिष्ठंति राजसाः ॥
जघन्यगुणवृत्तिस्था अधो गच्छंति तामसाः ॥ १८ ॥

सत्वस्थ ते राहति स्वर्गलोकीं
तैसे पहा राजस मृत्युलोकीं ।
जे तीसरे तामस लोक खास
निःशेष जातात अधोगतीस[2] ॥ १८ ॥

---

१ निश्चयेंकरून. २ नरकास.

नान्यं गुणेभ्यः कर्तारं यदा द्रष्टानुपश्यति ॥
गुणेभ्यश्च परं वेत्ति मद्भावं सोऽधिगच्छति ॥ १९ ॥

श्लोक (वसंततिलका).

बुद्धीमुळें उपजले गुण तोच कर्त्ता
त्याच्या शिवाय दुसरा नदिसेच पंर्ता ।
आत्मा गुणापलिकडे नर ज्यास ठावे
ज्ञाता खरा सुजन तो मज तोच पावे ॥ १९ ॥

गुणानेतानतीत्य त्रीन्देही देहसमुद्भवान् ॥
जन्ममृत्युजरादुःखैर्विमुक्तोऽमृतमश्नुते ॥ २० ॥

श्लोक (शालिनी).

झाले देहापासुनी तीन गूण
सोडी जो कां अर्जुना ह्यांस जाण ।
त्याला नाहीं जन्म कीं मृत्युदुःख
पार्था त्याला बा मिळे मोक्षसौख्य ॥ २० ॥

॥ अर्जुन उवाच ॥

कैर्लिंगैस्त्रीन्गुणानेतानतीतो भवति प्रभो ॥
किमाचारः कथं चैतांस्त्रीन्गुणानतिवर्तते ॥ २१ ॥

अर्जुन—

श्लोक (इंद्रवज्रा).

जो सोडितो तीन गुणांस ऐसें
त्या ओळखावें जगतांत कैसें ? ।
आचार त्याचा असतो कसारे ?
तें सर्व सांगें मजला मुरारे ॥ २१ ॥

१ दुसरा. २ मोक्षाचें सुख. ३ हे भगवंता.

॥ श्रीभगवानुवाच ॥

प्रकाशं च प्रवृत्तिं च मोहमेव च पांडव ॥
न द्वेष्टि संप्रवृत्तानि न निवृत्तानि कांक्षति ॥ २२ ॥

भगवान्–

जो ज्ञान कीं कर्म असो तरीहीं
अज्ञान आलें तरि द्वेष नाहीं ।
सोडोनि गेलीं जरि सर्व त्यास
इच्छी न पार्था कधिंही तयांस ॥ २२ ॥

उदासीनवदासीनो गुणैर्यो न विचाल्यते ॥
गुणा वर्तंत इत्येव योऽवतिष्ठति नेंगते ॥ २३ ॥

राहे उदासीन सदा मनानें
नोहे कधीं चंलल जो गुणानें ।
संतोष मानी त्रिगुणींं अलग्न
आत्मस्वरूपांत सदा निमग्न ॥ २३ ॥

समदुःखसुखः स्वस्थः समलोष्टाश्मकांचनः ॥
तुल्यप्रियाप्रियो धीरस्तुल्यनिंदात्मसंस्तुतिः ॥ २४ ॥

हो दुःख कीं सौख्य पहा जिवाला
औदास्यें कीं हर्ष नसे मनाला ।
पार्था जया नित्य समान भेंडा
मानी मनीं हेम तसांच धोंडा ॥ २४ ॥

---

१ ज्ञान, कर्म, अज्ञान इ० वरील. २ तीन गुणांमध्यें. ३ दूर. ४ तन्मय. ५ उदासीनता. ६ ढेंकूळ (मृत्तिकेचें).

मानापमानयोस्तुल्यस्तुल्यो मित्रारिपक्षयोः ॥
सर्वारंभपरित्यागी गुणातीतः स उच्यते ॥ २५ ॥

श्लोक (स्रग्धरा).

निंदा किंवा स्तुती हो सकलजगभरी जो तरी धैर्यवान
होवो वाईट किंवा फिरुनिफिरुनिही चांगलें ज्यासमान
शत्रूमित्रांस जो कां समसम धरुनी लेखितो ऐक्यभावें
जोकां आरंभ सोडी सततजन गुणातीत त्याला ह्मणावें

मां च योऽव्यभिचारेण भक्तियोगेन सेवते ॥
स गुणान्समतीत्यैतान् ब्रह्मभूयाय कल्पते ॥ २६ ॥

श्लोक (इंद्रवज्रा).

जो एकनिष्ठें बहु भक्ति ठेवी
पार्था सदा जो मजलाच सेवी[3] ।
तो सारुनी तीन गुणांस मागें
बा ब्रह्मरूपांत मिळेल वेगें ॥ २६ ॥

ब्रह्मणो हि प्रतिष्ठाहममृतस्याव्ययस्य च ॥
शाश्वतस्य च धर्मस्य सुखस्यैकांतिकस्य च ॥ २७ ॥

हें ब्रह्म कीं अक्षय मोक्ष याचें
कीं थोर जो शाश्वत धर्म त्याचें ।
कीं सर्व एकांतिक सौख्य नित्य
त्यांचें असें स्थानहि मीच सत्य ॥ २७ ॥

इति श्रीमद्भगवद्गीतासूपनिषत्सु ब्रह्मविद्यायां योगशास्त्रे श्रीकृष्णार्जुनसंवादे गुणत्रयविभागयोगो नाम चतुर्दशोऽध्यायः ॥ १४ ॥

चवदावा अध्याय समाप्त.

ह्मांत गुणांच्या तीन विभागांचें नि०केलें, ह्मणून "गुणत्रयविभागयोग" हें नांव आहे.

१ सारखें. २ गुणापासून अतीत वेगळा. 3 सेवन करी.

॥ अथ पंचदशोऽध्यायः प्रारभ्यते ॥

॥ श्रीभगवानुवाच ॥

ऊर्ध्वमूलमधःशाखमश्वत्थं प्राहुरव्ययम् ॥
छंदांसि यस्य पर्णानि यस्तं वेद स वेदवित् ॥ १ ॥

भगवान्–

श्लोक (इंद्रवज्रा).

खालींच शाखा वर मूळ ज्यास
अश्वत्थ कीं अव्यय नाम त्यास ।
ज्या वेदपर्णें असतात पार्था
तीं जाणतो तो नर वेदवेत्ता ॥ १ ॥

अधश्चोर्ध्वं प्रसृतास्तस्य शाखा गुणप्रवृद्धा विषयप्रवालाः ॥
अधश्च मूलान्यनुसंततानि कर्मानुबंधीनि मनुष्यलोके ॥ २ ॥

श्लोक (स्रग्धरा).

शाखा त्याच्या पहा ह्या बहुत पसरल्या अर्जुना ऊर्ध्व खालीं । वृद्धी झाली गुणांनीं सकल विषय हीं पल्लवें ज्यास आलीं । खालींचीं सर्व मूळें जगभर भरलीं अर्जुना सर्व तीं कीं । कर्मानें बद्ध झालीं सकल पसरलीं विस्तरें मृत्युलोकीं ॥ २ ॥

---

* श्लोकाचा भावार्थ नीट न समजेल तर सरल अर्थात ह्याच अध्यायाचा आरंभ पहावा. १ वेद जाणणारा (ज्ञाता.) २ वर. ३ कोंवळा कोंवळा पाला.

न रूपमस्येह तथोपलभ्यते नांतो न चादिर्न च संप्रतिष्ठा ॥
अश्वत्थमेनं सुविरूढमूलमसंगशस्त्रेण दृढेन छित्वा ॥ ३ ॥

श्लोक (भुजंगप्रयात).

कळेना पहा रूप ते शिष्टशिष्टां[1]
नसे आदि कीं अंत ज्याला प्रतिष्ठा ।
जयाचीं मुळें घट्ट भारी विचित्रें[2]
तरू छेदुनी हाच निःसंगशस्त्रें[3] ॥ ३ ॥

ततः पदं तत्परिमार्गितव्यं यस्मिन्गता न निवर्तंति भूयः ॥
तमेव चाद्यं पुरुषं प्रपद्ये यतः प्रवृत्तिः प्रसृता पुराणी ॥ ४ ॥

श्लोक (इंद्रवज्रा).

त्या नंतरें तें[4] पद धुंडणें कीं
गेल्यास तेथें परते न लोकीं ।
पावेल बा तो पुरुषास आद्यां
प्रवृत्ति जेथूनिच ह्या अनाद्या ॥ ४ ॥

निर्मानमोहा जितसंगदोषा अध्यात्मनित्या विनिवृत्तकामाः ॥
द्वंद्वैर्विमुक्ताः सुखदुःखसंज्ञैर्गच्छंत्यमूढाः पदमव्ययं तत् ॥ ५ ॥

न श्लाघता मोह न संग दोष
निष्काम अध्यात्म जया विशेष ।
[6]द्वंद्वें न ज्याला सुखदुःखसंज्ञ
ते पोंचती शांतपदासिं सुज्ञ ॥ ५ ॥

---

१ मोठमोठ्यांस. २ अद्भुत (हें मुळांचें वि०). ३ असंग हेंच शस्त्र करून त्यानें. ४ अश्वत्थाचें. ५ मूळ. ६ सुखदुःख इ० जोड्या.

न तद्भासयते सूर्यो न शशांको न पावकः ॥
यद्गत्वा न निवर्तंते तद्धाम परमं मम ॥ ६ ॥

श्लोक (भुजंगप्रयात).

प्रकाशे न तेथें[1] रवी चंद्र कांहीं
नसे अग्निही तेथ जो सर्वदाही[2] ।
पुन्हा पावल्या त्या न संसारकाम
असे तेंच माझें सख्या पुण्यधाम ॥ ६ ॥

ममैवांशो जीवलोके जीवभूतः सनातनः ॥
मनःषष्ठानीन्द्रियाणि प्रकृतिस्थानि कर्षति ॥ ७ ॥

श्लोक (इंद्रवज्रा).

ह्या सर्वभूतीं मम अंश आहे
व्यापूनि मी त्या सकलांस राहें ।
आदीकरूनी मन इंद्रियें हीं
मी चाळवीतों प्रकृती पहा ही ॥ ७ ॥

शरीरं यदवाप्नोति यच्चाप्युत्क्रामतीश्वरः ॥
गृहीत्वैतानि संयाति वायुर्गंधानिवाशयात् ॥ ८ ॥

ह्यांच्या सबें घे शरिरासि जेव्हां
किंवा निघे त्यांतुनि ईश जेव्हां ।
ह्यांनां[3] पहा संगति तोच घेतो
वारा जसा गंध हरूनि नेतो ॥ ८ ॥

---

१ ह्या पदांत. २ सर्वभक्षक. ३ ज्ञानेंद्रियांना.

श्रोत्रं चक्षुः स्पर्शनं च रसनं घ्राणमेव च ॥
अधिष्ठाय मनश्चायं विषयानुपसेवते ॥ ९ ॥

हे कर्ण चक्षू अथवा त्वचा ही
जिव्हा तसें नासिक ह्यांत पाही ।
बा मी अधिष्ठूनि मनास ठेवी
अशा रिती हा विषयास सेवी ॥ ९ ॥

उत्क्रामंतं स्थितं वापि भुंजानं वा गुणान्वितम् ॥
विमूढा नानुपश्यंति पश्यंति ज्ञानचक्षुषः ॥ १० ॥

कैसा निघे हा असतो कसा हा
भोगी कसा हा गुणिही कसा हा ।
जो मूढ तो हें नच पाहतोरे
हें ज्ञानचक्षू[1] बघतात सारे ॥ १० ॥

यतंतो योगिनश्चैनं पश्यंत्यात्मन्यवस्थितम् ॥
यतंतोऽप्यकृतात्मानो नैनं पश्यंत्यचेतसः ॥ ११ ॥

श्लोक (भुजंगप्रयात).

प्रयत्नी[2] अणी अर्जुना जाण योगी
तया पाहती नित्य तें अंतरंगीं ।
अयत्नी[3] तसें अज्ञ कीं चित्तभ्रष्ट
कदाकालिं ह्या पाहती ते न दुष्ट ॥ ११ ॥

१ ज्ञानी. २ उद्योगी. ३ आळशी.

यदादित्यगतं तेजो जगद्भासयतेऽखिलम् ॥
यच्चंद्रमसि यच्चाग्नौ तत्तेजो विद्धि मामकम् ॥ १२ ॥

रवीपासुनी तेज जें हें अपूर्व
निघोनी प्रकाशी जगालागिं सर्व ।
शशी माजि कीं अग्निमाजी नरां जे
असे सर्व तें तेजरे जाण माझें ॥ १२ ॥

गामाविश्य च भूतानि धारयाम्यहमोजसा ॥
पुष्णामि चौषधीः सर्वाः सोमो भूत्वा रसात्मकः ॥ १३ ॥

तसें जाण पृथ्वीमधें मी शिरून
धरीं सर्व भूतें स्वतेजें करून ।
नभीं चंद्र मी होउनीयां रसाळ[२]
जगीं औषधी पोशितों सर्वकाळ[३] ॥ १३ ॥

अहं वैश्वानरो भूत्वा प्राणिनां देहमाश्रितः ॥
प्राणापानसमायुक्तः पचाम्यन्नं चतुर्विधम् ॥ १४ ॥

श्लोक (इंद्रवज्रा).

होवोनि वैश्वानर[४] मी जिवांत
भूताश्रयानें वसतों तयांत ।
आपान प्राणासह चार अन्नें
निश्शेष[५] मी तीं पचवीं सुखानें ॥ १४ ॥

१ अर्जुना. २ रसयुक्त. ३ निरंतर. ४ जठराग्नि. ५ सर्व.

सर्वस्य चाहं हृदि सन्निविष्टो मत्तः स्मृतिर्ज्ञानमपोहनं च ॥
वेदैश्च सर्वैरहमेव वेद्यो वेदांतकृद्वेदविदेव चाहम् ॥ १५ ॥

सर्वांचिया मी हृदयीं प्रविष्ट
देतों स्मृती विस्मृति बोध इष्ट ।
आम्नायं मी ते रचिलेहि मीच
ते जाणणाराहि समग्र मीच ॥ १५ ॥

द्वाविमौ पुरुषौ लोके क्षरश्चाक्षर एव च ॥
क्षरः सर्वाणि भूतानि कूटस्थोऽक्षर उच्यते ॥ १६ ॥

श्लोक (शिखरिणी).

जगामध्यें जाणा पुरुष पहतां दोन असती
जयांना नामें हीं क्षर[2] अणिक बा अक्षर[3] इति ।
जगीं जन्मा येती क्षर वदति जीवास विजया
वसे जो कूटस्थीं[4] वदति बरवें अक्षर तया ॥ १६ ॥

उत्तमः पुरुषस्त्वन्यः परमात्मेत्युदाहृतः ॥
यो लोकत्रयमाविश्य बिभर्त्यव्यय ईश्वरः ॥ १७ ॥

निराळा ह्याहूनी परपुरुष[5] जो उत्तम अती
जयाला लोकीं ह्या सकल परमात्माच वदती ।
विनाशी जो नाहीं विचरत असे ह्या त्रिभुवनीं
करी[6] पोसोनीयां अवन जग जो ईश अवनीं ॥ १७ ॥

१ वेद. २ नाशक. ३ नाशरहित. ४ कूटस्थ (अचळ) कूट-पर्वताचें शिखर. ५ दुसरा पुरुष. ६ रक्षण करी (अवन).

यस्मात्क्षरमतीतोऽहमक्षरादपि चोत्तमः ॥
अतोऽस्मि लोके वेदे च प्रथितः पुरुषोत्तमः ॥ १८ ॥

श्लोक (शार्दूलविक्रीडित).

आहें मी बहु वेगळा समज हें पार्था क्षरापासुनी
तैसा उत्तम अक्षरांत सगळ्या व्यापूनियां राहुनी
ह्यासाठीं जगतामधें सतत कीं वेदांतही सन्मती[1]
हे पार्था पुरुषोतमाख्य[2] मजला जाणून हें बोलती १८

यो मामेवमसंमूढो जानाति पुरुषोत्तमम् ॥
स सर्वविद्भजति मां सर्वभावेन भारत ॥ १९ ॥

श्लोक (वसंततिलका).

ऐशा मला परम गूढ[3]हि अव्यय[4]ाला
ज्ञाताच जाणत असे पुरुषोत्तमाला ।
हे अर्जुना बहु[5]परी मज सुज्ञ तोच
भावें सदा भजतसे जगतांत साच ॥ १९ ॥

इति गुह्यतमं शास्त्रमिदमुक्तं मयाऽनघ ॥
एतद्बुध्वा बुद्धिमान् स्यात्कृतकृत्यश्च भारत ॥ २० ॥

श्लोक (शार्दूलविक्रीडित).

आहे गूढ जनास शास्त्र विजया हें सत्य जाणे अती
तें सारें कथिलेंच पापर[6]हिता पार्था तुला संप्रती ।
जाणे तोच मनीं खरा सुजन जो कीं तोच हें स्वीकर[7]ी
होतो तो कृतकृत्य सर्व जगतीं अर्थात सर्वोपरी ॥

इति श्रीम० यो० श्री० पुरुषोत्तमयोगो नाम पंचदशोऽध्यायः ॥ १५ ॥

पंधरावा अध्याय समाप्त.

ह्यांत पुरुषोत्तम स्वरूपाचें वर्णन आहे म्हणून यास "पुरुषोत्तमयोग" असें नांव आहे.

---

१ ज्ञाते. २ पुरुषोत्तम या नांवानें. ३ अत्यंत गुप्त. ४ अक्षयी मी त्या मला. ५ नानाप्रकारांनीं. ६ निष्पापा (अर्जुनाचें वि०). ७ स्विकार करतो.

॥ अथ षोडशोऽध्यायः प्रारभ्यते ॥

॥ श्रीभगवानुवाच ॥

अभयं सत्वसंशुद्धिर्ज्ञानयोगव्यवस्थितिः ॥
दानं दमश्च यज्ञश्च स्वाध्यायस्तप आर्जवम् ॥ १ ॥

भगवान्— श्लोक (वसंततिलका).

स्वाध्याय, निर्भयपणा, बहु शुद्ध चित्त
कीं ज्ञानयोग करणें सुयज्ञ नित्य ।
तैशी मनीं सरलता, तप दान श्रद्धा
सर्वेंद्रियांत मननिग्रह बुद्धिसुद्धा ॥ १ ॥

अहिंसा सत्यमक्रोधस्त्यागः शांतिरपैशुनम् ॥
दया भूतेष्वलोलुत्वं मार्दवं ह्रीरचापलम् ॥ २ ॥

श्लोक (इंद्रवज्रा).

सलज्ज, निंदी न जनास सत्य
निष्[२]काम, निर्लोभ, दयार्द्र[३], नित्य ।
अक्रोध, ही मार्दव[४], कीं प्रशंसा
स्थीरत्व[५], शांती, अणखी अहिंसा ॥ २ ॥

तेजः क्षमा धृतिः शौचमद्रोहो नातिमानिता ॥
भवंति संपदं दैवीमभिजातस्य भारत ॥ ३ ॥

श्लोक (शार्दूलविक्रीडित).

आंगीं तेज विराजणें, शुचिपणा, धैर्य, क्षमासागर
कोणाचा अभिमान लेश नसणें, हेवा, न कीं मत्सर ।
दैवी संपदिचा असे पुरुष जो त्याच्या तनूभीतरी
हे सारे असतात गूण विजया हें जाण तूं अंतरीं ॥ ३ ॥

१ वेदपठण. २ निरिच्छ. ३ दयाळू. ४ लीनता. ५ गंभीरपणा.

दंभो दर्पोऽभिमानश्च क्रोधः पारुष्यमेव च ॥
अज्ञानं चाभिजातस्य पार्थ संपदमासुरीम् ॥ ४॥

श्लोक (इंद्रवज्रा).

तैसेंच पार्था अभिमान गर्व
क्रूरत्व कीं क्रोध धरूनि सर्व ।
अज्ञान दंभादिक गूणराशी
संपत्ति ज्याची असुरी तयाशी ॥ ४ ॥

दैवी संपद्विमोक्षाय निबंधायासुरी मता ॥
मा शुचः संपदं दैवीमभिजातोऽसि पांडव ॥ ५ ॥

श्लोक (स्रग्धरा).

दैवी संपत्तियोगें अढळ[1]पद मिळे मोक्ष नामें प्रसिद्ध
संपत्ती राक्षसीनें सतत नर पहा निश्चयें होय बद्ध ।
दैवी संपत्तिमाजी नरवर पुरुषा अर्जुना जन्मलाशी
ह्यासाठीं शोक सोडी अचल मन करी सर्वदा शौर्यराशी

द्वौ भूतसर्गौ लोकेऽस्मिन्दैव आसुर एव च ॥
दैवो विस्तरशः प्रोक्त आसुरं पार्थ मे शृणु ॥ ६ ॥

श्लोक (इंद्रवज्रा).

पृथ्वींत दैवी असुरी ह्मणून
ह्या भूतसृष्टींत प्रकार दोन ।
दैवी तुला सांगितलीच पूर्ण
दे सांगतों ह्या असुरीस कर्ण ॥ ६ ॥

---

१ शाश्वतचें.

प्रवृत्तिं च निवृत्तिं च जना न विदुरासुराः ॥
न शौचं नापि चाचारो न सत्यं तेषु विद्यते ॥ ७ ॥

श्लोक (शार्दूलविक्रीडित).

नेणें कार्य करावया उचित कीं वाईट तें कोणतें
नेणें लेशहि स्वच्छता तिळभरी आचार ते कोणते ।
नाहीं ठाउक सत्य काय असते जन्मांत ज्याच्या कदा
पार्था हा गुणसंघ[1] जींत भरला ती आसुरी संपदा ॥

असत्यमप्रतिष्ठं ते जगदाहुरनीश्वरम् ॥
अपरस्परसंभूतं किमन्यत्कामहैतुकम् ॥ ८ ॥

श्लोक (स्रग्धरा).

सृष्टी ही सर्व खोटी सकल समजलें तीस आह्मीच केली । कर्त्ता व्हावा कशाला नरयुवतिमुळें[2] मैथुनानेंच झाली । भोळ्या लोकार्थ सोंगें सकल पसरलीं जाण तीं सर्व नीच । आहे तो ईश कोठें विफल भिवविता ईश नाहीं मुळींच* ॥ ८ ॥

एतां दृष्टिमवष्टभ्य नष्टात्मानोऽल्पबुद्धयः ॥
प्रभवंत्युग्रकर्माणः क्षयाय जगतोऽहिताः ॥ ९ ॥

ऐशीं ज्यांचीं मतें ते अधम नर जगीं भ्रष्टचित्तें तयांचीं
बाबा ते मूर्ख सारे नर किमपि नसे ज्ञानवृत्ती तयांची ।
पाषाणाचें तयांचें हृदय गमतसे शून्य जे सर्व अर्था
पीडा द्याया जगातें अधम उपजले जाण ते[3] सत्य पार्था

१ गुणांचा समुदाय. २ स्त्रीपुरुषांच्या. * ह्या श्लोकाचा संबंध पुढील श्लोकांशीं आहे. ३ असे ह्मणणारे.

काममाश्रित्य दुष्पूरं दंभमानमदान्विताः ॥
मोहाद्गृहीत्वाऽसद्ग्राहान्प्रवर्त्तंतेऽशुचिव्रताः ॥ १० ॥

तृप्ती नाहीं कधीं ज्या सतत धरिति जे काम तो आश्रयाला । जे कां आसक्त होती सतत पुरुष बा दंभ कीं मान त्याला ॥ होवोनी मत्त गर्वें फुकटच फुगती फार अज्ञानमार्गें । मोहानें वागताती जगतिवर सदा स्वच्छताहीनयोगें ॥ १० ॥

चिंतामपरिमेयां च प्रलयांतामुपाश्रिताः ॥
कामोपभोगपरमा एतावदिति निश्चिताः ॥ ११ ॥

कामाचे भोग सारे बहुत पसरले श्रेष्ठता त्यांत दावी खावें प्यावें खुलावें अनुकुल पडली चैन मारून घ्यावी लोकीं कर्तव्य जें तें दृढतर ह्मणतो हेंच मानून सत्य चिंता त्या प्राप्त होती परम कठिण हो जन्मपर्यंत नित्य

आशापाशशतैर्बद्धाः कामक्रोधपरायणाः ॥
ईहंते कामभोगार्थमन्यायेनार्थसंचयान् ॥ १२ ॥

श्लोक (शालिनी).

झाले लोकीं काम कीं क्रोध शुद्ध
आशापाशें शेंकडों सर्व बद्ध ।
पार्था त्याच्या आश्रयाला धरीती
अन्यायानें द्रव्य संपादिताती ॥ १२ ॥

१ ज्या कामाला. २ इच्छा. ३ असें ह्मणणारास.

इदमद्य मयालब्धमिमं प्राप्स्ये मनोरथम् ॥
इदमस्तीदमपि मे भविष्यति पुनर्धनम् ॥ १३ ॥

श्लोक (वसंततिलका).

हें आज म्यां मिळविलें इतक्या धनास
कीं मेळवीन इतकें उदईक खास ।
हें द्रव्य आज इतकें शिलकींत आहे
होईल खास इतकें उदईक पाहे ॥ १३ ॥

असौ मया हतः शत्रुर्हनिष्ये चापरानपि ॥
ईश्वरोऽहमहं भोगी सिद्धोऽहं बलवान्सुखी ॥ १४ ॥

श्लोक (स्रग्धरा).

म्यां आजी मारिले हे रिपुगण[1] इतके शेष जे ते उ-
द्यांला । सर्वांचा मीच राजा सुखदविषय[2] जे मीच
भोगीन त्यांला ॥ कीं मी आहें यशस्वी बहुलतर
पहा भाग्य माझेंच मोठें । शौर्याचा मीच स्वामी
मजसम दुसरा अन्य नाहींच कोठें ॥ १४ ॥

आढ्योऽभिजनवानस्मि कोऽन्योऽस्ति सदृशो मया ॥
यक्ष्ये दास्यामि मोदिष्य इत्यज्ञानविमोहिताः ॥ १५ ॥

मोठा श्रीमंत तो मी अगणित[3] जन जे त्यांत मा-
झीच सत्ता । जें जें इच्छीन तें तें करिन झडकरी
कोण सातें अवर्ता[4] ॥ मोठाले यज्ञ दानें सुखकर पथ
जे पाहिजे तें करीन । ऐसें चित्तीं धरूनी बडबड
करिती अज्ञ[5] मोहेंकरून ॥ १५ ॥

१ शत्रुसमुदाय. २ सुखकारक विषयांला. ३ असंख्य. ४ अटकाव करणारा. ५ अज्ञान लोक.

अनेकचित्तविभ्रांता मोहजालसमावृताः ॥
प्रसक्ताः कामभोगेषु पतंति नरकेऽशुचौ ॥ १६ ॥

श्लोक (इंद्रवज्रा).

चित्तांस ज्यांच्या उपजेल भ्रांती
मोहामुळें जाण अनेक रीती ।
तेणेंच पार्था मग सर्व सत्य
नर्कामधें ते पडतात नित्य ॥ १६ ॥

आत्मसंभाविताः स्तब्धा धनमानमदान्विताः ॥
यजंते नाम यज्ञैस्ते दंभेनाविधिपूर्वकम् ॥ १७ ॥

गर्विष्ठ कीं जे अभिमानयुक्त
आत्मस्तुतीचे परिपूर्ण भक्त ।
दंभेंकरूनी करितात यज्ञ
तो बोलती कीं अविधीच सुज्ञ ॥ १७ ॥

अहंकारं बलं दर्पं कामं क्रोधं च संश्रिताः ॥
मामात्मपरदेहेषु प्रद्विषंतोऽभ्यसूयकाः ॥ १८ ॥

श्लोक (वसंततिलका).

जे क्रोध काम बल कीं अभिमान यांस
होवोनियां वश जगीं करितात द्वेष ।
जो आत्म कीं परहृदीं वसतो तयाचे
द्वेषीच सर्व परमेश्वर एक त्याचे ॥ १८ ॥

---

१ विधियुक्त नव्हे.

तानहं द्विषतः क्रूरान्संसारेषु नराधमान् ॥
क्षिपाम्यजस्रमशुभानासुरीष्वेव योनिषु ॥ १९ ॥

श्लोक (इंद्रवज्रा).

पार्था असे निश्चित एक खास
मी क्रूर ऐशा पुरुषाधमांस ।
जी जन्ममृत्यूमय मृत्यूलोकीं
त्या राक्षसीयोनिंत त्यांस टाकीं ॥ १९ ॥

आसुरीं योनिमापन्ना मूढा जन्मनि जन्मनि ॥
मामप्राप्यैव कौंतेय ततो यांत्यधमां गतिम् ॥ २० ॥

ते राक्षसीयोनिंत जन्मतात
माझ्याप्रती ते[1] नच पावतात ।
अर्थात त्यांच्या मग जाण पार्था
अधोगति[2] मी लिहिलीच माथां ॥ २० ॥

त्रिविधं नरकस्येदं द्वारं नाशनमात्मनः ॥
कामः क्रोधस्तथा लोभस्तस्मादेतत्त्रयं त्यजेत् ॥ २१ ॥

हा काम हा क्रोधहि लोभ पोटीं
हीं तीन द्वारें नरकास मोठीं ।
ह्याकारणें तीं ढकलून द्यावीं
पार्था कधींही पदरीं न घ्यावीं ॥ २१ ॥

---

१ वर सांगितलेले. २ नरक.

एतैर्विमुक्तः कौंतेय तमोद्वारैस्त्रिभिर्नरः ॥
आचरत्यात्मनः श्रेयस्ततो याति परां गतिम् ॥ २२ ॥

या तीन द्वारांतुनि जो सुटेल
कल्याणकारी पथ आचरेल ।
पावेल तो उत्तम लोक सत्य
त्याला गती दिव्य सदैव नित्य ॥ २२ ॥

यः शास्त्रविधिमुत्सृज्य वर्तते कामकारतः ॥
न स सिद्धिमवाप्नोति न सुखं न परां गतिम् ॥ २३ ॥

मोडोनियां शास्त्रविधी तयातें
वागेल जो दुर्गति त्या नरातें ।
सिद्धी न त्याला सुखही न भक्ती
कीं अर्जुना त्यास मिळे न मुक्ती ॥ २३॥

तस्माच्छास्त्रं प्रमाणं ते कार्याकार्यव्यवस्थितौ ॥
ज्ञात्वा शास्त्रविधानोक्तं कर्म कर्तुमिहार्हसि ॥ २४ ॥

शास्त्रप्रमाणेंच अकार्यकार्या[1][2]
हें जाण चित्तीं गुज[3] शूरवर्या[4] ।
ह्याकारणें तूं नर सर्वयोगें
शास्त्राप्रमाणेंच सदैव वागें ॥ २४ ॥

इति श्रीमद्भगवद्गीतासूपनिषत्सु ब्रह्मविद्यायां योगशास्त्रे श्रीकृष्णार्जुनसंवादे दैवासुरसंपद्विभागयोगो नाम षोडशोऽध्यायः ॥ १६ ॥

सोळावा अध्याय समाप्त.

ह्यांत दैवीसंपत्ति व आसुरीसंपत्तीचें निरूपण केलें आहे म्हणून यास "दैवासुरसंपद्विभागयोग" असें नांव आहे.

---

१ वाईट कार्य कोणतें ? तें समजण्यास. २ सत्कार्याला. ३ गुप्त गोष्ट. ४ हे वीरश्रेष्ठा. (हें अर्जुनाचें संबोधन.)

॥ अथ सप्तदशोऽध्यायः प्रारभ्यते ॥

॥ अर्जुन उवाच ॥

ये शास्त्रविधिमुत्सृज्य यजंते श्रद्धयाऽन्विताः ॥
तेषां निष्ठा तु का कृष्ण सत्त्वमाहो रजस्तमः ॥ १ ॥

अर्जुन— श्लोक (इंद्रवज्रा).

देवा तुह्मां मी पुसतों अणीक
कीं सोडुनी शास्त्रविधीस लोक ।
जे एकनिष्ठें भजती तयांची
ती सत्वनिष्ठा रज कीं तमाची ॥ १ ॥

॥ श्रीभगवानुवाच ॥

त्रिविधा भवति श्रद्धा देहिनां सा स्वभावजा ॥
सात्विकी राजसी चैव तामसी चेति तां शृणु ॥ २ ॥

जीवास[1] स्वाभाविक तीन निष्ठा
उत्पन्न होती नरवीरे[2] श्रेष्ठा ।
सात्वीक कीं राजस तामसादी
त्या सांगतों ऐक सख्या अनादी ॥ २ ॥

सत्वानुरूपा सर्वस्य श्रद्धा भवति भारत ॥
श्रद्धामयोऽयं पुरुषो यो यच्छ्रद्धः स एव सः ॥ ३ ॥

बा सत्व जैसें असतें तशाच
निष्ठा पहा उद्भवतात साच ।
श्रद्धा जशी त्यास तसाच तो तो
अर्थात पार्था समतोल[3] होतो ॥ ३ ॥

---

१ प्राण्यास. २ अर्जुनाचें सं०. ३ श्रद्धेप्रमाणेंच तो होतो ह्मणजे सत्वनिष्ठा असली तर तो सत्वस्थ; व श्रद्धा राजस असली तर तो राजस इ०.

यजंते सात्विका देवान्यक्षरक्षांसि राजसाः ॥
प्रेतान्भूतगणांश्चान्ये यजंते तामसा जनाः ॥ ४ ॥

सात्वीक ते पूजिति सर्व देव
यक्षासुरां राजस ते सदैव ।
बा पूजिती तामस भूतप्रेतें
ऐशाच रीती भजतात ते ते ॥ ४ ॥

अशास्त्रविहितं घोरं तप्यंते ये तपो जनाः ॥
दंभाहंकारसंयुक्ताः कामरागबलान्विताः ॥ ५ ॥

शास्त्रामधें जें कथिलेंच नाहीं
तें आचरीती तप घोर पाहीं ।
जे दंभ किंवा बल रागें वश्य
प्रीती अहंकार जया अवश्य ॥ ५ ॥

कर्षयंतः शरीरस्थं भूतग्राममचेतसः ॥
मां चैवांतःशरीरस्थं तान्विद्ध्यासुरनिश्चयान् ॥ ६ ॥

गांजून काया करितात क्षीण
प्रत्यक्ष ते मूर्ख असेंच जाण ।
देहांत जो मी वसतों तयातें
जे पीडिती राक्षस जाणं ते ते ॥ ६ ॥

---

१ क्षुद्रदेवता. २ प्रीति.

आहारस्त्वपि सर्वस्य त्रिविधो भवति प्रियः ॥
यज्ञस्तपस्तथा दानं तेषां भेदमिमं शृणु ॥ ७ ॥

आहार[1] त्यांचे असतीहि तीन
कीं यज्ञ तैसें तप आणि ज्ञान ।
सर्वांमधें तीन प्रकार जाणे
तें सांगतों ऐक तुला क्रमानें ॥ ७ ॥

आयुः सत्वबलारोग्यसुखप्रीतिविवर्धनाः ॥
रस्याः स्निग्धाः स्थिरा हृद्या आहाराः सात्विकप्रियाः ॥ ८ ॥

श्लोक (वसंततिलका).

आयुष्य सत्व बल ज्यांत सुखप्रवृद्धी
आरोग्यप्रीतिकर जें करि सर्व सिद्धी ।
जें स्थीर[2] आर्द्र[3] रसयुक्त हृदीं प्रसन्न
तें सात्विकास विजया प्रिय फार अन्न ॥ ८ ॥

कट्वम्ललवणात्युष्णतीक्ष्णरुक्षविदाहिनः ॥
आहारा राजसस्येष्टा दुःखशोकामयप्रदाः ॥ ९ ॥

जे जे बहू तिखट खारट रुक्ष काळीं
अत्युष्ण[4] अंबट कडू नरड्यांस[5] जाळी ।
जें दुःख शोक बहु रोग सदैव देतें
तें अन्न राजसजना प्रिय फार होतें ॥ ९ ॥

---

१ भक्ष्य. २ गंभीर. ३ रुक्ष नव्हे (ओलसर). ४ कढत कढत. ५ घशाशीं जळणारें.

यातयामं गतरसं पूति पर्युषितं च यत् ॥
उच्छिष्टमपि चामेध्यं भोजनं तामसप्रियम् ॥ १० ॥

श्लोक (इंद्रवज्रा)

जें वाळलें कीं विटलें शिळेंही
उच्छिष्ट किंवा अपवित्र पाहीं ।
होवोनि ज्याला बहु वेळ झाला
तें अन्न होतें प्रिय तामसाला ॥ १० ॥

अफलाकांक्षिभिर्यज्ञो विधिदृष्टो य इज्यते ॥
यष्टव्यमेवेति मनः समाधाय स सात्विकः ॥ ११ ॥

इच्छा फळाची न धरून सुज्ञ
जे जे विधीनें करितात यज्ञ ।
कर्तव्य माझें ह्मणुनीच जाण
तो यज्ञ सात्वीक धरी प्रमाण ॥ ११ ॥

अभिसंधाय तु फलं दंभार्थमपि चैव यत् ॥
इज्यते भरतश्रेष्ठ तं यज्ञं विद्धि राजसम् ॥ १२ ॥

इच्छा फलाची धरुनी मनांत
दांभीकयोगें करि कर्म नित्य ।
पार्था पहा ह्या जगतांत ह्याला
बा बोलती राजस यज्ञ त्याला ॥ १२ ॥

विधिहीनमसृष्टान्नं मंत्रहीनमदक्षिणम् ॥
श्रद्धाविरहितं यज्ञं तामसं परिचक्षते ॥ १३ ॥

ज्याच्यामधें मंत्र न अन्नदान
कीं दक्षणाही न विधी न मान ।
श्रद्धा ह्मणोनी तिळमात्र नाहीं
तो अर्जुना तामस यज्ञ पाहीं ॥ १३ ॥

देवद्विजगुरुप्राज्ञपूजनं शौचमार्जवम् ॥
ब्रह्मचर्यमहिंसा च शारीरं तप उच्यते ॥ १४ ॥

श्लोक (वसंततिलका).

विद्वान देव गुरु ब्राह्मण तत्प्रशंसा
सुस्वच्छता सरलता करणें अहिंसा ।
कीं पाळणें सतत निश्चित ब्रह्मचर्या
ह्याला शरीरतप बोलति मित्रवर्या[1] ॥ १४ ॥

अनुद्वेगकरं वाक्यं सत्यं प्रियहितं च यत् ॥
स्वाध्यायाभ्यसनं चैव वाङ्मयं तप उच्यते ॥ १५ ॥

शब्दामुळें नच घडे दुसऱ्यास त्रास
कल्याणकारक महा प्रिय सत्य खास ।
स्वाध्याय[2] वेदपर शब्द सदा मुखांत
ह्यालाच वाङ्मय असें तप बोलतात ॥ १५ ॥

१ हे मित्रोत्तमा (अर्जुना). २ वेदपठण.

मनःप्रसादः सौम्यत्वं मौनमात्मविनिग्रहः ॥
भावसंशुद्धिरित्येतत्तपो मानसमुच्यते ॥ १६ ॥

पार्था प्रसन्न मन सौम्यपणा विशेष
ठेवून आत्मदम जो धरि मौनवेष ।
जो कीं विहार बहु निष्कपटें करीत
हें सर्व मानस जनीं तप बोलतात ॥ १६ ॥

श्रद्धया परया तप्तं तपस्तत्त्रिविधं नरैः ॥
अफलाकांक्षिभिर्युक्तैः सात्विकं परिचक्षते ॥ १७ ॥

बा जो करी त्रिविध[2] हें तप सव्यसाची
इच्छा मनीं सकल सोडुनियां फलाची ।
श्रद्धा मनांत परिपूर्ण धरूनि नित्य
होईल हेंच तप सात्विक सर्व सत्य ॥ १७ ॥

सत्कारमानपूजार्थं तपो दंभेन चैव यत् ॥
क्रियते तदिह प्रोक्तं राजसं चलमध्रुवम् ॥ १८ ॥

सत्कार मान सगळा अपुल्यास येवो
किंवा मनांत धरुनी बहु दंभभावो ।
केलें समस्त तप राजस तें म्हणावें
अस्थीर चंचल असेंच तयां गणावें ॥ १८ ॥

---

१ चित्त आवरून धरून. २ तीन प्रकारचें.

मूढग्राहेणात्मनो यत्पीड्या क्रियते तपः ॥
परस्योत्सादनार्थं वा तत्तामसमुदाहृतम् ॥ १९ ॥

श्लोक (इंद्रवज्रा).

दुराग्रहानें तप जे करीतीं
पीडा स्वदेहास बहूत देती ।
किंवा छळीती जन जे पराला
बा बोलती तामस त्या तपाला ॥ १९ ॥

दातव्यमिति यद्दानं दीयतेऽनुपकारिणे ॥
देशे काले च पात्रे च तद्दानं सात्विकं स्मृतम् ॥ २१ ॥

श्लोक (वसंततिलका).

जें योग्य तेंच उपकार करी न त्याला
पाहोनियां बहुत सुंदर योग्य वेला ।
कीं देशपात्र बहु योग्य बघूनि देणें
बा तें पहा सकल सात्विक दान जाणें ॥ २० ॥

यत्तु प्रत्युपकारार्थं फलमुद्दिश्य वा पुनः ॥
दीयते च परिक्लिष्टं तद्दानं राजसं स्मृतम् ॥ २१ ॥

फेडावयास्तव कधीं उपकार देती
जें दान इच्छुनि पहा स्वफलास चित्तीं ।
देतां जयास स्वमनीं बहु होय शोक
तें दान राजस असें ह्मणतात लोक ॥ २१ ॥

अदेशकाले यद्दानमपात्रेभ्यश्च दीयते ॥
असत्कृतमवज्ञातं तत्तामसमुदाहृतम् ॥ २२ ॥

श्लोक (उपजाति).

अयोग्य देशीं बहु देत दान
अयोग्य पात्रीं अणि मानहीन ।
जें दान देणें जगतांत नित्य
त्या बोलती तामस दान सत्य ॥ २२ ॥

ओं तत्सदिति निर्देशो ब्रह्मणस्त्रिविधः स्मृतः ॥
ब्राह्मणास्तेन वेदाश्च यज्ञाश्च विहिताः पुरा ॥ २३ ॥

श्लोक (शालिनी).

ज्या ब्रह्मानें यज्ञ कीं वेद चारी
किंवा केले विप्र हे वेदधारी ।
त्याचा आहे एक उच्चार बापा
ओं तत्सत् हा जाण कीं शत्रुतापा ॥ २३ ॥

तस्मादोमित्युदाहृत्य यज्ञदानतपःक्रियाः ॥
प्रवर्त्तंते विधानोक्ताः सततं ब्रह्मवादिनाम् ॥ २४ ॥

श्लोक (इंद्रवज्रा).

ह्याकारणें जे जन ब्रह्मवेत्ते
कीं यज्ञ दानें तप थोर कर्त्ते ।
ओंकार बोलोनि समस्त कर्म
आराधिती त्यांतिल हेंच मर्म ॥ २४ ॥

---

१ योग्य नव्हे असा. २ वेदास धारण करणारे.

तदित्यनभिसंधाय फलं यज्ञतपःक्रियाः ॥
दानक्रियाश्च विविधाः क्रियंते मोक्षकांक्षिभिः ॥ २५ ॥

पार्था मुमुक्षू जन याच रीती
इच्छा फलाची न धरून चित्तीं ।
जे आचरीती तप यज्ञ दान
त्या त्या क्रियांना तत् हेंच नाम ॥ २५ ॥

सद्भावे साधुभावे च सदित्येतत्प्रयुज्यते ॥
प्रशस्ते कर्मणि तथा सच्छब्दः पार्थ युज्यते ॥ २६ ॥

जें चांगलें उत्तम सत्वशील
साधू महात्मे जन जे सुशील ।
त्याला पहा हें सत् नाम देती
लोकांमधें जाण अशीच रीती ॥ २६ ॥

यज्ञे तपसि दाने च स्थितिः सदिति चोच्यते ॥
कर्मचैव तदर्थीयं सदित्येवाभिधीयते ॥ २७ ॥

कीं यज्ञ सारे तप दानमर्म
त्याकारणें जे करितात कर्म ।
त्यालाच पार्था ह्मणतात लोकीं
हे वीरश्रेष्ठा तत् हे विलोकीं ॥ २७ ॥

अश्रद्धया हुतं दत्तं तपस्तप्तं कृतं च यत् ॥
असदित्युच्यते पार्थ न च तत्प्रेत्य नो इह ॥ २८ ॥

श्रद्धा नसोनी स्वमनांत जाण
जे आचरीती तप होम दान ।
त्याचें मिळेना फल मृत्युलोकीं
किंवा मिळेना कधिं स्वर्गलोकीं ॥ २८ ॥

इति श्रीमद्भगवद्गीतासूपनिषत्सु ब्रह्मविद्यायां योगशास्त्रे श्रीकृष्णार्जुनसंवादे श्रद्धात्रयविभागयोगो नाम सप्तदशोऽध्यायः ॥ १७ ॥

सतरावा अध्याय समाप्त.

यांत तीन प्रकारच्या श्रद्धेचें निरूपण केलें आहे, म्हणून यास "श्रद्धात्रय विभागयोग" असें नांव आहे.

॥ अथ अष्टादशोऽध्यायः प्रारभ्यते ॥

॥ अर्जुन उवाच ॥

संन्यासस्य महाबाहो तत्त्वमिच्छामि वेदितुम् ॥
त्यागस्य च हृषीकेश पृथक्केशिनिषूदन ॥ १ ॥

अर्जुन—

श्लोक (इंद्रवज्रा).

आतां सांगें यादवा एक बा हें
संन्यासाचें तत्त्व तें काय आहे ? ।
त्यागाचीं हीं लक्षणें एकवार
ऐकायाला चित्त उद्युक्त फार ॥ १ ॥

---

१ हे श्रीकृष्णा. २ उत्कंठित.

॥ श्रीभगवानुवाच ॥

काम्यानां कर्मणां न्यासं संन्यासं कवयो विदुः ॥
सर्वकर्मफलत्यागं प्राहुस्त्यागं विचक्षणाः ॥ २ ॥

भगवान्–

जो अर्जुना त्याग सकाम कर्मीं
संन्यास बा तोच प्रसिद्ध नामीं ।
कर्मे करूनि फलमात्र त्यागी[1]
बा त्याग ऐसें ह्मणती तयासीं ॥ २ ॥

त्याज्यं दोषवदित्येके कर्म प्राहुर्मनीषिणः ॥
यज्ञदानतपः कर्म न त्याज्यमिति चापरे ॥ ३ ॥

दोषाढ्य[2] कर्मे सगळीं कित्येक
टाकून द्यावीं ह्मणतात लोक ।
कीं यज्ञदानें तप हींच जाणीं
त्यजूं नये हें ह्मणतात कोणी ॥ ३ ॥

निश्चयं शृणु मे तत्र त्यागे भरतसत्तम ॥
त्यागो हि पुरुषव्याघ्र त्रिविधः संप्रकीर्तितः ॥ ४ ॥

पार्था जरी मन्मत निश्चयाचें
बा पूससी तूं तरि हेंच साचें ।
आहेत ह्या त्याग जगांत तीन
ते सांगतों दें हिकडेस कान ॥ ४ ॥

---

१ त्याग करी. २ दोषयुक्त.

यज्ञदानतपःकर्म न त्याज्यं कार्यमेव तत् ॥
यज्ञो दानं तपश्चैव पावनानि मनीषिणाम् ॥ ५ ॥

श्लोक (वसंततिलका).

दानें अनेकविध यज्ञ महा तपें हीं
कर्में अशीं सकल हीं जगतांत पाहीं ।
हीं मानवांस करितात पवित्र देहीं
तीं टाकणें ह्मणुनियां तुज योग्य नाहीं ॥ ५ ॥

एतान्यपि तु कर्माणि संगं त्यक्त्वा फलानि च ॥
कर्तव्यानीति मे पार्थ निश्चितं मतमुत्तमम् ॥ ६ ॥

श्लोक (इंद्रवज्रा).

आवश्य कर्में जगतीं करावीं
पार्था स्वकर्में बहु आचरावीं ।
सोडोनियां मीपण सर्व बा हें
निश्चित माझें मत हेंच आहे ॥ ६ ॥

नियतस्य तु संन्यासः कर्मणो नोपपद्यते ॥
मोहात्तस्य परित्यागस्तामसः परिकीर्तितः ॥ ७ ॥

जें कर्म आहे नियमीत पाहीं
संन्यास त्याचा तरि योग्य नाहीं ।
मोहेंकरूनी करि त्याग त्याचा
तो अर्जुना तामस होय साचा ॥ ७ ॥

दुःखमित्येव यत्कर्म कायक्लेशभयात्त्यजेत् ॥
स कृत्वा राजसं त्यागं नैव त्यागफलं लभेत् ॥ ८ ॥

होतो ह्मणोनी शरिरास त्रास
किंवा बहू क्लेश पडे जिवास ।
ह्याकारणें कर्म समस्त टाकी
तो बोलती राजस त्याग लोकीं ॥ ८ ॥

कार्यमित्येव यत्कर्म नियतं क्रियतेऽर्जुन ॥
संगं त्यक्त्वा फलं चैव स त्यागः सात्विको मतः ॥ ९ ॥

मीं कर्म केलें अभिमान सोडी
आशा फलाची अगदींच मोडी ।
कर्त्तव्य माझें ह्मणुनी करावें
सात्वीक तो त्याग असें ह्मणावें ॥ ९ ॥

न द्वेष्ट्यकुशलं कर्म कुशले नानुषज्जते ॥
त्यागी सत्त्वसमाविष्टो मेधावी छिन्नसंशयः ॥ १० ॥

वाईट कर्मीं नच द्वेष पोटीं
कीं उत्तमाची नच प्रीति मोठी ।
हे गूण सारे असती जयास
सात्वीक त्यागी ह्मणती तयास ॥ १० ॥

---

१ त्रास.

नहि देहभृता शक्यं त्यक्तुं कर्माण्यशेषतः ॥
यस्तु कर्मफलत्यागी स त्यागीत्यभिधीयते ॥ ११ ॥

हीं सर्व कर्मे जगतांत नाहीं
टाकावया जीवें समर्थ नाहीं ।
ह्याकारणें जो फल सर्व त्यागी
त्यालाच पार्था म्हणतात त्यागी ॥ ११ ॥

अनिष्टमिष्टं मिश्रं च त्रिविधं कर्मणः फलम् ॥
भवत्यत्यागिनां प्रेत्य न तु संन्यासिनां क्वचित् ॥ १२ ॥

श्लोक (वंसततिलका).

कर्मास तीनच फलें असती प्रमाण
तीं इष्ट मिश्र अणखीहि अनिष्ट जाण ।
अत्यागियास मिळती मरणोत्तरीं तीं
संन्यासियास नच तीं कधिं प्राप्त होती ॥ १२ ॥

पंचैतानि महाबाहो कारणानि निबोध मे ॥
सांख्ये कृतांते प्रोक्तानि सिद्धये सर्वकर्मणाम् ॥ १३ ॥

श्लोक (इंद्रवज्रा).

सांख्यांत वेदांत नरा तशींच
बा कारणें सांगितलींहि पांच ।
तीं कर्म सिद्धीस्तव सर्व पूर्ण
ऐकावया दे हिकडेस कर्ण ॥ १३ ॥

---

१ प्राणी.

अधिष्ठानं तथा कर्ता करणं च पृथग्विधम् ॥
विविधाश्च पृथक् चेष्टा दैवं चैवात्र पंचमम् ॥ १४ ॥

पार्था अहंकार, शरीर, दोन
सर्वेंद्रियें, दैव धरी प्रधान ।
अपान प्राणादिक वात साच
व्यापार त्यांचे गणि हींच पांच ॥ १४ ॥

शरीरवाङ्मनोभिर्यत्कर्म प्रारभते नरः ॥
न्याय्यं वा विपरीतं वा पंचैते तस्य हेतवः ॥ १५ ॥

श्लोक (शालिनी).

आरंभावें कर्म जें जें नरानें
कायेनें कीं वाणिनें वा मनानें ।
होवो पार्था न्याय अन्याय कांहीं
त्याला हेतू पांच हे नित्य पाहीं ॥ १५ ॥

तत्रैवं सति कर्तारमात्मानं केवलं तु यः ॥
पश्यत्यकृतबुद्धित्वान्न स पश्यति दुर्मतिः ॥ १६ ॥

श्लोक (वसंततिलका).

कर्मांत पांच असुनी उघडेच हेतू
आत्मा उपाधिविरहीत मनीं धरीं तूं ।
कर्त्ता मनांत समजे निरुपाधि आत्मा
तो नेत्रहीन मतिमंद खरा दुरात्मा ॥ १६ ॥

---

१ मुख्य. २ प्राणापानादि वायूंचे. ३ देहानें. ४ वाचेनें. ५ कारणें. ६ पूर्वीच्या श्लोकांत सांगितलेले. ७ व्यास उपाधि नाहीं असा. ८ अंध.

यस्य नाहंकृतो भावो बुद्धिर्यस्य न लिप्यते ॥
हत्वापि स इमाँल्लोकान्न हंति न निबध्यते ॥ १७ ॥

श्लोक (इंद्रवज्रा).

ज्या मीच कर्त्ता,[1] मनिं भाव नाहीं
ज्याची मती लिप्त फलास नाहीं ।
त्यानें जना मारियलें तथापी
तो मारणारा नच होय पापी ॥ १७ ॥

ज्ञानं ज्ञेयं परिज्ञाता त्रिविधा कर्मचोदना ॥
करणं कर्म कर्तेति त्रिविधः कर्मसंग्रहः ॥ १८ ॥

श्लोक (शार्दूलविक्रीडित).

ज्ञाता, ज्ञान, ह्मणोनि दोन तिसरा बा ज्ञेय लोकीं असे
कर्माचे विधि तीन हे विलसती कीं सव्यसाची तसे ।
कर्त्ता, कर्म, हि दोन आणि करणें हे तीन कीं मानिले
लोकीं यापरि कर्मसंग्रह असें ध्यानांत ठेवीं भलें॥ १८ ॥

ज्ञानं कर्म च कर्ता च त्रिधैव गुणभेदतः ॥
प्रोच्यते गुणसंख्याने यथावच्छृणु तान्यपि ॥ १९ ॥

श्लोक (वसंततिलका).

कर्त्ता तसें सकल कर्म अणीक ज्ञान
त्याचे पहा त्रिविध भेद गुणेंकरून ।
जे जाहले कथिन तेंच सख्या समस्त
ऐकें तरी सकल चित्त करून स्वस्थ ॥ १९ ॥

---

१ ज्याला मीच कर्त्ता (असा) भाव नाहीं.

सर्वभूतेषु येनैकं भावमव्ययमीक्षते ॥
अविभक्तं विभक्तेषु तज्ज्ञानं विद्धि सात्विकम् ॥ २० ॥

श्लोक (भुजंगप्रयात).

असूनी पहा भिन्न हीं सर्व भूतें
मनामाजि जें पाहणें एक त्यांतें ।
खरें तेंचरे ज्ञान सात्वीक जाण
धरी अंतरीं अर्जुना हीच खूण ॥ २० ॥

पृथक्त्वेन तु यज्ज्ञानं नानाभावान्पृथग्विधान् ॥
वेत्ति सर्वेषु भूतेषु तज्ज्ञानं विद्धि राजसम् ॥ २१ ॥

श्लोक (इंद्रवज्रा).

भूतें जगीं सर्वच भिन्न जाणे
ऐसें पहा ज्ञान मनांत येणें ।
ज्ञानास ह्या राजस बोलतात
ही खूण ठेवीं विजयो मनांत ॥ २१ ॥

यत्तु कृत्स्नवदेकस्मिन् कार्ये सक्तमहैतुकम् ॥
अतत्त्वार्थवदल्पं च तत्तामसमुदाहृतम् ॥ २२ ॥

हेतू नसे लेशहि सत्य पाहीं
किंवा नसे ज्ञान खरें पुरें ही ।
ज्ञानास ऐशा जगतांत पाहे
हें अर्जुना तामस नाम आहे ॥ २२ ॥

---

१ हे अर्जुना. २ ज्ञानाचें विशेषण. ३ ज्ञानाचें वि०

नियतं संगरहितमरागद्वेषतः कृतम् ॥
अफलप्रेप्सुना कर्म यत्तत्सात्विकमुच्यते ॥ २३ ॥

प्रीती नसे द्वेष नसें मनांत
जो सक्त नोहे नियमें करीत ।
निष्काम जें कर्म जगीं करावें
सात्वीक तें कर्म असें ह्मणावें ॥ २३ ॥

यत्तु कामेप्सुना कर्म साहंकारेण वा पुनः ॥
क्रियते बहुलायासं तद्राजसमुदाहृतम् ॥ २४ ॥

जें कर्म कर्त्ता ह्मणवून मी मी
इच्छा धरूनी करितात कामी[1] ।
ज्याच्या मधें कष्ट बहूत लोकीं
तें कर्म बा राजस हें विलोकीं ॥ २४ ॥

अनुबंधं क्षयं हिंसामनपेक्ष्य च पौरुषम् ॥
मोहादारभ्यते कर्म यत्तत्तामसमुच्यते ॥ २५ ॥

तत्काळ जें बाधक[3] आणि मोहें
हिंसा पराची क्षय[4] ज्यांत आहे ।
मोहेंकरोनीच करी प्रमाण
जें कर्म तें तामस सत्य जाण ॥ २५ ॥

१ लंपट. २ लोभी. ३ बाधा देणारे. ४ नाश. (दुसऱ्याचा).

मुक्तसंगोऽनहंवादी धृत्युत्साहसमन्वितः ॥
सिद्ध्यसिद्ध्योर्निर्विकारः कर्त्ता सात्विक उच्यते ॥ २६ ॥

इच्छा फलाची न धरीच पाहे
कीं धैर्य उत्साह जयास आहे ।
सिद्धी असिद्धींत विकारशून्य
सात्वीक कर्त्ता जन तोच धन्य ॥ २६ ॥

रागी कर्मफलप्रेप्सुर्लुब्धो हिंसात्मकोऽशुचिः ॥
हर्षशोकान्वितः कर्ता राजसः परिकीर्तितः ॥ २७ ॥

इच्छी फलाला बहु लोभ वाहीं
हिंसा करी जो अपवित्र देहीं ।
जो हर्ष कीं दुर्धर शोकयुक्त
कर्त्ता पहा राजस तोच उक्त ॥ २७ ॥

अयुक्तः प्राकृतः स्तब्धः शठो नैष्कृतिकोऽलसः ॥
विषादी दीर्घसूत्री च कर्त्ता तामस उच्यते ॥ २८ ॥

श्लोक (वसंततिलका).

जो कीं अयुक्त कपटी बहु मूढ खोटा
गर्विष्ठ आणि शठ आळस ज्यास मोठा ।
कामांत चेंगट बहू रडका अपुर्ता
लोकांमधें म्हणति तामस तोच कर्त्ता ॥ २८ ॥

---

१ निर्विकार. २ श्रेष्ठ. ३ धरी. ४ दुःसह. ५ योग्य. ६ मूर्ख. ७ जो त्वरा करीत नाहीं तो.

बुद्धेर्भेदं धृतेश्चैव गुणतस्त्रिविधं शृणु ॥
प्रोच्यमानमशेषेण पृथक्त्वेन धनंजय ॥ २९ ॥

श्लोक (इंद्रवज्रा).

बुद्धीधृतींचे गुणभेद तीन
मी सांगतों ते शृणुं सावधान ।
आतां तुला मी कथितोंच सारे
ते वेगळाले विजया सख्या रे ॥ २९ ॥

प्रवृत्तिं च निवृत्तिं च कार्याकार्ये भयाभये ॥
बंधं मोक्षं च या वेत्ति बुद्धिः सा पार्थ सात्विकी ॥ ३० ॥

श्लोक (भुजंगप्रयात).

प्रवृत्तीस किंवा निवृत्तीस जाणे
अकार्यास कार्यासही त्याप्रमाणें ।
सदा जाणते बद्ध वा मोक्ष जेंं कीं
तिला बोलती सात्विकी बुद्धि लोकीं ॥ ३० ॥

यया धर्ममधर्मं च कार्यं चाकार्यमेव च ॥
अयथावत्प्रजानाति बुद्धिः सा पार्थ राजसी ॥ ३१ ॥

श्लोक (उपेंद्रवज्रा).

अधर्म कीं धर्म समस्त अर्थ
अकार्य कीं कार्य तसाच स्वार्थ ।
कळे न; जी संशययुक्त नित्य
असेल, ती राजस बुद्धि सत्य ॥ ३१ ॥

१ श्रवण कर. २ कर्तव्य कोणतें. ३ अकर्तव्य. ४ हें बुद्धीचें संबंधी सर्वनाम.

अधर्मं धर्ममिति या मन्यते तमसावृता ॥
सर्वार्थान् विपरीतांश्च बुद्धिः सा पार्थ तामसी ॥ ३२ ॥

श्लोक (इंद्रवज्रा).

वेदास शास्त्रास न जी जुमानी
अधर्म तो धर्म असेंच मानी ।
सर्वार्थ पार्था विपरीत जाणे
बुद्धी असे तामस याप्रमाणें ॥ ३२ ॥

धृत्या यया धारयते मनःप्राणेंद्रियक्रियाः ॥
योगेनाव्यभिचारिण्या धृतिः सा पार्थ सात्विकी ॥ ३३ ॥

हीं इंद्रियें प्राणक्रिया[1] धरोनी
चित्तास धैर्यें बहु आवरोनी ।
योगांत होई बहु स्थीर जाण
ती धारणा सात्विक हें प्रमाण ॥ ३३ ॥

यया तु धर्मकामार्थान् धृत्या धारयतेऽर्जुन ॥
प्रसंगेन फलाकांक्षी धृतिः सा पार्थ राजसी ॥ ३४ ॥

धर्मार्थकामा विजया धरीती
इच्छा फलाची स्वमनीं वरीती ।
राहे पहा धैर्य धरून नित्य
ती धारणा राजस होय सत्य ॥ ३४ ॥

---

१ प्राणांची जी क्रिया.

यया स्वप्नं भयं शोकं विषादं मदमेव च ॥
न विमुंचति दुर्मेधा धृतिः सा पार्थ तामसी ॥ ३५ ॥

दुर्बुद्धि कीं स्वप्न भयासिं जोडी
तैशी विषादासि कधीं न सोडी ।
डोले मदानें बुडवील स्वार्था
ती धारणा तामस होय पार्था ॥ ३५ ॥

सुखं त्विदानीं त्रिविधं शृणु मे भरतर्षभ ॥
अभ्यासाद्रमते यत्र दुःखांतं च निगच्छति ॥ ३६ ॥

तैशीं सुखेंही असतात तीन
तीं हीं तुला सांगतसें प्रमाण ।
अभ्यासयोगें विलयास जातीं[1]
दुःखें; मतीही रममाण होती ॥ ३६ ॥

यत्तदग्रे विषमिव परिणामेऽमृतोपमम् ॥
तत्सुखं सात्विकं प्रोक्तमात्मबुद्धिप्रसादजम् ॥ ३७ ॥

श्लोक (वसंततिलका).

भासे पहा प्रथम जें विषसें जिवाला
होई सुधेसम परी बहु शेवटाला ।
बुद्धी प्रसन्न करि जे बहु स्थीरभावें
ऐसें असेल सुख सात्विक त्या ह्मणावें ॥ ३७ ॥

---

१ शोकास. २ अभ्यासानें दुःखें विलयास जाती. (पुढील चरणांतील दुःखें हा कर्ता).

विषयेंद्रियसंयोगाद्यत्तदग्रेऽमृतोपमम् ॥
परिणामे विषमिव तत्सुखं राजसं स्मृतम् ॥ ३८ ॥

हीं इंद्रियें विषय ह्यांजमुळें जिवाला
वाटे सुधेसम पहा अधिं मानवाला ।
अंतीं परी सकलही विषसेंच व्हावें
ऐसें असेल सुख राजस तें ह्मणावें ॥ ३८ ॥

यदग्रे चानुबंधे च सुखं मोहनमात्मनः ॥
निद्रालस्यप्रमादोत्थं तत्तामसमुदाहृतम् ॥ ३९ ॥

अंतीं तसें प्रथम बुद्धिस मोह पाडी
जें दुःखदायक महा बहु पाप जोडी ।
आलस्य झोंप बहु वाढवि जें प्रमाद
बा तेंच तामस असे सुख निर्विवाद[1] ॥ ३९ ॥

न तदस्ति पृथिव्यां वा दिवि देवेषु वा पुनः ॥
सत्वं प्रकृतिजैर्मुक्तं यदेभिः स्यात्त्रिभिर्गुणैः ॥ ४० ॥

श्लोक (इंद्रवज्रा).

पृथ्वीमधें कीं नच देवलोकीं
देवामधेंही नच हें विलोकीं ।
माझें बहू तेजस सत्व झालें
आहेच तें तीनगुणां निराळें ॥ ४० ॥

---

१ निःसंशय.

ब्राह्मणक्षत्रियविशां शूद्राणां च परंतप ॥
कर्माणि प्रविभक्तानि स्वभावप्रभवैर्गुणैः ॥ ४१ ॥

श्लोक (शालिनी).

विप्रांच्या कीं क्षत्रियांच्या क्रियाही
वैश्यांच्या कीं शूद्र यांच्याहि पाहीं ।
वर्णांला ज्या नेमियेल्या स्वभावें
होती साऱ्या त्या गुणांच्या प्रभावें ॥ ४१ ॥

शमो दमस्तपः शौचं क्षांतिरार्जवमेव च ॥
ज्ञानं विज्ञानमास्तिक्यं ब्रह्मकर्म स्वभावजम् ॥ ४२ ॥

श्लोक (वसंततिलका).

शांती बहू सरलता, तप, शौचवृत्ती
विज्ञान, ज्ञान, शम, कीं दम, नित्य चित्तीं ।
आस्तिक्य हीं सकल घेउन सव्यसाची
कर्में स्वभाविक अशीं असती द्विजांचीं ॥४२॥

शौर्यं तेजो धृतिर्दाक्ष्यं युद्धे चाप्यपलायनम् ॥
दानमीश्वरभावश्च क्षात्रं कर्म स्वभावजम् ॥ ४३ ॥

श्लोक (भुजंगप्रयात).

रणीं दक्षता आणि युद्धांत शौर्य
न दे पाठ शत्रूस अंगांत धैर्य ।
बहू दान दे ईशभक्ती जयाची
स्वभावीक कर्में अशीं क्षत्रियाचीं ॥ ४३ ॥

---

१ वर्णकर्में. २ त्यांच्या गुणावरून. ३ सत्व० इ० तीन गुणांच्या प्रभावानें होतात. ४ क्षमा. ५ सरळपणा. ६ शुचिर्भूतपणा. ७ आस्तिकपणा. ८ ब्राह्मणाचीं.

कृषिगोरक्ष्यवाणिज्यं वैश्यकर्म स्वभावजम् ॥
परिचर्यात्मकं कर्म शूद्रस्यापि स्वभावजम् ॥ ४४ ॥

गुरें राखणें शेतकी देवघेव
अशीं वैश्यकर्मे स्वभावें सदैव ।
सदा चाकरी दासभावें करावी
अशीं शूद्रकर्मे जनीं ओळखावीं ॥ ४४ ॥

स्वे स्वे कर्मण्यभिरतः संसिद्धिं लभते नरः ॥
स्वकर्मनिरतः सिद्धिं यथा विंदति तच्छृणु ॥ ४५ ॥

श्लोक (इंद्रवज्रा).

जे स्वस्वकर्मी धरितील बुद्धी
निश्चित त्यांतें घडतेच सिद्धी ।
कर्मांत स्वाभाविक सिद्धि येती
ती सांगतों आज तुला सुरीती ॥ ४५ ॥

यतः प्रवृत्तिर्भूतानां येन सर्वमिदं ततम् ॥
स्वकर्मणा तमभ्यर्च्य सिद्धिं विंदति मानवः ॥ ४६ ॥

जेथोनि भूतें सगळीं निघालीं
ज्यानें जगें सर्वहि व्याप्त केलीं ।
ईशास त्या तृप्त सदा करावें
स्वज्ञातिकर्मे करुनीच भावें ॥ ४६ ॥

---

१ आपल्या वर्णास नेमलें कर्म करून.

श्रेयान् स्वधर्मो विगुणः परधर्मात्स्वनुष्ठितात् ॥
स्वभावनियतं कर्म कुर्वन्नाप्नोति किल्बिषम् ॥ ४७ ॥

श्लोक (भुजंगप्रयात).

उणा आपुला धर्महो फार श्रेष्ठ
पराचा जरी चांगला तो न इष्ट ।
जसा नेमिला आपुला वर्णधर्म
तसें आचरीतां नव्हे पापकर्म ॥ ४७ ॥

सहजं कर्म कौंतेय सदोषमपि न त्यजेत् ॥
सर्वारंभा हि दोषेण धूमेनाग्निरिवावृताः ॥ ४८ ॥

श्लोक (इंद्रवज्रा).

जें कर्म वर्णास असेल उक्त
टाकूं नये तें जरि दोषयुक्त ।
दोषाविणें कर्म नसेच लोकीं
धूम्राविणें अग्नि जसा विलोकीं ॥ ४८ ॥

असक्तबुद्धिः सर्वत्र जितात्मा विगतस्पृहः ॥
नैष्कर्म्यसिद्धिं परमां संन्यासेनाधिगच्छति ॥ ४९ ॥

श्लोक (भुजंगप्रयात).

मना जिंकुनी सक्त कोठेंच नोहे
स्पृहा टाकुनी सर्वदां शांत राहे ।
सदा जातसे तोचि संन्यासयोगें
महासिद्धिच्या शाश्वतांच्या सुमार्गें ॥४९॥

---

१ योग्य. २ इच्छा.

सिद्धिं प्राप्तो यथा ब्रह्म तथाप्नोति निबोध मे ॥
समासेनैव कौंतेय निष्ठा ज्ञानस्य या परा ॥ ५० ॥

श्लोक (इंद्रवज्रा).

ब्रह्माप्रमाणें मिळतात सिद्धी
ऐशी तुला मी कथितोंच बुद्धी ।
संक्षेप तीचा करुनीहि एक
मी सांगतों ती तरि नीट ऐक ॥ ५० ॥

बुद्ध्या विशुद्धया युक्तो धृत्यात्मानं नियम्य च ॥
शब्दादीन्विषयांस्त्यक्त्वा रागद्वेषौ व्युदस्य च ॥ ५१ ॥

निष्काम चित्तीं धरुनी सदैव
आत्मत्वयोगें मनिं शुद्ध भाव ।
प्रीती तसा द्वेष त्यजूनि लोकीं
शब्दादि भोगांस विटून टाकी ॥ ५१ ॥

विविक्तसेवी लघ्वाशी यतवाक्कायमानसः ॥
ध्यानयोगपरो नित्यं वैराग्यं समुपाश्रितः ॥ ५२ ॥

एकांतवासांत सदा रहातो
वाक्[1]काय तैसें मन आवरीतो ।
योगांत निष्ठा लघु खाय भक्ष्य
वैराग्य धर्मावरि सर्व लक्ष्य ॥ ५२ ॥

---

१ वाक् + काय. वाणी आणि देह.

अहंकारं बलं दर्पं कामं क्रोधं परिग्रहम् ॥
विमुच्य निर्ममः शांतो ब्रह्मभूयाय कल्पते ॥ ५३ ॥

वा क्रोध किंवा बल काम गर्व
तैसा अहंकार त्यजूनि सर्व ।
टाकील जो प्रीतिपरिग्रहांस
तो योग्य होईलच मत्पदास ॥ ५३ ॥

ब्रह्मभूतः प्रसन्नात्मा न शोचति न काङ्क्षति ॥
समः सर्वेषु भूतेषु मद्भक्तिं लभते पराम् ॥ ५४ ॥

जो सर्व भूतीं सम नित्य साचा
प्रसन्न आत्मा असतो जयाचा ।
इच्छाहि नाहीं भय शोक नाहीं
त्यालाच होते ममभक्ति पाहीं ॥ ५४ ॥

भक्त्या मामभिजानाति यावान्यश्चास्मि तत्त्वतः ॥
ततो मां तत्त्वतो ज्ञात्वा विशते तदनंतरम् ॥ ५५ ॥

आहें नरां[1] मी गुणहीन जैसा
जाणेल जो भक्ति धरून तैसा ।
जो ओळखीतो मज सत्य पूर्ण
मोक्षास तो योग्यच होय तूर्ण ॥ ५५ ॥

---

१ दान घेणें. २ अर्जुना.

सर्वकर्माण्यपि सदा कुर्वाणो मद्व्यपाश्रयः ॥
मत्प्रसादादवाप्नोति शाश्वतं पदमव्ययम् ॥ ५६ ॥

श्लोक (वसंततिलका).

कर्मे जगीं सकल हीं मम आश्रयानें
पार्था करील जन जो बहु निश्चयानें ।
पावून तो त्वरित सौख्यद मत्प्रसाद
जाईल शाश्वतपदा नर निर्विवाद ॥ ५६ ॥

चेतसा सर्वकर्माणि मयि संन्यस्य मत्परः ॥
बुद्धियोगमुपाश्रित्य मच्चित्तः सततं भव ॥ ५७ ॥

श्लोक (शालिनी).

चित्तें कर्मे सर्व अर्पी मला तूं
माझ्या ठाईं अर्जुना ठेव हेतू ।
ज्ञानें योगें त्वन्मनें ऐक्यभावें
रूपीं माझ्या सर्वदा लीन व्हावें ॥ ५७ ॥

मच्चित्तः सर्वदुर्गाणि मत्प्रसादात्तरिष्यसि ॥
अथ चेत्त्वमहंकारान्न श्रोष्यसि विनंक्ष्यसि ॥ ५८ ॥

श्लोक (इंद्रवज्रा).

माझ्याच ठाईं धरि सर्व चित्त
माझ्या प्रसादें तरशील सत्य ।
गर्वें जरी हें नच ऐकशील
निश्चित नाशाप्रत पावशील ॥ ५८ ॥

---

१ ऐक्य.

यदहंकारमाश्रित्य न योत्स्य इति मन्यसे ॥
मिथ्यैष व्यवसायस्ते प्रकृतिस्त्वां नियोक्ष्यति ॥ ५९ ॥

पोटीं अहंकार धरूनि शुद्ध
तूं बोलशी मी करितों न युद्ध ।
तें सर्व खोटें प्रकृती तुझी ही
लावील युद्धास बळेंच पाहीं ॥ ५९ ॥

स्वभावजेन कौंतेय निबद्धः स्वेन कर्मणा ॥
कर्तुं नेच्छसि यन्मोहात्करिष्यस्यवशोऽपि तत् ॥ ६० ॥

श्लोक (भुजंगप्रयात).

स्वभावीक जें कर्म वांट्यास आलें
तयानें तुला अर्जुना बद्ध केलें ।
न भांडें म्हणे अज्ञ बुद्धी तुझी ही
परी भांडसी यांत संदेह नाहीं ॥ ६० ॥

ईश्वरः सर्वभूतानां हृद्देशेऽर्जुन तिष्ठति ॥
भ्रामयन्सर्वभूतानि यंत्रारूढानि मायया ॥ ६१ ॥

श्लोक (इंद्रवज्रा).

ह्या सर्वभूतीं परमेश[2] आहे
जो अंतरीं नित्य भरून राहे ।
तो सूत्र हातीं धरुनी रहातो
प्राण्यास नानापरि नाचवीतो ॥ ६१ ॥

---

१ मनोवृत्ति. २ परमेश्वर.

तमेव शरणं गच्छ सर्वभावेन भारत ॥
तत्प्रसादात्परां शांतिं स्थानं प्राप्स्यसि शाश्वतम् ॥ ६२ ॥

श्लोक (वसंततिलका).

आहे समस्त भरला जगतांत तोच
जाईं तया शरण भाव धरूनि हाच ।
त्याच्या कृपेंकरुन शांति मिळेल थोर
जाशील शाश्वतपदा त्यजें सर्व घोरें[1] ॥ ६२ ॥

इति ते ज्ञानमाख्यातं गुह्याद्गुह्यतरं मया ।।
विमृश्यैतदशेषेण यथेच्छसि तथा कुरु ॥ ६३ ॥

हें ज्ञान बा परम गुह्य बहूत नामीं[3]
तूं मत्सखा[4] ह्मणुनियां उपदेशिलें मीं[5] ।
ह्याचा मनीं धरुनि पूर्ण विचारहेतू
वाटेल तें मग पुढें करि अर्जुना तूं ॥ ६३ ॥

सर्वगुह्यतमं भूयः शृणु मे परमं वचः ॥
इष्टोऽसि मे दृढमिति ततो वक्ष्यामि ते हितम् ॥ ६४ ॥

गुह्यांतलें परम गुह्य बहूत एक
तें शेवटीं कथितसें तुज नीट ऐक ।
माझा सखा परम तूं बहु बुद्धिमंत
ह्याकारणें तव हितास्तव हा उदंत[2] ॥ ६४ ॥

१ टाक. २ दुःख. ३ योग्य. ४ माझा सखा. ५ हें भाषण.

मन्मना भव मद्भक्तो मद्याजी मां नमस्कुरु ॥
मामेवैष्यसि सत्यं ते प्रतिजाने प्रियोऽसि मे ॥ ६५ ॥

श्लोक (भुजंगप्रयात).

तुझें चित्त हें ठेव माझ्या स्वरूपीं
नमस्कार पूजाहि मातेंचि अर्पी ।
तरी पावसी मत्पदा निश्चयानें
प्रतिज्ञा अशी भोगितों मन्मुखानें ॥ ६५ ॥

सर्वधर्मान्परित्यज्य मामेकं शरणं व्रज ॥
अहं त्वा सर्वपापेभ्यो मोक्षयिष्यामि मा शुचः ॥ ६६ ॥

श्लोक (वसंततिलका).

हे अर्जुना सकल धर्म त्यजूनि भावें
येईं मला शरण तूं सुजनस्वभावें ।
पापें तुझीं हरुनि सर्व करीन मुक्त
माझ्या सख्या भिउं नको परिसें मदुक्त ॥६६॥

इदं ते नातपस्काय नाभक्ताय कदाचन ॥
न चाशुश्रूषवे वाच्यं न च मां योऽभ्यसूयति ॥ ६७ ॥

जो भक्तिहीन तपहीन तया नराला
इच्छी न जो श्रवणभक्ति करून त्याला ।
निंदा करील अथवा जन शुद्ध पापी
सांगूं नकोसच तया गुंज[2] हें कदापी ॥ ६७ ॥

---

१ माझें भाषण. २ गुह्य गोष्ट.

य इदं परमं गुह्यं मद्भक्तेष्वभिधास्यति ॥
भक्तिं मयि परां कृत्वा मामेवैष्यत्यसंशयः ॥ ६८ ॥

श्लोक (इंद्रवज्रा).

मद्भक्त जेथें असतील त्यांत
जो थोर श्रद्धा धरुनी मनांत ।
सांगेल हें गुह्य सख्या मुखानें
पावेल तो मत्प्रत निश्चयानें ॥ ६८ ॥

न च तस्मान्मनुष्येषु कश्चिन्मे प्रियकृत्तमः ॥
भविता न च मे तस्मादन्यः प्रियतरो भुवि ॥ ६९ ॥

त्याच्याहुनी थोर मला न कोणी
ह्या मानवामाजि मनांत आणी ।
होणार नाहीं कधिहीं जगांत
त्याच्याहुनी थोर पुढें खचीत ॥ ६९ ॥

अध्येष्यते च य इमं धर्म्यं संवादमावयोः ॥
ज्ञानयज्ञेन तेनाहमिष्टः स्यामिति मे मतिः ॥ ७० ॥

हा धर्म्य संवाद ह्मणेल प्रेमें
माझा तुझा जो जन नित्य नेमें ।
बा ज्ञानयज्ञें पुजिलें तयानें
मातें गमे हें तरि निश्चयानें ॥ ७० ॥

श्रद्धावाननसूयश्च शृणुयादपि यो नरः ॥
सोऽपि मुक्तः शुभाँल्लोकान् प्राप्नुयात्पुण्यकर्मणाम् ॥ ७१ ॥

श्रद्धा धरोनी परिसेल यातें
निंदी न पार्था कधिंही तयातें ।
पावेल नाकीं नर भाग्यवंत
जेथें रहाती नर पुण्यवंत ॥ ७१ ॥

कच्चिदेतच्छ्रुतं पार्थ त्वयैकाग्रेण चेतसा ॥
कच्चिदज्ञानसंमोहः प्रनष्टस्ते धनंजय ॥ ७२ ॥

कां ऐकिले बोलें[4] सख्या समस्त ?
एकाग्र सारे करुनी स्वचित्त ।
संमोहे[2] अज्ञान निघूनि सांगें[3]
गेला न हा कां अझुनीहि सांगें ॥ ७२ ॥

॥ अर्जुन उवाच ॥

नष्टो मोहः स्मृतिर्लब्धा त्वत्प्रसादान्मयाच्युत ॥
स्थितोऽस्मि गतसंदेहः करिष्ये वचनं तव ॥ ७३ ॥

अर्जुन—

श्लोक (भुजंगप्रयात).

स्मृती जाहली मोह नाशास गेला
प्रसादें[5] तुझ्या अच्युता विश्वपालाँ[6] ।
असंदेह[7] मी जाहलों हे अनंता
तुझीं भाषणें सर्व मानीन आतां ॥ ७३ ॥

---

१ शब्द. २ मोह. ३ संपूर्ण. ४ बोल. ५ कृपेनें. ६ विश्वास पालन करणाऱ्या. ७ निःसंशय.

॥ संजय उवाच ॥

इत्यहं वासुदेवस्य पार्थस्य च महात्मनः ॥
संवादमिममश्रौषमद्भुतं रोमहर्षणम् ॥ ७४ ॥

संजय–

श्लोक (इंद्रवज्रा).

संवाद नारायणअर्जुनांचा
राजा महा अद्भुत होय साचा ।
ऐकोनि मातें बहु प्रेम दाटे
अद्यापि येती शरिरास कांटे ॥ ७४ ॥

व्यासप्रसादाच्छ्रुतवानेतद्गुह्यमहं परम् ॥
योगं योगेश्वरात्कृष्णात्साक्षात्कथयतः स्वयम् ॥ ७५ ॥

संवाद हा गुह्य असे महान
म्यां ऐकिला व्यासकृपेंकरून ।
साक्षात योगेश्वर कृष्ण यानें
सांगीतला हा अपुल्या मुखानें ॥ ७५ ॥

राजन्संस्मृत्य संस्मृत्य संवादमिममद्भुतम् ॥
केशवार्जुनयोः पुण्यं हृष्यामि च मुहुर्मुहुः ॥ ७६ ॥

कृष्णार्जुनाच्या मुखिंचा नृपाळ[1]
हा पुण्यसंवाद महा रसाळ ।
पुन्हा पुन्हा आठवतो जिवाला
पुन्हा पुन्हा हर्ष गमे मनाला ॥ ७६ ॥

---

१ हे राजा.

तच्च संस्मृत्य संस्मृत्य रूपमत्यद्भुतं हरेः ॥
विस्मयो मे महान् राजन् हृष्यामि च पुनः पुनः ॥ ७७ ॥

मोठें हरीचें किति विश्वरूप
पुन्हा पुन्हा तें[1] अठवे स्वरूप ।
आश्चर्य राजा मज फार वाटे !
पुन्हा पुन्हा हर्ष मनांत दाटे !!!॥ ७७ ॥

यत्र योगेश्वरः कृष्णो यत्र पार्थो धनुर्धरः ॥
तत्र श्रीर्विजयो भूतिर्ध्रुवा नीतिर्मतिर्मम ॥ ७८ ॥

प्रत्यक्ष योगेश्वर कृष्ण जेथें
गांडीवधारी नरवीर जेथें ।
नीती जयश्री तिकडे नृपाला
निश्चित वाटे मम मानसीं[2]ला ॥ ७८ ॥

इति श्रीमद्भगवद्गीतासूपनिषत्सु ब्रह्मविद्यायां योगशास्त्रे श्रीकृष्णार्जुनसंवादे मोक्षसंन्यासयोगो नाम अष्टादशोऽध्यायः ॥ १८ ॥

अठरावा अध्याय समाप्त.

ह्यांत संन्यासानें मोक्ष कसा प्राप्त होतो हें निरूपण केलें आहे, म्हणून यास " मोक्षसंन्यासयोग " असें नांव आहे.

इति श्रीमद्भगवद्गीता समाप्ता.

१ अकराव्या अध्यायांत सांगितलेलें. २ माझ्या मनाला.

ग्रंथ कर्त्याची प्रार्थना.

श्लोक (कामदा).

श्लोकमौक्तिकें सातशें खरीं
बोलिली मुळीं व्यासवैखरी ।
तीं प्रवेशुनी मन्मनोरथीं
बोलवी मुखें पार्थसारथी ॥ १ ॥

मंदबुद्धि मी अज्ञ संस्कृतीं
भक्तवत्सला ही तुझी कृती ।
स्वत्प्रसाद हा विश्वपालका
धन्य या करी आजि बालका ॥ २ ॥

श्रीहरी स्वयें शब्दमौक्तिकें
देइ अर्जुनालागिं कौतुकें ।
वर्णिली कथा तीच भारतीं
व्यासबुद्धिची तीव्रता किती ॥ ३ ॥

तीं कळावया प्राकृतांप्रती
वेंचिलीं पहा म्यां यथामती ।
पद्यरूप हा हार गुंफिला
सादरें जनालागिं अर्पिला ॥ ४ ॥

आवडो जनालागिं आगळा
मान्य होउनी शोभवूं गळा ।
राजहंस ते स्वाद घेतिल
माझिया श्रमा मान देतिल ॥ ५ ॥

कृष्णजी दिसे बोलला जरी
बोलला प्रभू जाण वैखरी ।
काय पामरा शक्ति हो मला
अंतरीं प्रभू जाण बोलिला ॥ ६ ॥

पूर्ण तेवढें बोलला हरी
गौण तें वदे आत्मवैखरी ।
खूण ही तुह्मी अंतरीं धरा
विस्मृती न हो जोंडितों करा ॥ ७ ॥

श्लोक (शार्दूलविक्रीडित).

गीतामौक्तिकहार हा स्वमतिनें मोठ्या श्रमें गुंफिला
नम्रत्वें सरलार्थ जोडुनि तया म्यां सज्जना अर्पिला ।
कोणी वाइट चांगलें मज ह्मणू जें पाहिजे तें करू
सारे वंद्य तुह्मी सदैव मजला मी तूमचें लेंकरूं ॥ ८ ॥

ग्रंथीं ह्या अढळेल न्यून बरवें जें वाचतां त्वन्मना
तें मातें अतिआदरें कळविणें ही प्रार्थना सज्जना ।
ईशा वंदुनि शेवटीं सविनयें मी एक मागें वर
कीं सेवा तुमची घडो पुनरपी या हातुनी सत्वर ॥ १ ॥

समाप्त.

